IRBK-0100246

म ग्र सं वाचनालय शाखा ठाणे
विषय चरित्र
दा क्र २४६

IRBK-0100246

# प्रिन्स बिस्मार्क.

( तृतीय खंड. )

यांच्या आयुष्यक्रमावर विशेष लक्षहि होतें. याच लेखकांनीं लिहिलेलीं पुस्तकें आधारभूत घेऊन त्यावरून हें चरित्र लिहिल्यामुळें तें किती विश्वसनीय झालें असेल याबद्दल स्पष्टीकरण करण्याचें कारण नाहीं. एकंदरींत हें चरित्र म्हणजे खऱ्या बिस्मार्कचें चरित्र होय. ते जसे होते, तसेच या चरित्रांत दिसून येतील.

स्वतंत्रपणें चरित्रग्रंथ प्रसिद्ध करण्याचा भारत-गौरव-ग्रंथमालेचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें तो आमच्या आश्रयदात्यांना कितपत आवडतो, याविषयी आम्हांला बरीच काळजी वाटत होती; परंतु आश्रयदात्यांनीं आम्हांस निरुत्साह न करतां उलट उत्साहित केलें आणि ' कादंबऱ्यांपेक्षां आपणास चरित्रेंच अधिक आवडतात ' असें त्यांनीं आमच्या अनुभवास आणून दिलें. कादंबऱ्यांपेक्षां या चरित्राच्या अधिक प्रती आम्हास छापाव्या लागल्या, हीच महाराष्ट्रियांच्या आवडीची साक्ष होय. केवळ वाङ्मयासच नव्हे, तर राष्ट्र व समाज यांसहि चरित्रग्रंथ हे केव्हांहि उपकारकच असतात. त्यांतून आतां काळ बदलला असून तो एकसारखा बदलतच चालला आहे. या काळाच्या ओघांत आमच्या देशाची उदयोन्मुखता स्पष्ट होऊं लागली असून साऱ्या जगांत विलक्षण खळवळ उडाली आहे. अशा वेळीं असामान्य व जगत्वंद्य अशा दोहों प्रकारच्या पुरुषांची ओळख करून घेणें व त्यांच्या चरित्राचा मनःपूर्वक अभ्यास करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. ग्रंथांचा संग्रह हा केवळ स्वतःसाठीं करावयाचा नसतो, तर स्वतः-बरोबर भावी पिढीचेंहि त्यांत कल्याण पाहवयाचें असतें. भावी पिढीसाठीं ठेवावयाचा हा ठेवा पवित्र व कल्याणकारक असला पाहिजे, हें कोणासहि समजण्यासारखें आहे. चरित्राबरोबरच सर्वोत्कृष्ट कादंबऱ्या वाचण्याची आवड असणेंहि स्वभाविक आहे; परंतु शृंगारिक, पाणचट व कांहीं तरी भाकड-कथांच्या कादंबऱ्यांचा संग्रह करणें म्हणजे आपल्या मुलाबाळांना निस्तेज, दुर्बळ व अविवेकी करण्यासाठीं विष विकत घेणें होय. निदान पुस्तकसंग्रहाच्या बाबतींत तरी या तत्परतेस विसंबतां कामा नये.

यावरून आमच्या आश्रयदात्यांपैकीं ज्यांना कादंबऱ्या वाचण्याची आवड विशेष आहे, त्यांना आम्ही निराश व निरुत्साह करीत आहों, असें कोणींहि समजूं नये. आजपर्यंत ग्रंथमालेंतून जशा सर्वोत्कृष्ट कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या, तशा या पुढेंहि प्रसिद्ध होतील; परंतु मधून मधून चरित्रेंहि प्रसिद्ध होतील. चरित्रें वाचण्याचा ज्यांना कंटाळा असेल त्यांनीं यामुळें घाबरून जाण्याचें कांहीं कारण नाहीं. जनतेच्या हातीं ज्यांचीं चरित्रें खरोखरच असावयाला पाहिजेत, असे थोर

पुरुष केव्हांहि हाताच्या बोटावर मोजण्या इतके असतात आणि अशाच थोर महात्म्यांचीं चरित्रें भारत-गौरव-ग्रंथमालेंतून प्रसिद्ध व्हावयाचीं असल्यामुळें चरित्रामागून चरित्रें प्रसिद्ध होतील, अशी भीति कादंबरीच्या चहात्यांनीं बाळगूं नये.या पुढें ग्रंथमालेंतून लवकरच **विद्वज्जनसभा** या नांवाची अगदींच नव्या प्रकारची कादंबरी प्रसिद्ध होईल. या सामाजिक कादंबरींत विद्वानांचा रहस्यमय आयुष्यक्रम रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारची कादंबरी मराठींत हीच पहिली असून ती सदुपदेशक, चित्ताकर्षक, व हृदय हलवून सोडणारी आहे. अलीकडच्या कांहीं नामधारी विद्वानांच्या सभा, त्यांच्या संस्था व त्यांचे उद्योग, यांची अत्यंत विलक्षण; पण तितकींच खरी व मनोरंजक माहिती या कादंबरींत फारच कुशलतेनें दिली आहे. समाजसेवेच्या मनोहर पडद्यामागें या विद्वानांचे कोणते विचित्र उद्योग चालतात, याचें चित्र या कादंबरींत अगदीं यथातथ्य असें उठविण्याचा यत्न केला आहे. हें चित्र पहात असतां उद्वेग उत्पन्न होतो, तर केव्हां संतापहि येतो. केव्हां डोळे अश्रूंनीं भरून येतात, तर केव्हां हंसूहि येतें.

शेवटीं एका दुःखकारक गोष्टीचा येथें मोठ्या कष्टानें उल्लेख करावा लागत आहे. ज्यांच्या प्रोत्साहनामुळें भारत-गौरव-ग्रंथमालेला मूर्तरूप प्राप्त झालें आणि ज्यांच्या कृपेनें ग्रंथमालेचें एकसारखें संवर्धन होत गेलें, त्या आमच्या मित्रवर्गापैकीं सुप्रसिद्ध कर्नाटक छापखान्याचे मालक रा. गणपतराव कुळकर्णी यांना कालानें अकालीं ओढून नेल्यामुळें ग्रंथमालेचा मोठा पाठिंबा नाहींसा झाला आहे. ग्रंथमालेनें प्रसिद्ध केलेल्या सव्वीस पुस्तकांपैकीं बारा पुस्तकें एकट्या कर्नाटक छापखान्यांत छापलेलीं आहेत, हें लक्षांत आणलें म्हणजे ग्रंथमालेचा आणि रा. गणपतराव यांचा ऋणानुबंध कसा होता, हें सहज कळून येईल. प्रसवावस्थेंत ग्रंथमालेचें जीवित संशयास्पद व सांपत्तिक दृष्टीनें दुर्बळ असतां रा. गणपतराव यांनीं ग्रंथमालेचें कार्य हातीं घेण्यास कसलाच किंतु मनांत आणला नाहीं; ही आठवण ग्रंथमालेच्या चालकांच्या चित्तांतून केव्हांहि जाणार नाहीं. असल्या हितेच्छु मित्रास मुकल्यामुळें ग्रंथमालेचें जें नुकसान झालें आहे तें कशानेंहि भरून येणार नाहीं.

गिरगांव,
मुंबई ता. २५ जून १९१८.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प चोविसावें.

# प्रिन्स बिस्मार्क.

(तृतीय खंड.)



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

IRBK-0100246

१९१८

(सर्व हक्क स्वाधीन.)

साधी प्रत चवदा आणे.] [कापडी प्रत दीड रुपया.

युद्धजन्य महागाईमुळें किंमत वाढविली आहे.

PUBLISHED BY
P. S. BHASE,
MANAGER,
**Bharat Gourav Granth Mala.**
GIRGAON-BOMBAY.

Printed by
M. N. Kulkarni
at the Karnatak Press,
434, Thakurdwar,
Bombay.

२०५

# प्रकाशकाचे दोन शब्द.

परमकृपावान् भगवंताच्या कृपेनें भारत-गौरव-ग्रंथमालेचें हें चोविसावें पुष्प तयार झालें असून आश्रयदात्यांच्या सेवेला तें आम्ही प्रेमपूर्वक सादर करीत आहों. प्रिन्स बिस्मार्कचें हें लहानसें चरित्र पुरें होण्यास बराच कालावधि लागला हें खरें; परंतु या चरित्रास अवश्य अशी लेखनसामग्री आमच्या हातीं वेळेवर न पडल्यामुळें साहजिक उशीर झाला. केवळ चरित्राच्या वाचकांना यामुळें बराच वेळ वाट पाहावी लागली, याबद्दल आम्ही दिलगीर आहों; परंतु हें पुरें झालेलें चरित्र पाहून ते आपला राग पार विसरतील असा आम्हांस भरंवसा आहे. चरित्रग्रंथ या दृष्टीनें त्यांत कांहीं उणेपणा राहूंनये व बिस्मार्क जसे होते, तसेच ते वाचकांना दिसावेत म्हणून आम्हांस बरींच पुस्तकें गोळा करणें भाग झालें. हल्लींच्या युद्धाच्या धामधुमींत हीं पुस्तकें परदेशांतून फारच आस्तेकदम वाट चाललीं आणि यामुळें हें चरित्र लवकर संपविण्याची इच्छा असूनहि बराच उशीर झाला.

बिस्मार्कसारख्या राजकारणपटु मुत्सद्याच्या चरित्राची हल्लींच्या स्थितींत किती आवश्यकता आहे, हें कोणास स्पष्ट सांगावयास नको. स्वराज्याचे आशावादी स्वर चोहोंकडे निनादित होत आहेत. अशा वेळीं राजकारणाचा अभ्यास ज्यांना सद्धेतुपूर्वक करावयाचा असेल, त्यांना या चरित्राचा अत्यंत उपयोग होईल. तसेंच चरित्रग्रंथ कसा असावा याची कल्पनाहि या चरित्रावरून चांगली येईल, असें आम्हांस वाटतें. या जर्मन मुत्सद्याचीं इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध झालेलीं कांहीं चरित्रें या पूर्वींच आमच्या पाहण्यांत आलीं होतीं; परंतु तीं वाचून पाहून बिस्मार्क यांचें चरित्र मराठींत लिहावें, असा आम्हांस लोभ उत्पन्न झाला नाहीं व त्यावरून खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या नानाफडणविसांचीहि आठवण झाली नाहीं. जे. डब्ल्यू. हेडलेम, चार्लस लो, एम. स्मिथ, एफ. एम. पोविक या लेखकांनीं लिहिलेलीं बिस्मार्क यांचीं चरित्रें आम्हीं मुद्दाम काळजीपूर्वक वाचून पाहिलीं; परंतु ज्या राजकारणपटुतेमुळें बिस्मार्क इतक्या सुप्रसिद्धीस आले, ती राजकारणपटुता इतक्या चरित्रांतून कोठेंच विशद झालेली दिसेना. या मुत्सद्याची खरी ओळख कां होत नाहीं, याचा आम्हांस

उलगडा होईना; परंतु लवकरच लहानपणीं शाळेंत शिकत असलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासाची आठवण झाली आणि 'आपल्या देशाचा इतिहास आपणच लिहिला पाहिजे.' हें सूत्रहि तावडतोब लक्षांत आलें. अशा रीतीनें बिस्मार्क यांना ओळखण्याचा मार्ग ध्यानांत आल्यावर खरी माहिती मिळवावयाचा आम्हीं प्रयत्न केला आणि तो प्रयत्न कांहीं अंशीं सफळहि झाला.

ब्रूनो गारलेप नांवाच्या प्रसिद्ध जर्मन इतिहासकाराचा आणि बिस्मार्क यांचा चांगला परिचय होता. या ब्रूनो गारलेपनें Germany's Iron Chance-lor ( जर्मनीचे वज्रबाहू प्रधान ) या नांवाचें बिस्मार्क यांचें जर्मन भाषेंत फारच चांगलें चरित्र लिहिलें आहे. या चरित्राचें इंग्रजी भाषांतर Sidney Whitman F. R. G. S. या विद्वान इंग्रज गृहस्थानें केलें असून तें अमेरिकेंतल्या वारनर कंपनीनें प्रसिद्ध केलें आहे. वरील सिडने व्हिटमन यांचा आणि बिस्मार्क यांचा चांगला परिचय होता; 'बिस्मार्क संबंधानें आपल्या स्वतःच्या आठवणी ' या नांवांचें त्याचें एक पुस्तक प्रसिद्ध आहे. वर सांगितलेल्या वारनर कंपनीनें प्रसिद्ध केलेल्या बिस्मार्क यांच्या चरित्राची किंमत पसतीस रुपये आहे. पृष्ठसंख्या अवघी ५०० आहे; परंतु पुस्तकाचा आकार मात्र फारच मोठा, म्हणजे १५×१० इंची आहे. हें चरित्र हातीं पडल्यावर मग मात्र खूप शर्तीनें राज्य राखणाऱ्या जर्मन नानाच्या कारस्थानाचा स्पष्ट चित्रपट डोळ्यापुढें उभा राहिला. मुख्यतःयाच पुस्तकाच्या आधारानें हें चरित्र मराठींत आम्हीं लिहिलें आहे. राजकारणाचा मनोरंजक इतिहास या दृष्टीनें हें पुस्तक मराठींत पहिलें असून मायभूमीचें कल्याण चिंतणाऱ्या कोणाहि गृहस्थ— चरित्रग्रंथावरून खऱ्या राजकारणाचा चांगल्या रीतीनें अभ्यास करता [illegible]

बिस्मार्क यांचें हें चरित्र लिहितांना वरील पुस्तकाशिवाय दु[illegible] पुस्तकाचाहि फार चांगला उपयोग झाला. डॉ. मारिट्झ बुश हे गृहस्थ इ. स. १८७० सालापासून बिस्मार्क यांचे सरकारी चिटणीस होते. त्यांनीं सुमारें अठ्ठावीस वर्षें बिस्मार्क यांची नौकरी केली. आपल्या समक्ष घडलेल्या व स्वतः बिस्मार्क यांनीं सांगितलेल्या हकीकतीचें टांचण ते दररोज करीत असत. या सर्व टांचणांचें समीकरण त्यांनीं Bismarck. Some secret pages of His History. या पुस्तकांत केलें आहे. या पुस्तकाचे मोठाले तीन भाग आहेत. वरील ब्रूनो गारलेप, सिडने व्हिटमन व डॉ. मारिट्झ बुश या तीनहि विद्वान गृहस्थांचा बिस्मार्क यांशीं चांगला परिचय असून बिस्मार्क

जर्मनीचे वज्रबाहु प्रधान

# प्रिन्स बिस्मार्क.

## तृतीय खंड.

### प्रकरण एकोणतिसावें.

### वर्तमानपत्रांचीं मतें.

बिस्मार्क यांस आलेल्या अनेक मानपत्रांपैकीं, पत्रांपैकीं, व तारांपैकीं विशेष महत्त्वांच्या लेखांस मात्र येथें स्थळ देण्यासारखें आहे, हें उघड आहे. कारण त्यांस आलेल्या या सर्व पत्रांचा संग्रह करूं म्हटलें, तर त्यांचे कित्येक ग्रंथ होतील. एका आठवड्याच्या अवधींत त्यांना साडेचार लक्ष पत्रें, नऊशें एकोणऐशीं पाकिटें, २०५ रजिस्टरपत्रें व सुमारें दहा हजार तारा आल्या. त्याचप्रमाणें त्यांच्या जन्मदिवशीं भेटीदाखल बाराशें पार्सलें आलीं.

शहांनीं बिस्मार्क यांस पुढील अभिनंदनपर संदेश पाठविला.

नें राष्ट्राची व माझ्या घराण्याची जी सेवा तुह्मीं बजाविली आहे, तिजबद्दल अंतःकरणपूर्वक मी आपले आभार मानतों. आपल्या नांवाचा अभिमान साऱ्या जर्मन साम्राज्यास अनंत काळ राहील. आपल्या आयुष्याच्या सायंकाळीं परमेश्वराचा आशीर्वाद आपणावर असावा, असें मागणें मी त्याजपाशीं मागतों."

रीशान्झींगर नांवाच्या सरकारी पत्रानें बिस्मार्क यांच्या जन्मदिवशीं एक अग्रलेख लिहिला होता, त्यांत त्यानें पुढील उद्गार काढले आहेत.

बिस्मार्क यांच्या वयास आज ऐशी वर्षें पूर्ण झालीं आहेत. जर्मन राष्ट्राची जी सेवा त्यांनीं कायावाचामनेंकरून केली, तिजबद्दल साऱ्या जर्मनांच्या मनांत त्यांजबद्दल पूज्यभाव किती पक्का वसत आहे, याची साक्ष गेल्या एक दोन आठवड्यांत सर्वांस पूर्णपणें पटली. सामान्य नागरिकापासून तों राजेरजवाड्यां-पर्यंत व जवळच्या आणि लांबच्या अनेक लोकांकडून त्यांस जे हजारों अभि-नंदनपर संदेश आले, त्यांजवरून जर्मनीचा त्यांजबद्दलचा पूज्यभाव पूर्ण व्यक्त होत आहे. परमेश्वरानें जर्मनीच्या या दिव्य पुत्रास पुष्कळ आयुरारोग्य द्यावें, अशी प्रार्थना सर्व जर्मन राष्ट्र आज करीत आहे. आपल्या शूर धन्याची नोकरी करून त्याच्या मदतीनें बिस्मार्क यांनीं विभागलेल्या जर्मनीची एकी केली. तेंच जर्मन साम्राज्य दिवसेंदिवस अधिक मजबूत व अधिक बलाढ्य होत गेलेलें पाहण्यास परमेश्वरानें बिस्मार्क यांस आयुष्य द्यावें अशी आमची इच्छा आहे.

बिस्मार्क यांच्या वाढदिवशीं बादशहाप्रमाणेंच इतर राजेरज-वाड्यांकडूनहि अभिनंदनपर संदेश त्यांस आले. वर्टेंबर्गच्या राजाकडून पुढील संदेश आला होता.

पितृभूमीची विनमोल सेवा बजावून जर्मन साम्राज्य निर्माण करण्याचें जें महत्कार्य आपण पार पाडलें, त्याजबद्दल आपले मनःपूर्वक आभार मानल्या-शिवाय मला राहवत नाहीं. जर्मन इतिहास जिवंत राहील, तोंपर्यंत आपल्या नांवासहि त्यांत अक्षय स्थान मिळेल. परमेश्वरानें आपणास दीर्घायुरारोग्य द्यावें, असें मी त्याजपाशीं मागतों.

ग्रँडड्यूक जॉर्ज आलेक्झांडर यांजकडून पुढील तार आली होती.

" आज सारें जर्मनराष्ट्र आपलें अभिनंदन करून आपले अंतःकरणपूर्वक आभार मानीत आहे. सदोदित सदिच्छा बाळगून तिच्या पूर्तीकरतां शक्य ती खटपट आपण जन्मभर केली. त्यामुळें आपल्या मनाला सदोदित शांती राहील यांत शंका नाहीं. या शांतीचा दीर्घकाळ उपभोग आपणास मिळावा, अशी मी परमेश्वरास प्रार्थना करतों."

सर्व पत्रांस व तारांस व्यक्तिशः उत्तर देणें अर्थातच शक्य नव्हतें. तेव्हां बिस्मार्क यांनीं हँबर्गच्या एका पत्रांत पुढील आभारदर्शक पत्र प्रसिद्ध केलें.

" जर्मनीच्या साऱ्या भागांतून व बाह्यदेशांच्या आणि विशेषतः अमेरिकेंतील जर्मन रहिवाशांकडून मला अभिनंदनपर पत्रें व तारा इतक्या आल्या कीं, त्यांस व्यक्तिशः उत्तर देणें मला शक्य नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. याकरतां मजकडून व्यक्तिशः उत्तरें न आल्यामुळें ज्या माझ्या मित्रांस राग आ असेल, त्यांनीं मला क्षमा करावी.

बिस्मार्क."

जर्मनींतील सर्व पत्रांनीं या प्रसंगीं अग्रलेख लिहून बिस्मार्क यांची स्तुति केली होती.

बिस्मार्क यांनीं स्थापन केलेल्या क्रूझ झिटंग पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

" क्रूझ झिटंग पत्राच्या आयुष्यांतील अत्यंत महत्वाच्या दिवसांचा संबंध बिस्मार्क यांच्या नांवाशीं कायमचा जोडला गेला आहे. याबद्दल आह्मांस अत्यंत अभिमान वाटतो. बिस्मार्क यांशीं अनेक बाबतींत अनेक वार.आमचा मतभेद झाला आहे; तथापि या ऐतिहासिक पुरुषांनीं जीं महत्कार्यें संपादिलीं तीं विसरणें आह्मांस शक्य नाहीं. त्यांजबद्दल कोणाच्याहि मनांत पूज्यभाव उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. आपण एक सामान्य मनुष्य आहों, असें बिस्मार्क स्वतः म्हणतात; पण आजपर्यंतच्या महाबुद्धिवान् म्हणून नाणावलेल्या मुत्सद्यांसहि जें कार्य करतां आलें नाहीं, तें बिस्मार्क यांनीं करून दाखविलें आहे. अत्यंत उच्च साध्य पुढें ठेवून कोणत्याहि अकार्यानें आपले हात मलिन होऊं न देतां तें कार्य सिद्धीस नेणारा त्यांच्या शिवाय दुसरा मुत्सद्दी जगाच्या इतिहासांत आजपर्यंत झाला नाहीं.

रीशबोट पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

" जर्मनसाम्राजाच्या अंतरंगांतील साऱ्या विचारांची एकत्र ओतलेली मूस जर कोणास पहावयाची असेल, तर त्याला ती प्रिन्स बिस्मार्क यांच्या ठिकाणीं आढळेल. पक्षभेदांमुळें उत्पन्न झालेली सारी खळबळ आज निघून गेली असून बिस्मार्क यांस त्यांच्या शुद्ध रूपांत आज आपण पहात आहों. बुद्धिमान् मुत्सद्दी, जर्मन राष्ट्राचे निर्माण कर्ते व आपल्या राजाचे व आपल्या देशबांध-

चांचे भक्त; एवढयाच शुद्ध समवायी रूपानें बिस्मार्क आज आपणापुढें उभे आहेत."

बर्लिन येथील दुसऱ्या एका पत्रानें पुढील मजकूर प्रसिद्ध केला.

खुद्द बादशहा, इतर राजे, सर्व प्रकारच्या संस्था, विश्वविद्यालयें, ग्रामसंस्था व जर्मन राष्ट्रांतील सामान्य जनता हीं सारीं एक दिलानें बिस्मार्क यांस नमन करीत आहेत. अशा प्रकारचा अद्वितीय पुरुष आपल्या भूमींत नाहीं, म्हणून जगांतील प्रत्येक राष्ट्र जर्मनीचा हेवा करीत आहे. जर्मन राष्ट्र जिवंत आहे, तोंपर्यंत त्याच्या नांवाशीं बिस्मार्क यांचें नांव अखंड संलग्न राहील. पिढयांमागें पिढया येतील व जातील, साम्राज्याला कधीं भले, तर कधीं बुरे दिवस येतील; पण जर्मनीची स्थिति भविष्यत् काळीं कशीहि असली, तरी तारीख ३१ जानेवारी इं० स० १८६४ रोजीं ईडर नंदी पार झाल्या दिवसापासून तों तारीख १८ जानेवारी इ० स० १८७१ पर्यंत गेलेला अत्यंत उज्वल काळ जर्मनीस पुन्हा दिसणार नाहीं. त्याप्रमाणें आज ज्या स्वस्थतेचा लाभ जर्मनीच्या वांट्यास आला आहे, तशी देदीप्यमान शांतीहि जर्मनीला पुन्हा लाभणार नाहीं. जगानें तोंडांत बोट घालून रहावें, अशा प्रकारचे जे जे चमत्कार गेल्या कांहीं वर्षांत जर्मनींत घडले, त्या प्रत्येक चमत्काराशीं बिस्मार्क यांचें नांव जोडलें गेलें आहे. या प्रत्येक गोष्टीच्या आठवणीबरोबर बिस्मार्क यांच्या नांवाचें स्मरणहि आमच्या वंशजांस झाल्याशिवाय राहणार नाहीं."

न्याशनल झिटंग पत्रानें बिस्मार्क, ल्यूथर आणि शीलर या त्रिमूर्तीस एका पंक्तीस बसवून तिचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

भविष्यत्काळीं जेव्हां पक्षभेद विसरून गेलेले असतील व अत्यंत सान्निध्यामुळें जो अनादर अवश्य उत्पन्न होतो, तो नाहींसा होऊन बिस्मार्क यांचें व्यक्तित्व दूर काळाच्या अंधुक प्रकाशांत गेलें, म्हणजे त्यावेळीं ल्यूथर आणि शीलर यांच्या पंक्तींत बिस्मार्क यांचेंहि नांव घालणारा एकादा त्रयस्थ अवश्य निर्माण होईल. त्या वेळीं बिस्मार्क हे आपल्या पिढींतल्या जनतेचेंच कल्याण कर्ते नसून त्यांनीं भावी पिढ्यांचेंहि कल्याण करून ठेवलें आहे, असें निःसंशय सिद्ध होईल. ल्यूथर हा आमचा धर्मदाता आहे. शीलर यानें आह्मांस नव्या आकांक्षा उत्पन्न करून दिल्या. आमचें साध्य शीलर यानें आह्मांपुढें ठेवलें

आणि बिस्मार्क यांनीं आह्मांस जर्मन राष्ट्र ही संस्था दिली. लूथर, शीलर आणि बिस्मार्क या त्रयींत शुद्ध जर्मन प्रकृतीचीं बीजें सारखींच दिसतात. यांच्या प्रकृतिविशेषाची नक्कल कोणी विदेशी करूं म्हणेल, तर ती गोष्ट अगदीं अशक्य आहे. हे पुरुष अशा प्रकारें अद्वितीय असल्यामुळेंच आह्मांस अत्यंत प्रिय आहेत. कारण आमच्या राष्ट्राच्या विशिष्ट भावनांचें व प्रकृतिविशेषाचें शुद्ध आणि उत्तानरूप कोठें पहावयाचें असेल, तर आह्मांस या त्रयींत तें आढळेल."

ड्यूक व्यागेश झिटंग म्हणाले,

"जर्मन राष्ट्राची एकत्र ओतलेली मूस बिस्मार्क यांच्या ठिकाणीं आढळते. त्यांचें धैर्य, त्यांचा करारी बाणा, त्यांची एकनिष्ठा, त्यांचें सत्य, प्रामाणिकपणा आणि राजभक्ति हीं सारींच अवर्णनीय आहेत."

लिप्झिगर टेजब्लाट म्हणालें:—

राज्यनौकेचें सुकाणूं बिस्मार्क यांच्या हातून गेलें असलें, तरी जर्मनराष्ट्राचें खरें पुढारीपण अद्यापि ह्यांच्याच हातीं आहे."

श्वांबिष्र मरकर नांवाच्या पत्रानें म्हटलें:—

जर्मनींतील दूरदूरच्या संस्थानांतहि जर्मन ऐक्याचीं गाणीं गाणारे लोक किती तरी निर्माण होऊं लागले आहेत. दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेशापासून तों एल्ब नदीच्या मुखापर्यंत सर्वत्र बिस्मार्क यांचा जयजयकार ऐकूं येतो. एवढा जयजयकाराचा ध्वनि जर्मनींत पूर्वीं केव्हांहि दुमदुमला नव्हता. अशा स्थितींत मूठभर मत्सरी लोकांच्यानें काय होणार ?"

बिस्मार्क यांनीं एके वेळीं राजीनाम्याचा अर्ज पहिल्या वुइलियम बादशहास सादर केला असतां त्यांनीं त्यावर 'कधींच नाहीं' असा शेरा मारून तो नाकारल्याची हकीकत वाचकांच्या स्मरणांत असेलच. या गोष्टीस अनुलक्षून हॅंबर्ग येथील एका पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

"वृद्ध वुइलियम बादशहांचा 'कधींच नाहीं' हा शेरा प्रत्येक जर्मनानें आपल्या हृदयांत कोरून ठेवावा. बिस्मार्क यांनीं घालून दिलेलें उज्वल उदाहरण प्रत्येक खऱ्या जर्मनानें लक्षांत ठेवून तदनुरूप आपली वागणूक ठेवली पाहिजे. परिस्थिति वक्र अथवा सरळ असली, तरी कोणाच्याहि अनुकूल अथवा प्रतिकूल टीकेकडे लक्ष न देतां अंगीकृत कार्य चिकाटीनें पार पाडावयाचें हा बिस्मार्क यांनीं शिकविलेला धडा प्रत्येक खऱ्या जर्मनानें अंत:करणांत वाळगावा. त्याचप्रमाणें बिस्मार्क यांनीं गादीशीं दाखविलेली निष्ठाहि आपण आपलीशी करून घेतली पाहिजे. जर्मन साम्राज्याचें कल्याण हा एकच ध्यास बिस्मार्क यांस आहे. या हेतूच्या पूर्तीकरतां जी जी गोष्ट त्यांस अवश्य वाटे, ती करण्यांस आपण सज्ज झालें पाहिजे. आजतागाइत बिस्मार्क यांचे सारे अंदाज खरे ठरलेले आहेत. कित्येक गोष्टींबद्दल आरंभीं वाद असला, अथवा कित्येक गोष्टी आरंभीं चमत्कारिकशा दिसल्या, तरी अखेरीस त्यांचें मत बरोबर होतें, असेंच आजपर्यंत सिद्ध झालें आहे. याकरतां बिस्मार्क यांच्या बुद्धिमत्तेवर सर्वस्वी अवलंबून राहाण्यास आह्मांस कोणतीच हरकत दिसत नाहीं."

वेसर झिटंग पत्रानें पुढील उद्गार काढले.

"तारीख १ एप्रील रोजीं जर्मन साम्राज्यात आनंदाची अभूतपूर्व लाट उसळेल, असें बिस्मार्क यांजपाशीं त्यांच्या एका स्नेह्यानें म्हटलें होतें. अशा प्रकारचीं भाषणें बहुतेक प्रसंगीं निव्वळ औपचारिक असतात. त्यांत सत्याचा फारसा भाग नसतो; पण या प्रसंगीं मात्र हें भाषण सर्वथैव खरें ठरलें. इतकेंच नव्हे, तर ही आनंदाची लाट कल्पनेच्याहि बाहेर मोठी उसळली. सर्व जर्मन राष्ट्र एकदिलानें एका मनुष्याचें अभिनंदन करीत आहे, असा अनुभव यापूर्वी केव्हांहि आला नव्हता."

फ्रँकफुरटर झिटंग पत्र म्हणालें:—

"सर्व विस्कळीत जर्मन संस्थानांचें एकीकरण करून ज्यानें त्याचें बलाढ्य साम्राज्य बनविलें व त्या साम्राज्यांत दीर्घ काळपर्यंत शांतता राखली, त्या मुत्सद्यास आह्मीं मनोभावानें नमन करतों. संघटित जर्मन संस्थानांवर अखंड

तावा चालवूं पाहणाऱ्या मुत्सद्यास पूर्वीप्रमाणेंच आजहि आह्मी मान देत नसलों, तरी ज्यानें हें साम्राज्य निर्माण केलें, त्या वृद्ध मुत्सद्यास मान देण्यास आह्मांस दिक्कत वाटत नाहीं. बिस्मार्क यांच्या आयुष्याची ही सायंकाळ त्यांस सुखाची जावो, असें आह्मी इच्छितों."

जर्मनीप्रमाणेंच आष्ट्रियांतील पत्रांनींहि अनेक स्तुतिपर लेख लिहिले होते. वुइनर फ्रेम डेनब्लाट पत्र म्हणालें:—

" बिस्मार्क यांच्या नजरे समोर उच्च दर्जाचें साध्य होतें. राजकीय बाबींत त्यांचा हात धरणारा दुसरा मुत्सद्दी आज नाहीं. त्यांचा देशाभिमान व त्यांची राजभक्ति यांस दुसऱ्या कोठेंहि जोड सांपडणार नाहीं. त्यांच्या आंगीं देशाभिमान आनखशिखांत भरून राहिला होता. ज्या जमिनदार वर्गानें प्रशियाचें लहानसें संस्थान वाढवून त्याचें मोठें राज्य केलें, त्याच जमिनदार वर्गांत प्रिन्स बिस्मार्क यांचा जन्म झाला. प्रिन्स बिस्मार्क हे जन्मतः प्रशियन असले, तरी आतां ते जर्मन बनले आहेत. जर्मन ऐक्याचा सारा इतिहास कोणास एका ठिकाणीं पहाव-याचा असेल, अथवा जर्मन भावनांचें समवायीरूप कोणास पहावयाचें असेल, तर त्यानें बिस्मार्क यांस पहावें."

न्यू फ्रीप्रेस पत्र म्हणालें:—

आस्ट्रिया हंगेरी संस्थानांस युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांच्या पंक्तींत स्थान मिळालें, ज्या ऐतिहासिक घटनेनें ही गोष्ट घडून आली, व जीमुळें जर्मनीशीं आमचें सख्य जडलें, त्या घटनेचा पाया प्रिन्स बिस्मार्क यांनीं घातला. या करतां त्यांच्या वाढदिवशीं आस्ट्रिया-हंगेरीनेंहि त्यांचा सन्मान करणें इष्ट आहे."

मेगियार हिरलाप् पत्र म्हणालें:—

" त्रिकुटसंधी करून बिस्मार्क यांनीं युरोपची शांतता दीर्घ काळपर्यंत राखली. ही शांतता सशस्त्र सज्जपणाच्या पायावर उभारली असल्यामुळें ही मोठ्या खर्चाची बाब होऊन बसली आहे, ही गोष्ट खरी; पण रक्तपातापेक्षां हा खर्च अधिक जड आहे, असें नाहीं. ही शांतता राखण्याकरतां प्रजेला जड ओझें वहावें लागतें, ही गोष्ट आह्मी विसरलों आहों असें नाहीं; पण चालू परिस्थि-तींत तिजबद्दल कुरकुरतांहि येत नाहीं, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. इतक्या दीर्घकाळपर्यंत शांतता राखली, याबद्दल सर्वांनीं त्यांचें ऋणी असलें पाहिजे."

## प्रकरण तिसावें.

# मानपत्रें व उत्तरें.

तारीख ८ एप्रीलपर्यंत बिस्मार्क यांची प्रकृति फारशी चांगली नसल्यामुळें प्रतिनिधिमंडळांच्या भेटी त्यांस फारशा घेतां आल्या नाहींत. तारीख ८ एप्रील रोजीं प्रशियांतील सर्व शाळांतून सुमारें चारशें शिक्षक त्यांच्या भेटीसाठीं फ्रेड्रिकश्रू येथें आले होते. कालोन विद्यालयांतील प्रोफेसर जागर यांनीं शाळा गुरूंतर्फे बिस्मार्क यांचें अभिनंदन करून मिन्याच्या रंगांत केलेलें 'जर्मानिया' हें सुंदर चित्र त्यांस अर्पण केलें. तेव्हां बिस्मार्क यांनीं उत्तरादाखल पुढील भाषण केलें.

"सद्गृहस्थ हो! तुह्मी दिलेल्या मानपत्राबद्दल तुमचे मनःपूर्वक प्रथम आभार मानून उत्तरादाखल मी चार शब्द बोलतों; पण तसें करण्यापूर्वी तुह्मी आपलीं मस्तकें आच्छादित करावींत अशी मी विनंति करतों. असल्या प्रकारच्या खराब हवेंत डोकीं उघडीं ठेवल्यानें काय परिणाम होतो, याचा अनुभव मला स्वतःला आहे. निरनिराळ्या जर्मन संस्थानांतून सन्मानांचा वर्षाव मजवर होत आहे व त्याप्रमाणेंच तुह्मीहि आज माझा मान करीत आहां. जे देश कुळानें जर्मन नाहींत, अशा देशांतूनहि मजवर मानपत्रांची वृष्टि होत आहे. याचें कारण इतकेंच कीं, पहिल्या वुइलियम बादशहांच्या काळीं ज्या अनेक पुरुषांनीं एक महत्वाचें राष्ट्रकार्य संपादिलें त्यांचा वारसा आज मजकडे आला आहे. यामुळें त्यांना हक्कानें मिळणारा मान वारसदारीच्या नात्यानें मजकडे येत आहे. वास्तविक माझी योग्यता फार मोठी आहे, असें नाहीं. पण ज्या कीर्तिमान पुरुषांनीं एक महत्कार्य केलें, त्यांची कीर्ति त्यांच्या मागें राहिलेल्या एका व्यक्तीकडे येत आहे. यामुळें ज्यांच्या बरोबर मीं काम केलें, त्यांच्या कीर्तीचीहि प्राप्ती आज मलाच होत आहे. परमेश्वराच्या इच्छेनें त्यांच्यापेक्षां मला अधिक आयुष्य लाभलें अथवा माझ्या कार्यास तरुणपणींच मीं सुरुवात केली व त्यांनीं वृद्धापकाळीं केली. इतक्या मानास मी पात्र नसतां तो मला मिळाला असता, तर तो ग्रहण करण्याची मला फार लाज वाटली असती; पण हा मान वास्तविक त्यांचा आहे, ही जाणीव मला असल्यामुळें न लाजतां मी आज तुह्मांपुढें उभा आहें. केवळ व्यक्तीच्या दृष्टीनें पाहतां बुद्-

लियम बादशहांच्या सेवकमंडळांत मजकडे आलेलें कर्तव्य मीं केलें आणि परमेश्वराच्या आशीर्वादानें त्याला यश आलें, इतकेंच.

"माझें कार्य यशस्वी होण्यास शाळागुरूंचा आशीर्वादहि माझ्या कामीं पडला आहे, हें मी विसरलों नाहीं. शाळागुरूंस मीं ऋणी करून ठेवलें असल्याचा उल्लेख मानपत्रांत तुह्मीं केला आहे; पण हा परस्परविनिमय आहे, हें आपण ध्यानांत धरा. तुह्मी शाळागुरूंनीं आमच्या कार्याचा पाया भक्कम रीतीनें घातला नसता, तर आमचें कार्य यशस्वी झालें असतें, असें मला वाटत नाहीं. आमचें कार्य अत्यंत दुर्घट होतें. आपल्या राष्ट्रापैकीं सुशिक्षितांच्या व तरुणांच्या मनांत या कार्याचें बीजारोपण तुह्मीं केलें नसतें, तर आमचें कार्य खचित फसलें असतें. देशाभिमान व राजकीय परिस्थितीचा तारतम्यभाव ओळखतां येणें, या गोष्टी प्रत्येक सुशिक्षितास आवश्यक आहेत. मानवी आयुष्याच्या ज्या काळांत या गोष्टींचें व इतर गुणांचें बीजारोपण केलें जातें, तो काळ तुमच्या सहवासांत जातो. त्या काळांत विद्यार्थ्यांवर सारी देखरेख तुमची असते. विद्यार्थी एकोणीस वीस वर्षांचा होईपर्यंत त्याचें प्राथमिक व मध्यम शिक्षण तुमच्या हाताखालीं होतें. यानंतर त्याचा प्रवेश विश्वविद्यालयांत होतो. विश्वविद्यालयांतून बाहेर पडून विद्यार्थी गृहस्थाश्रमी झाला म्हणजे प्रपंचाच्या शालागृहांत तो शिक्षण घेतो. सामान्यतः एकोणीस वीस वर्षांपर्यंत जर्मन विद्यार्थी तुमच्या हाताखालीं असतो, असें म्हणावयास हरकत नाहीं; पण मनुष्याच्या आयुष्यांतील अत्यंत महत्वाचा काळ झाला, तर तो हाच. त्याच्या भावी आयुष्यांतील दानत याच काळांत रूपाला येऊन तिला निश्चित वळण लागत असतें. या काळीं ज्या गुणांचें बीज त्याच्या ठिकाणीं पेरलें जातें, ते गुण पुढें विश्वविद्यालयांत शिक्षणानें अथवा प्रपंचांतील व्यवहारानें बदलून जात नाहींत. कोणत्याहि देशांत झालें तरी सुशिक्षितांची संख्या थोडीच असावयाची. पण या थोड्या संख्येवरच देशाची वाढ मुख्यतः अवलंबून असते. सामान्य जनसमूहांत म्हणजे खालच्या वर्गांत असंतोष पसरला, तर राष्ट्रदेहाला जो रोग निर्माण होतो, तो तीव्र दिसत असला, तरी तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. त्याला योग्य औषध मिळाल्याबरोबर त्याचें शमन होतें. अशा प्रकारच्या व्याधींवर आपणापाशीं पुष्कळ औषधें आहेत; पण देशांतील मूठभर सुशिक्षितांत असंतोष पसरला, म्हणजे जो रोग उत्पन्न होतो, तो मोठा चिकट असतो. त्याचें स्वरूप लवकर उघडकीस येत नाहीं. तो हळूहळू व निश्चयानें वाढत असतांहि त्याचें निदान ठरवितां येत

नाहीं. यामुळें तो वरा होण्यास काळहि पुष्कळ लागतो. याकरतां सुशिक्षित जनसमूहाच्या मनोघटनेबद्दल विशेष प्रकारची काळजी प्रत्येक देशानें घ्यावयास पाहिजे, असें माझें मत आहे.

"गादीवर कोण व्यक्ति बसली आहे, या प्रश्नाला मी फारसें महत्व देत नाहीं. कारण राष्ट्राच्या भवितव्यतेच्या दोऱ्या त्यांतील सुशिक्षित जनांच्याच हातांत असतात. हें शिक्षणाचें कार्य तुमच्या हातांत आहे. तुमच्या हाताखालून गेल्यावांचून कोणाहि मनुष्याचा उपयोग सरकारी नौकर या नात्यानें होणार नाहीं. देशांत सुशिक्षित माणसें नसतील, तर तेथें पार्लमेंट ही संस्थाहि निर्माण होणार नाहीं. ज्या पार्लमेंटांत सुसंस्कृत पुढारी नाहींत, असलें पार्लमेंट असून नसून सारखेंच. पार्लमेंटांतहि पुढारीपण सुशिक्षीतांच्या हातीं आपोआपच येतें. आपली शिक्षणपद्धति हल्लींच्या प्रमाणें सशास्त्र पायावर रचली गेली नसती, तर सैन्यांतील कामगारांचा जो भरणा आज आपणास करतां येतो, तो कधींहि करतां आला नसता. सैन्यांतील अधिकारी वर्ग तयार करण्याची पद्धत फक्त आमच्याच देशांत आज अस्तित्वांत आहे. या पद्धतीचें अनुकरण करणें इतर देशांस शक्य नाहीं. या बाबींत दुसऱ्या कोणत्याहि देशाला आपलें अनुकरण करणें देखील शक्य नाहीं. मग आपली बरोबरी करण्याची गोष्ट तर बोलावयासच नको; पण अशा प्रकारें अधिकारी वर्ग तयार करणें हेंहि तुह्मीं दिलेल्या शाळाशिक्षणावरच अवलंबून असतें. तुह्मीं दिलेल्या शिक्षणाचें महत्व आपले श्रीमंत व्यापारीहि पक्कें ओळखून आहेत. 'जर्मनींत तयार झालेला' असे शब्द ज्या मालावर असतात, तो सर्व जगांतील इंग्रजी बाजारांतहि आज मान्य ठरूं लागला आहे, याचेंहि कारण हें शिक्षणच. अशा प्रकारचें शिक्षण तुम्हीं दिलें नसतें, तर आमच्या कारखान्यांची अशी अभूतपूर्व वाढ कधींहि झाली नसती. त्याचप्रमाणें समुद्राच्या परतीरावर वास करणाऱ्या जर्मन व्यापाऱ्यास हें जर्मन शिक्षण मिळालें नसतें, तर त्यांनीं आज केलेलें कार्यहि आपणास दिसलें नसतें. मी वसाहती संबंधीं म्हणत नाहीं; पण उत्तर व दक्षिण अमेरिका आणि युरोपांतील इतर देश यांच्याशीं आपलें दळणवळण ठेवणें ही गोष्ट मुख्यतः व्यापारी वर्गाच्या हातांत आहे. आणि हें कार्य पार पाडण्यास समर्थ असा व्यापारी वर्ग अशा प्रकारच्या शिक्षणावांचून कधींहि निर्माण झाला नसता.

"आमच्या शाळांतून व पाठशाळांतून जर्मनीच्या तरुणांच्या मनांत पेरल्या जाणाऱ्या शिक्षणाचे परिणाम राजकीयदृष्ट्या काय होतात, याबद्दल मीं आणखीहि सविस्तर चर्चा केली असती, पण अशी शुष्क चर्चा करीत बसण्यापेक्षां माझ्या अनुभवाचें एक प्रत्यक्ष उदाहरण तुह्मांस सांगितलें असतां या विषयाचें स्पष्टीकरण अधिक चांगलें होईल. [व्हर्सेलिस येथें आमचा तळ असतां माझें बिऱ्हाड एका फ्रेंच बाईच्या घरीं होतें. एके वेळीं तिच्या मुलाच्या कांहीं शाळेंतल्या चोपडया मी सहज चाळीत बसलों होतों. त्यांत कित्येक ठिकाणीं जीं अत्यंत हास्यास्पद आणि खोटीं अशीं ऐतिहासिक विधानें मीं पाहिलीं, त्यानें मी अगदीं गुंगच होऊन गेलों. असल्या प्रकारच्या अगदीं खोट्या गोष्टी फ्रेंच मुलांच्या मनांत कशा भरवून दिल्या जातात, याचें मला मोठें नवल वाटलें. असल्या शिक्षणाचा परिणाम तरी काय होतो? याचा परिणाम इतकाच कीं, आरंभापासूनच तरुण फ्रेंचांच्या मनावर आपल्या राष्ट्रवैभवाच्या खोट्या कल्पना उत्पन्न होतात. जगांत सर्व शक्तिमान होण्यास आपलेंच कायतें राष्ट्र मात्र आहे, अशी दंभमूलक भावना त्याच्या मनांत दृढ होते. यामुळें जगाच्या प्रपंचांत तो जेव्हां प्रवेश करतो, तेव्हां या दुरभिमानाचा त्याच्या चित्तावर पूर्ण पगडा बसलेला असतो. मनुष्याचा पतनकाळ जवळ आला, म्हणजे दुरभिमान तेथें प्रथम आलेला असतो. ही म्हण आपणा सर्वांस ठाऊक आहेच. शालीनता हा गुण प्रत्येक मनुष्याच्या आणि त्याचप्रमाणें प्रत्येक राष्ट्राच्या आंगीं असणें अत्यंत आवश्य आहे. त्याचप्रमाणें प्रत्येकाला सत्याची चाडहि अवश्य असली पाहिजे. हे दोन गुण ज्याच्या आंगीं आहेत, त्याच्याच हातून जगांत महत्वाचीं कार्यें पार पडतात, असें मला वाटतें. जर्मन तरुणांच्या मनांत या दोन गुणांची जोपासना करण्यास तुह्मी कसूर करीत नाहीं, याबद्दल मला

फार आनंद होतो. आपल्या कर्तबगारीबद्दल फाजील घमेंड आंगीं असल्यानें हातीं घेतलेल्या कार्याला मुळांतच विरजण पडतें. याकरतां असल्या फाजील अभिमानाच्या वृत्तीचा उच्छेद मुळांतच केला पाहिजे. आजपर्यंत ही कामगिरी तुह्मीं चांगली बजाविली आहे. प्रत्येक जर्मन तरुणांस सत्याच्या मार्गांत आणून सोडण्याचा यत्न तुह्मी करतां. मत-भेदामुळें तुमच्या साधनांत निरनिराळे प्रकार होत असतील हें खरें; तथापि तुह्मा सर्वांचें ध्येय एकच. सत्याकडे विद्यार्थ्यांस नेऊन पोहोंच-वावयाचें, हेंच तुह्मां सर्वांचें ध्येय आहे. राजनीति म्हणजे असत्याची खाण, असा समज सर्वत्र पसरला आहे. ‘ वारांगनेव नृपनी-तिरनेकरूपा ’ असें म्हणतात, पण या बाबींत सुद्धां सत्यावलंबन अधिक श्रेयस्कर आहे, असा माझा अनुभव आहे. असत्यवादी मनुष्याचें धैर्य प्रसंगीं दगा दिल्यावांचून रहात नाहीं. यामुळें आपलें धैर्य खंबीर राखण्याची चाड ज्याला असेल, त्यानें नित्य सत्याचा आश्रय करावा. माझ्या अशा वागणुकीमुळें मला पुष्कळ शत्रू उत्पन्न झाले, हें खरें आणि माझ्या शब्दावर भलभलत्या अर्थाचा अथवा अनर्थाचा आरोप पुष्कळांनीं केला, हेंहि खरें; तथापि एकंदरीनें माझ्या वागणुकी-चा परिणाम अंतिम दृष्ट्या चांगला झाला. किमानपक्ष माझी सद-सद्विवेक बुद्धि भ्रष्ट झाली नाहीं, इतकें तरी खरें. मला शत्रू पुष्कळ आहेत, ही गोष्ट खरी आहे; तथापि स्वतंत्रमताच्या सुशिक्षित जर्मनांपैकीं बऱ्याच मोठ्या भागाचा मला पाठिंबा आहे, हेंहि खोटें नाहीं. कसेंहि असलें, तरी आमच्या राष्ट्रांतील विशिष्ट संस्था जिवंत राखण्यास मुख्य आधार सत्य हाच आहे, असें माझें निश्चित मत आहे. मी जातीचा शेतकरी असल्यामुळें अस्तसमयीं सूर्य तांबडा दिसला, म्हणजे दुसरा दिवस निरभ्र जाणार, असें जाणण्याची मला आरंभापासूनच संवय

आहे. सध्यां आकाशांत दिसणाऱ्या रक्तिमेमुळें तुह्मा सर्वांचे भावी दिवस निरभ्र जातील, अशी मला आशा आहे.

" सध्यांची तुम्हा शाळागुरूंची सांपत्तिक स्थिति आणि तुमची सामाजिक पदवी, याज बद्दल तुमची कुरकुर आहे, असें मी ऐकतों. तुमची ही कुरकुर रास्त आहे. तुमच्या धंद्याच्या महत्वाच्या मानानें आणि जें राष्ट्रकार्य तुम्ही करीत आहां, त्या मानानें जें योग्य वेतन तुम्हांस मिळावयास पाहिजे, तें मिळत नाहीं, ही गोष्ट खरी आहे. शाळांतून मिळणाऱ्या शिक्षणामुळें मुलांच्या मनांत केवढ्या महत्वाच्या संस्काराचीं बीजें पेरलीं जातात व त्या संस्कारांवर राष्ट्राची भवितव्यता किती अवलंबून असते, याची असावी तशी जाणीव आज लोकांस नाहीं, पण या बाबींत लोक हळूहळू जागे होत जातील, असा मला भरंवसा आहे. कर्तृत्ववान राजांच्या व सैन्याच्या साहाय्यानें जे जय आपण मिळविले आहेत, त्यांचें फळ आपणास कायम राखणें असेल, तर या गोष्टीचीं उपेक्षा करून चालणार नाहीं, असें मला वाटतें. शिक्षणाचा प्रसार स्त्रियांत झाल्यामुळें आपल्या राष्ट्रकार्यांत त्याहि मदत करूं लागल्या आहेत. पूर्वीं आमच्या स्त्रीवर्गाचा पाठिंबा आम्हास नव्हता. पन्नास वर्षांखालीं असल्या गोष्टींत आमच्या स्त्रीवर्गानें कधींहि लक्ष घातलें नाहीं; पण ही स्थिति आज बदलली आहे. आपण जर्मन हाडा-मांसाचे आहों, ही गोष्ट आज प्रत्येक आई आपल्या तान्हुल्याला आधीं शिकविते. स्त्रियांच्या मनांत उद्भूत झालेल्या कल्पना नेहमींच अधिक दृढमूल व अधिक काळ टिकणाऱ्या असतात. जगाच्या व्यवहारांत पुरुषाचें चित्त अधिक फांकलें गेलें असल्यामुळें कोणत्याहि कल्पना तेथें खोल पेरल्या जात नाहींत आणि त्या दीर्घ काळ टिकतहि नाहींत. या करतां ज्या कल्पनांवर राष्ट्राचें जीवन अवलंबून असतें, त्यांचें

बीजारोपण त्या राष्ट्रांतील स्त्रियांच्या मनांत केलेलें असलें, म्हणजे अत्यंत अधोगतीच्या काळींहि राष्ट्राचें जीवन कायम राखून त्याचा उद्धार करण्यास त्यांचा उपयोग होतो.

"सद्गृहस्थहो, सर्व जर्मन शाळागुरूंच्या नांवानें आपण त्रिवार जयजयकार करूं. आतांपर्यंत जें त्यांचें वर्णन मीं केलें, तीं व्याजस्तुति नसल्यामुळें, या जयजयकारास ते पात्रच आहेत.

"आणखी मी कितीहि बोललों, तरी तें पुरें होईल, असें मला वाटत नाहीं; पण आतां अधिक वेळ उभें राहाण्याचें सामर्थ्य मला नसल्यामुळें मला आटोपतें घेतलें पाहिजे. तुमच्याशीं आणखींहि बोलत रहावें, अशा हेतूनें माझें अंत:करण तुम्हाकडे धांव घेत आहे; पण विवेकबुद्धीचा इषारा ऐकून माझें ह्मणणें मला येथेंच संपविणें भाग आहे"

बिस्मार्क यांचें हें भाषण जर्मनींतील बहुतेक प्रमुख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें होतें. प्रशियांतील अभ्यासक्रमांत ग्रीस व रोमच्या प्राचीन इतिहासाचा अंतर्भाव झालेला होता; पण खुद्द प्रशियाचा इतिहास मुलांस शिकविला जात नव्हता. यामुळें फ्रेड्रिक दी ग्रेटच्या काळांत प्रशियानें केलेलीं मोठीं कार्यें, आणि त्यांनीं मिळविलेले मोठे विजय कालाच्या उदरांत लपून राहिल्यासारखे झाले होते. त्याच प्रमाणें नेपोलियनच्या काळांत झालेल्या मानहानीचें स्मरणहि लोकांच्या मनांतून जात चाललें होतें; पूर्वेतिहासाचें स्मरण नित्य जागृत ठेवणें, हें देशाभिमानाची ज्योत पेटविण्याचें एक मोठें साधन आहे. पण दीर्घकाळपर्यंत याबाबतींत प्रशिया स्वस्थ राहिला होता. प्रशिया संबंधीं शाळेंतील मुलांस फारच तुटपुंजी माहिती दिली जात असे.

यानंतर देशाभिमानाची लाट उसळली, तेव्हां शाळगुरूंनीं प्रशियाच्या बाबतींत जी खटपट केली, तिला सुशिक्षित पुढाऱ्यांकडून

फारसें पाठबळ मिळालें नाहीं, ही मोठ्या नवलाची गोष्ट आहे; तथापि शाळागुरूंनीं अशा परिस्थितींतहि लोकोत्तर देशसेवा बजावली, यांत शंका नाहीं. इ. स. १८६६ ची मोहीम शाळा गुरूंनीं जिंकली अशा अर्थाची एक म्हणसुद्धां प्रशियांत रूढ झाली होती. या म्हणीचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नाहीं, हें खरें; तथापि त्यांनीं केवढें महत्वाचें कार्य केलें व देशाच्या भवितव्यतेच्या दोऱ्या सामान्य शाळागुरूंच्या हातीं किती असतात, हें लक्षांत येईल. जनतेच्या खालच्या वर्गांत उत्साह वाढला असल्याशिवाय आणि शिक्षणाचें महत्व त्यांच्या लक्षांत आल्याशिवाय सुसंस्कृत पुढाऱ्यांच्या मेहनतीचें व्हावें तसें चीज होत नाहीं.

जेव्हर येथून प्रिन्स बिस्मार्क यांच्या अभिनंदनासाठीं एक प्रतिनिधी मंडळ आलें होतें. प्लव्हर पक्षाचीं शंभर अंडीं प्रतिवर्षीं भेट म्हणून जेव्हर येथून येत असत, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. या गोष्टीला अनुलक्षून बिस्मार्क म्हणाले.

"प्लव्हर पक्षीं एकाच ठिकाणीं रहात नाहीं. स्वतःला अनुकूल असें हवामान असेल, तेथें जाण्याची या पक्षाला संवय आहे. जेव्हरशीं जडलेला माझा संबंध अशा प्रकारच्या तात्पुरत्या स्वरूपाचा न होतां, त्याला अधिक चिरस्थायी रूप येईल, अशी मला आशा आहे.

"तुम्ही सर्व जर्मन लोकांनीं जर्मन साम्राज्याशीं एकीनें व एक दिलानें रहावें, अशी माझी तुम्हास विनंति आहे. जर्मन साम्राज्याची भक्ति तुमच्या मनांत असली पाहिजे; पण ही भक्ति मूक स्वरूपाची नसून ती प्रत्यक्ष कार्यांत अवतरली पाहिजे. तुमचा सामाजिक दर्जा कोणताहि असला, अथवा कोणताहि कामधंदा करीत असलां तरी, जर्मन साम्राज्याचें आपण घटक आहों व आपली भरभराट साम्राज्याच्या भरभराटीवर अवलंबून आहे, हें लक्षांत ठेवून जर्मन निशाणाला, उणे-

पणा येणार नाहीं, असें आपलें वर्तन ठेवा. कोणी मोठा सरकारी कामगार असो अथवा शेतकरी असो अथवा नाविक असो, साम्राज्याचा भार आपल्या शिरावर आहे, असें त्यास वाटत राहिलें पाहिजे."

बिस्मार्क यांच्या एक्यांशिव्या वाढदिवशीं ज्या विद्यार्थ्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें होतें, त्यांस आपलें कांहीं स्मरणचिन्ह म्हणून ब्रांझ धातूचें एक पदक बिस्मार्क यांनीं नजर केलें. या पदकावर तारीख ४ जून सन १८३५ व तारीख ४ जून सन १८८५ अशा दोन तारखा खोदल्या होत्या. तारीख ४ जून सन १८३५ रोजीं प्रशियन राज्याच्या नौकरींत त्यांचा प्रवेश झाला व तारीख ४ जून सन १८८५ रोजीं नौकरीस पन्नास वर्षें पुरीं झालीं. अशा प्रकारचीं सुमारें सात आठ हजार पदकें विद्यार्थ्यांस त्यांनीं दिलीं.

आस्ट्रियांतील स्टिरिया नांवाच्या जहागिरींतून एक प्रतिनिधिमंडळ बिस्मार्क यांच्या भेटीस आलें होतें. त्यांत आस्ट्रियांतील विद्यार्थ्यांतर्फे हि कांहीं विद्यार्थी आले होते. या मानपत्रांस बिस्मार्क यांनीं पुढील उत्तर दिलें.

" सद्गृहस्थहो, माझ्या भेटीसाठीं इतक्या लांबवर तुह्मी आलां, याबद्दल मी तुमचा फार ऋणी आहे. तुह्मी मला नजर केलेल्या पुष्पगुच्छांत आल्पस पर्वतावरील व खालच्या सपाट भूमीवरील फुलें, तुह्मी एकत्र गुंफलीं आहेत. ही आपणा परस्परांमधील उत्तम स्नेहाची निशाणी आहे, असें मला वाटतें. या फुलांचे वर्ण परस्परांपासून भिन्न आहेत, तरी त्यामुळें दृष्टिभंग न होतां ते रंग परस्परास पोषक असल्यामुळें त्या सर्वांचा एकत्र वास दृष्टीला अधिक रम्य मात्र झाला आहे. आजपर्यंत पुष्कळांनीं माझें अभिनंदन केलें; पण तुमच्या या अभिनंदनाला विशिष्ट प्रकारचें ऐतिहासिक स्वरूप असल्यामुळें माझ्या दृष्टीनें सर्वांत

अधिक महत्व आहे. आस्ट्रियाच्या बादशहांनीं कृपावंत होऊन एक
नंदनसंदेश मला नुकताच धाडला आहे आणि आतां सामान्य
जनांचा निरोप घेऊन तुह्मी आलां, यामुळें तुमच्या येण्यानें मला
ूच आनंद झाला. सोळा वर्षां पूर्वीं आस्ट्रियांत केलेल्या प्रवासाचें
ा भेटीनें मला स्मरण झालें. मी व्हियेन्नाला पोहोंचलों, तेव्हां तेथील
वासी जनांनीं इतक्या उत्साहानें माझें स्वगत केलें कीं, जर्मनी
आस्ट्रिया यांचे स्नेहसंबंध पूर्ववत जडलेच पाहिजेत, असें मला वाटलें.
मार्गांत कितीहि अडथळे आले, तरी ते बाजूस सारून या दोन
ांचा स्नेहसंबंध जोडणें जर्मनीचें कर्तव्य आहे, असें मला वाटलें.
ट्रिया व जर्मनी यांजमधील स्नेहभाव आजकालचा नसून हजार
हूनहि अधिक काळापूर्वी तो जडलेला आहे. सोळा वर्षांपूर्वी व्हिऐन्ना
जो त्रिकूट संधि आम्हीं घडवून आणला, तें या पूर्वसंबंधाचें
ळ दृश्य रूप होय. प्राचीन रोमन साम्राज्य उत्तर समुद्रापासून
ीपर्यंत पसरलेलें होतें. या साम्राज्यांतील निरनिराळ्या घटकांत
गविषेशीं तंटेबखेडे होत असत, तरी एकंदरीनें तें एका छात्रा-
ीं होतें हें खरें.

"आतां परमेश्वराच्या दयेनें मध्य युरोपचा हा सर्व भाग या त्रिकूट
मुळें एकत्र जोडला गेला आहे. परस्परांत झालेल्या युद्धामुळें
ानें त्यांच्या मैत्रीचा भंग मध्यंतरीं कांहीं काळ झाला होता; पण आतां
टक पुन्हा एक रूप झाले आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.
ांचा फ्रान्स वगळून शार्लमेन बादशहाचा बाकीचा सगळा मुलूख
त्रिकूटसंधीनें एकत्र जोडला गेला आहे. हा संधी स्थाइक स्वरू-
ा होऊन आपला परस्परांबद्दलचा स्नेहभाव वृद्धिंगत होईल, असा
भरंवसा आहे.

" पवित्र रोमन साम्राज्याचा प्राचीन इतिहास पाहिला, तर त्यांतील निरनिराळ्या घटकांत लढाया व रक्तपात झाल्यावांचून एक शतकाचा सुनें जात नसें, असें आपणांस आढळून येईल. पण यामुळें आपणांस हताश होण्याचें कारण नाहीं. कारण युरोपांतील प्रत्येक देशांत हाचें प्रकार आढळून येतो. प्राचीन जर्मन साम्राज्यांत अनेकविध पंथांच व कुलांचे लोक रहात होते. यामुळें त्यांत तंटा बखेडा झाल्यास नवल नाहीं; पण ज्या राष्ट्रांतील जनता बहुधा एकाच कुलांतील आहे, त्या राष्ट्रांतहि, असेंच रक्तपात झाल्याचें आढळून येतें, इंग्लंडचेंच उदाहरण घ्या. इंग्लंडच्या इतिहासांत देशांतल्याच परस्पर पक्षांत किती युद्धें झालीं, तें पहा! इंग्लंडची अगदीं आजची स्थिति पाहिली, तरी तेथें चिरकाळ शांती राहील, अशी हमी कोणालाहि देतां येणार नाहीं. आपला शेजारी फ्रान्स याचीहि हीच दशा आहे. फ्रान्सांत अनेक मानव कुळें नाहींत. असें असतांहि पंचवीस वर्षां पूर्वींच पारीस शहराजवळ आपसांत युद्ध होऊन रक्ताचे पाट वाहिले. परमेश्वर करो, आणि फ्रान्सांतलें हें रणकंदन अखेरचेंच होवो. स्पेनसारख्या देशाकडे पाहिलें, तरी तेथेंहि हीच स्थिति आढळेल. अशा प्रकारच्या भांडणांतून इटलीहि मुक्त झालेला नाहीं. अधिक उदाहरणें शोधीत बसण्याचें कारण आपणांस नाहीं. माझें म्हणणें इतकेंच कीं, आपण जर्मन लोक परस्परांशीं पूर्वी कितीहि भांडलों असलों, तरी आपलें ऐक्य होणार नाहीं, असें नाहीं. आपलीं सर्व भांडणें या पुढें विलयास जातील अशी मला आशा आहे. जेथें आपलीं सर्वांचीं मनें एकरूप होतील, असें एक ध्येय आपणांस सांपडलें आहे. या ध्येयाकडे जाण्याचे मार्ग भिन्न भिन्न झाले,तरी तत्वदृष्ट्या त्या ध्येयांत यापुढें कांहीं फरक पडेल, असें मला वाटत नाहीं. हें आपलें ध्येय प्रत्यक्ष सृष्टींत आणण्याकरतां

अस्ट्रोहंगेरीयन साम्राज्य व जर्मन साम्राज्य यांची एकी होणें इष्ट आहे; हें प्राचीन इतिहास आपणांस कंठरवानें सांगत आहे. प्रसंगीं क्रोधवश होऊन आपण परस्पराविरुद्ध तलवारी उगारल्या, तरी थोड्याच वेळानें आपली समजूत पटून आपण परस्परांचे स्नेही होऊं, याबद्दल मला शंका वाटत नाहीं. युरोपची आजची राजकीय परिस्थिति पाहिली, तर आपणां परस्परांत स्नेह असणें हें शांतीच्या दृष्टीनें अवश्य आहे, असें आपणांस आढळून येईल. आपणांतील स्नेहभाव नष्ट झाला, तर युरोपची शांतता कोणत्या क्षणीं भंग पावेल हें सांगतां येत नाहीं. युरोपांतील एकादें राष्ट्र एकटें पडलें, तर त्याविरुद्ध दोघांतिघांनीं एक होऊन त्यावर गिल्ला करण्याचा संभव नेहमीं उपस्थित होतो. उलट पक्षीं सांप्रतच्या त्रिकूट संधीप्रमाणें एकादा बलाढ्य संघ निर्माण झाला, तर त्यांतील एकाद्या राष्ट्रावर हल्ला करण्याची छाती सहसा कोणास होत नाहीं आणि अशी छाती एकाद्यानें केलीच, तर त्याच्या कृत्याचें प्रायश्चित्त त्याला तावडतोड मिळतेंच. जर्मन राष्ट्राला कोणाच्या तरी पाठिंब्याची आवश्यकता आहे. अशा स्थितींत आस्ट्रो हंगेरियन साम्राज्याशीं स्नेह जोडणें, हें जर्मन साम्राज्याला अधिक फायद्याचें आहे. आपणा दोघाराष्ट्रांच्या साम्राज्य सरकारांनीं पुष्कळ वेळां चुका केल्या आहेत. यामुळें आपणांत निष्कारण फाटाफूटहि झाली आहे; तथापि आपणा दोघांचाहि सुरक्षितपणा परस्परांच्या ऐक्यावर अवलंबून आहे, ही गोष्ट आपल्या लक्षांत येतांच परस्परांतील भेद आपण वेसरूं लागलों. अस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याशीं आमचें जें ऐक्य झालें आहे, त्यावरच या त्रिकूट संधीचें जीवित अवलंबून असून युरोपची शांततांहि या संधीनेंच राखिली आहे. आस्ट्रिया आणि हंगारी यांनीं परस्परांस पाठींबा देऊन आपलें जोड साम्राज्य चांगल्या स्थितींत

राखावें अशी विनंति माझ्या आस्ट्रियन बंधू जवळ या पूर्वींहि अनेक वार मीं केली आहे. आस्ट्रियांतील जर्मन प्रजाजनांचें वजन तेथें जों जों अधिक वाढत जाईल, तों तों आस्ट्रिया आणि जर्मनी यांचें ऐक्य-हि बळावत जाईल. आस्ट्रियन आणि जर्मन साम्राज्य यांच्यांत सदोदित शांतता नांदेसें करणें हें आपलें कर्तव्य आहे, असें माझ्या आस्ट्रियन बंधूंस पटेल, अशी मला आशा आहे. या बाबींत गादीवर असलेला वंश हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. विशेषतः परराष्ट्र संबंधांत तर राजवंश हाच मुख्य घटक असतो. याकरतां आपल्या बादशहांशीं पूर्ण भक्तीनें आणि एकदिलानें तुम्ही रहा, अशी विनंति मी तुम्हांस करतों. तुमच्या बादशहाच्या अंतःकरणांत जर्मन भावना आहे, आणि जर्मन वंशाचे गुण त्याच्या आंगीं आहेत, असें मला आढळून आलें आहे. इ. स. १८५२ सालापासून तुमच्या बादशहाशीं अनेक वार माझा संबंध आलेला आहे. त्या सालीं प्रशियातर्फे व्हियेन्ना येथें मी वकील होतों. तेव्हां पासून तुमच्या बादशहाची मला जी ओळख झाली आहे, तीवरून तो हाडाचा खरा जर्मन आहे, अशी माझी खात्री झाली आहे. खुद्द आस्ट्रियांतहि सर्व प्रजाजन एकाच मानव कुळां-तील आहेत, असें म्हणतां येत नाहीं आणि त्यांत हंगारीची भर घातली म्हणजे ही भिन्नता अधिकच स्पष्ट होते. तथापि या सर्वांचा एकरूप होण्याचा मध्यवर्ती बिंदु बादशहा हाच आहे. याकरतां बादशहाशीं एक-निष्ठेनें राहणें तुम्हां सर्वांस अवश्य आहे.

"निरनिराळ्या मानव कुलांत मधून मधून युद्धसंग्राम चालू रहावे, ही परमेश्वराचीच इच्छा दिसते. नाहीं तर जगांतील सर्व माणसांना नें एकाच कुलांत उत्पन्न केलें असतें. किमानपक्ष युरोपाकरतां तरी

एकाच वंशाची योजना त्याला करतां आली असती. प्रकृतीच्या साऱ्या व्यवहारांत हें अहमहमिकेचें तत्व सर्वत्र आढळून येतें. अहमहमिका लुप्त झाली, तर जीवितहि नाहींसें होईल. जगाचें अस्तित्व द्वैतावर अवलंबून आहे आणि द्वैत अहमहमिकेवर अवलंबून आहे. याच दृष्टीनें मानवी जातीची इतिहासपरंपरा पाहिली म्हणजे चक्रनेमीक्रमानें मानव वंशाची भरती ओहोटी चालू असल्याचें दिसुन येईल. आज भरभराटींत असलेलें एकादें मानव कुल उद्यां मागें पडतें आणि त्याच्या जागीं दुसरें एकादें नवें कुल येतें. अशा गोष्टी जर्मनी, आस्ट्रिया, हंगारी अथवा पोझन आणि पश्चिम प्रशिया यांतच घडून येतात असें नाहीं, तर जगाच्या साऱ्या इतिहासांतहि हाच प्रकार आढळून येतो. अनेक मानव कुलांनीं शेजारी शेजारीं रहावें, परस्परांशीं तंटे करावे आणि परस्परांचा द्वेष करावा, हाहि एक सृष्टीचाच कायदा आहे; असा सिद्धांत या इतिहासावरून काढला, तर तो चुकीचा होईल काय ? मनुष्यांनीं परस्परांशीं बंधुत्वाच्या नात्यानें रहावें, या कल्पनेचा उगम दीर्घ विचारानंतर होतो; पण सामान्य मनुष्यांत एवढा दीर्घ विचार नसतो. त्याचप्रमाणें सामान्य मनुष्यांत इतकी सहनशीलताहि नसते. याच दृष्टीनें पाहतां देशांतल्या देशांतहि तंटे आणि अहमहमिका असावी, हें रास्त आहे आणि इष्ट आहे; पण जी जनता आपणांस एकाच राजाचे प्रजाजन म्हणविते, त्यांनीं भांडणें भांडतांनाहि सौजन्यास फांटा देऊं नये. येनकेन प्रकारेण प्रतिपक्षियांस त्रास द्यावयाचा, त्याला चिडवावयाचे, अथवा त्याची मानहानी होईल असें करावयाचें; असें करूं नये. भांडणें झालीं, तरी त्यांचा हेतु अधिक उच्च असावा व भांडणांतहि सौजन्य विसरूं नये. प्रतिपक्षाचें समाधान करणें आपणांस नेहमींच साधेल, असें नाहीं. तथापि आपसांतील भांडणें हल्लींपेक्षां

अधिक सौजन्यानें चालविणें अशक्य नाहीं,असें मला वाटतें. आपण सारे खिस्तानुयायी म्हणवितों. मग एकाच गुरूच्या अनुयायांनीं परस्परांशीं सौजन्यानें वागणें अशक्य आहे काय ? ही धर्म दृष्टि क्षणभर बाजूस ठेवली व केवळ प्रपंच दृष्टीनें या गोष्टीचा विचार केला, तरीहि परस्परांशीं सौजन्यानेंच वागणें आपणांस भाग आहे, असें दिसून येईल. एकाच राज्यपद्धतीनें आपण सर्व बांधले गेलों आहों. हें एकच सूत्र आपणां सर्वांस बांधीत आहे. याकरतां प्रतिपक्षावर टीका करतांना तो प्रतिपक्ष परकीय वंशाचा असला व त्याची कृति आपल्या हितास विघात करणारी असली, तरीहि तो आपल्याच राज्यपद्धतींत बांधला गेला आहे, हें लक्षांत ठेवून त्याचा प्रतिकार करतांना आपण सौजन्य विसरूं नये. परस्परांचें समाधान होऊन ऐक्य व्हावें, हें आपल्या तंटयाचें अखेरचें साध्य असलें पाहिजे. सद्गृहस्थहो, माझी शब्दयोजना असावी तशी कदाचित् नसेल; तथापि माझा हेतु तुम्ही लक्षांत घ्या. जर्मन वंशांतील नसलेल्या अशा आपल्या प्रजाबांधवांशीं वागतांना सौजन्याचा त्याग करूं नका व त्यांच्यांशीं आपला एकोपा होईल या दृष्टीनें शक्य ती खटपट करा, अशी माझी तुम्हांस सूचना आहे. त्यांच्या दोषावर नेहमीं करडी नजर ठेवणें इष्ट नाहीं. जर्मन वंशांतील नसलेले प्रजाजन योग्यतेनें तुह्मांहून कमी आहेत, असें म्हणणें युक्त नाहीं. तथापि आपला अधिकार त्यांच्याहून मोठा आहे, असें तुम्हांस वाटत असेल, तर त्यांचे अपराधहि विसरून जाणें, हीच तुमच्या अधिक उच्चपणाची स्पष्ट खूण आहे, असें मला वाटतें.

" आह्मां टयूटन वंशीयांस अधिक जिवटपणा आणि अधिक सामर्थ्य यांचें दान परमेश्वरानें केलें आहे, असें मला वाटतें. परमेश्वरानें आपल्या साऱ्या सृष्टींत स्त्रीत्व आणि पुरुषत्व हा भेद जसा कायमचा करून टा-

कला आहे, तसाच टयूटन वंश प्रबळ आणि इतर दुर्बल हाहि भेद जणूं काय कायमच करून टाकला आहे. स्लाव, सेल्ट वगैरे वंश आमच्या शेजारीं नसले, तर आह्मी परस्परांशींच मारामाऱ्या करीत राहिलों असतों. टयूटन वंशीय गृहस्थ परकीयांत मिसळला, कीं शासनाच्या दोऱ्या अखेरीस आपल्या हातांत घेतल्यावांचून रहात नाहीं. माझ्या स्लाव बांधवांचें मन दुखवावें, असा माझा हेतु नाहीं; तथापि स्त्रीत्वाला योग्य असें सौंदर्य, चातुर्य, दूरदृष्टी, बुद्धिमत्त्व इत्यादि गुण त्यांच्या ठिकाणीं आढळून येतात. उलट पक्षीं टयूटन हा शुद्ध सोट भैरव दिसतो. तथापि शरीरबळ त्याच्या बाजूला आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. याकरतांच माझें तुह्मांला पुन्हा पुन्हा हेंच सांगणें आहे कीं, आपल्या स्लाव प्रतिपक्षाशीं वागतांना अत्यंत बिकट प्रसंगींहि आपला थोरपणा विसरूं नका. तुमच्या वरिष्ठ दर्जास शोभेल असें तुमचें वर्तनहि वरिष्ठ प्रतीचें असलें पाहिजे. आस्ट्रियांत तर अशा प्रकारची तुमची वर्तणूक असल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. कारण आष्ट्रियांतील सांप्रतची राज्यपद्धति आणि लष्करी रचना हीं थेट जर्मन वळणावरच आहेत. तुमच्या तक्तनशीन वंशाशीं हल्लींहून अधिक भक्तीनें तुह्मीं वागलें पाहिजे, हें मी तुह्मांला पुन्हः पुन्हाः बजावून सांगतों. गेलीं तीस वर्षें जर्मनीचा जो अनुभव मला आला आहे, त्यावरून देशाची भवितव्यता त्याच्या प्राचीन राजघराण्याच्या सामर्थ्यावर व वजनावर किती अवलंबून असतें, हें मला कळून चुकलें आहे. तुमच्या तक्तावरील वंशहि फार जुना आहे. कमींत कमी गेली चार शतकें तरी हा वंश तुमच्या देशावर राज्य करीत आहे. तुम्ही प्रजाजन आणि तुमचा राजवंश यांत अनेक वेळां बखेडे उपस्थित होऊन उभयपक्षांस थोडासा त्रासहि सोसावा लागला आहे; तथापि एकाद्या कुटुंबांतील भांडण

थोड्याच काळांत नाहींशीं होऊन जसें तें एक होतें, त्याप्रमाणें तुम्हींहि आपसांतील भांडणें संपविलीं पाहिजेत. परस्परांत कांहीं दोष असलें, तर त्यांकडे कानाडोळा करण्यास आपण शिकलें पाहिजे. हे विचार मनांत पक्के बाळगून तुमचे परमपूज्य बादशहा व माझेहि दयाळू धनी फ्रान्सिस जोसेफ यांच्या नांवानें आपण त्रिवार जयघोष करूं या. तुमच्या आमच्यांत जी एकी झाली आहे, ती चिरकाळ राहून यापुढें आपणा दोघांत फाटाफूट होणार नाहीं. अशी आशा आपण बाळगूं या."

हें भाषण संपल्यानंतर बिस्मार्क यांनीं प्रतिनिधी मंडळा पैकीं कित्येकांची भेट घेतली व अनेक विषयावर त्यांच्याशीं संभाषण केलें. आस्ट्रिया व जर्मन यां दोन्ही देशांतील लोकांच्या मनावर या भाषणाचा फार चांगलीं परिणाम झाला.

तारीख १७ एप्रील रोजा जर्मनींतील अनेक व्यापारी संघांच्या चार हजार सभासदांनीं फ्रेड्रिकश्रू येथें येऊन बिस्मार्क यांची भेट घेतली. यांत मोठ्या धनत्तर व्यापाऱ्यापासून तों सोनार, शिंपी, झाडूवाले व खाटिक इत्यादिकांपर्यंत सर्व धंद्यांचे लोक आले होते. त्यांचे आभार मानून बिस्मार्क यांनीं त्यांसहि थोडासा उपदेश केला व सर्व धंदे यशदायी होऊन जर्मनीस ऊर्जितावस्था यावी, अशी परमेश्वराची प्रार्थना करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

या महोत्सवास तारीख १ एप्रील रोजीं सुरुवात झाली; पण त्याचा एकंदर कार्यक्रम फारच दीर्घ असल्यामुळें एकाच दिवसांत हा उत्सव आटोपण्यासारखा नव्हता. नानाठिकाणांहून आणि अनेक प्रकारच्या लोकांकडून प्रतिनिधि मंडळें कित्येक दिवस येत होतीं. यांपैकीं एक प्रतिनिधीमंडळ विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें होतें. फ्रँको जर्म

युद्धांत लढलेल्या कित्येक वयोवृद्ध जर्मन अमेरिकनांचें एक प्रतिनिधी-मंडळ फ्रेड्रिकश्रू येथें तारीख ३० आगष्ट रोजीं आलें होतें. या मंडळाचा अध्यक्ष जोसेफ श्लेंकर यानें शिकागो येथील जर्मन लष्करी मंडळातर्फे एक मानपत्र बिस्मार्क यांस अर्पण केलें. त्यावर उत्तर देतांना बिस्मार्क म्हणाले, "सद्गृहस्थ हो, मला जो मोठा मान तुह्मी दिला, त्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. एवढ्या लांबीचा समुद्रप्रवास करून या अरण्यांत माझी भेट घेण्यास तुह्मी आलां, हे मजवर तुमचे मोठे उपकार झाले आहेत. जर्मनींतील आपल्या जुन्या संबंधीयांस तुह्मी विसरलां नाहीं व येथील जुन्या आठवणी तुह्मी आद्यापीहि कायम ठेवल्या आहेत, याबद्दल मला अतिशय आनंद होतो. पूर्वीं प्रमाणें आतां माझ्या आंगीं शक्ति राहिलेली नाहीं व बोलतां बोलतां मला त्रास होऊं लागतो, यामुळें माझ्यानें फार बोलवत नाहीं, याचें मला वाईट वाटतें; तथापि ऐंशी वर्षांपर्यंत परमेश्वरानें मला आयुष्य दिलें, हीच त्याची मोठी कृपा होय. औषधादिकांनीं या जीर्ण देहाची कितीहि डागडुजी केली, तरी तो तरुण होतो असें नाहीं. आंतून खिळखिळ्या झालेल्या गलबाताला बाहेरून नवे रंग लावून त्याची साफसुफी केली, तरी लांबच्या प्रवासाला तें उपयोगी पडतें असें नाहीं. कारण आंतल्या फळ्या कुजल्या असल्या-मुळें परस्परांपासून त्या केव्हां विभक्त होतील, याचा भरंवसा नसतो. माझी स्थिति आतां अशीच आहे. तरुण मंडळी जें कांहीं करीत असेल, त्यावर प्रेक्षकाप्रमाणें नजर टाकण्याचें काम मात्र मला करतां येण्या-सारखें आहे. कोणत्याहि उद्योगांत स्वतः पडण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं नाहीं. तसें असतें, तर शिकागोला येऊन तेथलें मोठें प्रदर्शनहि मीं पाहिलें असतें. उत्तर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत प्रवास करावा, अशी माझी फार इच्छा होती. जगांतील दुसऱ्या कोणत्याहि परकी

देशापेक्षां या संस्थानाकडे माझ्या मनाचा ओढा अधिक असतो. एकंदरीनें हीं संस्थानें जर्मन लोकांना चांगलीं मानवतात असा माझा अनुभव आहे."

भोजनानंतर या अमेरिकन जर्मनांचे पुन्हां आभार मानतांना बिस्मार्क म्हणाले,

"सद्गृहस्थहो, इतक्या लांबवर येऊन मला भेट दिल्याबद्दल मी तुमचे पुन्हा एकवार आभार मानतों. आपल्या जुन्या दोस्ताला तुह्मी विसरलां नाहीं, हें पाहून मला फार आनंद होतो. इ. स. १८७० सालीं खांद्याशीं खांदा भिडवून शत्रूंशीं लढत असतां जी देशाभिमानाची ज्योत आपण पेटविली, ती तुह्मीं अद्यापीहि कायम राखिली आहे व परकीय देशांत वास करूनहि तुमचा देशाभिमान लुप्त झाला नाहीं, याबद्दल तुमचें अभिनंदन करणें उचित आहे. तुमच्या ठिकाणीं देशाभिमान जागृत नसता, तर केवळ आपल्या जुन्या सोबत्यास भेटण्यासाठीं इतक्या लांबचा प्रवास तुह्मीं केला नसता. राजकारणाच्या दृष्टीनेंहि तुमच्या या भेटीबद्दल तुमचे आभार मानणें उचित आहे. तुमच्या या भेटीनें जर्मनांचा ऐक्यभाव वृद्धिंगत होण्यास मदत होऊन त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीय भावनाहि वाढीला लागेल. जर्मन साम्राज्यांत अनेक संस्थानांचा अंतर्भाव झाला असला, तरी जर्मन राष्ट्रांत एकतानता आहे, ही गोष्ट तुमच्या या कृतीनें सिद्ध होते. फ्रँको-जर्मन युद्धापूर्वीं अशी स्थिति नव्हती. त्याकाळीं सर्व जर्मन परस्परांशीं भांडणें करण्यांत चूर होते; पण युद्धानंतर ही स्थिति पालटली. आतां आपण परस्परांपासून कितीहि अंतरावर असलों, तरी त्यामुळें आपल्या बंधुभावांत उणेपणा येत नाहीं. हा आपणामधील स्नेहभाव उत्पन्न करण्यास फ्रेंचांनीं केलेले आघातांने कारण झाले आहेत. याबद्दल त्यांचे आभार मल

पाहिजेत, असें मी ह्मणत नाहीं. कारण आपली एकी व्हावी, असा त्यांचा उद्देश नव्हता; पण हें युद्ध झालें नसतें, तर आपली एकीहि इतक्या लवकर झाली नसती, यांत संशय नाहीं. या युद्धानें जें महत्कार्य घडवून आणलें, तें पार्लमेंटांतल्या भाषणांनीं आणि वर्तमानपत्रांतल्या लेखांनीं कधींहि झालें नसतें. तुमच्या नव्या पितृभूमींत तुमची सदोदित भरभराट व्हावी, अशी मागणी मी परमेश्वरापाशीं मागतों. या दोन भूमींचा परस्परांशीं कोणत्याहि प्रकारचा तंटाबखेडा नाहीं. शिकागो शहराची भरभराट व्हावी, अशी इच्छा करून त्याच्या नांवानें त्रिवार जयघोष आपण करूं या; अमेरिकेंतील जर्मनांची भरभराट होवो, असें मागणें आपण परमेश्वरापाशीं मागूं या. ॲटलांटिक महासागराच्या पाण्यानें आपल्या प्राचीन मातृभूमीबद्दलचा अभिमान तुमच्या मनांतून धुवून गेला नाहीं व पूर्वींप्रमाणेंच आजहि तो टिकाऊ आणि ताजा आहे, हें पाहून मला फार आनंद होतो."

बिस्मार्क यांच्या ऐशिंव्या वाढ दिवसानिमित्त जे मानपत्रांचे समारंभ झाले, त्यांतील हा अखेरचा होय.

---

प्रकरण एकतिसावें.

## बिस्मार्क व साम्राज्य पार्लमेंट.

जर्मनींतील बऱ्याचशा वर्तमानपत्रांत तारीख ३ मार्च रोजीं पुढील मजकूर प्रसिद्ध झालेला पाहून पुष्कळांस फार नवल वाटलें. तो मजकूर असा.

"प्रशियन पार्लमेंटानें एका सभासदाच्या सूचनेवरून बिस्मार्क यांचें अभिनंदन करण्याचा ठराव पास केला. अशाच अर्थाचा ठराव

साम्राज्य पार्लमेंटांत आला असतां तेथें तो १६२ विरुद्ध १४६ मतांनीं नापास झाला."

साम्राज्य पार्लमेंटांत हा अभिनंदनपर ठराव नापास झाल्यामुळें एकंदर जर्मन राष्ट्रांत किती खळबळ उडाली व त्यामुळें पार्लमेंटाची किती नाचक्की झाली, याचें दिग्दर्शन बादशहांनीं केलेल्या तारेंत आलेंच आहे. साम्राज्य निर्माणकर्त्या पुरुषाचा अशा प्रकारचा अपमान करणें हें कृतघ्नपण होय, असें सर्व राष्ट्रास वाटलें. राष्ट्राचें हें मत बहुतेक साऱ्या वर्तमानपत्रांत प्रतिबिंबित झालें होतें. त्याच प्रमाणें परक्या वर्तमानपत्रानींहि या बाबी संबंधानें कडक टीका करून जर्मन साम्राज्यपार्लमेंटाचा खरपूस समाचार घेतला होता. अशा रीतीनें बिस्मार्क यांच्या कीर्तीस उणेपणा आणण्यासाठीं त्यांच्या शत्रूंनीं जी खटपट केली, तिचा परिणाम अगदीं उलट होऊन बिस्मार्क यांचें यश अधिक उज्वल मात्र झालें.

या बाबींत कांहीं पत्रांनीं काढलेले उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

"जर्मनराष्ट्राच्या प्रतिनिधींत राष्ट्रियभावनांचा इतका अभाव आहे, आणि त्यांच्याठिकाणीं क्षुद्र पक्षभेद इतका जोरदार आहे, हें पाहून आम्हांस अत्यंत राग येतो. त्याचप्रमाणें पार्लमेंटास ही गोष्ट अत्यन्त लाजीरवाणी आहे, असेंहि वाटतें. जर्मनराष्ट्राच्या मनांत जी आकांक्षा कित्येक शतकें अमूर्त स्थितींत घोळत राहिली होती, तिला ज्यानें प्रत्यक्ष रूप दिलें, त्याचा सन्मान करण्याचा प्रसंग आला असतां, त्या राष्ट्राचे आपणास प्रतिनिधि म्हणविणाऱ्या लोकांनीं अशा वेळीं इतकी अनुदार बुद्धि प्रगट केली, हें पाहून प्रत्येक जर्मनराष्ट्रभक्तास लज्जेनें अधोमुख व्हावें लागेल."—'पोस्ट.'

"आजपर्यंत कोणत्याहि मोठ्या देशाच्या प्रतिनिधिसभेनें केली नसेल एवढी मोठी घोडचूक जर्मनसाम्राज्य पार्लमेंटानें या प्रसंगीं केली. इ. स. १८७० सालचा पंचविसावा वाढदिवस आतां नुकताच येत आहे. अशाप्रसंगीं एवढी मोठी घोडचूक खिशांत बाळगून या उत्सवांत हें पार्लमेंट सामील होऊं पहात आहे, ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. जर्मनीचें दुर्दैव ! याहून अधिक शब्द उच्चारण्याची गरज आम्हास दिसत नाहीं."—'न्याशनल झिटंग.'

" असा ठराव पास करून जर्मन पार्लमेंटानें साऱ्या जगांत आजच्या पुरतेंच आपलें हंसें करून घेतलें आहे, असें नाहीं, तर भविष्यत-काळींहि त्याच्या या कृतीला सारें जग हंसत राहील. असे उद्गार एका सुप्रसिद्ध गृहस्थानें काढले होते; पण आम्ही याहि पुढें जाऊन असें म्हणतों कीं, जर्मनपार्लमेंटाचें हें वर्तन अत्यन्त लज्जास्पद आहे." — ' क्रूस-झिटंग. '

"राष्ट्राचा जो मान तोच आपलाहि मान, अशी भावना ज्या खऱ्या देशभक्ताच्या मनांत वसत असेल, त्याला पार्लमेंटाच्या या कृतीबद्दल लज्जा वाटल्यावांचून राहणार नाहीं. या कृतीवर परकीय राष्ट्रांतहि कशाप्रकारची टीका होईल, हें सांगणें नकोच. कित्येकांना जर्मनरा-ष्ट्राचें मोठें नवल वाटेल, कित्येक त्याची थट्टा उडवितील, कित्येक त्याबद्दल तिरस्कार दाखवितील आणि कित्येकांना तर आमचें राष्ट्र अगदीं उपेक्षणीय वाटेल. जर्मनीच्या शत्रूंना मोठा आनंद होईल. पार्लमेंटाच्या या कृतीचें कौतुक ते करतील; पण हा सर्व अपमान आतां निमूटपणें सहन करण्यावांचून गत्यंतर नाहीं. पार्लमेंटांतील ज्या प्रतिनिधींनीं मता-धिक्यांनीं ही गोष्ट केली, ते राष्ट्राची मनोभावना प्रतिबिंबित करीत नाहींत, असें त्यांस स्पष्टपणें कळविणें, अत्यंत जरूरीचें आहे. जर्मन-

राष्ट्राला पार्लमेंटच्या या कृत्याचा अत्यंत संताप आला आहे, यांत नवल नाहीं. कारण जर्मनराष्ट्र आणि बिस्मार्क यांतील परस्पर संबंध काय आहेत, याची पूर्ण जाणीव त्याला आहे. आपण निवडलेल्या प्रतिनिधींनीं क्षुद्र पक्षाभिमानाला बळी पडून, जी भयंकर चूक केली, तिची सव्याज भरपाई जर्मनराष्ट्र खचित करील. "—'मुंचेनर–आलगेनीन–झिटंग.'

"जर्मन पार्लमेंटाचें अश्लाघ्य वर्तन साऱ्या जगापुढें आतां ढळढळीतपणें मांडलें गेलें आहे. जर्मन साम्राज्याच्या इतिहासांतील हें काळ पान यापुढें कधींहि पुसलें जाणार नाहीं. पार्लमेंटाच्या या कृतीची जबाबदारी राष्ट्रावर मुळींच नाहीं. ज्यांनीं जर्मनराष्ट्राला अशाप्रकारें हीनता आणली त्या क्षुद्र प्राण्यांची वाट तें यथाकाळीं अवश्य लावील." — लिप्झिगर–न्यूजस्टाग–नाकरिकटेन.'

अशा रीतीनें जर्मनराष्ट्राचा संताप चोहोंकडून व्यक्त होत होता. सॅक्सन लष्करी मंडळांतील बारा हजार सैनिकांनीं बादशहांना तार करून पार्लमेंटाच्या या अभिमानशून्यतेबद्दल तिरस्कार व्यक्त केला.

कांहीं हलक्या दर्जाच्या फ्रेंच वर्तमानपत्रांना मोठा आनंद झाला, यांत नवल नाहीं. नानाप्रकारचे जाड टाईपाचे मथळे घालून आपला आनंद त्यांनीं मनसोक्त व्यक्त केला होता; पण वजनदार पत्रांनीं जर्मपार्लमेंटाच्या या कृतीबद्दल आपला निषेध व्यक्त करण्यास कमी केलें नाहीं. पारीस येथील टेम्सपत्रांत पुढील मजकूर प्रसिद्ध झाला होता.

"जर्मन पार्लमेंटाच्या डोक्यांत सध्यां कसल्या प्रकारचे विचार चालू आहेत, हें आमच्या सारख्या त्रयस्थास समजणें फार कठिण आहे. प्रिन्स बिस्मार्क यांचें अभिनंदन करण्याचा ठराव हर फॉं लीव्हेट झो, यांनीं पुढें आणला. हा ठराव पास होण्याच्या मार्गांत कोणत्या अडचणी असाव्या,

हें प्रथम दर्शनीं कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें नव्हतें. हा मोठ्याशा राजकीय गुंतागुंतीचा प्रश्न नव्हता. आपलें नांव जर्मन साम्राज्याच्या इतिहासांत चिरकाल रहावें, या हेतूनें बिस्मार्क यांनीं ज्या कांहीं गोष्टी केल्या, त्यामुळें ते पुष्कळांच्या मनांतून उतरले आणि यामुळेंच अशा प्रकारचा ठराव पार्लमेंटांत नापास झाला. सध्यांच्या मंडळाशीं बिस्मार्क यांचा कोणत्याहि प्रकारचा संबंध उरलेला नाहीं. बिस्मार्क यांचें नांव आतां गतकालिनांच्या यादींत घालण्यास हरकत नाहीं. तथापि या गत कालीन मंडळींनीं जर्मन राष्ट्राच्या डोक्यावर ऋणाचें प्रचंड ओझें करून ठेवलें आहे, हें विसरतां येत नाहीं. ऐक्य आणि साम्राज्य यांचें वैभव स्वप्नांत भोगतां भोगतां जर्मनांच्या कित्येक पिढ्या गेल्या. स्वप्नसृष्टींतील हें साम्राज्य प्रत्यक्ष सृष्टींत कोणी आणलें? युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या यादींत जर्मनीला आज जी मानाची जागा मिळाली आहे, तो मान त्याला कोणी मिळवून दिला? जर्मनसाम्राज्याच्या मोठेपणाबद्दल जे लोक गर्वानें आज ताठून गेले आहेत, त्या लोकांनीं हें साम्राज्य निर्माण केलें नाहीं आणि तें निर्माण करण्याची योग्यताहि त्यांच्या आंगीं नव्हती. फार काय; पण या ऐक्याचा योग्य उपयोगहि त्यांस करतां आला नाहीं."

'ज्यूर' हें फ्रेंच पत्र म्हणालें,

"प्रिन्स बिस्मार्क यांजवर आह्मां फ्रेंच लोकांच मोठेसें प्रेम आहे, असें नाहीं; तथापि बिस्मार्क यांच्या वृद्धापकाळीं जर्मन पार्लमेंटानें त्यांस अभिनंदन करण्याचें नाकारलें, ही कल्पना पुष्कळशा फ्रेंच लोकांस तिरस्करणीय वाटेल यांत शंका नाहीं. बिस्मार्क हे आतां सर्व कारभार सोडून स्वस्थ बसले आहेत; तथापि त्यांच्या कार्याची आठवण सर्व लोकांना अद्यपि इतकी ताजी आहे कीं, जर्मनीपासुन त्यांचें नांव विभक्त करणें शक्य नाहीं. जर्मनीला आज जो कांहीं मोठेपणा प्राप्त

झाला आहे, त्याशीं बिस्मार्क यांचें नांव चिरकाळ निगडित झालें आहे. जर्मनीला मोठेपणा प्राप्त करून द्यावा,. हा एकच हेतु मनांत धरून ज्यानें आपलें सर्व आयुष्य या कामीं खर्च केलें, त्यांचें नांव सामान्य जर्मन जनतेच्या मनांतून कधींहि जाणार नाहीं. असें असतां जर्मन पार्लमेंटानें बिस्मार्क यांच्या वाढ दिवशीं त्यांचें अभिनंदन करण्याचा ठराव नापास केला ! बिस्मार्क हे जर्मन साम्राज्याचे मोठे सुप्रसिद्ध प्रतिनिधि आहेत, असा आह्मां फ्रेंच लोकांचा समज आहे; पण जर्मनींतील पुष्कळ लोक त्यांच्या विरुद्ध झालेले दिसतात. ज्यानें साऱ्या आयुष्यभर राष्ट्राची नौकरी केली, तिजबद्दल उत्तराई होण्याइतकीहि पात्रता ज्या पार्लमेंटाच्या आंगीं नाहीं, त्या पार्लमेंटाची नीतिमत्ता फारच हलक्या दर्जाची असली पाहिजे, असें या हकीकतीवरून स्पष्ट सिद्ध होतें. वुइलियम बादशहांनीं बिस्मार्क यांस तार पाठवून पार्लमेंटाच्या या कृतीचा निषेध व्यक्त केला, यावरून त्यांच्या प्रजेपेक्षां त्यांची स्वतः-ची नीतिमत्ता अधिक उच्च दर्जाची आहे, असेंहि सिद्ध होतें. कोणत्याहि नौकराची उपेक्षा होहेनझोलर्न घराण्यांनीं केली नाहीं, अशी त्या घराण्याची ख्याती आहे. ही कीर्ति हल्लींच्या बादशहांनींहि कायम ठेवली. त्यांच्या निषेधप्रदर्शक तारेंत मनाचा जो खरा मोठेपणा आणि देशाभिमान हीं दिसून येतात, तशीं तीं त्यांच्या प्रजेच्या ठिकाणीं दिसत नाहींत."

इंग्लडांतील 'पालमाल गॅझेटनें' पुढील मजकूर प्रसिद्ध केला.

"जर्मन पार्लमेंटाच्या ज्या १६३ सभासदांनीं बिस्मार्क यांच्या अभिनंदनाचा ठराव नापास केला, त्यांचीं नांवें पुढील निवडणुकींत गळून गेलीं नाहींत, तर स्वतःच्या गतकालीन वैभवाला जर्मनराष्ट्र पात्र नाहीं, असें सिद्ध होईल. बिस्मार्क यांचें अभिनंदन करावें कीं न करावें, हा

प्रश्न मोठ्याशा राजकीय भानगडीचा नव्हता. पार्लमेंटांतील बिस्मार्क यांचे कट्टे शत्रू यांनींहि असें कबूल केलें कीं, बिस्मार्क यांच्या कृपेनेंच आज आपण जर्मन प्रजाजन म्हणवून घेत आहों. अशा स्थितींत हा अभिनंदनाचा ठराव नापास होणें, हें जर्मन राष्ट्राला मोठें लांछन आहे. ”

'न्यू फ्री प्रेस' नांवाचें आस्ट्रियन पत्र म्हणालें,

“ जर्मन बादशहांनीं बिस्मार्क यांस केलेल्या तारेंत जो निषेध प्रदर्शित केला होता, तोच जर्मन राष्ट्राच्या खऱ्या मताचा निदर्शक होता. जर्मन पार्लमेंटांत मत्सर आणि तारतम्य बुद्धीचा आभाव यांचें साम्राज्य दिसतें. पार्लमेंटाच्या या कृतीनें जर्मनराष्ट्र साऱ्या युरोपचें हास्यविषय होऊन बसलें आहे; तथापि पार्लमेंटाच्या या कृतींत जो आणखीहि एक मुद्दा व्यक्त होतो, तो राजकीय दृष्ट्या भयंकर स्वरूपाचा आहे. राष्ट्राच्या हितसंबंधाहून आपल्या पक्षाचा हितसंबंध अधिक महत्वाचा आहे, हा भाव जर्मन राष्ट्रांच्या मनांतून अद्यापीहि नाहींसा झालेला दिसत नाहीं. राष्ट्रीय दृष्टीपेक्षां वैयक्तिक दृष्टीचेंच प्राबल्य तेथें अधिक दिसतें. हा अभिनंदनाचा ठराव तेथें नापास व्हावा, यावरून हेंच सिद्ध होतें कीं, एक तर पार्लमेंटांत राष्ट्राचे खरे प्रतिनिधी कोणी नाहींत अथवा जर्मनी हा राष्ट्र या नांवाला अद्यापि पात्र झालेला नाहीं.”

अशाच अर्थाची टीका इटालियन पत्रांनींहि केली होती. आपल्या उपकार कर्त्याचें स्मरण जर्मन पार्लमेंट इतक्या थोडया अवकाशांत विसरलें, यावरून त्याला स्मृतिभ्रंशाची व्यथा जडली असावी, असें एका पत्रानें म्हटलें. ‘ क्षुद्रबुद्धीच्या कांहीं किंपुरुषांनीं बिस्मार्क यांजवर हा सूड उगविला ’ असें म्हणून एका पत्रानें बादशहांच्या संदेशाबद्दल त्यांची स्तुति केली होती.

नवें राज्य निर्माण करावयाचें म्हटलें म्हणजे त्यासाठीं किती रक्तपात करावा लागतो व किती कष्ट सोसावे लागतात, याचा कटु अनुभव इटली देशाला पुष्कळसा आला असल्यामुळें बिस्मार्क यांजबद्दल इतर देशांहून इटलींत अधिक सहानुकंपा दिसून आली, यांत नवल नाहीं. याशिवाय इटलीवर बिस्मार्क यांनीं ऋणाचें ओझेंहि करून ठेवलें होतें. गुरुमहाराराज पोप यांनींहि बिस्मार्क यांजबद्दल सहानुभूति प्रगट केली.

डच वर्तमानपत्रांनींहि जर्मनपार्लमेंटाचा पुष्कळ निषेध केला. त्यांतील एक सुप्रसिद्ध पत्र म्हणालें,

"इ. स. १८७० सालच्या सुप्रसिद्ध युद्धाच्या पंचविसाव्या वाढदिवशीं जर्मनपार्लमेंटांत एका प्रश्नावर भवतिनभवति झाली, हें कोणास खरेंहि वाटणार नाहीं. जर्मन साम्राज्याचे आद्य जनक बिस्मार्क यांचें अभिनंदन जर्मन पार्लमेंटानें त्यांच्या ऐंशींव्या वाढदिवशीं करावें कीं नाहीं, हा या भवतीनभवतींतला मुद्दा होता. जर्मन पार्लमेंटानें बिस्मार्क यांचें अभिनंदन केलें, तरच त्यांच्या कीर्तींत अधिक भर पडेल असें नाहीं. बिस्मार्क यांची कीर्ति अगोदरच इतकी विस्तृत आहे कीं, पार्लमेंटाच्या ठरावांनीं तींत मोठी भर पडणार आहे असें नाहीं. जर्मन पार्लमेंटांतील या वटूंनीं विराटपुरुषाचें दर्शन आपणांस होत आहे, याबद्दल वास्तविक परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत; पण तसें न करतां जे लोक त्यांचें दर्शन टाळण्यासाठीं बाजूला सरतात, ते स्वतःच्याच पापांत अधिक भर घालतात. जर्मन साम्राज्य आणि त्याचा निर्माणकर्ता यांचे परस्परसंबंध इतके अभेद्य आहेत कीं, असल्या ठरावांनीं त्यांत खंड पडणें शक्य नाहीं. राष्ट्राचे प्रतिनिधि म्हणून कांहीं लोकांनीं भलत्याच गोष्टी जनतेस सांगितल्या, तरी त्यामुळें सत्य बाजूस पडतें असें नाहीं."

बिस्मार्क यांचीं मतें आणि त्यांची राजनीति ज्यांस पसंत नव्हती, अशा कांहीं सुप्रसिद्ध जर्मनांसहि पार्लमेंटाचें हें कृत्य पसंत पडलें नाहीं. क्याथोलिक पक्षाचे एक सुप्रसिद्ध पुढारी कौंट म्याटुशका यांनीं आपल्या पक्षा तर्फे म्हणून पुढील मजकूर प्रसिद्ध केला होता.

" क्याथोलिक पंथाचा एक निस्सीम उपासक आणि जर्मन राष्ट्रभक्त या नात्यानें क्याथोलिक तर्फे या बाबतींत आपलें मत मोकळेपणानें सर्व लोकांसमोर मांडणें मला इष्ट वाटतें. जर्मन राष्ट्राच्या आद्यजनकाच्या ऐशींव्या वाढदिवशीं त्याचें अभिनंदन करण्याचा ठराव जर्मन पार्लमेंटानें नापास केला, याबद्दल क्याथोलिक पक्षास अत्यंत दुःख होत असून ज्या पार्लमेंटीय पक्षांनीं हें कृत्य केलें, ते साम्राज्याचे शत्रू होत, असें क्याथोलिक पक्षाचें स्पष्ट मत आहे. जर्मन पार्लमेंटांतील या प्रतिनिधींनीं साऱ्या जगांत आपली नाचक्की करून घेतली आहे. क्याथोलिकपक्षाचें हें मत प्रसिद्ध न झालें, तर आमच्या मूकतेनें या देशद्रोह्यांच्या कृतीस अनुमती दिली असें होईल. असा आरोप आम्हांवर येईल याकरतां माझ्या लक्षावधी क्याथोलिक बांधवांच्या वतीनें त्या पक्षाचें हें मत सार्वजनिक रीत्या मी जाहीर करीत आहें. "

अशाच रीतीनें जर्मन साम्राज्याच्या इतर भागांतूनहि लोकमत प्रसिद्ध होत होतें. यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, इ. स. १८६४ आणि इ. स. १८७० या दोन सालांच्या दरम्यान जीं कांहीं संस्थानें प्रशियाला अथवा जर्मन साम्राज्याला जोडलीं गेलीं, त्यांतील जनतेनेंहि आपला निषेध प्रदर्शित केला. बिस्मार्क यांच्या वाढदिवशीं या संस्थानांतूनहि हजारों संदेश त्यांस आले.

जर्मनसाम्राज्याचा निर्माणकर्त्याचा अशा प्रकारें अपमान करून ज्यांनीं जर्मनराष्ट्रास परकीयांचा हास्यविषय करून सोडलें त्यांजबद्दल

सार्‍या जर्मनसाम्राज्यांतून अशाच प्रकारें निषेध प्रदर्शित केला. तथापि वाईटांतूनहि पुष्कळ वेळां चांगलें निपजतें असें म्हणतात, तसेंच येथें झालें. पार्लमेंटांत पक्षभेद प्रबळ होत असून यामुळें साम्राज्यास अपाय होण्याचा संभव दिसत आहे, ही गोष्ट जर्मनजनतेच्या लक्षांत येऊन चुकली. याशिवाय बिस्मार्क यांचा अपमान व्हावा म्हणून जी गोष्ट पार्लमेंटानें केली, तिचा परिणाम अगदीं विपरीत होऊन नभूतो नभविष्यति अशा प्रकारचा मान सार्‍या जगाकडून बिस्मार्क यांना मिळाला. असल्या प्रकारच्या ठरावांनीं खर्‍या कीर्तीस उणीव न येतां, ती अधिकच वाढत जाते, हें निःसंशय सिद्ध झालें.

---

प्रकरण बत्तीसावें.

## बिस्मार्क व वसाहती.

जर्मनसाम्राज्य बाल्यदशेंत असतां वसाहतींच्या प्रश्नाकडे फारसें लक्ष जाणें शक्य नव्हतें हें उघड आहे. साम्राज्याची इमारत चिरस्थायी कशी होईल हाच प्रश्न त्याच्या आद्यजनकापुढें त्यावेळीं होता. जर्मनीला स्वाभाविकपणेंच समुद्रकिनारा फारसा मोठा नाहीं. यामुळें जर्मनीची वाढ जमीनीच्याच बाजूनें व्हावी, असाच जणूं काय ईश्वरी संकेत दिसतो. यामुळें फ्रान्स अथवा इंग्लंड यांनीं ज्याप्रमाणें आफ्रिकेंत जाऊन वसाहती निर्माण केल्या, त्याप्रमाणें जर्मनीला करणें इष्ट वाटलें नाहीं. याकरतां ब्रिटन किंवा फ्रान्स या राष्ट्रांशीं या बाबतींत जर्मनीचा झगडा होण्याचा फारसा संभव नव्हता. दुसरें असें कीं, ज्या ठिकाणीं युरोपियनास सुखानें वस्ती करतां येईल, अशीं ठिकाणें इतरांनीं अगोदरच व्यापून टाकलीं होतीं. यामुळें दुसर्‍या खंडांत जाऊन जर्मनवसा-

हती निर्माण करण्याच्या बाबतींत जर्मनप्रजेस उत्तेजन देणें साम्राज्य सरकारास फारसें इष्ट वाटलें नाहीं.

जर्मनप्रजेला या बाबींत उत्तेजन दिलें, तर परकीय राष्ट्रांच्या मनांत जर्मनीबद्दल मत्सर उत्पन्न होऊन त्यांच्याशीं निष्कारण द्वेष वाढेल, अशी भीति जर्मन मुत्सद्यांस होती. याशिवाय खर्चाखालीं अगोदरच वांकलेल्या साम्राज्यावर वसाहती निर्माण करण्याच्या खर्चाचा बोजा अधिक पडण्याचा संभव होता. इतर खंडांत वसाहती निर्माण झाल्या म्हणजे त्यांच्या संरक्षणार्थ प्रचंड आरमाराची आवश्यकता निर्माण होते. यावेळीं जर्मन आरमार अगदींच क्षुद्र होतें. अशा प्रकारच्या अनेक कारणामुळें आपणास वसाहतींची जरूरच नाहीं, असा समज जर्मन साम्राज्यांत सर्वत्र पसरला होता. जे थोडेसे व्यापारी बाह्यदेशीं जाऊन राहिले होते, त्यांच्या संरक्षणासाठीं सध्यांची साधनसामग्री पुरेशी आहे, असें जर्मन मुत्सद्यांस वाटत होतें.

तथापि हॅंबर्ग वगैरे प्रांतांतले जे व्यापारी बाह्यदेशीं जाऊन राहिले होते, त्यांनीं जर्मनसाम्राज्याची वाढ या दिशेनें करण्यास अगोदरच सुरुवात केली होती. आपल्या या कार्यांत राष्ट्राचें पाठबळ आपणास मिळेल कीं नाहीं अथवा मोठें आरमार निर्माण होऊन त्याचा पाठिंबा आपणास मिळेल कीं नाहीं, अशा शंका मनांत न आणतां त्यांनीं या कार्यास सुरुवात केली होती; पण वसाहती निर्माण करणें ही गोष्ट चुटकीसरशी करतां येणारी नव्हे. अशा कार्याला साऱ्या राष्ट्राचें पाठबळ अवश्य पाहिजे. कोठेंहि वसाहत निर्माण करावयाची म्हटली, तर ग्रेटब्रिटन आणि अमेरिका या दोन राष्ट्रांच्या मनांत तेढ उत्पन्न झाल्याशिवाय ही गोष्ट करणें शक्य नव्हती. दक्षिण आफ्रिकेंत इंग्लंडशीं तंटा उपस्थित झाला असता व दक्षिण समुद्रांतील बेटाबद्दल इंग्लंड अमेरिका व जर्मनी या तिघांत अगोदरच बोलाचालीस सुरुवात झाली होती.

ब्रेमेन येथील एक बडा व्यापारी इ. स. १८७६ सालीं बिस्मार्क यांस भेटला होता व या बाबतींत त्यांच्याशीं त्याचें कांहीं बोलणेंचालणेंहि झालें होतें, असें हॅन्सब्लूम नांवाच्या इतिहासकारानें लिहून ठेवलें आहे. 'दक्षिण अफ्रिकेंत एक जर्मनवसाहत स्थापावी. तेथें आगगाडीचा रस्ता करावा व हॅंबर्गपासून आगबोटींची व्यवस्था करावी. या दोन गोष्टी एकाद्या कंपनीनें भागिदारांकडून भांडवल गोळा करून कराव्यात व साम्राज्यसरकारानें या कंपन्यांबद्दल दहा वर्षेपर्यंत हमी घ्यावी. बिस्मार्क यांशीं झालेल्या भाषणाचा गोषवारा अशा प्रकारचा होता. पुष्कळ जर्मन प्रजाजनांचा जो प्रवाह उत्तर अमेरिकेंत लोटत होता, त्याचा ओघ अशा रीतीनें एकाद्या वसाहतीकडे वळणें अनिष्ट नाहीं, असें बिस्मार्क यांसहि वाटत होतें. या कामीं होणारा खर्च अनाठायीं जाईल, असेंहि बिस्मार्क यांस वाटत नव्हतें; पण एकतर या खर्चाला जर्मनपार्लमेंटाकडून मंजुरी मिळणार नाहीं व इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याशीं आजच वितुष्ट निर्माण करणें इष्ट नाहीं, असें बिस्मार्क म्हणाले; तथापि या कल्पनेचें बीज जर्मन साम्राज्यांत यावेळीं पेरलें गेलें होतें, यांत शंका नाहीं. या बीजापासून झाड उत्पन्न होऊन त्याला कोणत्या प्रकारचें फळ येणार, हें अर्थात्‌च कालांतरानें समजण्यासारखें होतें.

हॅंबर्ग येथील जॉन सीझर गोडफ्राय नांवाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्यानें उपोलू नांवाच्या बेटांत फार मोठा जमीनजुमला विकत घेऊन तो उत्पन्नास आणण्यासाठीं त्यावर पुष्कळसा खर्चहि त्यानें केला होता. पुढें एका सट्टयांत त्याच्याजवळील सर्व संपत्ति जाऊन त्याचें दिवाळें निघालें. तेव्हां त्याचें हें वतन साम्राज्यसरकारच्या संरक्षणाखालीं एका जर्मन कंपनीनें आपल्या ताब्यांत घ्यावें, असा कांहीं जणांनीं प्रयत्न केला. एक कोट मार्कस् भांडवलाची एक कंपनी निघाली. तेव्हां या भांडवलावर

तीन टक्के व्याज देण्याची हमी जर्मन सरकारानें दहा वर्षें द्यावी, असा ठराव पार्लमेंटापुढें आला. तेव्हां तो ठराव बारांच्या मताधिक्यानें नापास झाला. यावरून वसाहतीबद्दल जर्मनींत कशा प्रकारचें लोकमत होतें, याचा थोडासा अंदाज होतो. पार्लमेंटानें हा ठराव नापास केला खरा; तथापि वसाहतवाल्यांस उत्तेजन द्यावें, या हेतूनें फ्रँकफर्ट येथें प्रिन्स होहेन लो, यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक वसाहतमंडळ स्थापन झालें होतें.

ब्रेमेनचे कांहीं व्यापारी या उद्योगांत अगोदरच गुंतले होते. यांपैकीं एकानें जर्मन परराष्ट्र खात्याचा पाठिंबा मिळवून आफ्रिकेंत बरीचशी जमीन संपादन केली होती. पुढें आणखी थोड्या दिवसांनीं ग्रीक्वालँड-मध्यें दुसऱ्याहि कांहीं जर्मन व्यापाऱ्यांनीं वस्ती केली. तेव्हां इ. स. १८८४ सालीं दक्षिण आफ्रिकेंत आपल्या हितसंबंधास धोका येण्याचा संभव आहे, अशी तकरार इंग्लडनें केली; पण लॉर्ड ग्रेनव्हील यांनीं इ. स. १८८० सालीं या बाबतींत इंग्लंडनें जें धोरण आंखलें होतें, त्याला सोडून आमचें वर्तन नाहीं, असें जर्मनीनें उत्तर दिलें. ज्या प्रांतावर इंग्लंडनें नांवाचें स्वामित्व सांगून वसाहत मात्र केली नाहीं, तो प्रांत अंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें इंग्लंडचा होत नाहीं व ही गोष्ट पूर्वापर चालीस अनुसरूनहि नाहीं, असें मत बिस्मार्क यांनीं दिलें. तेव्हां या बाबतींत आपला हट्ट सोडून या नव्या वसाहतीवरचा जर्मनीचा हक्क कबूल करणें इंग्लंडास भाग पडलें. यानंतर गिनीच्या उपसागरांत व क्यामेरूनमध्यें जर्मन व्यापाऱ्यांनीं जमिनी संपादन केल्या, तेव्हां ग्लॅड-स्टन यांच्या प्रधानमंडळानेंहि त्यांस हरकत केली होती; पण तीहि वरीलप्रमाणेंच निवारण झाली. अशारीतीनें पश्चिम आफ्रिकेंत एक जर्मनवसाहत निर्माण होऊन तिजवर डॉ. न्याक्टीगॉल नांवाच्या एका गृहस्थाची मुख्य अधिकारी या नात्यानें नेमणूक झाली. फ्रान्स व

ब्रिटन यांशीं तंटा उत्पन्न होईल, अशी कोणतीहि गोष्ट डॉक्टर यांनीं करूं नये, असा हुकूम साम्राज्यसरकारनें त्यांस दिला होता. पुढें आजुबाजूंच्या जमिनींवर मालकी सांगण्यास इंग्लंडनें सुरुवात केली; तेव्हां या लुटालुटीच्या धंद्यांत डॉक्टर मजकूर यांस पडणें भाग झालें. व्हिक्टोरिया नांवाचें एक समुद्रकांठचें गांव इंग्लंडनें घेतलें,तेव्हां न्याक्टिगॉल यांनीं बिंबिया आणि बाहंगा यांजमधील प्रदेश जर्मनीचा आहे, असें जाहीर केलें. पुढें यापैकीं एका गांवांतील कांहीं आफ्रिकन रहिवाशांनीं दगा केला. या लोकांना फूस देण्याच्या कामांत एका इंग्रज अधिकाऱ्याचें अंग आहे, अशा प्रकारचा पुरावा बिस्मार्क यांच्या हातीं आल्यावरून त्या अधिकाऱ्याला, तेथून काढून टाका, अशी मागणी बिस्मार्क यांनीं लॉर्ड ग्रेन्व्हिल यांजकडे केली. त्यांनीं अधिक चवकशी न करतां ती मागणी फेटाळून लावली. तेव्हां या बाबतींत जर्मन पार्लमेंटांत मोठा वादविवाद झाला असतां, बिस्मार्क यांनीं दोन मोठीं भाषणें करून ही सर्व भानगड पार्लमेंटापुढें मांडली व ब्रिटिश सरकाराशीं कायमचा करारनामा करण्यासाठीं कौंट हर्बर्ट बिस्मार्क, यांची रवानगी लंडन येथें केली. लंडनमध्यें या प्रश्नाची पूर्ण वाटाघाट होऊन जर्मनी व इंग्लंड यांजमध्यें पक्के करारमदार झाले व पश्चिम आफ्रिकेंतील जर्मन वसाहतीची सरहद्द निश्चित करण्यांत आली. अशाच रीतीनें फ्रान्सशींहि करारमदार होऊन आफ्रिकेंतील व दक्षिण समुद्रांतील वसाहतींच्या सरहद्दी निश्चित करण्यांत आल्या.

तारीख १८ नवंबर सन १८८४ रोजीं बर्लिन येथें सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा प्रिन्स बिस्मार्क यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरली होती. या सभेंत कांगो व नायगर प्रांत यांच्या भानगडींचा खल होऊन त्याजबद्दल सर्व राष्ट्रांत करारमदार निश्चित करण्यांत आले. या सभेला

इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, अमेरिका, आस्ट्रिया, रशिया व इतर छोटीं राष्ट्रें इतक्यांचे प्रतिनिधि हजर होते.

तारीख २४ आगष्ट सन १८८५ रोजीं पश्चिम पासिफिक समुद्रांतील क्यारोलीन बेटावर जर्मन निशाण लावण्यांत आलें. तेव्हां स्पेननें त्यावर आपला हक्क सांगितला. पुढें या बाबतींत स्पेनशीं बरेच दिवस वाटाघाट होऊन त्याचा निकाल करण्याचें काम पोपकडे सोंपवावें, असें उभयपक्षीं ठरलें. पोप तेरावे लियो, यांनीं या प्रश्नाचा निकाल करून असें ठरविलें कीं क्यारोलीन बेटावर मुख्य राजसत्ता स्पेनची असावी व स्पेननें तेथें जर्मनीच्या पासिफिक आरमाराला लागणाऱ्या कोळशाच्या कोठाराकरतां एक बंदर जर्मनीला द्यावें व याशिवाय जर्मन वसाहतवाल्यांस कांहीं विशेष हक्क द्यावेत.

वसाहतींच्या बाबतींत इंग्लंड, फ्रान्स, स्पेन वगैरे प्रमुख राष्ट्रांनीं जें धोरण स्वीकारलें होतें, तेंच जर्मनीनेंहि स्वीकारावें, असें बिस्मार्क यांचें मत होतें. एकाद्या व्यापाऱ्यानें बाह्यदेशीं जाऊन वसाहत केल्यास त्याला जरूर ती मदत करण्यापलीकडे साम्राज्य सरकारानें अधिक कांहीं करूं नये, हेंच इतर पुढारी राष्ट्रांचें धोरण जर्मनींतहि चालू रहावें, असें मत बिस्मार्क यांनीं पार्लमेंटांत बोलून दाखविलें होतें. पार्लमेंटांतील विरुद्ध पक्षानें या बाबींतहि बिस्मार्क यांजविरुद्ध जाण्यास कमी केलें नाहीं. जर्मन राष्ट्राला नव्या वसाहती करण्याची इच्छा नसतां, बिस्मार्क त्याजवर त्या लादीत आहेत, व ज्यापासून कवडीचाहि फायदा व्हावयाचा नाहीं, असल्या धंद्यांत ते राष्ट्राच्या लक्षावधी रुपयांचा चूर करीत आहेत, असा आरोप बिस्मार्क यांजवर त्यांनीं केला. तथापि विरुद्ध पक्षाला या बाबींत पार्लमेंटाचा पाठिंबा चांगलासा न मिळाल्यामुळें एका आगबोट कंपनीला सुमारें पसतीस लक्ष रुपयांची मदत सरकारांतून मिळण्याचा ठराव पार्लमेंटानें पास केला.

यानंतर न्यूगिनी, मार्शलबेट, बिस्मार्क-आर्चिपेलेगो आणि सालोमन बेटें इतक्या ठिकाणीं नव्या वसाहती निर्माण झाल्या. तेव्हां तारीख ६ एप्रील सन १८८६ रोजीं ग्रेटब्रिटनशीं बिस्मार्क यांनीं नवा करार केला. इ. स. १८८४ सालीं जर्मन ईस्ट आफ्रिका नांवाची कंपनी, या नांवाची एक व्यापारी मंडळी निर्माण झाली होती. या मंडळी तर्फे डॉ. कार्लपिटर्स यांनीं पूर्वआफ्रिकेंत प्रचंड जमीनजुमला खरेदी केला. या खरेदींत पुढें आणखी भर पडून कंपनीची पूर्वआफ्रिकेंतील स्थावर मालमत्ता सोमाली लँडपासून केप डेलगाडो पर्यंत पसरली. यापैकीं ज्या कित्येक समुद्रकिनाऱ्याच्या भागावर या कंपनीनें आपली मालकी निर्माण केली होती, तिजवर झांजीबारच्या सुलतानानें आपला राजसत्तेचा हक्क सांगितल्यामुळें तेथें तंट्याचें मूळ उपस्थित झालें. त्यावेळचे इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉर्ड ग्रेन्व्हिल यांनीं सुलतानाच्या हक्कास पुष्टी दिली. ब्रिटिश व हिंदुस्थान सरकार या दोघांनींहि आपल्या अमलाखालीं सुलतानाची राजसत्ता पुष्कळ वर्षांपासून कबूल केली आहे, असें लॉर्ड ग्रेनव्हिल यांनीं बिस्मार्क यांस कळविलें. ब्रिटिश प्रधानमंडळाचा पाठिंबा आपणास आहे, असें पाहून इ. स. १८८५ च्या मे महिन्यांत तंट्याच्या जागीं सुलतानांनीं आपलें सैन्य पाठविलें. तेव्हां जर्मन आरमाराची एक तुकडी तेथें आली व त्याच्या मुख्य अधिकाऱ्यानें सुलतानास निकराचा खलिता पाठवून उत्तराला चोवीस तासांची मुदत दिली. तेवढ्या अवधींत उत्तर न आल्यास राजवाड्यावर आपण तोफ लावूं असेंहि त्यानें कळविलें होतें. तेव्हां सुलतानानें लॉर्ड ग्रेन्व्हिल यांच्या सल्ल्यानें पडती बाजू घेऊन जर्मनीचा हक्क कबूल केला व जर्मन व्यापाऱ्यांस धंद्याच्या बाबींत कांहीं विशेष हक्क दिले. या बाबींतहि नेहमींप्रमाणें इंग्लंडशीं तह होऊन दोघांच्या प्रदेशकक्षा निश्चित झाल्या व त्याचप्रमाणें पोर्तुगालशींहि कांहीं करारमदार झाले.

गुलाम विकण्याचा धंदा करणाऱ्या कित्येक अरब टोळ्यांनीं इ. स. १८८८ सालीं पूर्व आफ्रिकेंत बराच दंगा केला होता. यामुळें तेथलीं कांहीं गांवें वस्तीला अयोग्य झालीं होतीं. यावेळीं जर्मन ईस्ट आफ्रिका कंपनीचा मुख्य व्यवहार बंदरांच्या गांवींच चाले. बंदर सोडून देशांत राहणें या अरबांच्या टोळधाडीमुळें अशक्य झालें होतें. तेव्हां या अरबांची खोड मोडण्यासाठीं मेजर विस्मन नांवाच्या एका अधिकाऱ्याची नेमणूक साम्राज्य सरकारानें केली. त्याचप्रमाणें इतर युरोपियन राष्ट्रांच्या संगनमतानें बंदरांच्या गांवीं गुलामांचा व्यापार चालूं नये यासाठीं तेथें नाकेबंदी करण्यांत आली. यामुळें या व्यापारास बराच आळा बसला.

यानंतर सामोआ बेटासंबंधीं जर्मनी, इंग्लंड आणि अमेरिका यांजमध्यें बऱ्याचशा निकराचा तंटा सुरू झाला. देशांतील मुळचे रहिवाशी आडदांडपणें वागत. त्यांस आळा घालण्याचें काम मोठें दुष्कर होतें. त्यांच्या पैकीं ज्या कित्येकांस न्यायाचा अधिकार दिला होता, ते न्यायाधिकारीहि त्यांच्या कित्येक दुष्कृतींकुडें दुर्लक्ष करीत. लॉपेपा नांवाचा त्यांचा एक राजा होता. हा या सर्व दंग्याच्या मुळाशीं आहे,असें पाहून जर्मन अधिकाऱ्यांनीं त्याची उचलबांगडी करून त्याला प्रथम क्यामेरून बेटास पाठविलें व तेथून त्याची रवानगी मार्शल बेटांत केली. त्याच्या जागीं टामासेस नांवाच्या नव्या राजाची योजना करण्यांत आली. हा राजा जर्मनांच्या हातांतलें नुसतें खेळणें होऊन बसला होता. त्याला तेथील रहिवाशांचें पाठबळ नव्हतें. त्याच्या जागीं माटाफा नांवाच्या एका टोळीच्या,प्रमुखाची योजना करावी, असें तद्देशीय प्रजेचें मत होतें. तेव्हां इ. स. १८८१ च्या आगष्ट महिन्याच्या अखेरीस टामासेस व माटाफा यांमध्यें युद्ध सुरू झालें. टामासेस याला जर्मन आरमाराची मदत मिळाली होती व सामोआ बेटांतील बहुतेक प्रजा माटाफाला

अनुकूल होती. तारीख १९ दिसेंबर रोजीं फंगाली नांवाच्या बंदरावर १४० जर्मन खलाशी उतरविण्यांत आले. त्याजवर माटाफाच्या सैन्यांनीं अचानक घाला घातल्यामुळें या तुकडीची बरीच खराबी होऊन राहिलेल्या लोकांस परत जावें लागलें. माटाफाच्या सैन्याला शस्त्रास्त्रें व दारूगोळा यांचा पुरवठा अमेरिकन व्यापाऱ्याकडून होत असून ब्रिटिश सरकारहि त्यालाच पाठींबा देत आहे, असें पाहून तेथल्या जर्मन व्यापाऱ्यांचीं मनें या दोन राष्ट्रांबद्दल बरींच कलुषित झालीं.

जर्मन अधिकाऱ्यांनीं सामोआ बेटांत लष्करी कायदा पुकारला; पण इंग्लंड व अमेरिका या देशांच्या प्रतिनिधींनीं हरकत घेतल्यामुळें दुसऱ्याच दिवशीं तो परत घेण्यांत आला. या वेळीं अपिया नांवाच्या उपसागरांत तीन अमेरिकन एक ब्रिटिश व तीन जर्मन लढाऊ जहाजें नांगरून पडलीं होतीं. तारीख १५ मार्च रोजीं तेथें एक भयंकर वादळ होऊन यांपैकीं एक ब्रिटिश जहाज मात्र सुखरूपपणें भर समुद्रांत निघून गेलें.

सामोआ बेटाच्या या दंग्याच्या प्रसंगीं बिस्मार्क यांनीं जी वागणूक केली, तिजबद्दल स्टिव्हनसन् नांवाच्या इतिहासकारानें त्यांची फार तारीफ केली आहे. सामोआ बेटांतील रहिवाशांसंबंधीं यत्किंचितहि द्वेषबुद्धि मनांत न बाळगितां अथवा खोट्या इभ्रतीच्या मोहास बळी न पडतां बिस्मार्क यांनीं जर्मन अधिकाऱ्यांचीं चूक कबूल केली व तेथला कारभार सुरळीत चालण्याकरितां नवी शिस्त घालून दिली. पदच्युत केलेल्या लॉपेपा राजाला मार्शल बेटांतून परत आणून त्याची स्थापना बिस्मार्क यांनीं पुन्हां त्याच्या गादीवर केली. पुढें या बेटांतील निरनिराळ्या राष्ट्रांचे हितसंबंध निश्चित करण्याकरतां बर्लीन येथें इंग्लंड

अमेरिका व जर्मन या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक होऊन सामोआ बेटाचें स्वातंत्र्य सर्वांनीं कबूल केलें, व या तीन राष्ट्रांच्या अनुमतिनें तेथील रहिवाशांनीं आपल्या पसंतीचा राजा गादीवर बसवावा, असें ठराविलें.

सामोआ बेटा संबंधीं बिस्मार्क यांनीं आंखलेले धोरण इंग्लंडांतील कांहीं प्रमुख लोकांस आवडलें नाहीं. तथापि बिस्मार्क यांच्या वर्तणुकी संबंधीं खुद्द त्यांच्यांतहि एकमत नव्हतें. मूळ रहिवाशांच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष करून जर्मन व्यापाऱ्यांचें तट्टू बिस्मार्क यांनीं पुढें दामटलें, असें कित्येकांनीं म्हटलें आणि दुसऱ्या कित्येकांनीं आपल्या स्वतःच्या अधिकाऱ्याशीं बिस्मार्क यांनीं बेमुर्वतीचें वर्तन केलें, असेंहि म्हटलें. तेथील जर्मन अधिकाऱ्यांचें वर्तन त्यांस दिलेल्या अधिकारा बाहेर होतें, असें खुद्द बिस्मार्क यांचें मत होतें. तसेंच ब्रिटिश व अमेरिकन अधिकाऱ्यांशीं त्यांनीं केलेलें वर्तनहि बिस्मार्क यांना पसंत पडलें नाहीं. सामोआ बेटांतील अधिकाऱ्यास पाठविलेल्या खलित्यांत ते म्हणतातः—

"परकीय राष्ट्रांच्या प्रतिनिधींच्या अमलाखालीं, जे परकीय लोक राहतात, त्यांजवर आपला अम्मल चालविण्याचा अधिकार तुम्हांस नव्हता. या बाबींत तुमच्या वर्तनासंबंधीं इंग्रज अधिकाऱ्यानें काढलेले आक्षेप सप्रमाण आहेत. या कारणावरून जे कांहीं तंटे उपस्थित होतील, त्यांत चुकीचा सर्व भाग तुमच्याकडेच येत असल्याचें तुम्हांस आढळून येईल. 'जर्मनीनें सामोआ बेटाचा सर्व कारभार आपल्या हातीं घ्यावा' अशी मागणी तुम्हीं आम्हाकडे केली आहे; पण असा आमचा बेत कधींच नव्हता आणि तुम्हांसहि अशा दृष्टीचा अधिकार कधींच देण्यांत आला नव्हता. याकरतां तुम्ही काढलेले सर्व हुकूम परत घ्यावेत. तुम्ही केलेल्या तारेंतील मजकुराचा अर्थ मला बरोबर सम-

जला असेल, तर या बाबींतलें तुमचें वर्तन शिस्तीला धरून होतें, असें मला म्हणवत नाहीं."

नव्या वसाहती स्थापन करण्याच्या मार्गांत अनेक प्रकारच्या अडचणी उद्भवतात, यांत संशय नाहीं. अशा प्रकारच्या भावी सर्व अडचणी आधीं ध्यानांत आणून त्यांच्या निराकरणाची अगाऊ तजवीज करणें शक्य नसतें. याकरतां प्रत्येक बाबींत दुय्यम अधिकाऱ्यांना खुलासेवार सूचना देणें कोणाहि प्रधानास अशक्य आहे. ईस्ट ऑफ्रितेंतील गुलामांचा व्यापार बंद करण्याकरतां काय काय गोष्टी केल्या पाहिजेत, ह्याचा सर्व तऱ्हेचा खुलासा करा, अशी मागणी विस्मन् यांनीं विस्मार्क यांजकडे केली होती; पण अशी गोष्ट करणें शक्य नाहीं, असें बिस्मार्क यांनीं उत्तरीं कळविलें. अशा प्रकारच्या परिस्थितींत कसेंहि करून यश मिळवा, इतकीच सूचना करणें बिस्मार्क यांस शक्य होतें.

जर्मनीनें स्वीकारलेल्या वसाहतींच्या धोरणाविरुद्ध ग्लॅड्स्टन् प्रधानमंडळानें एवढी प्रतिकूळता कां दाखविली, याचें कारण बिस्मार्क यांच्या लक्षांत येईना. या बाबींत 'पृथ्वीवरील सर्व रिकाम्या जागा आपल्याच आहेत असें इंग्लंडास वाटत असावें' असें एकवार ते म्हणाले होते. तेव्हां असल्या प्रकारची कल्पना समूळ नाहींशी करण्याकरतां अंतरराष्ट्रीय कायदा व पूर्वापार पद्धति यांजवर दोन कडक भाषणें त्यांस करावीं लागलीं.

जर्मनीच्या वाढत्या वसाहतींसंबंधीं इंग्लंडांत प्रक्षुब्ध झालेलें लोकमत हळूहळू थंड होत गेलें. आफ्रिकेंत जारीनें चालणाऱ्या गुलामांच्या व्यापारास आळा घालण्याच्या कार्यांत जर्मनीहि शक्य ती खटपट करीत आहे, असें पाहून इंग्लंडच्या मनांतील या बाबींतील वैषम्य बहुतेक नाहींसें झालें. यानंतर पुढें थोड्याच काळानें कौंट क्याप्रिव्ही यांनीं

हेलिगोल्यांडचा सवदा इंग्लंडशीं केला हेलिगोल्यांडासारख्या एका क्षुद्र व खडकाळ बेटाबद्दल आफ्रिकेंतील एक चांगला सुपीक प्रदेश आपणास मिळाला, यामुळें इंग्लंडांतील लोकांस फार आनन्द झाला व पूर्वींचें राहिलेंसाहिलेलें वैषम्यहि समूळ नाहींसें झालें. उत्तर समुद्रांत आरमारी वर्चस्व असल्याशिवाय या बेटाचा लष्करी दृष्टयाहि कांहीं उपयोग होण्यासारखा नव्हता. आणि जर्मनीचें मुख्य बळ त्याच्या जमिनीवरील लष्करांत असल्यामुळें हा सवदा जर्मनीला पथ्यकर होईल, अशी कल्पना इंग्लंडांत कोणाच्याहि मनांत आली नाहीं.

एकंदर गोष्टींचा विचार करतां बिस्मार्क यांचें वसाहतीचें धोरण बऱ्याच अंशीं सफळ झालें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण खुद्द जर्मनीपेक्षांहि अधिक विस्तृत एवढा भूभाग जर्मन लोकांस सध्यां वावरावयास मिळाला आहे. त्यांच्यांत कांहीं कर्तबगारी असेल, तर ती दिसून येण्यास एवढ्या भागांत पुरेसा अवकाश आहे.

---

प्रकरण तेहतीसावें.

## जुबिलीनंतर.

बिस्मार्क यांच्या ऐंशीव्या वाढदिवशीं त्यांस जसा मान मिळाला, तसा तो एकाद्या मोठ्या जगद्विजयी बादशहासहि मिळाला नसेल. जगांतील सर्व सुधारलेल्या देशांकडून, राजेरजवाड्यांकडून आणि अनेक प्रकारच्या संस्थांकडून मानपत्रांचा वर्षाव त्यांजवर झाला.

राज्यधुरा खांद्यावरून खालीं ठेवल्यानंतर राजकारणाशीं बिस्मार्क यांचा प्रत्यक्ष कोणताहि संबंध नव्हता; तथापि, राष्ट्राच्या जीवनकार्यांत जें अढळ स्थान त्यांनीं मिळविलें होतें, तें अखेरपर्यंत तसेंच अढळ होतें. राष्ट्रकार्याची कोणतीहि चळवळ चालू झाली, तरी बिस्मार्क यांचें

अंग तींत असे. तरुणपणाच्या उत्साहानें व जोमानें वृद्धापकाळींहि अशा चळवळीस ते हातभार लावीत होते. त्यांच्या शरीरांतला जोम गेला होता, तथापि त्यांच्या मनाचें सामर्थ्य पूर्ववत् कायम होतें. मानपत्रास उत्तरें देतांना जीं भाषणें त्यांनीं केलीं, तीं पाहिलीं म्हणजे त्यांची प्रवृत्ति किती जोरदार होती, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. त्यांच्या भाषणांतील तीक्ष्णतेमुळें पुष्कळ लोक खवळून जात ही गोष्ट खरी; तथापि त्यांच्या स्पष्टोक्तीचा परिणाम राष्ट्रदृष्ट्या अखेरीस फायद्याचाच होई. एका कवीनें बिस्मार्क यांस जर्मन राष्ट्रपुरुष कल्पून त्यांजसंबंधीं पुढील अलंकारिक वर्णन केलें होतें. " जर्मानियाच्या तोंडून शब्द बाहेर पडले, म्हणजे सारें जग कंपायमान होतें. तिची तरवार चमकली, म्हणजे सैन्यामागें सैन्य विरघळून जातें. आतां ही प्रचंड लाट शांत झाली आहे. "

बिस्मार्क यांनीं प्रधानपद सोडलें होतें व ते स्वस्थ बसून राहिले होते, तरी त्यांजवरचा त्यांच्या शत्रूंचा रोष कमी झाला नव्हता. मधून मधून प्रसंग साधेल त्याप्रमाणें ते त्यांजवर हल्ले करीतच होते. फ्रेड्रिकश्रू येथें आपल्या घरीं बसूनच बिस्मार्क एकाद्या भाषणानें अशा अनेक हल्ल्यांचें निर्मूलन करीत. कालेंकरून जर्मनीच्या राजकारणाचें वातावरण हळू हळू थंडावत गेलें व बिस्मार्क यांचीं हीं द्वंद्वेंहि नाहींशीं झालीं.

इ. स. १८९६ च्या एप्रील महिन्यांत इराणचा बादशहा नासरुद्दीन यानें जर्मनीबद्दल लिहिलेला कांहीं मजकूर जर्मन पत्रांत प्रसिद्ध झाला. त्यावरून फ्रँकोजर्मन युद्ध, जर्मन संस्थानांची संहति व या गोष्टी घडवून आणणारे पुरुष यांजबद्दल त्या बादशहाचें मत दिसून येतें.









१ बिस्मार्क यांचे वडील.
२ बिस्मार्क यांची पत्नी.

१ बिस्मार्क यांच्या मातोश्री.
२ युद्धमंत्री फां रून.

"प्रूस देशासंबंधीं इतके दिवस आम्हास फारशी माहिती नव्हती. या देशाकडे आमचें फारसें लक्ष नव्हतें; पण गेल्या दोन वर्षांत या देशांतील बादशहानें जगांतील सगळ्या बादशहांस मागें टाकलें आहे. पश्चिमेकडून आलेल्या सगळ्या पत्रांत या बादशहांच्या धैर्याबद्दल आणि त्यांच्या प्रजेच्या शौर्याबद्दल वर्णनें आलेलीं आहेत. फ्रंगी (फ्रेंच) लोकांचें सैन्य त्यांनीं उधळून लावलें व नेपोलियन बादशहास शृंखलाबद्ध करून आपल्या देशीं नेलें. माझे वजीर, राजपुत्र व तेहरानमधील परराष्ट्राचे वकील हे प्रूसच्या राजाबद्दल पुष्कळ गोष्टी बोलत होते. या गोष्टी ऐकून मला जिज्ञासा होऊन फ्रंगी बादशहाचा हा जेता आहे तरी कसा, हें पाहून यावें असें मला वाटलें. माझा मुख्य सेनापति ग्यास्टीगर याजकडून या लढाईची सर्व हकीकत मीं ऐकून घेतली. परमेश्वरानें प्रूस देशाला एवढा मोठा सामर्थ्यवान् बादशहा कसा दिला व त्यानें आपल्या राष्ट्राचें वैभव कसें वाढविलें, ही सारी हकीकत मीं ऐकून घेतली. त्याच प्रमाणें त्याच्या दुसऱ्या एका हस्तकानें प्रथम आस्ट्रियाचें सैन्य कसें जिंकलें व नंतर फ्रंगी लोकांचा कसा धूवा उडविला, हेंहि मीं ऐकून घेतलें. या शहाण्या बादशहाजवळ शूर सेनापति व बुद्धिवान् मुत्सद्दी आहेत. त्यांच्या उपदेशानें प्रूसचे लोक एकदिलानें उन्मत्त फ्रंगी लोकांशीं लढले व त्यांना निर्मूळ करीपर्यंत त्यांनीं तलवार खालीं ठेवली नाहीं. नंतर प्रूस देशाजवळच्या लहान लहान खानांनीं प्रूसच्या राजाला आपला बादशहा केलें. ही गोष्ट शत्रूच्या मुलखांतच घडली. आज या बादशाहांच्या मुकुटाचे देदीप्यमान किरण पांच कोटी लोकांवर पसरले आहेत. फ्रंगीस्थान (यूरोप) च्या इतिहासांत एवढा मोठा शक्तिमान् बादशहा दुसरा झाला नाहीं. पश्चिमेकडील दुसरे बादशहा आज त्याला भेटण्याची इच्छा करीत आहेत. कारण त्याचा

हस्त शक्तिमान आहे. तो आपल्या इच्छेनें वाटेल तें करूं शकतो. त्याची मैत्री लाभदायक आणि त्याचा द्वेष मृत्युदायक आहे."

अशा रीतीनें इ. स. १८७०--७१ सालच्या युद्धाबद्दल साऱ्या जगभर कौतुक पसरलें होतें. या युद्धानें वुइलियम बादशहा, बिस्मार्क व मोल्टकें यांचीं नांवें सर्वतोमुखीं झालीं. आफ्रिकेंतील कृष्णवर्ण रहिवाशांतहि या युद्धासंबंधीं आश्चर्यकारक गोष्टी कौतुकानें सांगितल्या जात होत्या.

जर्मनींतील लोकांना तर बिस्मार्क यांच्या संबंधीं अपार पूज्यभाव उत्पन्न झाला होता. जागोजाग त्यांचे पुतळे उभारले जात होते. बिस्मार्क ज्या एका क्लबाचे मेंबर होते, त्यांतील मंडळी त्यांस भेटावयास फ्रेडिकश्रू येथें आली असतां बिस्मार्क त्यांस म्हणाले,

"आपल्या क्लबाच्या मंडळीची जी यादी मीं वाचली, तीवरून त्यांत सर्व धंद्यांचे लोक आहेत, असें मला दिसून आलें. येथें सर्व धंद्यांचे लोक मला भेटावयास येतात, यावरून माझी कामगिरी कोणा विशिष्ट व्यक्तीला अथवा विशिष्ट धंद्याच्या लोकांनांच पसंत पडली आहे, असें नाहीं, तर ती सर्वांस पसंत पडली आहे, हें पाहून मला मोठा संतोष होतो. आतां सर्व धंद्याचे लोक सारखेच संतुष्ट झाले आहेत, असें नाहीं, हें मी कबूल करतों; पण तसें झालें नाहीं, ही माझ्या दृष्टीनें परमेश्वराची कृपाच होय. पूर्ण संतोष ही मोठी आपत्ति आहे, असें मला वाटतें. असंतोषामुळेंच आपलें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडत जातें. असंतोष नाहींसा झाला, कीं, सुधारणेचे यत्न आणि अहोरात्र चाललेली खटपट हीं सुद्धां थंडावतील यांत संशय नाहीं. मनुष्यानें दिवसेंदिवस अधिकाधिक चांगलें होत जावें, याकरतांच परमेश्वरानें प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत असंतोषांचें बीज पेरून ठेवलें आहे. या

दृष्टीनें पाहतां आपली समाजरचना व आपलें राजकारण यांचा उपयोग जोंपर्यंत तुमच्या इच्छातृप्तीकडे होत असतो, तोंपर्यंतच तुम्हांस तीं प्रिय असतात. तथापि कोणत्याहि समाजरचनेंत सर्व लोकांस पूर्ण तृप्ती या जगांत कधींतरी सांपडेल, अशी भलतीच अपेक्षा तुह्मीं आपल्या हृदयांत बाळगूं नये, अशी तुम्हां सर्वांना माझी प्रार्थना आहे. दक्षिण समुद्रांतील बेटांतील रहिवाशी दिवसांमागें दिवस खजूरीच्या झाडाखालीं पडून असतात व वरून पडणारा खजूर खाऊन सारें आयुष्य आळसांत काढतात. आपणहि त्यांचें अनुकरण न करण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

"तृप्ती हा पदार्थ या जगांत उपलब्ध नाहीं. परमेश्वरानें आपणांस तो दिलेलाच नाहीं. सद्गृहस्थहो, आतां तुम्हांसमोर हीं ताटें वाढलेलीं आहेत. येथें आपण सारेजण एकमेकांच्या पंक्तीचा लाभ घेऊन त्यांत तरी तृप्ती सांपडते कीं काय, तें पाहूं या."

म्याकलेनबर्ग-श्वेरीनच्या जहागिरींतून बिस्मार्क यांस भेट व पत्र आलें असतां त्यांनीं त्यांस पुढील उत्तर पाठविलें.

"सद्गृहस्थहो, तुम्हीं जें माझें अभिनंदन केलें, त्याबद्दल व विशेषतः तुम्हीं दिलेल्या भेटीबद्दल मी तुमचें मनःपूर्वक आभार मानतों. तुमच्या परलोकवासी ग्रँडड्यूकचा मजवर फार लोभ होता व माझेंहि त्यांजवर फार प्रेम होतें. माझे धनी पहिले वुइलियम बादशहा यांच्याशीं त्यांचें साम्य पुष्कळ बाबींत असल्यामुळें, तर माझा लोभ विशेषच दृढ झाला होता. जर्मन संस्थानांचें एकीकरण व्हावें यासाठीं त्यांसहि फार तळमळ लागून राहिली होती. तुमच्या परलोकवासी ग्रँडड्यूकवरचें माझें हें प्रेम मी तुमचे नवे ग्रँडड्यूक यांच्या चरणीं अर्पण करतों. प्रशिया व म्याकलेनबर्ग यांचा स्नेहसंबंध फार प्राचीनकाळचा आहे. प्रशियाच्या

पडत्या काळांत म्याकलेनबर्गनें त्याची पाठ राखिली होती. परदेशीं एकादा म्याकलेनबर्गचा रहिवाशी मला भेटला असता, तर स्वदेशबंधु या नात्यानें जशी मीं त्याला मिठी मारली असती, तशी दक्षिणेकडील एकाद्या जर्मनास मीं मारली नसती.

"पण हा भेदभाव काळाच्या पोटांत आतां सर्वथैव लोपला असून तो पुन्हां जन्मास येणार नाहीं, अशी मला आशा आहे. एकसूत्रानें बद्ध झालेल्या जर्मन लोकांत परमेश्वर पुन्हां फूट पडूं देणार नाहीं, असा मला भरंवसा आहे. प्रसंगविशेषीं परस्परांत आपण कितीहि भांडलों, तरी रणभूमीवर ज्यांचीं रक्तें एक झालीं आहेत, ते पुन्हां कधींहि विभक्त होणार नाहींत. सॅक्सनी, ब्व्हेरिया वगैरे शेजाऱ्यांशीं प्रशियाचीं भांडणें पूर्वकाळीं पुष्कळ वेळां झालीं आहेत; पण फ्रेड्रिक दी ग्रेटच्या काळापासून म्याकलेनबर्गशीं प्रशियाचा तंटा केव्हांहि झाला नाहीं. फ्रेड्रिक दी ग्रेट यानें आस्ट्रिया, पोलंड वगैरे देशांप्रमाणें म्याकलेनबर्गलाहि थोडाबहुत त्रास दिला असेल; पण या गोष्टी आतां गतकाळाच्या उदरांत गेल्या आहेत."

या व अशाच प्रसंगीं उच्चारलेल्या दुसऱ्या शब्दांवरून जर्मनसंहतीबद्दल बिस्मार्क यांच्या चित्तांत कशाप्रकारचे विचार घोळत होते, याचें अनुमान होतें. जर्मन संस्थानें विभक्त राहिलीं, तर त्यांचें राष्ट्रीयत्व नाहींसें होऊन तीं नामशेष होतील, अशी बिस्मार्क यांची पुरी खात्री होती. जर्मन कुळापैकीं कोणत्याहि शाखेनें जर्मनसंहतींतून बाहेर पडूं नये, हीच त्यांची मोठी इच्छा होती.

इ. स. १८९६ सालीं बिस्मार्क यांस त्यांच्या जुन्या व्यथेनें पुन्हा पछाडलें. यावेळीं त्यांची प्रकृति पुन्हां इतकी बेताल झाली कीं, त्यांचा मुलगा कौंट हर्बर्ट याला फ्रेड्रिकश्रू येथें यावें लागलें. यावेळीं ते कित्येक

महिनेपर्यंत एकसारखेच अजारी असल्यामुळें त्यांस कोणाची भेट घेतां आली नाहीं.

या अजारांतून उठल्यानंतर बिस्मार्क प्रथम हिंडूं फिरूं लागल्याचें वृत्त लोकांस कळलें, तेव्हां लोकांना फार आनंद झाला.

तारीख १० मे रोजीं जर्मनी व फ्रान्स यांजमधील तहाच्या वार्षिक दिनाचा उत्सव झाला. या दिवशीं पहिल्या वुइल्यिम बादशहाचें एक मोठें स्मारक खुलें करण्याचा विधि दुसऱ्या वुइलियम बादशहांनीं स्वहस्तें केला. हें स्मारक फ्रँकफर्ट शहरीं उभारण्यांत आलें होतें. इ. स. १८६६ सालापर्यंत याच फ्रँकफर्ट शहरीं जर्मन संहतीच्या खटपटी अनेकवार होऊन त्या साऱ्या विफळ झाल्या होत्या. जर्मन संस्थानांची एकी व्हावी यासाठीं तेथें जमलेले प्रतिनिधी परस्परांविरुद्ध खलबतें मात्र करीत. यावेळच्या प्रतिनिधींच्या बैठकींची मासलेवाईक हकीकत ब्रिस्मार्क यांनीं एका पत्रीं लिहिलेली वाचकांस स्मरत असेलच. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें बिस्मार्क यांस फ्रँकफर्ट येथें जातीनें हजर राहतां आलें नाहीं. यामुळें पुष्कळ लोकांचा मोठा विरस झाला. बिस्मार्क यांना या प्रसंगीं फ्रँकफर्टहून पुढील तार दुसरे वुइलियम यांनीं पाठविली होती.

"पंचवीस वर्षांपूर्वी फ्रँकफर्ट मुक्कामीं जो तह झाला, त्याचा वाढदिवस आज आपण साजरा करीत आहों. या प्रसंगीं परलोकवासी वुइलियम बादशहांचें स्मारक उघडलें जात आहे, हें अगदीं योग्यच आहे. जर्मनीनें आपली संहती ज्या काळीं निर्माण केली, व राष्ट्रमालिकेंत आपल्या मोठेपणास साजेसें स्थान निर्माण केलें, त्या काळाचें पर्यवसान फ्रँकफर्ट येथें पंचवीस वर्षांपूर्वी झालें. परमपूज्य प्रिन्स, या मोठ्या गोष्टी तुम्ही आपल्या आंगच्या अनेक गुणांनीं घडवून आणल्या. याकरतां या प्रसंगीं त्यांचें स्मरण करून तुमचें उतराई होणें हें माझें अवश्य कर्त्तव्य

आहे, असें मी समजतों. बादशहा वुइलियम दी ग्रेट यांच्या नांवाबरोबर त्यांच्या महनीय चान्सेलरचें नांवहि इतिहासांत व माझ्या स्मरणपटांत चिरकाळ जोडीनें राहील. तुम्हांबद्दल माझ्या चित्तांत असलेला आदर-भाव कधींहि नष्ट होणार नाहीं."

वुइलियम राजे व बादशहा.

या तारेला बिस्मार्क यांनीं पुढील उत्तर पाठविलें.

"बादशहांनीं कृपावंत होऊन मला जी तार पाठविली, तीमुळें मला अत्यानंद होत आहे. या तारेमुळें पूर्वीं गेलेल्या सुखाच्या काळाचें स्मरण मला झालें. सरकारच्या पायापाशीं माझी तज्ञताबुद्धि अर्पण करण्याची मी परवानगी घेतों."

फ्रँकफर्ट शहराचें प्रशियाशीं पूर्वकाळीं मोठें सूत होतें असें नाहीं. याशिवाय इ. स. १८६६ सालीं तेथील बंडस्त्राथचें ठाणें उठविल्या-मुळें त्या शहराचें महत्व कमी झालें होतें. तथापि नव्या आमदानींत भरभराटीचे दिवस त्याला दिसल्यामुळें त्याच्या मनांतील प्रशियाबद्दलचें किल्मिष निघून गेलें होतें. या फ्रँकफर्ट शहरामार्फत बिस्मार्क यांस पुढील तार आली.

"या महत्वाच्या दिवशीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपणास येथें हजर राहतां आलें नाहीं, याबद्दल आम्हांस फार वाईट वाटत आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं याच दिवशीं जो चिरस्मरणीय तह आपण घडवून आणलात त्यामुळें जर्मनीनें केलेल्या यशस्वी युद्धाचें उज्वल फळ त्याला प्राप्त झालें. आपणास परमेश्वरानें दीर्घकाल आयुरारोग्य द्यावें, असें आम्ही मनःपूर्वक इच्छितों."

जर्मनसंहतीच्या बाबतींत सर्व यश आपलें एकट्याचेंच आहे, असें बिस्मार्क यांस केव्हांहि वाटलें नाहीं. हें महत्कार्य घडवून आणण्याच्या

बाबतींत अनेकांचे श्रम खर्ची पडले आहेत, ही गोष्ट त्यांनीं स्वतः भाषणांतून व खाजगी पत्रांतून अनेकवार कबूल केली आहे. बिस्मार्क घमंडखोर होते, या त्यांच्या शत्रूंच्या आक्षेपास बिस्मार्क यांच्या सार्वजनिक भाषणांत किंवा खाजगी पत्रांत पुरावा मिळत नाहीं. जर्मनसंहतीचें यश लोकांनीं त्यांस आपणहून देऊं केलें असतांहि त्यांनीं तें घेतलें नाहीं. यांत त्यांची मनःप्रवृत्ति स्पष्ट दिसून येते. कौंट गायडो हेंकेल नांवाच्या आपल्या एका स्नेह्यास या उत्सवाच्या दिवशींच त्यांनीं पुढील पत्र लिहिलें.

"फ्रँकफर्टच्या तहाच्या पंचविसाव्या महोत्सवप्रसंगीं तुमचे आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. तहाच्या पूर्वी व तहाच्या वाटाघाटींत तुम्हीं जें अप्रतिम साहाय्य मला केलें, त्याबद्दल आज तुमचे आभार मानणें इष्ट आहे. तुमच्यासारख्या पुष्कळ वर्षांच्या विश्वासू स्नेह्याची मदत मला झाली नसती, तर एवढा राज्यकारभार इतक्या सुव्यवस्थितपणें मला हांकता आला असता कीं नाहीं, याची शंकाच आहे. याकरतां कृतज्ञतापूर्वक व आनंदानें तुमचे आभार मी मानतों."

आपला—व्हॉ. बिस्मार्क.

याच सुमारास चीनचे सुप्रसिद्ध 'बिस्मार्क' ली-हुंग-चंग हे बिस्मार्क यांस भेटण्यासाठीं फ्रेड्रिकश्रू येथें आले होते. या वेळीं बिस्मार्क यांची प्रकृति बरीच बिघडलेली होती. ली-हुंग-चंग यांजबरोबर बरेच सुप्रसिद्ध चिनी गृहस्थ व कांहीं जर्मन मुत्सद्दीहि आले होते. बिस्मार्क व ली-हुंग-चंग यांनीं परस्परांची कुशल पृच्छा केल्यानंतर बिस्मार्क म्हणाले, "चीन देशाशीं सख्य जोडावें, अशी फार दिवसांपासून माझी इच्छा होती; पण अनेक अडचणींमुळें ही माझी इच्छा मला तृप्त करतां आली नाहीं."

"आपण सध्यां काय करीत आहां?" असा प्रश्न ली-हुंग-चंग यांनीं केला. तेव्हां 'मी आतां कांहीं करीत नाहीं. दगदग करण्याचें कांहीं कारणच आतां मला उरलें नाहीं. आतां या भव्य अरण्यश्रीचा उपभोग घेण्यापलीकडे दुसरा कोणताच धंदा मला उरलेला नाहीं.' असें उत्तर बिस्मार्क यांनीं दिलें.

---

## प्रकरण चवतीसावें.

## अंतःस्थ धोरण.

ऱ्हाईन नदीकांठचा मुलूख व वेस्ट फ्यालिया प्रांत यांतील शेतकी सुरक्षित राखण्याकरतां एक संस्था स्थापन झाली होती. या संस्थेचा पंचविसावा वाढदिवस इ. स. १८९६ च्या एप्रील महिन्यांत साजरा झाला. या प्रसंगीं व्यापारखात्याचे प्रधान फॉ बरलेश यांनीं आपल्या भाषणांत बिस्मार्क यांच्या जकातीच्या संरक्षक धोरणासंबंधीं बिस्मार्क यांची मोठी स्तुति केली. तथापि या भाषणानें बिस्मार्क मोठेसे खूष झाले नाहींत. असें कां झालें याचें कारण पुढें कळून येईलच. शेतकीच्या रक्षणासाठीं स्थापन झालेल्या संस्था अत्यंत महत्वाच्या असून त्यांच्या अभावीं व्यापार व शेतकी या संबंधीं जें धोरण बिस्मार्क यांनीं स्वीकारलें होतें, तें यशस्वी झालें नसतें, असें विधान बरलेश यांनीं आपल्या भाषणांत केलें होतें. केवळ व्यापारी संस्थांच्या मदतीनें बिस्मार्क यांचें धोरण यशस्वी झालें नसतें, असा त्यांचा म्हणण्याचा उद्देश होता. घरचें गिऱ्हाइक कायम राखून व वाढवून बाहेरची गिऱ्हाइकी संपादन करावी, असें बिस्मार्क यांचें धोरण होतें. बिस्मार्क यांच्या व्यापारी धोरणाचा सुपरिणाम इतक्या लवकर दिसून आला कीं, त्याचें साऱ्यांसच मोठें आश्चर्य वाटलें. ऱ्हाईन ल्यँड आणि वेस्ट फ्यालिया या प्रांतांत

नव्या नव्या उद्योगधंद्याची वाढ अतिशय झपाट्यानें झाली. इ. स. १८९१–९२ सालीं बिस्मार्क यांच्या खटपटीनेंच नवे व्यापारी तह अस्तित्वांत आले. यानंतर थोड्याच दिवसांत उद्योगधंदा इतक्या मोठ्या प्रमाणावर फैलावला कीं, एक तर नव्या उद्योगास आळा घालावा किंवा नवे तह निर्माण करावेत अशी वेळ येऊन ठेपली. बाहेरचें गिऱ्हाइक आपल्या हातून जाऊं द्यावयाचें नसेल, तर नवे व्यापारी करारमदार करणें, अत्यंत अवश्य झालें. कोणत्याहि प्रकारच्या निर्बं-धाशिवाय खुल्या व्यापारपद्धतीचा अंगिकार इ. स. १८७९ सालाप-र्यंत जर्मनींतील बऱ्याच संस्थानांनीं केला होता; पण या सालापासून अनिर्बंध व्यापाराचें तत्व सोडून देऊन त्यांनींहि संरक्षक जकातींचा आश्रय केल्यामुळें नवे करारमदार करणें अवश्य झालें होतें. कारखाने सुरक्षित राहून ते चिरस्थाई व्हावेत असें करावयाचें असेल, तर नवे व्यापारी तह केल्याशिवाय हें साधणें शक्य नव्हतें. बारीकसारीक पोटकलमांसंबंधीं प्रधानमंडळांत मतभेद असला, तथापि मुख्य तत्वा-संबंधीं सर्वांचें एकमत झालें होतें. बिस्मार्क यांनीं पूर्वी स्वीकारलेल्या संरक्षक धोरणामुळें मालाची निर्गत अतिशय वाढून उद्योगधंद्यांचा किती फायदा झाला होता, ही गोष्ट कोणासहि उघड दिसून येण्या-सारखी होती.

अशा प्रकारचे मुद्दे बरलेश यांनीं आपल्या भाषणांत आणले होते. बिस्मार्क यांच्या धोरणास अनुरूप म्हणून ज्या तहांचा उल्लेख त्यांनीं आपल्या भाषणांत केला होता, ते तह बिस्मार्क यांच्या कारकीर्दीत झालेले नसून क्याप्रिव्ही यांनीं आस्ट्रियाशीं ते घडवून आणले होते. यासंबंधांत जर्मनीचा अधिकार क्याप्रिव्ही यांनीं आस्ट्रियाहून कमी दर्जाचा ठरविला, असा पुष्कळांचा समज झाल्यामुळें या तहाबद्दल

पुष्कळ लोक नाखूप होते. बरलेश यांच्या या भापणावर टीका करतांना हंबर्गच्या एका पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

"नव्या कारकीर्दीस सुरुवात झाली, त्यावेळीं जें नवें प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें, त्यानें पूर्वीच्या प्रधानमंडळाचा मार्ग सोडून देऊन नवाच मार्ग स्वीकारला व त्यामुळें गादीला कमीपणा आणला. उद्योगधंद्यांत पुढें आलेल्या एका सुप्रसिद्ध प्रांताच्या व्यापारी संस्थेचें अध्यक्षपद बरलेश यांजकडे होतें. तेव्हां व्यापारविषयासंबंधीं वावगा सल्ला त्यांनीं देऊं नये व आपली जबाबदारी ओळखावी याकरतां बिस्मार्क यांनीं व्यापारी खात्याचें प्रधानपद त्यांस दिलें. या उभयतांनीं व्यापारविषयकमतें जुळतीं नव्हतीं. तेव्हां आपणांवरची जबाबदारी नाहींशी करण्याकरतां बरलेश यांची नेमणूक व्यापारी प्रधानाच्या जागीं करावी, असा सल्ला त्यांनीं बादशहांना दिला. आणि बादशहांनीं ज्या अर्थी या सल्ल्याचा स्वीकार केला, त्या अर्थी बिस्मार्क यांच्या मतांशीं बादशहांच्या मताचा विरोध होता, असें स्पष्ट दिसून येतें. हाच विरोध कालांतरानें कमी न होतां वाढत जाऊन त्याचें पर्यवसान बिस्मार्क यांस प्रधानपदावरून दूर करण्यांत आलें."

हा लेख बिस्मार्क यांच्या सल्ल्यानेंच प्रसिद्ध झाला असल्यामुळें त्यांच्या राजीनाम्यास काय काय कारणें झालीं असावींत, याचाहि थोडासा खुलासा होतो. प्रधानमंडळांतील लोकांशीं प्रिन्स बिस्मार्क यांची वागणूक अकारण कृपेची अथवा अवकृपेची नसे, असें ते स्वतःच वारंवार बोलून दाखवीत. तथापि पक्षाभिमानांनीं अंध झालेलीं कित्येक पत्रें बिस्मार्क यांजवर अशा प्रकारचा आरोप करीत. प्रशियाचे फडणीस क्यांप हॉसन मरण पावले, तेव्हां त्यांचा मृत्युलेख लिहितांना 'बिस्मार्क यांच्या अवकृपेमुळें क्यांप हॉसन यांनीं आपल्या फडणीशीचा राजीनामा

दिला ' असे उद्गार कित्येक पत्रांनीं काढले होते. यावर उत्तर म्हणून वरील हँबर्गच्या पत्रानें पुढील टीका प्रसिद्ध केली.

"हें म्हणणें अक्षरशः खोटें आहे, असें आम्ही निक्षून सांगतों. पार्लमेंटांतील न्याशनल लिबरल पक्षानें क्यांप हॉसन यांस इतके सतावून सोडलें कीं, या हल्ल्यांस कंटाळून त्यांनीं राजीनामा दिला. या प्रसंगीं बिस्मार्क यांनीं त्यांस धीर देण्याची पुष्कळ खटपट केली; पण तींत त्यांस यश आलें नाहीं."

बिस्मार्क यांजवर त्यांचे शत्रू कशा प्रकारचे प्रयोग करीत याचे अनेक मासले वर्तमानपत्रांतून त्यावेळीं प्रसिद्ध झाले होते. प्रिन्स बिस्मार्क प्रधानपदावर असतां स्टोकर नांवाच्या पाद्रानें क्याथोलिक पक्षाच्या पुढाऱ्याला एक पत्र लिहून बिस्मार्क यांजविरुद्ध बादशहांचे कान फुंकावेत असा उपदेश स्पष्टपणें केला होता. या पत्रांत बिस्मार्क यांचें नांव नव्हतें; तथापि आजुबाजूची हकीकत इतकी खुलासेवार दिली होती कीं, तो मजकूर बिस्मार्क यांसच अनुलक्षून असावा, हें सहज समजण्यासारखें होतें. या पत्राची हकीकत बादशहांच्या कानांवर गेल्यावर या पाद्राला त्याच्या वृत्तींतून कमी करण्यांत आले. वृत्तिभ्रष्ट झालेला हा पाद्री पुढें पार्लमेंटांत शिरला व तेथें आपला एक पक्ष निर्माण करून प्रधानमंडळावर हल्ले करण्याचा उद्योग त्यानें सुरू केला. या स्टोकर संबंधीं खुद्द बादशहांनीं पुढील उद्गार काढले होते.

"स्टोकरच्या जातीचे ख्रिस्ती धर्मोपदेशक हे राक्षसरूप होत, असें मला वाटतें. सहिष्णुता हें ख्रिस्ती धर्माचें आदितत्व आहे. स्टोकर सारख्या लोकांची वागणूक ख्रिस्ती धर्माच्या अगदीं विरुद्ध आहे. लोकांस सदुपदेश करून परस्परांविषयीं सहानुभूति व प्रेमभाव त्यांच्या मनांत उत्पन्न करावा, हें धर्मोपदेशकांचें काम आहे. ज्या बाबीशीं आपणांस

कांहीं कर्त्तव्य नाहीं, असले राजकारणासारखे विषय त्यांनीं बाजूस ठेवावेत, हें बरें."

बादशहांचें हें मत प्रसिद्ध झालें, तेव्हां लोकसमूहाकडूनहि त्यांस चांगला दुजोरा मिळाला. या संबंधीं एका पत्रानें पुढील उद्गार काढले होते.

"राजकारणांत पडणारे धर्मोपदेशक हे असुर आहेत, असे जे उद्गार बादशहांनीं काढले, ते सर्वथैव खरे आहेत. आपलें अंगीकृत कर्तव्य सोडून धर्मोपदेशक अशा भलत्याच फंदांत पडूं लागले, तर त्यांच्यांत परस्परांतच यादवी सुरू होईल व असें होणें धर्माच्या दृष्टीनें केव्हांहि इष्ट नाहीं. सामाजिक अथवा राजकारणाच्या बाबतींत त्यांचें लक्ष अधिक वेधूं लागलें, तर धार्मिक बाबतींत ते आपोआपच उदासीन होतील आणि असें होणें हें लोकहिताच्या दृष्टीनें अर्थात्च इष्ट नाहीं."

इ. स. १८९८ सालच्या आरंभीं रोमदरबारांतील जर्मन वकील बर्नार्ड फॉं बुलो यांची नेमणूक बादशहांनीं परराष्ट्रीय प्रधानाच्या जागीं केली, तेव्हां लोकांस अत्यानंद झाला. हे गृहस्थ स्वभावानें न्यायी व मोठे शहाणे व दूरदर्शी मुत्सद्दी आहेत, अशी त्यांची ख्याती लोकांत अगोदरच पसरली होती. नव्या जागीं नेमणूक होण्याबरोबर फ्रेड्रिकश्र येथें जाऊन बिस्मार्क यांची भेट त्यांनीं घेतली. जर्मन पार्लमेंटांत प्रधानमंडळांतील सभासद या नात्यानें बुलो यांनीं केलेलें पहिलेंच भाषण इतकें समतोल व चित्ताकर्षक होतें कीं, त्यामुळें सर्व पक्षांवर पहिल्या भेटींतच त्यांनीं आपली छाप बसविली.

याच सुमारास जर्मनींतील दोन प्रख्यात इतिहासकार दिवंगत झाले, या गोष्टीचाहि उल्लेख येथें करणें अवश्य आहे. हेनरिक फॉं ट्रीशे व हेनरिक फॉं सीबेल, हे दोघेहि इतिहासकार फार प्रसिद्ध होते. जर्मन साम्राज्यासंबंधीं बिस्मार्क यांच्या कल्पनांशीं या दोघांचेहि विचार तंतो-

तंत जुळते होते. साम्राज्याच्या इतिहासासंबंधीं या दोघांनीं जी बिन-मोल कामगिरी करून ठेविली आहे, तिला जर्मन देशाच्या इतिहासांत अक्षय्य स्थान मिळेल.

---

## प्रकरण पसतिसावें.

## रहस्यस्फोट !

इ. स. १८९६ च्या सपटंबर महिन्यांत ब्रेसला येथें जर्मन सैन्याची मोठी कवाइत व्हावयाची होती. या प्रसंगीं जर्मनीचे बादशहा वुइलियम, व रशियाचे बादशहा निकोलस यांची भेट तेथें व्हावयाची, असें ठरलें होतें. ही बातमी प्रसिद्ध झाली, तेव्हां या भेटींत अखेरीस काय निष्पन्न होतें, हें पाहण्याकडे साऱ्या जगाचे डोळे लागून राहिले होते. रशिया व प्रशिया या दोन राष्ट्रांचे स्नेहसंबंध सुमारें एक शतकभर चांगल्या प्रकारचे होते. त्यांत व्यत्यय येईल, अशा प्रकारची कोणतीहि गोष्ट या अवधींत घडून आली नाहीं; पण रशियाच्या तिसऱ्या आलेक्झांडर बादशहाच्या कारकीर्दींत यासंबंधास थोडेसें निराळें वळण मिळालें: तक्तनशीन राजांच्या केवळ व्यक्तिविषयक भावनांचा परिणाम राजकारणांत विशेष महत्वाचा होतो, असें नाहीं; तथापि त्यांची थोडी बहुत छाया राष्ट्राच्या परस्पर संबंधावर पडल्याशिवाय रहात नाहीं. तिसरा आलेक्झांडर बादशहा स्वभावानें शांतताप्रिय होता; तथापि जर्मनीबद्दल त्याला चांगलासा विश्वास वाटत नव्हता. त्याला संशय येण्यास कांहीं सुस्पष्ट व सबळ कारणें उपस्थित झालीं होतीं, असें नाहीं; तथापि बिस्मार्क यांशीं त्याची भेट झाली, तेव्हां जर्मनीच्या धोरणाबद्दल त्यानें शंका प्रदर्शित केली होती. यामुळें अर्थातच जर्मन राष्ट्रालाहि रशियाबद्दल शंका उत्पन्न झाली. या शंकेचें निरसन करावें

व उभयराष्ट्रांचा सलोखा पूर्ववत चालावा. या हेतूनें निकोलस बादशहा ब्रेसला येथें येणार होता. या भेटीच्या प्रसंगीं दोन्ही बादशहांनीं परस्परांशीं जें वर्तन केलें, त्यामुळें लोकांचें शंकानिरसन होऊन दोन्ही राष्ट्रांत पूर्ववत सलोखा राहील, असें पुष्कळांस वाटलें; पण या आनंदांत विरजण पडण्यासारखी एक गोष्ट याच प्रसंगीं घडून आली. या भेटीच्या वेळीं निकोलस बादशहानें जें भाषण केलें, तें प्रसिद्ध करून फ्रेंच पत्रांनीं त्यावर जर्मनीला प्रतिकूळ असा अर्थ बसविला. आलेकझांडराप्रमाणेंच निकोलस बादशहाहि जर्मनीबद्दल साशंक आहे, असा ध्वनि या भाषणांतून त्यांनीं काढला.

यानंतर तारीख ६ आक्टोबर रोजीं, झार निकोलस यांचें आगमन पारीस येथें झालें; तेव्हां फ्रेंच जनतेनें अभूतपूर्व उत्साहानें त्यांचें स्वागत केलें. जर्मनीबद्दल फ्रेंचांच्या मनांत असलेला द्वेष जणूं काय या रूपानें बाहेर पडला. रशियाशीं संगनमत करून जर्मनीला कात्रीच्या या दोन पात्यांत चिरडून टाकावा, अशी इच्छा या वेळीं फ्रेंच राष्ट्राच्या मनांत उद्भूत झाली होती. निकोलस बादशहाच्या अभूतपूर्व स्वागताचें मूळ कारण हेंच होतें; तथापि रशियन बादशहाच्या मनांत या वेळीं फ्रान्सशीं तह करण्याचा कोणताच विचार नव्हता. जो दुरंगी तह यानंतर अस्तित्वांत आला, त्याचा मागमूसहि या वेळीं नव्हता; तथापि फ्रेंच लोक जात्याच बेताल प्रकृतीचे व मनस्वी स्वभावाचे असल्यामुळें जणूं काय असा तह झाला असून जर्मन राष्ट्राच्या उद्यांच चिंध्या उडणार, अशा भावनेनें फ्रेंचराष्ट्र उच्छृंखळ बनलें. मनावर ताबा नसलेल्या राष्ट्राला अशा प्रकारची मनःस्थिति पुष्कळ वेळां फार घातक होत असते.

जर्मन राष्ट्र जात्याच धिम्या स्वभावाचें असल्यामुळें तेथें बाह्यतः फारशी गडबड दिसली नाहीं; तथापि जर्मन लोकांना थोडी तरी

भीती उत्पन्न झाल्यावांचून राहिली नाहीं. फ्रेंच राष्ट्राच्या मनांत जर्मनीबद्दल धुमसत असलेला हा द्वेषाग्नी विझवून टाकण्यास काय उपाय योजावेत याबद्दल जर्मनींत वाटाघाटी सुरू झाल्या.

याच वेळीं हँबर्गच्या एका पत्रांत एक लेख प्रसिद्ध झाला. याचा उगम फ्रेड्रिकश्रू येथून झाला होता, याबद्दल कोणासच फारशी शंका नव्हती. या लेखामुळें साऱ्या युरोपभर मोठी खळबळ उडून गेली व खुद्द जर्मन लोकहि चकित झाले. या लेखांत बिस्मार्क यांनीं गुप्त राजकारणें उघडकीस आणून देशद्रोह केला, असें त्यांचे शत्रू म्हणूं लागले व यामुळें जर्मनीवर विलक्षण आपत्ति कोसळेल, असेंहि भाकित ते वर्तवूं लागले; पण या लेखाचा असा कोणताहि वाईट परिणाम न होतां, राजकारणांत उणीवा कोणत्या आहेत, हें मात्र सर्वांच्या निदर्शनास आलें. हा महत्त्वाचा लेख असा—

"रशियाचे मुख्य प्रधान प्रिन्स गार्टशकाफ यांनीं इ. स. १८८२ सालीं प्रधान पदाचा राजीनामा दिला व इ. स. १८८३ सालीं ते परलोकवासी झाले. ही गोष्ट घडल्यानंतरहि सात वर्षेंपर्यंत प्रिन्स बिस्मार्क जर्मनीचे मुख्य प्रधान होते. जर्मनी व रशिया या राष्ट्रांचें सख्य होण्याच्या मार्गांत गार्टशकॉफ एवढाच अडथळा असता, तर हा वेळपर्यंत तो सहज दूर करतां आला असता. या राष्ट्रांच्या सलोख्याच्या मार्गांत गार्टशकॉफ हेच अडथळा घालीत होते, असें नाहीं. वस्तु स्थिति वेगळीच आहे. रशियाच्या सर्व कारभाराचीं सूत्रें गार्टशकॉफ यांच्या हातीं होतीं; तथापि आणखी कांहीं गोष्टींची भर पडली नसती, तर कोणत्याहि खटपटीनें जर्मनी व रशिया यांत वितुष्ट उत्पन्न करण्याचें कार्य त्यांस करतां आलें नसतें. इतर अनेक गोष्टींची जोड त्यांच्या खटपटीस मिळाली, म्हणूनच हें कार्य त्यास करतां आलें. आपली

रणनीति जितकी यशस्वी होईल, असें रशियाला वाटत होतें, तितकी ती यशस्वी झाली नाहीं. कारण पूर्वीं नियत केलेल्या मर्यादेबाहेर ती वाढल्यामुळें आपोआपच बेतालपणा आला. सेनापती टोटल बेन यांच्या हातीं सैन्यांचीं सूत्रें जाईपर्यंत सैन्याची शिस्त निष्णात माणसांच्या हातांत नव्हती. दुसरें असें कीं, आपल्या हातीं सैन्य किती आहे, व लढाईचा पल्ला किती पोहोंचवावयास पाहिजे, याचा अजमास मुख्य सेनापतीस अवश्य असला पाहिजे. नाहींतर लहान तोंडीं मोठा घास होऊन प्रसंगीं फसगत झाल्याशिवाय रहात नाहीं. रशियानें तुर्कांबरोबर केलेल्या युद्धांत अशीच गत झाली. कान्स्टान्टीनोपलवर चाल करून जाण्याचा पूर्वींचा वेत नव्हता. पुढें ही चाल करावी कीं नाहीं, याच्या वाटाघाटींत सहा आठवडे लोटून गेले. एवढ्या अवधींत सेनापतीच्या हातीं पुरेशी फौजहि राहिली नाहीं. यामुळें या दिरंगाईनें झालेलें नुकसान पुढें केव्हांहि भरून आलें नाहीं. अर्थात एवढ्या भानगडींत रशियानें मुत्सद्देगिरीच्या व लष्करी दृष्टीच्या अनेक चुका केल्या. वास्तविक विचार करतां या दोषाचें खापर रशियन सरकारच्या माथीं फोडलें पाहिजे; पण हें अपयश आपल्या पदरांत घेण्याची त्याची इच्छा नसल्यामुळें कोणत्यातरी उपायानें तें जर्मनीच्या गळ्यांत बांधण्याची त्यांनीं युक्ति केली. ‘ जर्मनीची दोस्ती नुस्ती शाब्दिक आहे. व्यवहारांत तिचा कांहींच उपयोग नाहीं ’ अशा प्रकारची कुजबुज तेथल्या दरबारांत सुरू झाली. वास्तविक विचार करतां केवळ तटस्थ राहण्यापलीकडे जर्मन सरकारला रशियास कोणती मदत करतां आली असती ? त्यानें काहीं मदत केली असती, तर जर्मन राष्ट्रानें त्याला याबद्दल जबाब विचारला नसता काय ? या अपयशाला कोणी तरी धनी उभा करणें गार्टेशकॉफ यांस अवश्य वाटत होतें व जवळचा जर्मनी या प्रसंगीं

त्यांच्या उपयोगी पडला. गार्ट शकॉफ नंतर झालेल्या प्रधानांनीं अथवा झार बादशहांनींहि हीच परंपरा चालू ठेवली असती, असें नाहीं. फार कशाला गार्ट शकॉफ यांच्या पाठीमागून थोड्याच दिवसांनीं स्किरनिविस येथें खल होऊन जर्मनी व रशिया यांच्या नीतीचें धोरण निश्चित करण्यांत आलें होतें. ही स्थिति इ. स. १८९० पर्यंत कायम राहिली. जर्मनी अथवा रशिया यांपैकीं कोणावरहि परचक्र आलें, तर त्या प्रसंगीं दुसऱ्यानें पूर्ण तटस्थ रहावें, असा ठराव उभयपक्षीं स्किरनिविस येथें ठरला. या कराराला रशियानें आपली पूर्ण संमति दिली होती. फ्रान्सनें जर्मनीवर हल्ला केला, तर रशिया संबंधीं जर्मनीला निर्धास्त राहण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें रशियावर हल्ला झाल्यास जर्मनीच्या बाजूच्या सुरक्षिततेबद्दल रशियानेंहि खात्री बाळगण्यास हरकत नाहीं. असें या कराराप्रमाणें ठरलें होतें. बिस्मार्क यांची प्रधानपदावरून हकालपट्टी झाल्यानंतर या कराराचा पुन्हा जीर्णोद्धार झाला नाहीं. आह्मांस मिळालेली माहिती बरोबर असेल, तर याचा दोष रशियाकडे नसून बर्लिन दरबाराकडे होता. असा करार करण्यांस रशिया उद्युक्त असतां, कौंट क्याप्रिव्ही यांनीं तो पुढें चालू ठेवण्याचें नाकारलें असें आह्मांस समजतें.

"याच प्रसंगीं प्रशियन पोलंडच्या कारभारालाहि थोडेसें निराळें वळण लागत असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. यामुळें रशियाच्या मनांत अर्थातच किंतू उत्पन्न होण्यास जागा झाली. पहिल्या वुइलियम बादशहाच्या कारकीर्दींतील पोलंडबद्दलचें प्रशियाचें धोरण आतांच बदलण्यास कारण तरी काय? असा प्रश्न पिटर्सबर्ग दरबाराच्या मनांत उत्पन्न झाला.

"याशिवाय रशियाला प्रतिकूळ अशा दुसऱ्याहि कित्येक गोष्टी वुइल्हेल्म स्ट्रासींत घडून आल्या, त्या येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

मुख्य मुद्दा इतकाच कीं, कौंट क्याप्रिव्ही यांच्या परराष्ट्रीय व पोलंडच्या धोरणामुळें रशियाच्या मनांत आपल्या शेजाऱ्याबद्दल जबर शंका उत्पन्न झाली. रशिया हें राष्ट्र प्रबळ आहे, तरी भविष्यकाळच्या सुरक्षिततेबद्दल त्याच्याहि मनांत शंका येणें गैर वाजवी नाहीं. क्रिमियन युद्धांत फ्रान्स, इंग्लंड आणि इटली हीं युरोपांतील तीन प्रमुख व प्रबळ राष्ट्रें रशियाविरुद्ध एकवटल्यामुळें त्याची राजकीय परिस्थिति चमत्कारिक गुंतागुंतीची झाली होती. 'बाल्कन संस्थानांत रशियानें आपणास कांहीं विशेष हक्क न दिले, तर ते मिळविण्यासाठीं कांहीं स्वतंत्र तजवीज करणें भाग पडेल ' अशी धमकी रशियाला याच वेळीं आस्ट्रियानें दिली. या प्रसंगीं प्रशियाखेरीज बाकीचीं सर्व प्रबळ राष्ट्रें रशियाच्या शत्रूच्या गोटांत गेलीं होतीं. यांतच प्रशियाची भर पडली असती, तर एकटा रशिया एकीकडे व बाकीचें सारें युरोप त्याविरुद्ध अशी रशियाला भयजनक स्थिति प्राप्त झाली असती. अर्थात्च अशा प्रकारचा संघ यापुढें निर्माण होईल, असें आमचें म्हणणें नाहीं; तथापि रशियासारख्या प्रबळ राष्ट्रालाहि भविष्यकाळाबद्दल चिंता वाटावी यांत शंका नाहीं. युरोपांत आपणांस एकादा नेकीचा मित्र असावा, अशासाठीं खटपट करण्याचें त्याच्या मनांत आल्यास नवल नाहीं. होहेनझोलर्न घराण्याशीं रशियाचा स्नेहसंबंध पूर्वापर चालत असल्यामुळें प्रशिया हा आपला खात्रीचा दोस्त आहे, असें रशियाला वाटत होतें; पण क्याप्रिव्ही यांच्या कारकीर्दींत रशियन दरबाराविरुद्ध ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या, त्यामुळें प्रशियाच्या स्नेहभावाबद्दल साशंक होऊन दुसऱ्या एकाद्या राष्ट्राची जोड मिळविण्याची खटपट रशियानें केल्यास त्यांत नवल नाहीं. जर्मनीबद्दल ज्याच्या मनांत फारसा प्रेमभाव अगोदरच नाहीं, अशा एकाद्या राष्ट्राशीं स्नेहभाव जोडण्यास रशियानें आतुर होणें, हें अगदीं साहजिक आहे.

"अशा रीतीनें क्रोनस्टाड व मारसेले हे स्नेही निर्माण झाले. अशा प्रकारें सुलतानी सत्ता गाजविणारा झार, व फ्रेंचांचें लोकसत्ताक यांचा विजोड जोड जमला. क्याप्रिव्ही यांच्या चुकीच्या धोरणामुळेंच हा प्रकार घडून आला, असें म्हणण्यास आम्हांस यत्किंचित्‌हि प्रत्यवाय वाटत नाहीं. भविष्यत्काळाच्या सुरक्षिततेसाठीं युरोपांत एकादा तरी खात्रीचा पाठिंबा मिळवून ठेवणें, हें प्रत्येक दूरदर्शी मुत्सद्याचें कर्तव्य आहे. या कर्तव्यास अनुसरून कोणाचा तरी पाठिंबा मिळवून ठेवणें रशियाला आवश्यकच होतें आणि क्याप्रिव्ही यांच्या चुकीमुळें फ्रान्सला मिठी मारल्यावांचून रशियाला गत्यन्तरच उरलें नाहीं."

ज्या लेखानें युरोपांत व विशेषत: जर्मनींत मोठी खळबळ उडून गेली होती, तो लेख वरीलप्रमाणें होता. रशिया व जर्मनी यांजमध्यें तेढ उत्पन्न करण्यास बिस्मार्क हे कारणीभूत झाले, असा जो समज जर्मनीमध्यें बऱ्याच लोकांत पसरला होता, तो या लेखानें पूर्ण दूर झाला. बिस्मार्क यांच्या कारकीर्दींत रशिया व जर्मनी यांजमध्यें पूर्ण सलोखा असून यापैकीं एकाद्यास युद्धांत पडावें लागल्यास दुसऱ्यानें कसें वर्तन करावें, ही मर्यादा सुद्धां बिस्मार्क यांनीं निश्चित केली होती. त्याचप्रमाणें रूसोटर्किश युद्धांत पहिले वुइल्यिम व बिस्मार्क यांनीं आपला स्नेहसंबंध कसा कायम राखिला होता, हेंहि या लेखावरून व्यक्त होतें.

या स्फोटामुळें प्रारंभीं बरीच खळबळ झाली. तरी त्याचे एकंदर परिणाम बरेच चांगले झाले, यांत शंका नाहीं. त्यामुळें फ्रान्समध्यें जर्मनी-विरुद्ध उठलेली वावटळ थंडावली. जर्मनी व रशिया यांजमध्यें स्नेहभाव उत्पन्न होण्याची थोडीफार शक्यता आहे, ही गोष्ट फ्रेंचांच्या नजरेस आल्याबरोबर रशिया बद्दल जो प्रेमाचा उमाळा त्यांस आला होता, तो बराच थंड झाला. बादशहा दुसरे वुइल्यिम व रशियाचे झार निकोलस

यांच्यांत खाजगी स्नेह त्यावेळीं चांगला होता. यापुढें जर्मन साम्राज्य सरकारनें पोलंडबद्दलच्या आपल्या धोरणांत थोडासा फरक केल्यामुळें रशियाच्या मनांतील तो किंतूही जाऊन त्या दोन राष्ट्रांच्या स्नेहांत व्यत्यय येण्यासारखें राजकारण उरलें नाहीं. जर्मनीविरुद्ध ताबडतोब युद्ध पुकारून सत्तर सालाचें उट्टें काढावें म्हणून जी ओरड फ्रेंच पत्रांनीं चालविली होती, तीहि पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें तत्काळ नाहींशी झाली. राजकारणाचे कांहीं गुप्त डाव बिस्मार्क यांनीं चव्हाटयावर आणल्यामुळें कांहीं लोक त्यांवर नाखुष झाले ही गोष्ट खरी; तथापि त्यामुळें इतके सुपरिणाम होऊन प्यारिस मध्यें उठलेला आगीचा भडका विझाला, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

तथापि बिस्मार्क यांनीं केलेली प्रत्येक गोष्ट वाईट म्हणावयाची असा निश्चय त्यांच्या ज्या शत्रूंनीं केला होता. त्यांचें लक्ष या सुपरिणामाकडे गेलें नाहीं. त्यांनीं बिस्मार्क यांजवर अनेक प्रकारचे कडक आरोप केले. चालू प्रधानमंडळावर शिंतोडा उडविण्याकरितांच बिस्मार्क यांनीं हें गुप्त राजकारण चव्हाटयावर आणलें व यामुळें तिरंगी संधीस उणेपणा येऊन इतर प्रबळ राष्ट्रांपासून जर्मनी अलग झाला, अशी टीका कित्येकांनीं त्याजवर केली. जर्मन राष्ट्राचें कल्याण करावयाचें एवढा एकच हेतु मनांत धरून त्याच्या सिद्धीसाठीं कायावाचामनानें ज्यानें जन्मभर खटपट केली, तोच गृहस्थ जर्मनीचा कट्टा शत्रू व केवळ स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां वाटेल तें निंद्य कर्म करणारा आहे, असें या लोकांनीं भासविण्यास कमी केलें नाहीं. बिस्मार्क यांजवर गोपनस्फोटाबद्दल खटला करावा, असेंहि कित्येक पत्रांनीं सरकारास सुचविलें. या लेखाचा बाष्कळपणाचा नमुना म्हणून पुढील एक दोन लेख पाहण्यासारखे आहेत.

" ग्लॅडस्टन अथवा मोल्टके यांना आपल्या वृद्धावस्थेचे दिवस शांततेंत घालविण्याचा जसा हक्क होता, तसा तो बिस्मार्क यांस नाहीं. कारण ग्लॅडस्टन अथवा मोल्टके यांची मनोभूमिका वृद्धापकाळींहि जीर्ण झाली नसून ती तारुण्यावस्थेप्रमाणेंच सतेज व टवटवीत होती. त्यांचें चैतन्य अखेरपर्यंत मलीन झालेलें नव्हतें; पण बिस्मार्क यांची गोष्ट तशी नाहीं. मन मानेल तसें वर्तन ठेवल्यामुळें त्यांचें शरीर आणि त्यांचें मन दोन्हीहि झडून गेलीं आहेत. त्यांचा जुनापुराणा मेंदू सडून गेल्यामुळेंच त्यांनीं नुकत्या केलेल्या रहस्यस्फोटासारखीं अनन्वित कृत्यें करण्याची बुद्धि त्यांस झाली. "

यावर बिस्मार्क यांच्या कित्येक चहात्या पत्रांनीं सणसणीत उत्तरें देऊन त्यांच्या प्रतिपक्षियांची बोळवण केली होती. सरकारी मदतीनें चालणाऱ्या पत्रांतून असला बीभत्स प्रकार दृष्टीस पडला नाहीं, हें खरें; तथापि बिस्मार्क यांच्या कृतीमुळें साम्राज्य सरकाराला हीनत्व आलें व त्यामुळें त्याच्या मार्गांत नसत्या अडचणी मात्र उत्पन्न झाल्या, अशा अर्थाची टीका करण्यास या पत्रांनीं कमी केलें नाहीं. प्रिन्स बिस्मार्क यांस अशा रितीनें राज्यरहस्याचा स्फोट करण्याचा अधिकारच नव्हता, असें त्यांचें म्हणणें होतें.

आपण प्रसिद्ध केलेला मजकूर म्हणजे मोठें रहस्य नव्हे, असें उत्तर बिस्मार्क यांनीं आपल्या तर्फे दिलें. रशिया व जर्मनी यांमध्यें झालेली वाटाघाट आतां इतिहासांत अंतर्भूत होत असल्यामुळें चालू राजकारणाशीं तिचा संबंध येत नसून ती कोणाच्याहि टीकेचा विषय होऊं शकते, असें बिस्मार्क यांचें म्हणणें होतें. वास्तविक पाहतां हा तह तेव्हांच प्रसिद्ध व्हावयाचा; पण रशियन सरकारच्या इच्छेस मान देऊन त्यावेळीं तो गुप्त ठेवण्यांत आला होता; पण ज्या कारणासाठीं

हें गौप्य राखलें होतें, तें कारण आतां संपल्यामुळें या गौप्याचेंहि कारण संपलेंच. हा तह प्रसिद्ध होण्यांतच आतां जर्मनीचें कल्याण असून त्रिकूट संधींतील कोणाहि भागीदार राष्ट्राला या रहस्यस्फोटामुळें उणेपणा येत नाहीं, असें ते म्हणाले. आपल्या राष्ट्राच्या मोठेपणास व हितसंबंधास बाध येऊं न देतां युरोपांत शांतता नांदेसें करणें हें प्रत्येक मुत्सद्याचें पहिलें कर्तव्य आहे. हें साधण्यासाठीं तो जें कांहीं करील, तें रीतसरच म्हटलें पाहीजे. याशिवाय त्रिकूट संधींतील कोणाहि राष्ट्राशीं बेइमानी केल्याचा पुरावा या तहांत नसल्यामुळें या रहस्यस्फोटामुळें जर्मन राष्ट्राला कांहीं उणेपणा येतो, असेंहि होत नाहीं.

अशा रीतीनें जर्मन साम्राज्य सरकार व बिस्मार्क यांजमध्यें हें वाग्युद्ध कांहीं काळ सुरू होतें. त्यावेळीं बिस्मार्क यांच्या शत्रूंनीं व सरकारी पत्रांनीं जरी अनेक खटपटी केल्या, तरी त्यांस यश आलें नाहीं व बिस्मार्क यांची कीर्ति यत्किंचितहि कमी झाली नाहीं.

यामुळें साऱ्या युरोपांत व विशेषतः जर्मनींत जी मोठी खळबळ उडाली, तिचें पर्यवसान असें झालें कीं, ' सरकारानें बिस्मार्क यांच्या विरुद्ध जाऊन या बाबींतला आपला पुरावा साम्राज्य पार्लमेंटापुढें मांडावा ' असें आव्हान कित्येक प्रतिनिधींनीं सरकारास केलें. पण साम्राज्य सरकारानें या द्वंद्वांत पडण्याचें साफ नाकारलें. कित्येक प्रतिनिधींस परराष्ट्रासंबंधानें वाटत असलेली भीति अगदीं निराधार असून जर्मनीचे इतर राष्ट्राशीं असलेले स्नेहसंबंध पूर्वीप्रमाणेंच कायम आहेत, असें आश्वासन सरकाराकडून सभेला देण्यांत आलें. बिस्मार्क यांच्या पार्लमेंटीय शत्रूंनीं घेतलेल्या आक्षेपांस कित्येकांनीं तेथेंच उत्तरें देऊन त्यांचें निरसन केलें. यावेळींहि बिस्मार्क यांस हजारों खाजगी पत्रें येऊन त्यांत या रहस्यस्फोटाबद्दल त्यांची स्तुति केली होती. याव-

रून सामान्य राष्ट्राचा विश्वास बिस्मार्क यांजवर कसा होता, हें दिसून येतें. बिस्मार्क यांच्या शत्रूंनीं अखेरपर्यंत त्यांची पाठ पुरविली असतांहि जर्मनराष्ट्र त्यांस विमुख झालें नाहीं. कांहीं वाष्कळपत्रें त्यांजवर कडक टीका करीत असतांहि जर्मनराष्ट्र त्यांस पूर्वीं प्रमाणेंच मान देत होतें. एका बाजूनें शत्रूंचे हल्ले त्यांजवर होत असतां, दुसऱ्या बाजूनें बिस्मार्क यांचीं नवीं नवीं स्मारकें उभारलीं जात होतीं. इ. स. १८९६ च्या आक्टोंबर महिन्यांत फ्रीबर्ग जवळ अशाच एका स्मारकाचा अनावरण विधि झाला. या प्रसंगीं तेथें हजारों लोक हजर होते व त्यापैकीं पुष्कळ लोक फार दूरदूरच्या प्रांतांतून गेले होते. प्रकृतीच्या अस्वास्थ्या-मुळें बिस्मार्क यांस या समारंभास हजर राहतां आलें नाहीं. या सुमा-रास त्यांची प्रकृति बरीच नादुरुस्त झाली होती. प्रो. श्वेनिंगर यांच्या औषधापासूनहि त्यांस पूर्ण गुण असा पडलाच नाहीं. मधून मधून प्रकृति सुधारल्याची हकीकत प्रसिद्ध होई, तेव्हां तेव्हां लोकांकडून हजारों अभिनंदनपर संदेश येत. थोडेंसें बरें वाटल्याबरोबर पूर्वपाठा-प्रमाणें बिस्मार्क हेहि साक्सनीच्या सुंदर व हिरव्यागार अरण्यांतून पायीं सहल करीत अगर घोड्यावरून रपेट करीत असत.

उन्हाळ्याच्या निरभ्र दिवसांत वनश्री सर्वांगांनीं नटली व वायु मंद आणि सुगंध वाहूं लागला म्हणजे बिस्मर्क यांचा मुळचा आनंदी स्वभावहि जागृत होई. बिस्मार्क यांचा मुळचा स्वभाव आनंदी, थट्टे-खोर व नम्र असा होता. तो स्वभाव अशा दिवसांत पुन्हां जागृत होई. तथापि यावेळीं त्यांचें शरीरदौर्बल्य बरेंच वाढलें होतें. त्यांनीं ग्यास्टीन येथें अथवा दुसऱ्या एकाद्या हवा खाण्याच्या ठिकाणीं जावें अशी डॉ. श्वेनिंगर यांची इच्छा होती; पण प्रवासाचे श्रम व दगदग हीं आपणांस सोसणार नाहींत, असें म्हणून बिस्मार्क यांनीं कोठेंहि

जाण्याचें नाकारलें. ते म्हणाले, "हवेंतून उडत जाण्याची सोय असती, तर मी व्हार्जिनला गेलों असतों. आतां पूर्वपरिचित वस्तूंच्या बाहेर जाऊं नये असें माझ्या जुन्या धन्याप्रमाणें मलाहि वाटूं लागलें आहे. पहिल्या वुइलियम बादशहांचा एकादा नौकर वृद्ध झाला व त्याच्यानें पूर्वींसारखें काम होईनासें झालें, तरीसुद्धां बादशहा त्याला रजा देत नसत. ते असें कां करीत, याचें रहस्य मला आतां समजलें. ज्यांनीं आपली नौकरी आज कित्येक वर्षें इमानें इतबारें वजाविली व ज्यांच्या संगतींत आपण इतकीं वर्षें काढलीं, त्यांना आपल्यापासून दूर करणें माझ्या जीवावर येतें. थोडीशी अडचण झालेली पुरविली, पण नव्या चेहऱ्याचीं माणसें मला खपत नाहींत. तसाच मोठा अपराध असल्याशिवाय कोणाहि नौकराला बडतर्फ केल्याचें मला आठवत नाहीं. नौकर फार जुना झाला म्हणजे तो फाजील होतो, व वाजवीहून अधिक बडबड करतो, असें लोक म्हणतात आणि मलाहि कित्येक वेळां असा अनुभव आला; तथापि त्यांनासुद्धां मीं कामावरून दूर केलें नाहीं. एकेवेळीं एक मोतद्दार मात्र दारूनें बेहोश होऊन भलभलतें बरळूं लागला; तेव्हां त्याला मीं हांकून दिलें. जुन्या नौकरांना कमी न करण्याची चाल बिस्मार्क कुटुंबांत पुरातन काळापासून चालत आली आहे. शॉनहॉसनचें वतन माझ्या ताब्यांत आलें, तेव्हां तीन तीन पिढ्यांचे नौकर आमच्या घरीं होते. इ. स. १७९२ सालीं ज्योड नांवाच्या एका मुलाला त्याच्या बापानें आमच्या तैनातीस आणून पोहोंचविलें. या ज्योडनें आमच्या घरीं साठ वर्षें नौकरी केली. दुसरा एक नौकर असाच पन्नास वर्षें नौकरी करून आतां वार्धक्यामुळें घरीं बसला आहे व त्याला अद्यापि मी पेनशन देत आहें. आमच्या जुन्या पुराण्याकाळीं सर्वत्र अशीच पद्धत होती; पण आतां आगगाड्या तारा-

यंत्रें वगैरेंच्या योगानें साराच मनु बदलला आहे. यामुळें जुने स्नेहसंबंधहि शिथिल झाले आहेत."

बिस्मार्क यांच्या स्वभावांत आढयतेचा गंधहि नसल्यामुळें कोठेंहि चार मंडळींत ते गेले, तरी एकाद्या सामान्य मनुष्याप्रमाणें साऱ्यांशीं ते मिळून मिसळून वागत. सरकारी कामकाजाची दगदग फार झाली, म्हणजे चारचौघामंडळींत आनंदानें थोडा काळ घालविला असतां त्या साऱ्या दगदगीला विरजण पडतें; असें ते म्हणत. खाजगी रीतीनें कांहीं खेळ खेळत असतां, डाव अंगावर आल्याबरोबर हमरीतुमरीवर येण्याची खोड पुष्कळांना असते. अशा वेळीं प्रतिपक्षानें कांहीं अधिक उणी वागणुक केली असतां बिस्मार्क त्याचा विषाद मानीत नसत. एकेवेळीं त्यांच्या जंगलांतला एक नौकर त्यांच्या विरुद्ध बाजूस खेळावयास बसला असतां डाव अंगावर येत आहे, असें पाहून आपल्या हातांतील पत्ते त्यानें बिस्मार्क यांच्या अंगावर झुगारून दिले व संतापाच्या भरांत आपला पेशा विसरून कांहीं अपशब्दहि तो बिस्मार्क यांस बोलून रागानें तो तेथून बाहेर पडला. तेव्हां बिस्मार्क यांनीं जवळ बसलेल्या दुसऱ्या एका मित्राला त्याच्या मागोमाग पाठवून त्याला परत बोलावून पुन्हा खेळावयास बसविलें. अशा या खेळाडू मंडळींत बिस्मार्क बसले असतां तेहि आपला मोठेपणा विसरून एकाद्या पोराप्रमाणें हुकुमाचें पान मोठ्या जोरानें आपटून मोठ्यानें हंसत असत. म्हातारपणीं सायकलवर बसण्याचीहि आवड त्यांना उत्पन्न झाली होती; पण शरीर ताब्यांत नसल्यामुळें ती त्यांची हौस पूर्ण झाली नाहीं.

प्रिन्स बिस्मार्क व बादशहा दुसरे बुइलियम यांजमध्यें आरंभीं जरी थोडासा मतभेद होता, तरी तो पुढें नाहिंसा होऊन बादशहा त्यांस मान देऊं लागले. होहेन झोलर्न घराण्याची बिस्मार्क यांनीं केलेली

सेवा लक्षांत घेऊन बादशहा तीजबद्दल वारंवार उल्लेख करीत. बिस्मार्क यांच्या घरीं कांहीं विशेष प्रसंग असला, तर केव्हां स्वतः हजर राहून अथवा केव्हां आपल्या तर्फे कोणासतरी पाठवून तो ते साजरा करीत. पहिल्या वुइलियम बादशहांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं बिस्मार्क यांचें स्मरण बादशहांस हटकून होई व या प्रसंगीं बिस्मार्क यांस सन्मानाचें एकादें नवें चिन्ह ते अर्पण करीत. जर्मन आरमारांतलें पहिलें मोठें चिलखती क्रुइझर तयार झालें, तेव्हां त्याला 'बिस्मार्क' असें नांव बादशहांनीं दिलें. या जाहाजाचा नामकरणविधी तारीख २३ सपटंबर सन १८९७ रोजीं कील बंदरांत कौंटेस वुइलियम बिस्मार्क यांच्या हस्तें झाला. या प्रसंगीं बादशहांच्या तर्फे त्यांचे बंधु प्रिन्स हेनरी हे हजर होते.

इ. स. १८७७ सालीं जें एक लोखंडी जहाज जर्मन आरमारखात्यानें बांधलें होतें, त्यालाहि बिस्मार्क हेंच नांव देण्यांत आलें होतें. या जाहाजानें जर्मनीच्या वसाहतीस प्रारंभ करून दिला, असें म्हणावयास हरकत नाहीं. या जाहाजाच्या नामकरणाबद्दल पहिल्या वुइलियम बादशहांनीं बिस्मार्क यांस कळविलें, तेव्हां अत्यन्त नम्रतापूर्वक बादशहांचे आभार मानून बिस्मार्क म्हणाले, "या माझ्या अजारांतून बरा होऊन बादशहाच्या नोकरींत रुजू होण्याची व त्यांची राज्यनौका सुरक्षितपणें चालविण्याची मला आशा आहे."

हें पहिलें क्रुइझर तेरा वर्षेपर्यंत सरकारी नौकरींत होतें. दक्षिण समुद्रांत यानें बरीच महत्वाची कामगिरी बजाविली होती. इ. स. १८७९ सालीं सामोआ बेटासंबंधीं झालेल्या तहावर याच जहाजावर सह्या झाल्या. तेथून हें जहाज पूर्व आफ्रिकेला गेलें. या ठिकाणीं सुलतान सैयद बर्गस याजवर नजर ठेवण्याचें काम त्यास करावयाचें होतें.

हें कामहि चोख रीतीनें बजावून हें जहाज पुढें हिंदुस्थान व चीन या देशांच्या सफरीस गलें होतें. इ. स. १८९१ सालापासून या जहाजाला विश्रांति मिळाली असून वुइलियमशेवन बंदरांतील आरमारी शिबंदीच्या बराखी त्यांत आहेत. अशा रीतीनें या बिस्मार्क जहाजानेंहि जर्मन राष्ट्राची दर्यावरील कामगिरी चांगल्या रीतीनें बजावून जर्मन आरमाराच्या इतिहासांत आपलें नांव कायम करून ठेवलें आहे.

---

## प्रकरण छत्तीसावें.

## खाजगी.

इ. स. १८९७ सालच्या आरंभीं आपणास नातू झाल्याची बातमी ऐकून बिस्मार्क यांस फार आनंद झाला. साक्सनीच्या वनश्रीला व घराण्याच्या दौलतीला भावी मालक उत्पन्न झाला, हें पाहण्यास ईश्वरानें आपणास जगविलें, याबद्दल बिस्मार्क यांनीं परमेश्वराचे उपकार मानले. यावेळींहि बिस्मार्क यांजवर अभिनन्दनपर तारा व पत्रें यांचा वर्षाव झाला.

इ. स. १८९७ सालीं क्रीट बेटांत मोठा दंगा माजून भयंकर रक्तपात झाला व त्याचें अखेर पर्यवसान टर्की व ग्रीस यांजमधील युद्धांत झालें. या दोन देशांतील तंटा शांततेच्या मार्गानें नाहींसा व्हावा म्हणून दुसऱ्या वुइलियम बादशहानें मध्यस्ती सुरू केली व या कार्यांत इतर युरोपीय राष्ट्रांकडूनहि त्यांस मदत मिळाली. या विषयासंबंधीं टीका करतांना बादशहांचें हें वर्तन बिस्मार्क यांच्या ठरीव राजनीतिविरुद्ध आहे, असें आपलें मत कांहीं पत्रांनीं दर्शविलें. बाल्कन प्रदेशासंबंधीं वाटाघाट चालू असतां 'या प्रांतांत एकाहि जर्मन शिपायाचें रक्त सांडावें अशी याची योग्यता नाहीं.' अशा अर्थाचें बिस्मार्क यांचें एक

वाक्य या पत्रांनीं पुरावा म्हणून दाखल केलें होतें. ही हकीकत बिस्मार्क यांस समजली, तेव्हां पत्रकारांची ही समजूत चुकीची आहे, हें लोकांच्या लक्षांत आणून देण्याकरतां बिस्मार्क यांनीं पुढील मजकूर प्रसिद्ध केला.

" पूर्वेकडील देशांत उपस्थित होणाऱ्या भानगडींत जर्मनीचा जेव्हां कोणत्याहि प्रकारचा हितसंबंध नसेल, तेव्हां त्या भानगडींत एकाहि पोमेऱ्यानियन शिपायाचीं हाडें पडणें अयोग्य असून अशा गोष्टीला मी कधींहि संमति देणार नाहीं, इतकेंच मी म्हटलें होतें."

प्रिन्स बिस्मार्क व दुसरे वुइलियम यांजमध्यें शक्य तेव्हां तेढ उपस्थित करण्याची खटपट बिस्मार्क यांचे शत्रू कसे करीत, याचें हें एक उदाहरण आहे. तथापि असे प्रसंग जेव्हां जेव्हां येत, तेव्हां तेव्हां बिस्मार्कहि त्यावर चोख उत्तर देऊन आपल्या शत्रूंचीं तोंडें बंद करीत. बिस्मार्क यांचा देह वृद्धापकाळामुळें दुर्बळ झाला होता, तरी त्यांचें मनोबळ अखेरपर्यंत कायम होतें. कोणतीहि राजकीय अथवा सार्वजनिक भानगड उपस्थित झाली, तर तिजसंबंधीं बिस्मार्क जें आपलें मत स्पष्ट करीत, त्यावरून त्यांच्या मनाचें सामर्थ्य उघड दिसून येत असे.

चीनचे बिस्मार्क ली-हुंग-चंग हे बिस्मार्क यांस भेटावयास आले होते, तेव्हां चीनशीं यापूर्वींच सख्य जोडण्याचा उपक्रम आपण केला नाहीं, याबद्दल आपणास वाईट वाटतें, अशा अर्थाचे शब्द बोलल्याचें वाचकांच्या स्मरणांत असेलच. बिस्मार्क यांची ही राहिलेली कामगिरी पुरी होण्याची वेळ इ. स. १८९७ च्या दिसेंबरांत अनपेक्षितपणें आली. चिनी लोकांनीं कांहीं जर्मन मिशनऱ्यांचे खून केल्यामुळें जर्मन आरमारी सैन्यानें कियाचौचें बंदर व किल्ला हीं हस्तगत केलीं, अशी

बातमी चिनांतून आली. चिनांतील आपल्या प्रजाजनांचें व आपल्या व्यापारी हितसंबंधाचें रक्षण करण्याकरतां तेथें आपला ताबा बसविणें अवश्य आहे, असें जर्मन सरकारानें जाहीर केलें. अशाच प्रकारच्या कांहीं कांहीं कारणांनीं इतर युरोपीय राष्ट्रांनीं चिनांत चंचुप्रवेश केला होता; पण जर्मनीला अशी संधी पूर्वी मिळाली नव्हती, ती आतां मिळाली. चीनशीं युद्ध करावें असा जर्मन सरकारचा हेतु नव्हता, तेव्हां उभयपक्षी कांहीं वाग्युद्ध होऊन कियाचौचें बंदर नव्याण्णव वर्षांच्या मुदतीनें चीनच्या बादशहानें जर्मनीला दिलें. या बंदराचा मालकीहक्क पूर्वीप्रमाणें चीनकडेच राहून नव्याण्णव वर्षें जर्मनीच्या ताब्यांत तें रहावें, असें या करारांत ठरलें. यासंबंधाचीं बोलणीं करण्याकरतां बादशहांनीं आपले बंधु प्रशियाचे प्रिन्स हेनरी यांस एका आरमारी तुकडीसह चीनला रवाना केलें.

आशियांतील जर्मनीचे हितसंबंध सुरक्षित राखण्याकरतां जर्मन सरकारानें ताबडतोब उपाय योजले, याबद्दल साऱ्याच जर्मन राष्ट्राला संतोष झाला व त्याबरोबरच बिस्मार्क यांसहि फार आनंद झाला हें सांगणें नकोच. कील येथून आपल्या बंधूची रवानगी चीनला करून देऊन बादशहा बिस्मार्क यांस भेटण्याकरतां फ्रेड्रिकश्रू येथें गेले. तेव्हां या चीनच्या प्रकरणाबद्दल त्यांजपाशीं बिस्मार्क यांनीं आपला पूर्ण संतोष व्यक्त केला.

जर्मन आरमारी तुकडी कियाचौ येथें पोंहोंचतांच दोनशें खलाशांनीं कियाचौच्या शहरांत प्रवेश केला. कियाचौच्या उपसागरापासून हें शहर चौपन मैल आंत वसलेलें आहे. या ठिकाणीं चिनी सरकारचें शिबंदी ठाणें होतें. जर्मन खलाशी शहरांत येतांच एकहि गोळीबार न

होतां चिनी शिबंदीनें आपलें ठाणें उठविलें. व चिनी सरकारनें विशेष ओढून न धरतां जर्मनीच्या सर्व मागण्या कबूल केल्या.

इ. स. १८९७ च्या सालांत बिस्मार्क यांची प्रकृति बरीच बिघडली असल्यानें कोठेंहि फारसा प्रवास न करतां हें सारें साल त्यांनीं जवळ जवळ पूर्ण एकांतांतच घालविलें. अशावेळीं कोणी स्नेहीमंडळी भेटावयास आली, तर अनेक विषयावर ते त्यांच्याशीं संभाषण करीत. अशाच एका प्रसंगीं ते म्हणाले, " कांहीं राजकीय भानगड उपस्थित होऊन राज्याचा गाडा सरळ रस्त्यानें जात नाहीं, असें मला दिसलें, म्हणजे मला अर्थात्च वाईट वाटतें; पण त्याला मी तरी काय करणार? यांत सुखाची गोष्ट इतकीच कीं आतां कसल्याच राजकारणाची जबाबदारी माझ्यावर नाहीं. यामुळें मला त्रास करून घेण्याचें कांहींच कारण नाहीं. खाजगी रीतीनें मला कोणी सल्ला विचारला, तर तसा सल्ला देणें मला अशक्य वाटतें. कारण त्या सल्ल्याप्रमाणें पुढें व्यवहार होतो कीं नाहीं, हें मला पाहतां येत नाहीं. त्या सल्ल्याचा उपयोग व्यवहारांत कसा होतो, याचें निरीक्षण मला करतां येत नाहीं. दुसरें असें कीं सल्ला कितीहि चांगला असला, तरी त्यांतील तत्वांश घेऊन परिस्थितीप्रमाणें त्याचा व्यवहारांत उपयोग केला नाहीं, तर तो फुकटच जातो. घोड्यावर कसें बसावें, याबद्दल स्वाराला कितीहि उत्तम युक्त्या सांगितल्या, तरी आपल्या घोड्याचा स्वभाव ओळखून योग्यवेळीं त्या युक्त्यांचा उपयोग करण्याची चतुराइ स्वाराला नसेल, तर केव्हां तरी घोडा त्याला धूळ चारल्यावांचून राहणार नाहीं. राजकारण हें शास्त्र नसून ती एक कला आहे. ही विद्या शिकवून येणारी नाहीं. ती उपजतच आंगीं असली पाहिजे. "

या सुमारास नेपोलियनचीं पत्रें ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालीं होतीं. हें पुस्तक बिस्मार्क यांस फार आवडलें व फावल्यावेळीं तेंच वाचावयास

घेत. जर्मन आणि रशिया यांजमध्यें झालेल्या तटस्थपणाच्या कराराबद्दल एकेवेळीं सहज गोष्टी चालल्या असतां ते म्हणाले, "जर्मनी, आस्ट्रिया व इटली यांजमध्यें झालेल्या त्रिकुट संधीइतकेंच महत्व या रशियन करारालाहि मी देतों. हा करार अस्तित्वांत आला, तेव्हां त्यामुळें युरोपांतील अग्रणीं राष्ट्राच्या मालिकेंत जर्मनीला जें स्थान मिळालें, तें स्थान त्याला पुन्हां लवकर मिळेल कीं नाहीं, याची शंका आहे. आतां या करारांत दुसरेहि अनेक गुंतागुंतीचे प्रश्न आहेत, ही गोष्ट खरी; पण राजकारण आणि गुंतागुंत यांची नेहमींच सोयरीक आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पहिले वुइलियम बादशहा मला एकदां म्हणाले, 'तुमचें काम करण्याची इच्छा मला कधींहि होणार नाहीं. ती तुमची जागा तुम्हालाच लखलाभ असो. घोड्यावर बसून दवडत असतां आळीपाळीनें पांच चेंडू झेलणाऱ्या स्वाराची आठवण तुम्हाला पाहून मला होते' वृद्ध बादशहांचें हें म्हणणें अगदीं खरें आहे; तथापि अनेक भानगडींत त्यांची समजूत मी कशीबशी घालीत असे व मग तेहि स्वस्थ रहात."

पोस्ट ऑफिसांतून सरकार कित्येक वेळां महत्वाचीं पत्रें काढून घेते, या विषयावर एकवेळीं गोष्टी निघाल्या असतां पूर्वीच्या कांहीं राजांच्या कारकीर्दींतील कांहीं मौजेच्या गोष्टी बिस्मार्क यांनीं सांगितल्या. कित्येक राजांनीं ही कला मोठ्या उच्चावस्थेस नेली असून त्यासाठीं या कामावर तज्ञगृहस्थांची नेमणुक केली होती. चाकू तापवून त्यानें पत्र उघडावयाचें काम एकानें करावें, दुसऱ्यानें मजकुराचें टांचण करावें आणि तिसऱ्यानें तें पाकीट बंद करावें, अशा पद्धतवार रीतीनें हें काम चालत असे.

वोर्थच्या लढाईसंबंधीं गप्पा निघाल्या असतां ते म्हणाले, "शौर्य आणि धाडस या बाबतींत फ्रेंच शिपायाशीं आमचे शिपायी कसे टिक-

तात, याची काळजी आम्हा सर्वांसच फार लागली होती. त्यांतून फ्रेंचांच्या ‘ चेसपो ’ बंदुका आमच्या बंदुकाहून अधिक चांगल्या आहेत असा गवगवा त्यावेळीं झाल्यामुळें, तर ही काळजी अधिकच वाढली होती; पण वोर्थ आणि रिपचर्न या दोन लढाया झाल्यानंतर भ्रमाचा भोपळा फुटला. या दोन लढायांतच जर्मन शिपायांनीं आपली कर्तबगारी आमच्या पूर्ण निदर्शनास आणली. जर्मन शिपायांबद्दलचें आमचें मत बदलण्याचा प्रसंग या मोहिमेंत पुढें केव्हांहि आला नाहीं. ”

अलीकडच्या कान्झरवेटीव अथवा पुराणमतवादी पक्षासंबंधीं बिस्मार्क यांच्या मनांत फारशी आदरबुद्धि नव्हती. पूर्वकाळच्या लोकांपैकीं हे नव्हत, असें ते म्हणत असत. “ पूर्वकाळच्या कान्झरवेटीव पक्षाच्या लोकांत एकप्रकारचा जोम असून स्वतःच्या मताच्या सत्यतेसंबंधीं त्यांची खात्री असे. पूर्वापर चालत आलेल्या पद्धतीनें राज्यकारभार चालविला, तरच राज्याला मजबुती राहील, असें त्यास अंतःकरणपूर्वक वाटे, यामुळें या मतांना चिकटून राहण्याचा यत्न ते अन्तःकरणपूर्वक करीत. अलीकडे हा सारा मनु आतां बदलला आहे. ज्यानें त्यानें आपल्या पोळीवर तूप ओढावें, असा प्रकार सध्यां चालू आहे. यामुळें स्वार्थदृष्टि बळावून साम्राज्यदृष्टि नाहींशी झाली आहे. प्रत्येकाला प्रधानपद मिळविण्याची हांव सुटली आहे. एकाद्याला पदकें आणि पदव्यांची हांव असते, तर दुसऱ्याला दरबारी नाचरंगांत आपल्याला बोलावणें यावें अशी हौस असते. तिसरा एकादा आपल्या मुलाच्या बढतीसाठीं खटपट करीत असतो, तर आपल्या बायकोचा प्रवेश राणी सरकारच्या तैनातींत कसा होईल, याच्या खटपटींत चवथा गुंतलेला असतो. अशा स्थितींत सध्यांचा पुराणमतवादी पक्ष पडलेला आहे. त्यांतले सारेच लोक असे स्वार्थसाधु बनले आहेत, असें माझें

म्हणणें नाहीं; पण पुष्कळांची स्थिति अशीच आहे, हें मात्र खरें. विशेषतः पक्षाचे पुढारी म्हणून जे म्हणवितात, त्यांत असल्या स्वार्थ-साधूंचा भरणा अधिक असतो. पक्षांतील साऱ्या लोकांचा पाठींबा त्यांना असल्यामुळें त्यांचें वजनहि पूर्वीपेक्षां अधिक वाढलें आहे. याशि-वाय पक्ष या नांवाचा समुदाय आणि त्यांतील प्रत्येक व्यक्ति यांतील भेद लक्षांत ठेवला पाहिजे. एकेवेळीं एका राजकुलीन पुरुषानें अशीच एक गंमत मला सांगितली. पार्लमेंटांतील कांहीं लोकांस आपल्या बाजूस वळविण्याचा प्रसंग त्यांस आला होता. या प्रसंगासंबंधीं माझ्या-पाशीं बोलतांना ते म्हणाले, 'पार्लमेंटांतील प्रत्येक मनुष्य व्यक्तिशः सरळ मनाचा आणि सुबुद्ध असतो. कोणतीहि गोष्ट त्याला नीटपणें सांगितली, तर त्याची समजूत तात्काळ पडते; पण ते सारे एकत्र जमले आणि त्यांचा पक्ष झाला कीं, ते पक्के अडाणी बनतात.' माझ्या विरुद्ध भांडणाऱ्या पक्षांत कांहीं लोक मला पक्के दीर्घद्वेषी आढळले. नीपॉफ गांवचा हा एकच रहिवाशी एवढ्या मोठ्या पदवीला चढला व आपण सारे मागें पडलों, याचेंच त्यांना दुःख होत असे. यामुळें कसलाहि विचार न करतां, माझ्या विरुद्ध ते जात."

सांप्रतचा जर्मन केवळ आपल्या पुरतें पाहणारा बनला आहे, असें बिस्मार्क म्हणत. लोककार्यार्थ पुढें सरणारा जर्मनसुद्धां आपल्या स्वतःच्या कक्षेबाहेर फारसा पहात नाहीं, असें ते म्हणत. आतां या नियमाला थोडे फार अपवाद असावयाचेच; पण असे अपवाद अगदीं थोडे. तसेंच पार्लमेंटांतील पक्षसुद्धां देशांतील खऱ्या गरजांकडे लक्ष न पुरवितां भलत्याच मतासंबंधीं केवळ पक्षाभिमान धरून रणें माजवितात, असें त्यांचें मत होतें. इतर पक्षांनीं देशाच्या राजकारणासं-बंधीं अशीं भांडणें न भांडतां हेच पक्ष जर्मनीची शेतकी सुधारण्या-

साठीं आणि आपसांतील एकोपा पुरा करण्यासाठीं झटतील, तरच जर्मनीचें अधिक कल्याण होईल; विशेषतः शेतकरी वर्गानें तरी राजकीय भानगडींत न पडतां आपल्या मुख्य धंद्याकडे अधिक लक्ष देणें फार अवश्य आहे. मी अमक्या पक्षाचा अथवा तमक्या पक्षाचा, असला अभिमान न धरतां वाटेल त्या पक्षाची मदत मिळवून शेतकीची सुधारणा करणें हेंच त्यांचें आद्य कर्तव्य आहे, असें त्यांचें मत होतें.

बिस्मार्क न कंटाळतां अथवा त्रासतां कित्येक तास एक सारखे काम करीत रहात, हें पूर्वीच सांगितलें आहे. बिस्मार्क यांच्या या गुणासंबंधीं फां हिडमन् यांनीं कांहीं माहिती सांगितली आहे. इ.स. १८७८ पासून १८८१ पर्यंत हिडमन हे मुख्य प्रधानाच्या ऑफिसांत मुख्याचें काम करीत असत. यामुळें बिस्मार्क यांजबरोबर काम करण्याचा प्रसंग त्यांस नित्य येत असे. एके दिवशीं वुल्फच्या तार कंपनी संबंधीं कांहीं कायद्याची माहिती बिस्मार्क यांस हवी होती. तेव्हां ती त्यांनीं हिडमन् यांस विचारली. ती माहिती हिडमन् यांस मुळींच नव्हती. तेव्हां बिस्मार्क म्हणाले, “ कांहीं हरकत नाहीं. आजच कांहीं घाई आहे, असें नाहीं; पण उद्यां दुपार पर्यंत या प्रकरणाचा खुलासेवार रिपोर्ट तुम्ही मला सादर करा. ” हिडमन् यांस ह्या हुकुमाची अम्मलबजावणी करण्याकरतां सारी रात्र जागावें लागलें. अशा रीतीनें कित्येक तास एकसारखें काम करण्यापासून फार त्रास होतो, असा अनुभव बिस्मार्क यांस नसल्यामुळें कोणासहि असें काम सांगण्यास त्यांस दिक्कत वाटत नसे. कामाच्या भरांत रात्रीच्या रात्री ते स्वतः जागून कांढीत.

वक्तशीरपणा हा बिस्मार्क यांचा आणखी एक मोठा गुण होता. अनेक प्रकारचीं कामें त्यांस उरकावयाचीं असल्यामुळें कामाच्या वेळा त्यांनीं अगदीं बांधून टाकल्या होत्या. यामुळें ते फारसे कोणाची

भेटहि घेत नसत. अगाऊ सूचना न देतां प्रधान मंडळांतील एकादा गृहस्थ कामानिमित्त भेटावयास आला, तर त्यालाहि कित्येक वेळां तासांचे तास तिष्ठत रहावें लागे. वक्तशीर न वागणारांचा मुलाहिजा त्यांनीं केव्हांहि ठेवला नाहीं. एकादा अमिर उमरावसुद्धां असा वागला तर प्रसंगीं त्याचीसुद्धां कान उघाडणी ते करीत. एकेवेळीं अशाच एका बडया जहागिरदारानें भेटीची परवानगी मागितली. रात्रीं नऊ वाजतां आपण आल्यास मला फार आनंद होईल, असें उत्तर त्यांनीं त्याला कळविलें. नऊ वाजण्याच्या सुमारास पाहुण्यांचा सन्मान करण्याकरतां बिस्मार्क यांनीं उंची वस्त्रें परिधान करून बिल्ले, चांद वगैरे धारण केले. नऊ वाजून गेले, तरी पाहुणा आला नाहीं. शेवटीं अर्धा तास वाट पाहून आपल्या हुजऱ्याला हाक मारून ते म्हणाले, 'अरे, माझा घरचा पोशाक घेऊन ये आणि हा परत नेऊन ठेव.' घरगुती पोषाक घालून ते काम करावयास बसतात न बसतात, तोंच बड्या पाहुण्याची स्वारी आली. तेव्हां त्या साध्या पोशाकांतच त्यांची भेट घेऊन बिस्मार्क यांनीं दोन तीन मिनिटांतच त्यांची बोळवण केली.

विश्रांतीसाठीं ते व्हार्जिन येथें येत, तेव्हांहि सरकारी कामाचे ढीग त्यांच्या बरोबर असतच. व्हार्जीन येथें ऑफिसच्या मुख्याशिवाय कारकून मंडळीपैकीं कोणीहि बरोबर नसल्यामुळें तेथें त्यांजवर कामाचा बोजा अधिकच पडत असे. या विश्रांतीच्या दिवसांत पहांटे चार वाजे पर्यंत त्यांस बहुधा रोज जागावें लागे.

---

## प्रकरण सदतिसावें.

## मृत्यु.

जर्मन राष्ट्रावर आज मोठा दुर्धर प्रसंग ओढवला. आपल्या देदीप्यमान तेजानें प्रकाशणारा तारा आज अस्तंगत झाला. बादशहा

पहिले वुइलियम आणि प्रिन्स बिस्मार्क या दोन शुभ्र ताऱ्यांपैकीं दुसरा तारा नभोमंडळांतून आज दृष्टिआड झाला. जर्मन साम्राज्य नौकेचा उज्वल दीप आज मावळला. सर्व जर्मन साम्राज्यांतून बाहेर पडणारे दुःखाचे हुंदके जगतीतलाच्या सर्व भागावर आज आढळत आहेत. जर्मन साम्राज्याची जी भयंकर हानि आज झाली, तिजबद्दल सारें जग जर्मनीशीं सहानुकंपा दाखवीत आहे. आपसांत भांडणाऱ्या व त्यामुळें क्षुद्रतेस पावलेल्या बारीक बारीक संस्थानांस एकत्र करून ज्यानें त्यांना साम्राज्यपदाच्या उज्वल पदवीवर चढाविलें, तो पुरुष कालवश होत्साता, आज निचेष्ट पडला आहे. जर्मनीच्या इतिहासांतील एका अत्यन्त उज्वल भागाचा आज शेवट झाला. शापानें अथवा शरानें जर्मन साम्राज्याचें शत्रुत्व करावें, असा विडा ज्यांनीं उचलला होता, त्या सर्वांस शापानें अथवा शरानें धूळ चारून त्यांचे प्रयत्न विफल करणाऱ्या सेनानीनें आज आपलें शस्त्र खालीं ठेवलें.

जर्मनीवर जेव्हां जेव्हां संकट आलें व जर्मनराष्ट्र काळाच्या पोटांत गडप होतें कीं काय, अशी भीति जेव्हां जेव्हां उपस्थित झाली, तेव्हां तेव्हां आपल्या वज्रबाहूनें त्या संकटाचें निवारण करून जर्मनीला ज्यानें बलवान् राष्ट्रांच्या पंक्तीस आणून बसविलें, त्याचे दोष विसरून फक्त गुणच तेवढे लोकांनीं घ्यावे, यांत नवल काय? जर्मन साम्राज्याच्या एकीसाठीं अनेकांनीं अनेक प्रकारचे यत्न केले; पण तें यश बिस्मार्क यांच्याच पदरीं पडावें, असा ईश्वरी संकेत होता. बिस्मार्क परलोकवासी झाले, ही बातमी बाहेर पसरतांच सर्व राष्ट्रांत मोठा हा हाःकार झाला. अनेक संकटें सोसून बिस्मार्क यांनीं जर्मन या नांवाला जगांत केवढें महत्व आणलें, याची विस्मृति त्यांच्या शत्रूंस पडली असली, तरी ही विस्मृति जर्मन राष्ट्राला पडलेली नव्हती. बिस्मार्क यांनीं

आपल्या प्रत्यक्ष उदाहरणांनीं राष्ट्रभक्तीचा उज्वल कित्ता सर्व जर्मन लोकांस घालून दिल्यामुळें राष्ट्रभक्ति म्हणजे काय याचा उमज अत्यन्त मूढ अशा जर्मनाला सुद्धां त्यांच्या उदाहरणानें स्पष्ट झाला.

काळाच्या ओघांत आणखी कित्येक शतकें निघून गेलीं, तरी बिस्मार्क यांची कीर्ति आजच्याप्रमाणेंच निरंतर उज्वल राहील, यांत शंका नाहीं. आजची पिढी ज्याप्रमाणें अत्यन्त आदरानें त्यांचें नांव घेते, त्याचप्रमाणें भावी काळच्या कित्येक पिढ्याहि त्यांचें नांव तितक्याच आदरानें घेतील. बिस्मार्क यांनीं राष्ट्रभक्तीचा जो धडा जर्मन जनतेस घालून दिला, तोच चांगला वळवून त्यांनीं केलेलें कार्य अधिक उज्वल व दृढ करणें हें जर्मन राष्ट्राचें आद्य कर्तव्य असून बिस्मार्क यांचें खरें स्मारकहि तेंच होय.

पहिले वुइलियम व बिस्मार्क या जोडीनें अतुल पराक्रम गाजविले व अभूतपूर्व यश संपादन केलें; तथापि आपली शालीनता व शांति यांस त्यांनीं सोडलें नाहीं. उद्धटपणाचा अथवा गर्विष्ठपणाचा प्रवेश त्यांनीं आपल्या हृदयांत होऊं दिला नाहीं. या दोन वीरांस जें एवढें अतुल सामर्थ्य प्राप्त झालें होतें, त्याचें रहस्य हेंच होय. प्रत्येक जर्मनानें त्यांचें हें उदाहरण लक्षांत ठेवून सर्व प्रसंगीं शालीनता व शांति या दोन गुणांचा अवलंब करावा.

बिस्मार्क देहानें गेले असले, तरी कीर्तीनें आपल्या देशांत अखंड उरावेत अशी प्रार्थना आज प्रत्येक जर्मन करीत आहे ही प्रार्थना वावगी आहे, असें कोण म्हणेल ?

प्रिन्स बिस्मार्क यांच्या मृत्यूनें जर्मनराष्ट्रास जसा जबर धक्का बसला, तसा मोठा धक्का बऱ्याच काळांत त्याला बसलेला नव्हता. तारीख ३० जुलई सन १८९८ रोजीं रात्रीं अकरा वाजतां बिस्मार्क मरण

पावल्याची बातमी तारेनें सर्व जर्मनीभर पसरली. बिस्मार्क आणि जर्मन साम्राज्य यांचीं नावें सर्वांच्या चित्तांत इतकीं एकरूप होऊन राहिली होतीं कीं, बिस्मार्क गेल्यावर जर्मनीचें काय होईल; असा प्रश्न पुष्कळांच्या मनांत उद्भवल्यावांचून राहिला नाहीं. साम्राज्य निर्माण करण्यापासून तों त्याची घटना स्थिर होईपर्यंत अनेक आपत्तींतून बिस्मार्क यांनीं त्याला वांचविलें होतें. साम्राज्यावर कोणतेंहि संकट आलें, तरी आपल्या अतुल बुद्धिबलानें बिस्मार्क त्याचें निवारण करतील व सर्व जर्मनांच्या मनांत उत्साह उत्पन्न करतील, असा भरंवसा प्रत्येकास वाटत होता. त्याचप्रमाणें जर्मन साम्राज्याच्या शत्रूंसहि एकादा डाव टाकावयाचा झाला, तर बिस्मार्क यांची भीति प्रथम वाटत होती. बिस्मार्क यांच्या मृत्यूनें जर्मन साम्राज्याचा आशावृक्ष जसा उन्मळून पडला, त्याचप्रमाणें त्यांच्या शत्रूंचें भीतिस्थानहि नाहींसें झालें. यामुळेंच त्यांच्या मृत्यूनें जर्मन लोकांस अत्यंत खेद उत्पन्न झाला.

मृत्यूपूर्वी कांहीं वर्षें बिस्मार्क यांची प्रकृति फारशी चांगली नव्हती. यामुळें हा प्रसंग आपणावर केव्हांतरी येणार, याची जाणीव जर्मन राष्ट्राला अगोदर नव्हती, असें नाहीं. हा घाला जर्मन राष्ट्रावर अवचित पडला नाहीं; तथापि असें असतांहि ते मरण पावल्याची बातमी प्रसिद्ध झाली, तेव्हां आपला मोठा घात झाला, असें जर्मन राष्ट्रास वाटल्यावांचून राहिलें नाहीं. मृत्यूच्या पूर्वीं कांहीं दिवस वर्तमानपत्रांचे चवकस बातमीदार फ्रेड्रिकश्रू येथें येऊन वारंवार बातमी मिळवून जात होतेच. बिस्मार्क यांचें प्रकृतिमान बरेंच काळजी करण्यासारखें आहे, अशा बातम्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत होत्या; पण मध्यंतरीं प्रोफेसर श्वेनिंगर हे फ्रेड्रिकश्रू येथून बाहेर गेले, अशी बातमी प्रसिद्ध झाली, तेव्हां लोकांना पुन्हा धीर आला. आतां भीतीचें कारण उरलें

नाहीं, असें त्यांना वाटलें. इतक्यांत एकाएकीं तारीख ३० जुलई रोजीं श्वेनिंगर यांस तारेनें बोलावण्यांत आले. या तारेप्रमाणें शनवारीं रात्रीं साडे दहा वाजतां फ्रेड्रिकश्रू येथें ते हजर झाले; पण त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग होण्याची वेळ निघून गेली होती. ते येण्यापूर्वींच बिस्मार्क बेशुद्ध झाले होते आणि त्याच स्थितींत अकरा वाजतां त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. ते बेशुद्धींत असल्यामुळें अखेरच्या यातना त्यांस अर्थात्च जाणवल्या नाहींत.

बिस्मार्क यांच्या खोलींतून श्वेनिंगर बाहेर आले व शेजारच्या खोलींत जमलेल्या आप्तस्वकीयांस ही बातमी त्यांनीं सांगितली; तेव्हां आपला पालनकर्ता गेला, हें पाहून सर्वांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या यांत नवल नाहीं. श्वेनिंगर यांस तार गेल्याची बातमी बाहेर पडली; तेव्हांच लोकांचे थवेच्या थवे वाड्याच्या दरवाजा बाहेर जमूं लागले होते. श्वेनिंगर वाड्यांत गेलेले त्यांनीं पाहिले. बराच वेळ कांहीं बातमी बाहेर येईना यामुळें लोकांची चिंता दुणावली. अखेरीस त्यांच्या मृत्यूची बातमी बाहेर आली. लोकांच्या मनाची अगाऊ तयारी असतांहि प्रत्यक्ष बातमी आली, तेव्हां सर्वांच्याच चित्ताला जबर धक्का बसला. हजारों लोकांच्या मुखांतून दुःखाचा मंद ध्वनि बाहेर पडला. अधोमुखानें जनतेचा प्रवाह हळू हळू ओसरत गेला.

पुढें थोडे दिवसपर्यंत मृतासंबंधीं कोणतीहि बातमी वाड्याबाहेर आली नाहीं. बिस्मार्क यांचे आप्त व स्नेही मात्र दूरदूरच्या ठिकाणांहून येऊन वाड्यांत राहिले होते. कोणाहि परकीय मनुष्याचा प्रवेश वाड्यांत झाला नाहीं; तथापि पुष्पगुच्छ व पुष्पमाला यांचा अविरत प्रवाह मात्र एकसारखा सुरू झाला. लोकांनीं पाठविलेल्या या अखेरच्या अर्पणानें वाड्यांतील खोल्यांच्या खोल्या भरून जाऊं लागल्या. तारा

तर याहूनहि अधिक येऊं लागल्या. बिस्मार्क यांचें प्रेत ज्या खोलींत ठेवण्यांत आलें होतें, त्या एकाच खोलींत रात्रभर भरपूर दिवे लावून उज्वल प्रकाश केला होता. खोलीच्या मध्यभागीं शुभ्र बिछान्यावर त्यांचा देह ठेवला होता व बिछान्यावर पुष्पगुच्छ आणि माळा ठेवल्या होत्या.

मुख्य राजधानीचें शहर बर्लिन हेंच बिस्मार्क यांच्या चळवळीचें केंद्रस्थान असल्यामुळें दुःखप्रदर्शनाचा देखावा, तेथें मोठ्या प्रमाणावर दिसत होता. म्युनिसिपालिटीचीं ऑफिसें व शहरांतील हजारों घरें दुःखसूचक निशाणांनीं मंडित झालीं होतीं. अर्ध्या काठीपर्यंत खालीं उतरविलेलीं निशाणें सर्व शहरभर दिसूं लागलीं. पार्लमेंटांतील कित्येक पक्षाच्या पुढाऱ्यांतर्फे व शहरांतील खाजगी मंडळातर्फे हजारों दुःखसंदेश फ्रेड्रिकश्रू येथें गेले. यांत कित्येक संदेश त्यांच्या शत्रूकडूनहि गेले होते. बिस्मार्क यांच्या जिवंतपणीं त्यांची किंमत ज्यांनीं ओळखली नाहीं, तेच लोक त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची स्तुति करूं लागले. सर्व पक्षांच्या वर्तमानपत्रांनींहि जादाअंकाच्या लक्षावधी प्रति काढून बिस्मार्क यांची स्तुति एकमतानें केली होती. असाच देखावा जर्मन साम्राज्यांतील इतर लहान मोठ्या गांवांतूनहि दिसून आला. बिस्मार्क यांच्या मृत्यूनंतर कित्येक दिवसपर्यंत लोकांना बोलण्याला दुसरा विषयच नव्हता. सर्व संस्थानांतील प्रमुख शहरांतून बर्लिनप्रमाणेंच हजारों दुःखसंदेश फ्रेड्रिकश्रू येथें गेले.

जर्मनीप्रमाणेंच इतर देशांतूनहि अशाच प्रकारें दुःखप्रदर्शन झालें. आस्ट्रियाचे बादशहा फ्रान्सीस जोसेफ यांनींहि बिस्मार्क यांच्या वडील मुलास सहानुभूतीचा व दुःखप्रदर्शक संदेश पाठविला. वर्तमानपत्रांतील लेखांची सामान्य दिशा दाखविण्याकरतां पुढील उतारे पाहण्यासारखे आहेत.

" बिस्मार्क यांच्यासारखे अद्वितीय पुरुष जगांत हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच निपजतात. हे पुरुष शककर्ते होत. देशाच्या ओघाला हे नवें वळण लावीत असतात. एकाद्या देशाच्या इच्छा त्याच्या आकांक्षा आणि त्याची कर्तबगारी यांना मूर्तरूप देऊन त्याचें नांव जगाच्या इतिहासांत पुढें आणण्याचें कार्य हे पुरुष करतात. हें त्यांचें कार्य केवळ त्यांच्या पिढीपुरतेंच असतें असें नसून देशाच्या उन्नतीच्या भावी मार्गाचा नकाशाहि ते आंखून ठेवित असतात. बिस्मार्क यांच्या काराकर्दींत अनेक अद्भुत घटना घडून आल्या. या घटना केवळ यदृच्छेनें घडल्या असें नसून बिस्मार्क यांनीं आपल्या कर्तबगारीनें त्या घडवून आणल्या. या सर्व घटनांच्या मुळाशीं त्यांची अतुल मुत्सद्देगिरीच होती. आपलें अखेरचें साध्य काय आहे, याचा निश्चय मनाशीं एकवार ठरविल्यावर ते त्यापासून केव्हांहि परावृत्त झाले नाहींत. यामुळें त्यांच्या साऱ्या कृतींत धरसोडपणा केव्हांहि आढळून येत नाहीं. त्यांचा निश्चय कार्यसिद्धीपर्यंत एकसारखा टिकून राहिला होता. हळूहळू आणि पायरी पायरीनें पण निश्चयानें अखेरचें साध्य त्यांनीं पार पाडलें. जर्मन कुळाच्या अनेक शाखांचे रक्त फ्रान्सच्या रणभूमीवर एकत्र सांडलें गेलें, पण याच रक्तानें सर्व जर्मन शाखांचें एकीकरण बिस्मार्क यांनीं इतकें बेमालुम केलें कीं, त्यांत फूट पडण्याची भीति यापुढें राहिलेली नाहीं. याच पायावर त्यांनीं उज्वल साम्राज्य उभें केलें. ज्या लोहानें धारातीर्थीं त्यांनीं शत्रूंचें दमन केलें, त्याच लोहाची आतां औतें आणि नांगर त्यांनीं बनविलीं असून तीं जर्मनीचा योगक्षेम चालवीत आहेत. जर्मन साम्राज्याच्या इतिहासांत त्यांचें नांव अजरामर राहील. त्यांचें कबरस्थान ही भावी पिढ्यांची एक महायात्रेची जागा होऊन राहील. त्यांच्या कर्तबगारीमुळें ज्या कोट्यवधी जर्मनांस सुखाचा लाभ झाला,

त्या जर्मन लोकांच्या हृदयांत बिस्मार्क यांनीं अक्षय्यस्थान मिळविलें आहे." विनर-झिटंग-व्हियेन्ना.

" बिस्मार्क यांच्या मृत्यूनें जर्मनीच्या एका नव्या शकाच्या प्रारंभीच्या भागाचा शेवट झाला. बिस्मार्क यांची कीर्ति सर्व जगभर दुमदुमून राहिली असल्यामुळें सर्व जातीच्या लोकांस त्यांच्या मृत्यूनें दुःख होईल यांत शंका नाहीं. " न्यू फ्री प्रेस, व्हियेन्ना.

" इतिहासकर्ते म्हणून जे थोडेसे पुरुष जगाच्या इतिहासांत मधून मधून निर्माण होत असतात, त्यांतच बिस्मार्क यांची गणना करणें अवश्य आहे. त्यांनीं आपल्या कार्यास आरंभ केला, तेव्हां जर्मन कुल विलक्षण विपत्तींत सांपडलें होतें. युरोपांतील मानवकुलांत जर्मन कुल संख्येनें बरेंच मोठें असून कर्तबगारीनेंहि इतर कुलांपेक्षां कमी दर्जाचें नाहीं. असें असतांहि तें हिन दशेस पोहोंचलें होतें. आपला मानमरातब वाढावा आणि आपल्या कर्तबगारीला योग्य असें स्थान जगाच्या इतिहासांत आपणास मिळावें, अशी आकांक्षा जर्मन कुलाच्या मनांत वसत होती; पण ही आकांक्षा मूर्त स्वरूपास कशी आणावी, हें मात्र त्यांस समजत नव्हतें. हें महत्कार्य पार पाडण्यास बिस्मार्क यांचा जन्म झाला. दुर्बळ संस्थानांतून त्यांनीं निर्मिलेल्या साम्राज्याच्या शब्दाला जगांत आज योग्य मान मिळत असून त्याची गणना जगांतील प्रमुख आणि वजनदार राष्ट्रांत आज होऊं लागली आहे. हें बिस्मार्क यांच्यांच कर्तबगारीचें फळ होय. " फ्रेम-डेनब्लाट-व्हियेन्ना.

" बिस्मार्कसारख्या पुरुषाचा जन्म एकाद्या विशिष्ट देशांत झाला असला, तरी त्यांच्या कर्तबगारीचा उपयोग साऱ्या जगाला होत असल्यामुळें त्यांची गणना जगद्वंदनीय पुरुषांत करणें अवश्य आहे. कांहीं लोकांनीं मित्रभावानें त्याजवर प्रेम केलें, तर कांहींनीं त्यांचा द्वेष

केला. किंवहुना खऱ्या मित्रापेक्षां त्यांस शत्रूच अधिक होते; तथापि ज्या विशिष्ट कल्पनेचा उपक्रम त्यांनीं केला व जी प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांनीं आणून दिली, ती कल्पना मित्रा प्रमाणें त्यांच्या शत्रूसहि मान्य झाली. बिस्मार्क यांचे सिद्धीचे मार्ग त्यांस आवडले नसले, तरी मूळ हेतूबद्दल केव्हांच वाद नव्हता. बिस्मार्क यांची विशाल बुद्धि, जिवा-पाड काम करण्याची त्यांची मेहनत आणि त्यांचा निश्चय; यांगुणांबद्दल त्यांच्या मित्रांप्रमाणें त्यांच्या शत्रूसहि आदर वाटत होता. दैत्यांच्या पंक्तीस त्यांस बसविणारे त्यांचे शत्रू त्यांचे हे गुण ओळखून त्यांस वचकून असत. बिस्मार्क यांजविरुद्ध हात उचलण्यापूर्वी त्यांस चांग-लाच विचार करावा लागे. त्यांचें वैयक्तिक तेज अशा प्रकारचें होतें कीं, त्यांच्या शत्रूसहि त्यांजपुढें नमून वागावे लागे. स्वतःच्या कर्तबगारी बद्दल आत्मविश्वास आणि दृढनिश्चय या गुणांनीं हें ईश्वरी तेज उत्पन्न झालें होतें." पेस्थरलॉइड, हंगेरी.

जर्मनी व आस्ट्रिया-हंगेरीप्रमाणेंच इटलींतहि बिस्मार्क यांच्या मरणानें लोकांस अतिशय दुःख झालें. बिस्मार्क यांनीं इटलीशीं आरंभापासू-नच चांगला स्नेहभाव राखिला होता. इटलीचे राजे हँबर्ट यांजकडून वुइलियम वादशहांस दुखवट्याची तार आली. त्याच प्रमाणें प्रधान मंडळाकडूनहि फ्रेड्रिकश्रू येथें सहानुभूतीचे संदेश आले. सुप्रसिद्ध इटालियन मुत्सद्दी सिनार क्रिस्पी यांनीं ट्रिब्यूना पत्रांत पुढील मजकूर प्रसिद्ध केला.

"आटो फॉं बिस्मार्क यांच्या मरणानें जगांतील एक अद्वितीय पुरुष आज नाहींसा झाला आहे. दंभ आणि कपट यांचे ते पक्के द्वेष्टे असल्यामुळें बिस्मार्क यांज संबंधीं अनेक प्रकारच्या कुत्सित टीका त्यांच्या शत्रूंनीं केल्या. त्यांच्या स्पष्टवक्तेपणाला त्यांच्या शत्रूंनीं उद्दाम-

पणाचें रूप दिलें. त्यांच्या निश्चयाचें रूपांतर त्यांनीं हटवादीपणांत केलें; पण बिस्मार्क हे उद्धट नव्हते व हटवादीहि नव्हते. इ. स. १८७० सालचें युद्ध फ्रान्सलाच हवें होतें व तें फ्रान्सनेंच सुरुं केलें, याबद्दल आतां कोणालाहि शंका राहिलेली नाहीं. या युद्धांत प्रशियाला आपण धुळीस मिळवूं, असें फ्रान्सला वाटत होतें. त्याच प्रमाणें या युद्धांत प्रशियाचा टिकाव लागेल, असें युरोपांत कोणासहि वाटत नव्हतें; पण इ. स.१८१५ सालापासून दरदर्शीपणानें प्रशियानें जी कडेकोट लष्करी तयारी केली, तीमुळेंच सर्वांचा अजमास चुकला व फ्रान्सची आशा विलयास गेली. इ. स १८७० सालचें युद्ध संपल्यानंतर बिस्मार्क यांनीं शांततेचाच पुरस्कार एकसारखा केला. फ्रान्सांत निर्माण झालेली लोकसत्ता मोडून टाकून तेथें नेपोलियनची सत्ता पुन्हा स्थापावी अशी खटपट सुरू असतां बिस्मार्क यांनीं तिला पाठिंबा दिला नाहीं. युरोपची शांतता कायम रहावी, एवढ्याच हेतूनें फ्रान्सच्या प्र[illegible] सत्ता, काला त्यांनीं दुजोरा दिला. बिस्मार्क हे स्वभावाचे किती सच्चे होते-याचा अनुभव त्यांच्या अठ्ठावीस वर्षांच्या कारकीर्दींत अनेक वार अनेकांस आला आहे. इ. स. १८६६ च्या युद्धांत इटालियन प्रधान-मंडळाच्या कित्येक कृतींसंबंधीं बिस्मार्क यांनीं तकरार केली; पण इ. स.१८८७ पासून १८९० पर्यंत मुख्य प्रधानकीची सूत्रें माझ्या हातीं असतां बिस्मार्क यांचा वचक साऱ्या युरोपांत किती होता, व त्यांच्या स्नेहाची खरी किंमत काय होती, हें अनुभवानें माझ्या ध्यानांत आलें. जर्मनीला जें कांहीं महत्व आज प्राप्त झालें आहे, तें त्यांच्याच कर्तबगारीचें फळ होय आणि जर्मन राष्ट्रांनींहि आपल्या या देशाबांधवाची किंमत ओळखून त्यांचा योग्य गौरव केला."

" जर्मनराष्ट्राच्या या दुःखांत इटालियन राष्ट्रहि भागीदार आहे. बिस्मार्क यांच्या राज्यधोरणामुळेंच इटालियन राष्ट्र आज सुखांत आहे. या गोष्टीचा

विसर आह्मांस कधींहि पडावयाचा नाहीं. इटलीचें सुसंघटीत राष्ट्र बनविण्याच्या कामीं ज्यांनीं श्रम केले, त्यांस बिस्मार्क यांची प्रत्यक्ष मदत असल्यामुळें या यशाचा वांटा बिस्मार्क यांजकडे जातो, ही गोष्टी इटालियन लोकांच्या ध्यानांतून जाणार नाहीं." ओपिनियोन-इटली.

" तरवारीच्या बळावर साम्राज्य निर्माणकर्ते पुरुष आजपर्यंत पुष्कळ झाले; पण अंतःस्थ कलहानें दुबळ्या झालेल्या लोकांच्या मनांत एकराष्ट्रीयत्वाची प्रबळ भावना उत्पन्न करून त्यांचें एक प्रबळ राष्ट्र बनविणें हें काम अत्यंत दुर्घट होय. हें दुष्कर काम बिस्मार्क यांनीं केलें, त्या अर्थी त्यांची गणना अद्वितीय पुरुषांच्या मालिकेंत करणें अवश्य आहे. " डॉनचिझीओट, इटली.

बिस्मार्क यांची प्रकृति अगदीं बेताल झाली असल्याची खबर इंग्लंडांतील लोकांस नसल्यामुळे त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकून ते अगदीं चाकित होऊन गेले. अमेरिका व स्पेन यांजमधील युद्धाचा शेवट होऊन तहाच्या कलमांची वाटाघाट यावेळीं सुरू होती. ही गोष्ट इंग्लंडच्या दृष्टीनेंहि अत्यंत महत्वाची असल्यामुळें अर्थातच इंग्लंडांतल्या वर्तमानपत्रांचें लक्ष या एकाच विषयाकडे गुंतून राहिलें होतें; पण बिस्मार्क यांच्या मृत्यूची बातमी समजल्याबरोबर त्यांसहि या स्पॅनिश अमेरिकन प्रकरणाचा विसर क्षणभर पडला. इंग्लंडांतील सर्व पत्रांनीं त्यांज संबंधीं लांब लचक अग्रलेख लिहिले होते. पुष्कळांनीं त्यांचें त्रोटक चरित्रहि छापलें. कित्येकांनीं चित्रेंहि छापलीं. नेपोलियन नंतर त्याच्याच तोडीचा दुसरा पुरुष बिस्मार्क यांजशिवाय झाला नाहीं, असें टाइम्सनें लिहिले होतें "कित्यकांचें कार्य तात्पुरते मोठें दिसत असलें, व त्यावेळीं तें अत्यंत महत्वाचें भासत असलें, तरी त्याला चिरकलीन टिकाऊ रूप नसतें. ज्यांच्या मागें त्यांचें कार्य पुष्कळ दिवस

टिकून राहील, असे कार्य कर्ते पुरुष विरळे. या विरळ्या पुरुषांत बिस्मार्क यांचीं गणना खात्रीनें करता येईल. "असें आपलें मत टाइम्सनें प्रगट केलें होतें. "आपणाशीं समकालीन असलेल्या युरोपांतील सर्व मुत्सद्यांत बुद्धिमत्तेनें व कर्तबगारीनें बिस्मार्क अग्रगण्य होते." असें मत टेलिग्राफनें दिलें होतें. "क्रामवेलनें इंग्लंडांत जें कार्य केलें, असें कार्य बिस्मार्क यांनीं जर्मनींत केलें" असे उद्गार संडेस्पेशल पत्रानें काढले होते. अशाच रीतीनें इंग्लंडांतील इतर पत्रांनींहि बिस्मार्क यांची स्तुति करून जर्मन साम्राजाच्या पितृपदावर त्यांस बसविले होतें. "बिस्मार्क यांची दानत, त्यांची विशाल बुद्धि आणि त्यांची कृत्यें; हीं इतकीं असामान्य कोटींतील होतीं कीं, त्यांजमुळें कीर्ति मंदिरांत त्यांच्या नांवाला अक्षय्यस्थान मिळेल, यांत संशय नाहीं. दुर्बळ संस्थानांतून जर्मन साम्राज्य त्यांनीं निर्माण केलें, त्यांचें हें उज्वल कार्य काळाच्या पोटांत अदृश्य झाले, तरी त्यांच्या विशाल बुद्धीची व अतुल कर्तबगारीची कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ मागें राहिल. त्यांचें महत्वाचें अखेरचें कार्य म्हटलें म्हणजे त्रिकुट संधि हें होय. युरोपांत अनेक प्रकारची गडबड चालू असतांहि त्याच्या शांतीचा भग झाला नाहीं, हें फळ केवळ त्रिकुट संधीचेंच होय, ही गोष्ट युरोपनें लक्षांत ठेवली पाहिजे" असें स्टँडर्ड पत्रानें लिहिलें होतें. "उत्तम प्रतीची तारतम्य बुद्धि, धैर्य आणि निश्चय या गुणांचा योग्य उपयोग केला असतां केवढे महत्कार्य साधतां येतें, याचा धडा बिस्मार्क यांनीं आपल्या उदाहरणांनीं जगाला घालून दिला आहे. हा धडा गिरवून आपलें कल्याण साधून घेणें हें जगांतील भावी मुत्सद्यांचें कर्तव्य आहे." असें मार्निंग पोष्ट पत्रानें म्हटलें होतें.

स्पेन देश युद्धसमाप्तीच्या गडबडींत असल्यामुळें तेथील पत्रांत युद्धविषयक चर्चेलाच प्रमुखस्थान मिळावें, यांत नवल नाहीं; तथापि अशा

स्थितींतहि ही चर्चा क्षणभर बाजूस ठेवून तेथील पत्रांनीं बिस्मार्क यांजसंबंधीं लांबलचक लेख लिहिले होते. एकाच शहाण्या मुत्सद्याच्या कर्तबगारीनें राष्ट्र मोठ्या पदवीला व प्रबलतेला कसें चढतें व एकाद्याच्या मूर्खपणामुळें दुसरें एकादें राष्ट्र दुर्दैवाच्या तडाक्यांत कसें सांपडतें, याचें विवेचन मॅड्रिडच्या कित्येक पत्रांनीं केलें होतें. अर्थातच स्पेनिश-अमेरिकनयुद्ध व फ्रँको-जर्मनयुद्ध यांची तुलना करून तीपासून निघणाऱ्या बोधासंबंधीं या पत्रांनीं प्रछन्न चर्चा केली होती. यावरून बिकट प्रसंगीं संबंध राष्ट्राचें चित्त एकाद्या शहाण्या मुत्सद्याकडे कसें वळतें, व अशा मुत्सद्याची भूक त्याला किती लागलेली असते, हें यावरून दिसून येतें. बिस्मार्क यांचा जन्म जर्मनींत न होता, दुसरीकडे कोठें झाला असता, तर त्यांच्या जर्मनींतील शत्रूंनींहि त्यांची अशीच स्तुति केली असती व संकटाच्या प्रसंगीं अशा पुरुषाच्या अस्तित्वाचीहि अपेक्षा केली असती; पण बिस्मार्क जन्मानें जर्मन असल्यामुळें त्यांच्या गुणांवर काजळ फासण्याचा हक्क जणूं काय जन्मतःच आपणांस प्राप्त झाला आहे, असें त्यांच्या शत्रूंस वाटलें.

प्यारीसच्या पत्रांनीं निंदाप्रचुर लेख लिहून आपल्या मनाची स्थिति व्यक्त केली होती. इ. स. १८७० सालचा विसर त्यांस अद्यापि पडला नव्हता व पुढेंहि कदाचित् पडणार नाहीं, असें या लेखावरून स्पष्ट दिसून येण्यासारखें होतें. यांतील कित्येक पत्रांनीं बिस्मार्क यांजबद्दल द्वेषभाव प्रगट केला होता, तर दुसऱ्या कित्येकांनीं त्यांची थट्टा केली होती:

"बिस्मार्क हे पशुतुल्यवृत्तीचे आणि रक्ताला लालचावलेल्या पशूसारखे क्रूर होते. त्यांचें सारें शहाणपण म्हणजे भल्याबुऱ्या मार्गानें आपला वरचढपणा स्थापन करणें यांतच होतें. आणि अशा रीतीनें

मिळविलेल्या जयांचा उपयोग त्यांनीं दुसऱ्यावर जुलूम गाजविण्यांत केला." —रापेल–प्यारीस.

"बिस्मार्क यांच्या मृत्यूबद्दल जर्मन लोक शोकाचीं गाणीं गातील व अशा रीतीनें या प्रसंगाला मोठें गंभीर रूप आणतील; पण बिस्मार्क हे दांभिक आणि खुनी होते, असा विचार त्यांच्या पैकींहि कित्येकांच्या मनांत आल्यावांचून राहणार नाहीं. आणि अशा गुणांतून उत्पन्न होणारें कार्य हें महत्कार्य आहे, असें कोणीहि म्हणणार नाहीं." —जर्नल.

"बिस्मार्क यांच्या कर्तबगारीबद्दल इतिहासकार कदाचित् चकित होऊन आश्चर्य प्रगट करतील; पण तें त्यांस कधींहि पापमुक्त करणार नाहींत." ल्यांटर्न.

"हा वृद्ध लुटारू यापुढें आतां कोणासहि उपद्रव करूं शकणार नाहीं." लायब्र पॅरोल.

"बिस्मार्क यांनीं आंगीकारलेलें कार्य पुढें चालविणारा, दुसरा कोणी इसम जर्मनींत निघेल कीं नाहीं, याची शंकाच आहे. इंग्लंडचे मुख्य प्रधान ग्लॅडस्टन व बिस्मार्क यांची तुलना कित्येक लोक करतात; पण या दोघांचे मनोधर्म परस्परांच्या अगदीं विरुद्ध होते. ग्लॅडस्टन हे सुधारणेचे व स्वातंत्र्याचे चहाते होते. आणि बिस्मार्क हे तरवारीचे आणि जुलुमाचे भक्त होते." गॉलाय.

अशा रीतीनें अनेक फ्रेंच पत्रांतून बिस्मार्क यांजवर निंदेचा व थट्टेचा वर्षाव झाला. तथापि पुष्कळ पत्रांनीं त्यांची स्तुतिपर चरित्रें लिहिलीं, व कित्येकांनीं बिस्मार्क यांच्या कीर्तीत भर पडणाऱ्या दंथ कथा प्रसिद्ध केल्या. कित्येक पत्रांत सामान्य जनतेचे म्हणून जे लेख प्रसिद्ध झाले

होते, त्यांवरून बिस्मार्क यांजबद्दल तिच्या मनांत विशेष किल्मिष राहिलें होतें असें दिसत नाहीं. बर्लिन कांग्रेसमध्यें सेक्रेटरी या नात्यानें फ्रान्स-तर्फें कौन्ट मॉय हे हजर होते. त्यावेळीं बिस्मार्क यांशीं त्यांचा खास परिचय झाला होता. मॉय यांनीं लेख लिहून त्यांत बिस्मार्क यांची स्तुति केली होती. विशेषतः बिस्मार्क यांच्या उद्योगशीलतेबद्दल त्यांनीं विशेष तारीफ केली होती.

डॅनिश पत्रांनीं बिस्मार्क यांचे लोकोत्तर गुण कबूल करून त्यांची स्तुति केली होती. तथापि श्लेश्वीगन्हालस्टीन प्रांतांचें शल्य त्यांच्या हृदयांत टोंचत होतें, हें व्यक्त करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. अमेरिकेंतील पत्रांनीं लांबलचक अग्रलेख लिहून त्यांजबद्दलची आपली पूज्य बुद्धि व्यक्त केली होती.

पिटर्सबर्ग येथील पत्रांनींहि बिस्मार्क यांची पुष्कळ स्तुति केली होती. नोवेरेम्या पत्रांत पुढील मजकूर होता.

"कट्टा देशभक्त म्हणून बिस्मार्क यांचें उदाहरण प्रत्येक रशियनानें आपल्या पुढें नित्य ठेवण्यासारखें आहे. बिस्मार्क यांनीं रशियाशीं कधींहि शत्रुत्व केलें नाहीं. क्रिमियन युद्ध व पोलंडांतील बंड या वेळीं बिस्मार्क यांनीं जें धोरण राखलें, त्यावरून रशियाबद्दलचा त्यांचा स्नेह-भाव स्पष्ट होतो. मृत्यूच्या आधीं कांहीं दिवस हे प्रधानपदावरून दूर झाले होते; तथापि राजकारणांत त्यांचें नांव लोकांच्या दृष्टी समोरून कधींहि गेलें नाहीं. पहिलें धोरण बदलून नव्या धोरणाचा स्वीकार विलियम बादशहांनीं केला, तरी बिस्मार्क अद्यापि हयात आहेत ही गोष्ट त्यांस विसरता येण्यासारखी नव्हती."

बादशाहा निकोलस व टर्कीचे सुलतान यांनींहि बिस्मार्क यांच्या कुटुंबास व वुइलियम बादशहांस दुखवटयाचे निरोप पाठविले होते.

वरील हकीकतीवरून बिस्मार्क यांच्या मृत्यूनें सारें जग कसें आमूलाग्र हललें व बिस्मार्क हे किती लोकोत्तर पुरुष होते, याची चांगली कल्पना येईल.

---

प्रकरण अडतिसावें.

## बिस्मार्क कुटुंबास बादशहांची भेट.

बिस्मार्क मरण पावल्याबरोबर डॉ. श्वेनिंगर यांनीं वुइलियम बादशहांस बर्जेन मुक्कामीं पुढील तार पाठविली.

" बिस्मार्क यांनीं आतांच इहलोकाचा त्याग केला, ही बातमी हुजुरास मी नम्रपणें कळवितों. "

बिस्मार्क यांचा भरंवसा नाहीं, ही बातमी तारीख ३० जुलई रोजीं रात्रीं बादशहांस समजलीच होती. तेव्हां सकाळीं काय खबर येते, या काळजींत बादशहा होते. तारीख ३१ जुलई रोजीं सकाळीं श्वेनिंगर यांची तार त्यांस पोंहोंचली, तेव्हां त्यांनां अतिशय दुःख झालें. होहेनझोलर्न नांवाच्या आपल्या राजनौकेवरील राजकीय झेंडा त्यांनीं अर्ध्याभागापर्यंत खालीं उतरविण्याचा हुकूम केला व ते त्वरेनें राजधानीस येण्यास निघाले. यावेळीं प्रधानमंडळांतील परराष्ट्रीय प्रधान बर्नार्ड फॉं बुलो हे सेमरीन येथें होते व त्यांच्याचप्रमाणें इतर कांहीं मंडळी बाहेरगांवीं होती. त्यांस ही बातमी समजतांच सर्व मंडळी बर्लिन येथें जमा झाली. राजाज्ञेनें सर्व राजभवनावरील निशाणें अर्ध्या काठीपर्यंत खालीं उतरविलीं. त्याचप्रमाणें राजकुमारांच्या राजवाड्यावरील व सर्व सरकारी कचेऱ्यांवरील निशाणेंहि अर्धीं खालीं उतरविलीं. बिस्मार्क यांचें शव राजधानींत दफन करण्यांत यावें, अशी बादशहांची इच्छा होती; पण आपल्या शवाची व्यवस्था काय करावयाची व त्यावर कोणता लेख लिहावयाचा,

हें बिस्मार्क यांनीं अगोदरच ठरवून टाकलें असल्यामुळें बादशहांस आपली इच्छा बाजूस ठेवावी लागली.

"प्रिन्स फॉं बिस्मार्क. जन्म एप्रील, सन १८१५. मृत्यु—

पहिल्या वुइलियम बादशहांचा एक एकनिष्ठ जर्मन सेवक."

असा लेख आपल्या थडग्यावर कोरावा, असें बिस्मार्क यांनीं स्वतःच लिहून ठेवलें होतें.

वस्तुतः प्रिन्स बिस्मार्क यांनीं तीन बादशहांची नौकरी केली; तथापि पहिल्या वुइलियम बादशहांच्या वेळच्या उज्वलकाळाचें स्मरण त्यांस विशेष होत असे, व त्यांजवरच त्यांचें विशेष प्रेम असें. यामुळें या दोन गोष्टींचें स्मारक करण्याची त्यांस इच्छा झाली. बिस्मार्क हे हाडाचेच राजभक्त असल्यामुळें दुसऱ्या दोन बादशहांबद्दलहि त्यांच्या ठिकाणीं आदरभाव होता; पण तें प्रेम व्यक्तींचें नसून गादीचें होतें. पहिल्या वुइलियम बादशहावरील त्यांचें प्रेम अधिक व्यक्तिविषयक व खाजगी स्वरूपाचें असल्यामुळें त्या दोघांत अकृत्रिम व एक प्रकारच्या बरोबरीच्या नात्याचा स्नेह उत्पन्न झाला.

तारीख २ आगष्ट रोजीं संध्याकाळीं सहा वाजतां फ्रेड्रिकश्रू येथें मृताबद्दल करावयाचा धर्मविधी झाला. या प्रसंगीं बादशहा व महाराणी यांशिवाय फक्त जवळची आप्तमंडळीच हजर होती. दुपारीं एक सैन्याची लहानशी तुकडी येऊन हजर झाली. ही तुकडी बादशहांच्या हुकुमानें आली होती. हळू हळू सैन्याच्या विभागातर्फे प्रतिनिधीमंडळेंहि येऊं लागलीं. तारांवर तारा येण्यास सुरुवात झाली. मृतावर ठेवण्याच्या पुष्पमाळा इतक्या येऊं लागल्या कीं, त्या नुसत्या घेऊन ठेवण्यासच कित्येक तास लागले. अशा माळांचे एकंदर तीनशें पेटारे भरले.

बिस्मार्क यांच्या राहत्या वाड्याबाहेर लोकांचे थवेच्या थवे जमा झाले. त्यांचें अखेरचें दर्शन व्हावें म्हणून प्रत्येक गाडीनें हजारों स्त्री पुरुषें येतच होतीं. यांत पुष्कळ इंग्रज व फ्रेंच लोकहि होते. शेवटीं लोकांची गर्दी इतकी झाली कीं, दारापर्यंत जाण्यासहि वाट मिळेना.

संध्याकाळीं सहा वाजतां राजघराण्यांतील मंडळीची नऊ डब्यांची स्पेशल गाडी फ्रेड्रिकश्रू येथें आली. बादशहांनीं यावेळीं आरमारी पोषाक धारण केला होता. बादशहा व महाराणी यांच्या मागोमाग फॉं बुलो, फॉं ल्युकानस, कौंट युलेनबर्ग, ॲडमिरल बॅरन फॉं सेनडेन बायब्रान, लेफ्टेनंट जनरल फॉं प्लेसेन. जनरल फॉं हॅंके, कौंटेस केलर. बादशहाचे एडिक्यांप फॉं मेकेनसन व कौंट फॉं मोल्टके वगैरे प्रमुख मंडळी गाडींतून खालीं उतरली.

या मंडळीस घेण्यासाठीं बिस्मार्क यांचे वडील चिरंजीव प्रिन्स हर्बर्ट हे आले होते. बादशहांनीं प्रिन्स हर्बर्ट यांशीं मोठ्या प्रेमानें हस्तांदोलन केलें. नंतर ही सर्व मंडळी वाड्याकडे आली. वाड्याच्या दरवाजाबाहेर बादशहातर्फे आलेली पायदळ पलटण दुतर्फा उभी होती. सर्व मंडळी येतांक्षणींच या पलटणीनें त्यांस सलामी दिली. वाड्यांत आल्यावर बादशहा सर्व मंडळीसह मृताच्या खोलींत गेले व तीन मोठाले पुष्पहार शवाच्या पेटीवर त्यांनीं ठेवले. अनेक लोकांकडून अगणित पुष्पमाळा येऊन पडल्या होत्या व त्या साऱ्या बिस्मार्क यांच्या बसावयाच्या खोलींत ठेवल्या होत्या. मृतासाठीं करावयाची प्रार्थना वेस्टफाल या नांवाच्या पाद्रानें केली. त्यावेळीं पाद्री म्हणाला,

“ या मृतदेहाच्या भोंवतीं मृताची सर्व आप्त व स्नेही मंडळी सखेद अंतःकरणांनीं उभी राहिली आहे. बिस्मार्ककुटुंबावर हा मोठा घाला पडल्याचें ऐकून फार दूरवरची मंडळी मृताचें अखेरचें दर्शन घेण्याकरतां

दुःखाक्रांत अंतःकरणानें येथें जमा झाली आहे. आपले प्रिय बादशहा व महाराणीसाहेब याहि या प्रसंगीं येथें हजर आहेत. परमेश्वराच्या सान्निध चिरशांती घेत असलेल्या माजी बादशहांच्या एका इमानी नौकराबद्दल सांप्रतच्या बादशहांस जें प्रेम व जो आदर वाटत आहे, तो व्यक्त करण्याकरतां ते स्वतः येथें हजर झाले आहेत. जगाच्या ज्या ज्या भागांत जर्मनांची वस्ती आहे, तेथील हजारों अंतःकरणांतून निघणाऱ्या विचारलहरी या शांत भागापर्यंत येऊन पोहोंचत आहेत. ' प्रिन्स बिस्मार्क मरण पावले ' ही बातमी ऐकल्याबरोबर जगांतील साऱ्या जर्मनांच्या अंतःकरणांत दुःखाचा मोठा कल्होळ उठला व ती लाट या जागीं येऊन धडकत आहे. या सर्व गोष्टी परमेश्वरसत्तेच्या आधीन आहेत. त्याची इच्छा काय आहे, व त्या इच्छापुर्तीचे त्याचे मार्ग कोणते, हें आपणा मानवांस समजण्यासारखें नाहीं. याकरतां त्याच्या इच्छेला भक्तीपुरःसर मान देऊन आलेल्या प्रसंगांस सादर होणें, इतकेंच आपल्या हातीं आहे. बिस्मार्क यांजवर परमेश्वराचा मोठा विलक्षण अनुग्रह होता. इतकी कृपा क्वचितच कोणाच्या वांट्यास येते. परमेश्वरानें त्यांना लौकिकदृष्ट्या फार मोठ्या पदवीला चढविलें. ज्या सूत्रानें त्यांचें व इतर जर्मन प्रजाजनांचें अंतःकरण एकत्र बांधलें गेलें, तें सूत्र कधींहि भंग पावूं नये, अशी सर्वांची इच्छा होती; पण परमेश्वराची इच्छा वेगळीच आहे. अत्यंत उच्च पदारूढ असलेल्या या मृतानें खोल थडग्यांत जाऊन पडावें आणि सर्वांस बांधणारा तो प्रेमतंतु तुटावा अशी त्याची इच्छा होती. अशा प्रसंगीं आपलें अंतःकरण जड होऊन कांहीं सुचेनासें होतें. अशा प्रसंगीं परमेश्वराचें वचन आपल्या कानीं पडतें व त्याची सत्यताहि आपल्या प्रतीतीस येते. दुःखानें आपलें अंतःकरण अंधकारमय बनलें असतां पुढील मार्ग दिसेनासा

होतो व या अंधारापलीकडे काय आहे, हें जाणण्याची आपली सारी धडपड व्यर्थ होते. जें आपलें अमूल्य निधान परमेश्वरानें आपणापासून हिरावून नेलें, त्याच्या मोबदल्यांत त्यानें आपणास काय दिलें याचें ज्ञान आपल्या मानवी बुद्धीनें आपणास होत नाहीं. याचें उत्तर धर्मानें असें दिलें आहे.—

"मर्त्य म्हणून जें कांहीं आहे, त्यांचें रूपांतर अमर्त्यांत होतें. दृश्य "नाहींसें झालें, तरी उज्वल अदृष्य कायम असतें. हीच आशेची "जागा आहे. दुःखाश्रूंनीं नेत्र डबडबून डोळ्यांपुढें काळोखी येते व "गडद अधंकार पडून कांहीं दिसेनासें होते. अशा वेळीं धर्म प्रका- "शमय किरणांनीं आपलें सांतवन करतो"

"बिस्मार्क यांच्या मृत्यूनें बिस्मार्ककुटुंबाचेंच केवळ नुकसान झालें आहे, असें नाहीं, तर त्यामुळें आपले परमपूज्य बादशाहा आणि सर्व जर्मन राष्ट्र यांचें नुकसान झालें असून बिस्मार्क यांच्या आप्तस्वकीयांच्या दुःखांत सारें राष्ट्र भागीदार आहे. आपणास या वियोगामुळें परमावधीचें दुःखझालें आहे, ही गोष्ट खरी; तथापि परमेश्वरानें बिस्मार्क यांस त्र्यायशी वर्षांचें आयुष्य दिलें वं एवढ्या अवधींत त्यांजवर कृपा करून त्यांजकडून अभूतपूर्व गोष्टी करविल्या, हे त्याचे मोठे उपकार नव्हेत काय ? बिस्मार्क यांचें आयुष्य जसें दीर्घ होतें, तसेंच तें मूल्यवानहि होतें. आपल्या साऱ्या आयुष्यभर विलक्षण दगदग व त्रास सोसणें यांनीं त्यांना बिनमोल करून टाकलें. त्यांच्या साऱ्या आयुष्य क्रमांत परमेश्वराचा वरदहस्त त्यांच्या मस्तकावर होता, हें अगदीं उघड दिसून येतें. परमेश्वराचे संकेत जसे अगम्य, तसेच त्या संकेतपूर्तीचे त्याचे मार्गहि अगम्यच आहेत. बिस्मार्कसारख्या विभूतींच्या द्वारें परमेश्वर आपली संकेतपूर्ती करीत असतो. ऐहिक जगांत बिस्मार्क यांनीं ज्या-

प्रमाणें अतुल विजय मिळवून अखंड कीर्ती संपादन केली, त्याच प्रमाणें केवळ खाजगी गृहस्थ या नात्यानेंहि अतुल कौटुंबिक सुखाची प्राप्ती त्यांस झाली होती. राजकीय दृष्ट्या त्यांच्या इतके विजय मिळविलेले पुरुष ज्याप्रमाणें विरळा, त्याचप्रमाणें अशाप्रकारचें कौटुंबिक सुख लाभलेले पुरुषहि विरळाच. कामाच्या भाराखालीं जीव दडपून जात असतां व राजकीय उलाढालीची काळजी चित्तास नित्य जाचीत असतां घरीं आल्याबरोबर या सर्व काळज्या मागें टाकून बिस्मार्क आनंदी वृत्ति धारण करीत. आपल्या काळजीचा व दगदगीचा स्पर्श आपल्या कुटुंबास त्यांनीं केव्हांहि लागूं दिला नाहीं. परमेश्वरानें कृपा करून त्यांजकडून मातृभूमीची मोठी कामागिरी करविली आणि ही कामगिरी पुरी झाल्यावर त्यांच्या आवडत्या फ्रेड्रिकश्रूमध्यें दीर्घकाळ शांतीचा आयुष्यक्रमहि त्यांस दिला. परमेश्वराच्या या कृपेची आठवण आपण अंतःकरणांत वागवावयास नको काय ? आतां त्यांच्या आयुष्याच्या या संध्यासमयीं पत्निनिधनामुळें त्यांवर थोडीशी कृष्ण छाया पडली, ही गोष्ट खरी; तथापि त्यांच्या आप्त स्वकियांचें पूर्ण प्रेम त्यांजवर होतें व आपल्या परमपूज्य बादशहांनींहि त्यांचा आयुष्यक्रम आपणाकडून शक्य तितक्या सुखाचा केला, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांच्या आयुष्याचा संध्यासमय सर्वांकडून मिळणाऱ्या धन्यवादांच्या आनंद लहरींनीं भरून गेला होता. अशा स्थितींत त्यांच्या जुन्या व्याधीनें त्यांस पछाडलें, तेव्हां त्यांस अत्यंत शारिरिक क्लेश होतील अशी भीति वाटत होती; पण तसें कांहीं न होता, अत्यंत शांततेनें आपल्या आवडत्या साक्सन अरण्यांत त्यांनीं इहलोकचा त्याग केला. त्यांस अखेरची निद्रा लागली, त्यावेळीं त्यांचे आप्तस्वकीय त्यांज भोंवतीं जमा झाले होते. अशारीतीनें त्यांचा अंतसमय सुखकारक झाल्याबद्दल आनंदानें आपण परमेश्वराचे आभार मानू या. त्याच्या इच्छेनें जें कांहीं होतें; तें चांगलेंच असतें.

"तथापि बिस्मार्क यांस परमेश्वरकृपेनें ऐहिक सुखाचा पुष्कळ लाभ झाला, एवढ्याच करतां आपण त्याचे आभार मानले, तर तसें करणें युक्त होईल कीं काय, हाहि विचार करणें अवश्य आहे. बिस्मार्क यांस ऐहिक सुखाचाच लाभ झाला म्हणून नव्हे, तर त्यांचें नश्वर जीवित नाहींसें करून चिरंतन सुखाची जोड परमेश्वरानें त्यांस दिली, हें आपण लक्षांत ठेवलें नाहीं, तर आपल्या दुःखाचा उपशम होणार नाहीं व आपणास शांतीहि मिळणार नाहीं. या जागीं आणि या स्थितींत लक्षांत ठेवावयाची मुख्य गोष्ट हीच आहे. बिस्मार्क यांच्या जीविताचा क्षणभंगुरपणा नाहींसा करून परमेश्वरानें त्यांस चिरकाल प्रकाश दिला आहे, हें लक्षांत ठेवण्यासाठींच आपण येथें जमलों आहों. बिस्मार्क यांचा आयुष्यक्रम लहानपणापासूनच खऱ्या ख्रिस्त्याला योग्य असा होता. त्रिमूर्ति परमेश्वराच्या ठिकाणीं त्यांचा पूर्ण विश्वास होता. असा विश्वास कायम असतांच त्यांचा अंत झाल्यामुळें त्यांस परमेश्वराच्या ठिकाणीं शांति मिळेल. बिस्मार्क यांच्या आयुष्यक्रमांत अनेक संकटें त्यांजवर आली. त्यांच्या शिरावरील जबाबदारी फार मोठी होती; तथापि परमेश्वराच्या कार्यांत आपण त्याचे केवळ हस्तक आहोंत, अशी भावना त्यांच्या ठिकाणीं दृढ असल्यामुळेंच सर्व प्रसंगांस त्यांस धैर्यानें तोंड देतां आलें, असें ते स्वतःच म्हणत. परमेश्वराची कृपा आपणावर नसती, तर एवढी जबाबदारी आपल्या शिरावर आपणास कधींहि घेतां आली नसती, असें तें स्पष्ट बोलून दाखवीत. अशा प्रकारच्या शुद्ध मनोभूमिकेंत पेरलेल्या बीजांचा वृक्ष होऊन त्यास मनोहर फ़ळें यावींत यांत नवल नाहीं. यामुळेंच बिस्मार्क यांच्या गुणांबद्दल अत्यंत आदरभाव सर्वत्र दिसून येतो. परमेश्वराला ते भिऊन वागत असत यामुळेंच मनुष्यांच्या रागाची त्यांनीं परवा केली नाहीं. परमेश्वरावर त्यांचा

विश्वास अत्यंत दृढ असल्यामुळेंच ते स्वत: अत्यंत दृढनिश्चयी बनले. आपणास जें कांहीं न्याय्य आणि बरें वाटतें, तें करण्यास त्यांनीं कोणाचीहि भीति बाळगिली नाहीं अथवा कोणत्याहि कारणानें अंगीकृत कर्तव्यापासून ते परांङ्मुख झाले नाहींत. राजकारण हें बोलून चालून धरसोडीचें व असत्याचें साम्राज्य आहे, असा समज सर्वत्र पसरलेला आहे. हा समज बिस्मार्क यांनीं आपल्या सत्यपूर्ण व एकनिश्चयी वर्तणुकीनें खोटा करून दाखविला आहे. कोणत्याहि परिस्थितींत त्यांनीं धरसोड केली नाहीं, अथवा असत्याचा मार्गहि स्वीकारला नाहीं. अनेक बिकट परिस्थितींत त्यांनीं दाखविलेलें धैर्य आपणास चकित करून सोडतें. परमेश्वराच्या ठिकाणीं पूर्ण विश्वास असल्यामुळेंच अशा अनुपम धैर्याची प्राप्ती त्यांस झाली. बिस्मार्क हे उच्च पदावर आरूढ झाले होते. त्यांच्या हातीं सत्ता होती व ती सत्ता गाजविण्याचें सामर्थ्यहि त्यांच्या आंगीं होतें. मनुष्याला उद्दाम व गर्विष्ठ बनविण्यास ज्या गोष्टी कारणीभूत होतात, त्या सर्व त्यांच्या ठिकाणीं एकवटल्या होत्या; पण असें असतांहि सर्व लहान थोरांबरोबर त्यांची वागणुक नम्रपणाची व स्नेहबुद्धीची होती. याचें कारण हेंच कीं, धर्मतत्वांवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. ख्रिस्तानें सांगितलेलीं व आचरून दाखविलेलीं तत्वें त्यांच्या ठिकाणीं पूर्ण मुरलेलीं होतीं आणि धार्मिकपणाचें स्तोम जरी त्यांनीं माजविलें नाहीं, तरी त्यांच्या आंगचे धार्मिक सद्गुण त्यांच्या जवळच्या स्नेही मंडळीस ठाऊक झाले होते. याच गुणांच्या बळावर ते इतक्या उच्च पदवीस चढले व आपणासर्वांस आपल्या दानतीनें आदर्शभूत होऊन राहिले. आज त्यांचा नश्वरदेह येथें अचेतन पडला आहे, तरी ते येथें ज्याप्रमाणें कीर्तीनें अखंड राहिले आहेत, त्याप्रमाणें परलोकांतहि ते अक्षय्य झाले आहेत.

ज्या ठिकाणीं मत्सर त्यांना स्पर्शेहि करूं शकणार नाहीं आणि ज्या ठिकाणीं कोणत्याहि दुःखाचें वारें नाहीं, अशा ठिकाणीं ते गेले आहेत. हे उज्वल जीवात्म्या, तूं येथून गेला आहेस, तरी स्नेह रज्जूंनीं तुझें अंतःकरण आमच्या अंतःकरणाशीं बद्ध झालें आहे व हे रज्जू तोडण्याचें सामर्थ्य कोणासहि नाहीं."

आपण या आजारांतून आतां बरें होत नाहीं, ही गोष्ट बिस्मार्क यांस आधीं बरेच दिवस कळून चुकली होती. एप्रील महिन्यांत त्यांच्या घरीं कांहीं धार्मिक विधी झाला, तेव्हां ते म्हणाले, "आतां आमची तयारीच आहे. आतां खोगीर ठेवण्यास हरकत नाहीं." घोड्यावर बसण्याचा शौक त्यांस असल्यामुळें अशा प्रकारें लाक्षणिक अर्थानें त्यांनीं आपला मृत्यु सूचित केला होता.

धार्मिक विधी आटोपल्यानंतर बादशहांनीं पाद्र्याशीं हस्तांदोलन करून म्हटलें, "अशा प्रकारच्या दुःखद प्रसंगीं आपलें प्रथम दर्शन मला झालें, याचें मला वाईट वाटतें." पाद्र्याशीं हस्तांदोलन करून बादशहा बाहेर पडणार, तोंच बिस्मार्क यांचा पिनो नांवाचा हुजऱ्या त्यांच्या नजरेस पडला. हा हुजऱ्या त्यांच्या तैनातींत पंचवीस वर्षें होता. बिस्मार्क यांच्या आजारांत त्यानें त्यांची मनोभावें सेवा केली होती. आपल्या धन्यास तो क्षणभरहि विसंबत नसे. ही गोष्ट लक्षांत घेऊन बादशहांनीं त्याच्याशीं हस्तांदोलन करून त्याला सन्मान दिला.

भपका आणि बाह्य देखावा यांचा तिटकारा बिस्मार्क यांस मनापासून होता. आपला दफनविधि अगदीं साधेपणानें व्हावा, असें त्यांनीं आधींच सांगून ठेवलें होतें. त्यांच्या इच्छेप्रमाणें हा विधि कोणताहि भपका न होतां पार पडला. बिस्मार्क यांच्या प्रेताबरोबर फार मोठी यात्रा चालली होती. बादशहा जावयास निघाले, तेव्हां प्रो. श्वेनिंगर

त्यांस दिसले, तेव्हां त्यांच्याशींहि दोन गोड शब्द बोलून त्यांचा आदर त्यांनीं केला.

जर्मनीचे तेव्हांचे बादशाहीप्रधान प्रिन्स होहेनलो यांस बादशहांनीं पुढील लेख पाठवून तो त्यांजकडून सर्व साम्राज्यभर प्रसिद्ध करविला.

" आमच्या साम्राज्यांतील सर्व संस्थानिक आणि सर्व जर्मन प्रजाजन यांजवर ओढवलेल्या दुःख प्रसंगांत आम्हीहि भागीदार आहों. जर्मन साम्राज्याचे पहिले चान्सेलर प्रिन्स ऑटो फां बिस्मार्क, ड्यूक ऑफ लॉयनबर्ग यांच्या निधनानें सर्व प्रजाजनांप्रमाणें आम्हांसहि अत्यंत दुःख होत आहे. त्यांचें उज्वल कार्य आम्हीं आमच्या नजरेनें पाहिलें, त्यांची मुत्सद्देगिरी पाहून आम्हांस धन्यता वाटली आणि युद्धाच्या अथवा शांतीच्या प्रसंगीं जें निश्चयाचें वर्तन त्यांनीं केलें, तें पाहून आम्हांस साभिमान कौतुक वाटलें. या पितृभूमीचा हा एक सुपुत्र होता. तिची भक्ति त्यानें मनापासून केली व आपल्या बादशहाची व राजाची सेवाहि बिस्मार्क यांनीं प्रामाणिकपणें बजावली. जर्मन संस्थानांची एकी होऊन त्यांचें साम्राज्य बनावें व तें उच्च पदवीला चढावें असा परमेश्वराचा संकेत होता व या संकेतपूर्तीसाठीं बिस्मार्क यांची योजना त्यानें आपल्या हस्तकाच्या जागीं केली. आज हा हस्तक नाहींसा झालेला पाहून आम्हांस परमावधीचा खेद होत आहे. बिस्मार्क यांनीं जीं महत्कृत्यें केलीं त्यांचा पाढा अशा प्रसंगीं वाचणें उचित नाहीं. बादशहाची व साम्राज्याची सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन त्यांनीं जे मोठे विजय संपादन केले, ते अशा प्रसंगीं सांगणें उचित नाहीं. त्यांनीं जीं जीं कार्यें केलीं, तीं इतक्या उज्वल स्वरूपाचीं आहेत, कीं त्यांचें वर्णन लहानशा लेखांत करणें शक्यच नाहीं. हें काम यथोचित करणें इतिहासासच शक्य आहे व त्यांचें नांव उज्वल अक्षरांनीं लिहून इतिहास

आपलें कर्तव्य बजावील यांत शंका नाहीं. तथापि आम्हां सर्व जर्मनांस जें अत्यंत दुःख आज होत आहे, व बिस्मार्क यांजबद्दल कृतज्ञतायुक्त जो आदरभाव आम्हा सर्वांस आज वाटत आहे, तो सर्व राष्ट्राच्या वतीनें जगास कळविणें आमचें कर्तव्य आहे, असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणें या विशालबुद्धि प्रधानानें जें कांहीं मिळवून आमच्या हातीं दिलें आहे, त्याचें रक्षण करून तें वाढविण्याचा आमचा कृतनिश्चय सर्व राष्ट्रातर्फे जगाला आम्ही कळवितों. पहिले जर्मन बादशहा वुइलियम दी ग्रेट यांच्या सत्तेखालीं जें साम्राज्य बिस्मार्क यांनीं उभारिलें त्याचें रक्षण आमच्या रक्तानें व जीवितानें करण्याची शपथ आम्ही व सर्व जर्मन जनतेनें घेतली असल्याचें जगास जाहीर करतों. आपणा सर्वांचा धनी जो परमेश्वर त्याचा वरदहस्त आम्हावर असो.

"आमचें हें फर्मान सर्वजनतेस जाहीर करावें, असा हुकूम आम्ही आपणास कळवितों.

फ्रेड्रिकश्रू २ आगष्ट १८९८ वुइलियम, आय. आर."

तारीख १ आगष्ट रोजीं बादशहांनीं लष्कराला एक खास फर्मान काढलें होतें. तें असें—

"जनरल फील्ड मार्शल ऑटो प्रिन्स फां बिस्मार्क डयूक ऑफ लायन बर्ग यांच्या मृत्यूची बातमी फ्रेड्रिकश्रू येथून आली. ती ऐकून आम्हांस, आमचा सैन्यास व सर्व जर्मन देशास फार दुःख झालें. जर्मन सैन्याच्या हृदयांत प्रिन्स बिस्मार्क यांनीं अक्षय्य स्थान मिळविलें आहे. आपल्या दुर्दमनीय इच्छाशक्तीनें व वज्रबाहूनीं जर्मन सैन्याची कर्तबगारी वाढवून त्याला त्यांनीं नवें बळ प्राप्त करून दिलें. प्रिन्स बिस्मार्क हे निधड्या छातीचे योद्धे होते, ही गोष्ट सर्व रणांगणावर आणि सर्व प्रसंगीं त्यांनीं सिद्ध करून दाखविली. पितृभूमीच्या संरक्ष-

णार्थ आपली लष्करी तयारी जय्यत असली पाहिजे, या मताचा पुरस्कार प्रथमपासूनच त्यांनीं केला. आमच्या सैन्याचे ते खरे मित्र होते. अशा मित्राच्या निधनानिमित्त लष्करानें दुःख प्रदर्शक चिन्हें धारण करावीत हें उचित आहे.

कील. 'होहेन झोलर्न' बोटीवर
तारीख १ आगष्ट १८९८ } वुइलियम."

या फर्मानाच्या शेवटीं लष्कराच्या कोणत्या तुकडीनें किती दिवस व कशा प्रकारचीं दुःख चिन्हें धारण करावीत, या खुलाशाचा हुकूम बादशहांनीं दिला होता.

वुइलियम बादशहा व महाराणी यांच्या स्वाऱ्या शवगृहांतून बाहेर पडल्या, तोंच बाहेरच्या बाजूस बिस्मार्क यांची वृद्ध भगिनी तेथें उभी असल्याचें महाराणीच्या नजरेस पडलें. त्या बादशहाकडे वळून म्हणाल्या,

"वुइलियम, प्रिन्सची ही वृद्ध भगिनी तेथें उभी आहे."

हे शब्द ऐकतांच बादशहा वळले व तिच्याशीं थोडें भाषण करून त्यांनीं आपलें दुःख प्रदर्शित केलें. बिस्मार्क यांची भगिनी मालवीन, हिचें स्मरण वाचकांना असेलच. लहानपणीं या बहिणभांवडांत अप्रतिम प्रेम नांदत होतें. मालवीन व ऑटो यांची जोडी कधींहि फुटत नसे, हें पाहून लोक थट्टेनें असेंहि म्हणत कीं, जणूं काय या दोघांचें लग्नच लागणार आहे. याच बहिणीला बिस्मार्क यांनीं पुष्कळ पत्रें लिहिलीं होतीं. हीं पत्रें आतां प्रसिद्ध झालीं आहेत.

स्टेशनावर आल्यानंतर बादशहांनीं बिस्मार्क यांचे वडील चिरंजीव प्रिन्स हर्बर्ट यांचें चुंबन घेऊन त्यांस नमन केलें. बादशहांस पोहोंचविण्यासाठीं बिस्मार्ककुटुंबांतील सर्व मंडळी स्टेशनावर आली होती. लोकांचेहि मोठे थवे स्टेशनावर जमले होते. तथापि या प्रसंगीं स्तब्धता

इतकी पसरली होती कीं, सुई पडल्याचा आवाज सुद्धां ऐकूं आला असता.

बर्लिन येथें आल्यानंतर बादशहांनीं आपल्या खास चर्चमध्यें बिस्मार्क यांजकरतां तारीख ४ आगष्ट रोजीं एक प्रार्थना करविली. या प्रसंगींहि देवळाबाहेर हजारों लोक जमा झाले होते. देवळांत सर्व राजकन्या व राजपुत्र आपआपल्या परिवारासह आले होते. त्याचप्रमाणें दरबारचे मानकरीहि सर्व आले होते. वरच्या बाजूच्या सज्जांत गांवांतील लोक बसले होते.

थोड्या वेळानें लष्करी व आरमारी अधिकारी आपआपल्या हुद्याच्या लष्करी पोषाकांत येऊन दाखल झाले. या प्रसंगीं जर्मन सैन्यांतील व आरमारांतील सर्व पुढारी एकवटले होते. त्याच प्रमाणें पार्लमेंटाचे प्रतिनिधी, बाह्य देशाचे वकील, विश्वविद्यालयाचे प्रमुख व इतर पुष्कळ संस्थानांचे पुढारीहि तेथें या वेळीं जमले होते. जणूं काय जर्मनीचे सारें बुद्धिवैभव बिस्मार्क यांस शांती देण्या करतां परमेश्वराची आराधना करण्यास तेथें आलें होतें.

दहा वाजतां जर्मन संस्थानिकांच्या स्वाऱ्या एकामागून एक येऊन दाखल झाल्या व थोड्याच वेळानें देवळा बाहेर असलेल्या ब्यांड मधून मंदध्वानि ऐकूं येऊं लागला. तेव्हां बादशहा व महाराणी यांच्या स्वाऱ्या आल्या असें लोकांस समजलें. या प्रसंगीं बादशहांनीं गार्ड पलटणीचा पोशाक केला होता. बादशहा येऊन दाखल झाल्यानंतर प्रख्यात जर्मन तंतकार बीटोव्हन यानें रचलेलें एक गाणें ब्यांड मधून सुरू झालें. दरबारचा पाद्री फेबर यानें पुढील आशयाची प्रार्थना केली.

"हे विश्वपालक परमेश्वरा, ज्या मृत पुरुषाच्या द्वारें अनेक विस्काळित संस्थानांचें एक अभेद्य राष्ट्र बनलें, त्या मृताबद्दल दुःख प्रदर्शित

करण्या करतां तें राष्ट्र आज तुज समोर आलें आहे. आपल्या अत्यंत विख्यात पुत्राच्या निधनानें जर्मन पितृभूमि अत्यंत शोकाकुल झाली आहे. दहा वर्षीपूर्वी अशाच प्रकारचा शोकजनक घाला आमच्या शूर बादशहांच्या मरणानें आम्हांवर पडला. पहिल्या वुइल्यिम बादशहांच्या मृत्यूनें आमच्या हृदयास जो व्रण पडला, तो कधींहि बुजून जाणार नाहीं. आणि आतां त्या दुःखांतच या नव्या दुःखाची भर पडली आहे. वुइल्यिम बादशहांच्या मृत्यूनंतर नव्या बादशहांचेंहि दफन करण्याचा प्रसंग आम्हांवर लवकरच पडला. अशा रीतीनें गेल्या दहा वर्षांत हे तीन प्रसंग आम्हांवर गुदरले.

"हे परमेश्वरा, एकामागून एक असें प्रसंग पाहिले म्हणजे पूर्वी ज्या काळीं तुझा वरदहस्त आम्हावर होता व ज्या काळीं तुझ्या कृपा-अमृताचें भरपूर सिंचन आम्हावर करून तूं आमच्या पितृभूमीला मोठ्या भाग्याला चढविलेस, तो काळ नाहींसा होत आहे, असें वाटूं लागतें. पाहिले वृद्ध बाहशहा निजधामास गेले, व आतां त्यांची सेवा करावयास त्यांचे वृद्ध चान्सेलरहि त्यांच्या मागोमाग गेले, असें पाहिलें म्हणजे आमच्या भाग्याचे दिवस संपले कीं काय, अशी शंका मनांत येते; पण आशा ही बलवत्तर आहे. हे परमेश्वरा, आमच्या मध्यें अशा प्रकारचीं जगाला ललामभूत होणारीं नररत्नें जन्माला घालणें ज्या अर्थी तुला उचित वाटलें, त्या अर्थी आतां तूं आपली कृपा आम्हावरून कमी करणार नाहींस व भविष्यत् कालींहि आमच्या पितृभूमीला तूं अधिकाधिक भाग्याला चढविशील, अशी आशा आमच्या चित्तांत उद्भवते. आम्हा सर्वांस आज अत्यंत दुःख झालें आहे, ही गोष्ट खरी; तथापि तुझ्या कृपेबद्दल आमच्या अंतःकरणांत वसत असलेला कृतज्ञपणा त्याहूनहि मोठा आहे. अशा प्रकारचा धीरोदात्त व वज्रबाहू

नरसिंह तूं आमच्यामध्यें निर्माण केलास यामुळें उत्पन्न झालेल्या कृतज्ञतेंत आमच्या दु:खाला विरजण पडतें. एका महत्कार्याची योजना तूं केलीस व ती पार पाडण्याकरितां बिस्मार्क यांना जन्माला घालून व त्यांना हातीं धरून एका महाभाग राजाची भेट तूं करविलीस. हे धनी आणि सेवक तुझ्या इच्छेनें एक रूप झाले. अनेक प्रकारच्या संकटाच्या प्रसंगींहि त्यांचीं मनें दुभंग झालीं नाहींत. अनेक आपत्तींतहि त्यांनीं एकमेकांची पाठ सोडली नाहीं. मृत्यूनें दोघांस एकमेकांपासून भिन्न करीपर्यंत :युद्धप्रसंगांत आणि शांतीच्या वेळीं हे धनी आणि सेवक एकरूपच राहात. लहान लहान संस्थानिकांनीं मोठ्या विश्वासानें आपलीं अंत:करणें बादशहांच्या स्वाधीन केलीं आणि हा बिनमोल ठेवा बादशहांनीं संरक्षणार्थ बिस्मार्क यांच्या स्वाधीन केला. प्रजेनें राजाला देण्याजोगी अत्यंत महत्वाची अशी वस्तु एकच असते. ती वस्तु म्हणजे यावज्जीव राजनिष्ठा हीच होय. बिस्मार्क यांनीं हीच बिनमोल वस्तु बादशहांच्या चरणीं अर्पण केली होती. अशा रीतीनें परस्पर झालेल्या या विनिमयानें राजा व प्रजा यांचीं अंत:करणें एकरूप होऊन जावीत हा तुझाच संकेत होय. तुझ्या या अनुपम कृपेबद्दल अखिल जर्मन प्रजाजनांच्या जिव्हा यावच्चंद्रदिवाकरौ तुझीं स्तोत्रें गातील. त्यांचे गायक सदोदित तुझ्या नांवानें गायन करतील. आमचे महाराज वुइलियम यांना पूर्वकाळीं ज्या अनेक थोर पुरुषांनीं युद्धासारख्या बिकट प्रसंगीं पाठबळ दिलें व शांततेच्या प्रसंगीं बुद्धिबळ दिलें, ते पुरुष तुझ्या कृपेनें आम्हांत जन्म पावले, हे लक्षांत ठेवून आमचे कवी प्रत्यहीं तुझीं नवीं, नवीं स्तोत्रें रचतील. आम्हास नामशेष करावे म्हणून जे शत्रू विडा उचलून आम्हावर चालून आले, त्यांना योग्य शिक्षा देण्याकरतां तीव्रधारेची तरवार तूं स्वहस्तें आमच्या



दुसरे वुइलियम.



बादशाहा ३ रे फ्रेड्रिक.

राजाच्या हातीं दिलीस व अशा रीतीनें तुझ्या कृपेनें तूं आमचें रक्षण केलेंस. एवढेंच नव्हे, तर जर्मन साम्राज्याद्वारें नवराष्ट्रजीवन तूं आम्हास दिलेंस व त्याचें महत्व त्याच्या शत्रूंस कबूल करावयास लावलेंस.

"जर्मन प्रजाजनांच्या चित्तांत राष्ट्रभक्तीच्या वृक्षाला नवे कोम फुटले आणि तो वृक्ष पुन्हा नव्या जोमानें वाढूं पहात आहे. हें सारें बिस्मार्क यांच्याच कर्तबगारीचें फळ होय. अशा प्रकारचा लोकोत्तर पुरुष तूं आम्हांस दिलास, ही तुझी केवढी कृपा ! प्रिन्स बिस्मार्क यांच्या द्वारें नव्या पिढीपुढें तूं जो एक राजभक्तीचा व करारी इच्छा-शक्तीचा नमुना ठेवलास, त्याबद्दल अत्यंत भक्तियुक्त अंःतकरणानें आम्ही तुझे उपकार मानतों. बिस्मार्क यांचें देदीप्यमान उदाहरण जर्मन तरुणांनीं सदोदीत आपल्या नजरेपुढें ठेवावें म्हणजे त्यांच्या अंतःकर-णांतील विषाद समूळ नाहींसा होऊन तें वज्रप्राय बनेल. कोणी कसा-हि भित्रा असला, तरी बिस्मार्क यांच्या नामोच्चारानें त्याची भीति पळून जाईल, त्याला धैर्य चढेल व जे कोणी आधींच शूर असतील त्यांच्या हातून मोठमोठीं कार्यें सहज पार पडतील. संसारांत लोभनीय म्हणून जें जें कांहीं आहे, तें सारें बिस्मार्क यांस तूं दिलें होतेंस. त्यांचा मानमरातब तूं वाढविलास. त्यांनीं आंगीकारलेल्या सर्व कार्यांत तूं त्यांस यश दिलेंस. कुटुंबियांच्या आणि देशबांधवांच्या निष्काम प्रेमाची जोडहि तूं त्यांस दिलीस; पण या सर्वांहून अत्यंत श्रेष्ठ आणि सर्वांहून अत्यंत महत्वाची अशी जी एक वस्तु तूं त्यांस दिलीस, ती खिस्ताच्या ठिकाणीं विश्वास ही होय. अत्यंत पापी मनुष्यहि खिस्ताच्या कृपेनें उद्ध-रून जातो. मृत्यु हा चिरजीवी प्रवेशाचा दरवाजा होय, ही गोष्ट बिस्मार्क यांच्या चित्तांत सदोदीत वागत होती. सॅक्सन अरण्यांतील ओकवृक्षांच्या रायांमधून नंदनवनांतील चिरजीविक वृक्षांच्या सांव-

लींत तूं बिस्मार्क यांस नेऊन बसविलें आहेस, असा आमचा पूर्ण विश्वास आहे. तूं दयासागर असल्यामुळें आपल्या भक्तांना चिरकाल शांती देतोस, असा विश्वास आमच्या हृदयांत उत्पन्न होतो.

"हे सर्व शक्तिमान् परमेश्वरा, आमच्या बादशहास सर्व काळ बिस्मार्क यांज प्रमाणेंच विश्वासू आणि शहाणे सल्लागार मिळावेत व त्यांच्या हातून शांततारक्षणाचें कार्य व्हावें व आमच्या बादशांच्या पूर्वजांकडून कुलपरंपरेनें जो ठेवा आज त्यांच्या हातीं आला आहे, त्याची जोपासना त्यांज कडून व्हावी, अशी तुझी प्रार्थना आम्हीं आज केली, तर बिस्मार्क यांच्या अंतरात्म्यास संतोष होईल, असें आम्हांस वाटतें. त्याच प्रमाणें त्यांच्या प्रशियन जन्मभूमीच्या कल्याणाकरतां व भरभराटीकरतां आम्हीं तुझी प्रार्थना केली, तर तीहि त्या आत्म्याला आवडेल यांत शंका नाहीं. जर्मन साम्राज्याचा जो महावृक्ष बिस्मार्क यांनीं निर्माण केला, त्याचीं मुळें प्रशियाच्या भूमींतच अज्ञात वासांत राहिलीं होतीं. त्याचप्रमाणें बिस्मार्क यांच्या सामर्थ्याचें मूळ प्रशियन भूमतींतच रुजलें. याकरतां त्याभूमीच्या व एकंदरीनें सर्व जर्मन साम्राजाच्या कल्याणा करता आम्हीं तुझी प्रार्थनाकेली,तर बिस्मार्क यांच्या अंतरात्म्याची संमति आम्हांस खचित मिळेल असें वाटतें. हे परमेश्वरा, आमच्या पितृभूमींत जें कांहीं सत्य आणि न्याय्य असेल तें वाढीस लागावें, तें पुष्पभारानें मंडित व्हावें व शेवटीं फलभारानें नम्र व्हावें आणि जें सत्यरूप नसेल, त्याचें रूपांतर तुझ्या मर्जीप्रमाणें व्हावें,अशी आम्ही तुझी प्रार्थना करतों. तुझ्या मुखाच्या उज्वल किरणांचा वर्षाव आमच्या पितृभूमीवर सदैव होवो. आमचीं आपसांतील भांडणें विलयास नेऊन त्या ठिकाणीं बंधुभाव व परस्पर प्रेम उत्पन्न करणारे सत्पुरुष आम्हांमध्यें निर्माण होवोत. हे परमेश्वरा, आम्ही तुला भिऊन वागत असल्यामुळें जगांत इतर कशाचेंहि भय

बाळगण्याचें कारण आम्हास नाहीं, ही गोष्ट बिस्मार्क यांच्या साक्षीनें तुजसमोर आम्ही जाहीर करतों. त्याच प्रमाणें आमची दिवसेंदिवस सुधारणा होत जावी, व आमची जीवितयात्रा दिवसेंदिवस अधिक उदात्त होत जावी म्हणून सर्वतोपरि तुजवर भार टाकून मनःपूर्वक यत्न करण्याची शपथ आम्ही आज तुजसमोर घेतों."

पाद्र्याचें हें भाषण झाल्यानंतर भजन आणि प्रार्थना होऊन त्या दिवसाचा कार्यक्रम समाप्त झाला. अखेरीस बादशहांनीं लहानसें भाषण करून पाद्र्याचे आभार मानले. महाराणीबरोबर बादशहा बाहेर पडल्यानंतर बाकीची मंडळी त्यांच्या मागोमाग बाहेर गेली.

अशा रीतीनें बिस्मार्क यांस अखेरचा सन्मान देण्याकरतां बादशहांनीं केलेला समारंभ आटोपला.

---

प्रकरण एकोणचाळीसावें.

## जगाकडून अखेरचा सन्मान.

फ्रेड्रिकश्रूच्या आजुबाजूचें अरण्य पूर्वींप्रमाणें आजहि नव्या पालवीनें व नव्या फुलांच्या भारानें गजबजून गेलें होतें. पूर्वींचे जुनाट वृक्ष आजहि वाऱ्याच्या सोसाट्याबरोबर सळसळ करीत होते. शेत जमिनींत धान्याचे सोनेरी लोंगर पूर्वींप्रमाणेंच आजहि दिसत होते; तथापि या साऱ्या वनश्रींत आज केवढा फरक पडून गेला आहे! या सर्वांचा पुष्कळ वर्षांचा मालक आज अचेतन होऊन पडला आहे. आपल्या हयातींत आपल्या घरच्या शेतवाडीवरच नव्हे, तर बाह्य राष्ट्रावरहि ज्यानें आपली सत्ता गाजविली, तो पुरुष एका लहानशा लांकडी पेटींत चैतन्यगत होत्साता पडला असून त्याची सत्ता आणि त्याचें वजन हीं आतां लोकांच्या हातांत गेलीं आहेत. ज्या महाभाग पुरुषानें इत-

स्तत: विभागलेल्या संस्थानांच्या समूहास एकत्र करून त्यांना योग्य वळण दिलें व त्याचें नवरूपसंपन्न व बलवान् राष्ट्र निर्माण केलें; ज्याचें रहातें घर म्हणजे यात्रेचें ठिकाण, असें जर्मन लोकांस वाटत होतें आणि ज्याच्या दर्शनाकरतां जवळच्या व दूरच्या लोकांचा अप्रतिहत प्रवाह फ्रेड्रिकश्रूकडे लोटत होता; तो प्रतिभावान् पुरुष इहलोकची यात्रा संपवून परलोकास गेला आहे. दरवाजावरील सज्यांत उभे राहून आपल्या उज्वल शब्दांनीं हजारों लोकांचीं अंत:करणें भारून टाकणाऱ्या त्या मुखांतून आतां दुसरा शब्द ऐकूं यावयाचा नाहीं. अरण्यांत भटकत फिरून भेटेलल्या जंगली मनुष्याबरोबरहि चार गोड शब्द बोलणारें तें मुख आतां फिरून नजरेस पडावयाचें नाहीं. ज्याला आपल्या मनोभावना उदात्त रूपाच्या करावयाच्या असतील त्यानें सृष्टिदेवतेशीं सदोदीत सान्निध्य करावें असें बिस्मार्क म्हणत आणि याच हेतूनें तासांचे तास साक्सन अरण्यांत ते भटकत. त्या साक्सन अरण्याची सुंदर शोभा त्या डोळ्यांस पुन्हा दिसावयाची नाहीं.

आज बिस्मार्क यांचें रहातें घर उदासवाणें झालें आहे. पूर्वींच्या साऱ्या वस्तु जागच्याजागींच आहेत; परंतु त्यांचें चैतन्य गत झाल्यामुळें त्या मृतप्राय दिसत आहेत. बाहेर सूर्याचा उज्वल प्रकाश असतांहि त्या घरांत अमावास्येच्या मध्यरात्रीच्या काळोखाची भयाणता व उदासीनता हीं दिसत आहेत.

पण जुनें जावें आणि नवें यावें हा क्रम साऱ्या सृष्टींत अबाधित चालत असल्याचें दिसून येतें. या क्रमास अनुसरूनच हा प्रकार घडला. यांत सृष्टिबाह्य असें कांहीं नाहीं. फ्रेड्रिकश्रू येथील घराचा व आजूबाजूच्या साक्सन अरण्याचा जुना मालक आज गेला व त्या जागीं त्याचा वडील मुलगा प्रिन्स हर्बर्ट हा विराजमान झाला. बिस्मार्क

यांच्या कारकीर्दींत त्यांना हर्बर्ट यांची चांगली मदत होत असे. त्यांचें बरेंचसें कामकाज तो मोठ्या हुषारीनें उरकीत असे.

बिस्मार्क कुटुंबाचे स्नेही सोबती व आप्तेष्ट फ्रेड्रिकश्रू येथून लवकरच निघून गेले. त्यानंतर प्रिन्स हर्बर्ट हे दुखवट्याचीं पत्रें व पुष्पगुच्छ यांचा स्वीकार करण्याकरतां थोडे दिवस फ्रेड्रिकश्रू येथें सहकुटुंब राहिले होते. त्या अवधींत बिस्मार्क यांचें जें लहानसें स्मारक फेड्रिकश्रू येथें चाललें होतें, त्यावरहि त्यांनीं देखरेख केली. साक्सन अरण्यांतच एका कोंपऱ्याला ही स्मारकाची इमारत उभारण्यांत आली होती. ही जागा स्वतः बिस्मार्क यांनींच जिवंतपणीं पसंत करून ठेवली होती.

बिस्मार्क यांच्या शवावर घालण्याकरतां पुष्पमालांचे ढीगच्या ढीग येत होते. बादशहा व महाराणी यांजकडून पुष्पमाळा आल्याचें अगोदर सांगितलेंच आहे. बादशहांचे धाकटे बंधु प्रशियाचे प्रिन्स हेनरी हे यावेळीं चिनांत फ्युझन येथें होते. त्यांनीं दुःखप्रदर्शक तार पाठवून एक पुष्पमाळा घालण्याविषयीं हुकूम दिला होता. पुष्पमाळा व गुच्छ इतके आले कीं, त्यांस ठेवण्यास घरांतील जागा पुरेनाशी झाली. तेव्हां घराच्या पुढील विस्तीर्ण जागेंत ते मांडावे लागले. या पुष्पांच्या परिमळानें घराच्या आजूबाजूचें सर्व वातावरण दरवळून गेलें होतें. फ्रेड्रिक बादशहांच्या पत्नीनें म्हणजे सांप्रतच्या बादशहांच्या आईनें पाठविलेला हार सर्वांत शोभादायक व प्रचंड होता. प्रधान मंडळातर्फे साम्राज्याचे मुख्य चान्सेलर प्रिन्स होहेनलो यांनीं स्वहस्तें हार अर्पण केला. ज्या निरनिराळ्या आप्त स्नेह्यांनीं व देशभक्तांनीं हार पाठविले, त्यांचा नुसता नामनिर्देशहि करणें येथें शक्य नाहीं. पुष्पमालांबरोबर पुष्कळांनीं निरोपहि पाठविले होते व त्यावरून जर्मन राष्ट्राच्या चित्तांत

बिस्मार्क यांजबद्दल केवढा आदरभाव व केवढें प्रेम वसत होतें, हें दिसून येतें. याप्रसंगीं जर्मन पार्लमेंटानेंहि एकमतानें पुष्पहार पाठविला, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. साम्राज्याच्या पार्लमेंटाचें स्वप्न ज्यानें प्रत्यक्ष सृष्टींत आणलें, त्या जर्मन साम्राज्याच्या एका आद्य जनकास त्याच्या ऐशीव्या वाढदिवशीं याच पार्लमेंटानें त्यांस मान देण्याचें नाकारलें होतें, या गोष्टीची येथें आठवण होते. त्यावेळीं जर्मन पार्लमेंटावर सर्व जगाकडून अधिक्षेपाचा कसा वर्षाव झाला, हेंहि वाचकांच्या लक्षांत असेलच. त्यावेळच्या आपल्या पापाचें परिमार्जन करण्याकरतांच कीं, काय, पार्लमेंटांनीं यावेळीं बिस्मार्क यांचा बहुमान एकमतानें केला.

बाहेरून येणाऱ्या पुष्पगुच्छांच्या करंड्या घेऊन त्यांची योग्य व्यवस्था लावण्याच्या कामावर कित्येक माणसांची नेमणूक झाली होती.

याप्रसंगीं लीमा, ग्वाटीमाला, ब्यांककाक वगैरे ठिकाणच्या जर्मन रहिवाशांकडून पुष्पमाला आल्या होत्या. त्याचप्रमाणें अमेरिकेंतील संस्थानांतील बहुतेक मोठमोठ्या शहरांतून पुष्पगुच्छ व शोकसंदेश आले होते. यावरून बिस्मार्क यांजबद्दल साऱ्या जगांत किती सहानुभूति वसत होती, याचें अनुमान होतें.

---

प्रकरण चाळीसावें.

## राजघराण्यांचे शोकसंदेश.

वुइलियमशो—आपले वडील परलोकवासी झाल्याची बातमी बादशहांकडून मला आतांच समजली. आपणावर कोसळलेल्या महादुःखाबद्दल आमची पूर्ण सहानुकंपा आहे व आपल्या या दुःखांत प्रत्येक जर्मन प्रजाजन भागीदार आहे.

आगस्ट—व्हिक्टोरिया.

फ्रेड्रिकश्रू—आपल्या वडिलांच्या मृत्यूमुळें आपणास व आपल्या कुटुंबास झालेल्या दुःखप्रसंगीं मी आपली पूर्ण सहानुभूति व्यक्त करतें.

एंप्रेस फ्रेड्रिक.

फ्युझन—मला अत्यंत दुःख झालें आहे.

हेनरी.

पिल्निट्झ्—बिस्मार्क यांच्या मरणानें पितृभूमीचें जें नुकसान झालें आहे, तें कधींहि भरून येणार नाहीं. आपल्या दुःखांत मीहि भागीदार आहे. याप्रसंगीं मीहि एका खऱ्या मित्रास मुकलों असून त्यामुळें माझें स्वतःचें नुकसानहि झालें आहे.

अलबर्ट.

रोरशॉक—आपल्या वडिलांच्या मृत्यूमुळें मला अत्यंत दुःख होत आहे. हा माझा सहानुभूतीचा संदेश आपल्या सर्व कुटुंबियांस कळवावा, अशी मी आपली प्रार्थना करतों. याप्रसंगीं पितृभूमीचें फारच मोठें नुकसान झालें आहे, म्हणूनच केवळ नव्हे, तर माझा स्वतःचा एक उत्तम खाजगी मित्र गत झाला, याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे. बिस्मार्क यांच्या मृत्यूनें सारा जर्मन देश दुःखी झाला आहे.

वुइलियम—वरटेमबर्गचे राजे.

कार्लश्रू—आमचे महाराज ग्रँड ड्यूक यांची स्वारी बाहेरगांवीं असल्यामुळें त्यांच्या हुकुमावरून त्यांच्या तर्फे मी आपल्या वडिलांच्या मृत्यूमुळें आपणास झालेल्या दुःखाबद्दल सहानुभूती व्यक्त करतों.

फां ब्रोर—प्रधान.

रासतेड—आपल्या वडिलांच्या मृत्यूची बातमी ऐकून मला फार दुःख होत आहे. पितृभूमीच्या सर्व भागांतील लोक या दुःखांत

आपले भागीदार आहेत, या जाणिवेमुळें आपल्या दु:खास आळा पडेल, अशी मला आशा आहे.

पीटर.

वुइली ग्रॅंड—परमेश्वराच्या इच्छेनें पितृभूमीवर पडलेल्या या प्रसंगामुळें मला फार दु:ख होत आहे. जर्मनभूमीच्या प्रत्येक मित्राला आपला एक अत्यंत जवळचा आप्तच गेला असें वाटेल.

कार्ल आलेक्झांडर.

आल्टमबर्ग—जर्मनीचे पहिले चान्सेलर गत झाले, हें ऐकून फार दु:ख झालें. परमेश्वर आपलें सांतवन करो. बिस्मार्क यांची आठवण मी कधींहि विसरणार नाहीं.

प्रिन्स झू वाल्डेग.

बक्बर्ग—आपल्या वडिलांच्या मृत्यूची अवचित बातमी ऐकून फार दु:ख झालें. जर्मनीच्या या विख्यात मुत्सद्याबद्दल सर्व जर्मन राष्ट्राला अत्यंत दु:ख होत आहे. याप्रसंगीं परमेश्वरानें आपल्या सन्निध राहून आपलें सांतवन करावें अशी मी त्याची प्रार्थना करतों.

जार्ज प्रिन्स झू शामबर्ग.

डेटमोल्ड—साऱ्या जर्मन राष्ट्राच्या अभिमानाचा विषय आज नाहींसा झाला. बिस्मार्क यांच्या मृत्यूनें केवळ आपलीच हानी झाली आहे, असें नसून साऱ्या जर्मनीची हानी झाली आहे. आमच्या संस्थानांतील लोकांतर्फे मी आपलें दु:ख प्रदर्शित करतों.

अर्नेस्ट कौंट रीजंट झू लीप्.

ईस्कल—आपल्या वडिलांच्या मृत्यूची बातमी ऐकून माझी स्मृति पुन्हा ताजी होऊन त्यांच्या व माझ्या परिचयांतील अनेक गोष्टींची आठवण मला झाली. बिस्मार्क यांचा व माझा जो खाजगी स्नेहसंबंध

होता, त्यामुळें मला अतिशय दुःख वाटत आहे. विस्मार्क यांनीं मृत्यूच्या पूर्वी जीं महत्कार्यें पार पाडलीं, तीं चिरस्थायी रूपाचीं असल्यामुळें विस्मार्क हे देहानें गेले असले, तरी कीर्तीनें उरले आहेत, हें जाणून आपल्या दुःखास आपण आळा घालाल. याप्रसंगीं अतिशय दुःख होणें साहजिक आहे; पण बिस्मार्क कीर्तीनें चिरंजीव आहेत हें ध्यानांत घ्यावें.

फ्रांझ् जोसेफ.

ऑसफोर्न—आपल्या या महाहानीच्या प्रसंगीं आपल्याशीं माझी पूर्ण सहानुभूति आहे.

व्हिक्टोरिया. आर. आय.

काऊझ्—आपल्या सुप्रसिद्ध वडिलांच्या मृत्यूनिमित्त मला झालेलें दुःख मी व्यक्त करीत आहें. आपणाशीं माझी पूर्ण सहानुभूति आहे, असें आपल्या कुटुंबियांस कळविण्याची मेहेरबानी करावी.

अलबर्ट एडवर्ड.

मार्सस्ट्यांग—आपल्या या महाहानीमुळें मला फार दुःख होत आहे. आपल्या वडिलांसारख्या विभूति जगांत क्वचित्‌च जन्मास येतात. अशा विभूती जीं कृत्यें करतात त्यांची भरपायी सर्व लोकांना एकदिलानेंहि करतां येत नाहीं. माझ्याशीं जो स्नेहसंबंध त्यांनीं राखला होता, तो यावज्जीव माझ्या लक्षांत राहील.

आस्कर.

टयुरीन—प्रिन्स बिस्मार्क यांच्या मृत्यूबद्दल मला आणि महाराणीला फार दुःख होत आहे. प्रिन्स बिस्मार्क यांचें नांव यावच्चन्द्र दिवाकरौ कायम राहून त्यांच्या महत्कृत्याची उज्वल कीर्ति सर्वांच्या मनांत सदोदीत आदर उत्पन्न करील.

हंबर्ट.

कान्स्टांटीनोपल—आपल्या वडिलांच्या मृत्यूमुळें आपणास जें दुःख होत आहे, त्यांत मी भागीदार आहें.

अब्दुल हमीद.

लेस्को वाट्झ्—माझ्या स्वतःच्या आणि सर्व सर्वियाच्या लोकांतर्फे मी आपल्या दुःखाचा भागीदार आहे. बिस्मार्क यांच्या प्रमुखत्वाखालीं भरलेल्या बर्लिन कांग्रेसच्या वेळीं सर्वियाच्या राष्ट्रावर त्यांनीं जे उपकार केले, यामुळें त्यांचें नांव आमच्या राष्ट्राच्या इतिहासांत कायमचें नोंदलें गेलें आहे. बिस्मार्क यांनीं आम्हांस राष्ट्रीय स्वातंत्र्य देऊन संस्कृतीच्या मार्गास लागण्यास आम्हास संवड उत्पन्न करून दिली. या धीरोदात्त देशभक्ताची कीर्ति अखंड उज्वल राहो.

आलेक्झांडर, सर्वियाचे राजे.

अशारीतीनें अनेक संस्थानिकां कडून व राजेरजवाड्यांकडून सहानुभूतीचे व दुखवटयाचे संदेश आले. चीनचे बादशहा, सयामचे राजे वगैरे कडूनहि असेच संदेश आले होते. बिस्मार्क हे किती अलौकिक पुरुष होते, याबद्दल सर्वांची एकवाक्यता अशा रीतीनें निदर्शनास आली.

---

प्रकरण एकेचाळीसावें.

## एक महत्वाचा खलिता.

बिस्मार्क यांच्या मृत्यूनंतर एक अत्यंत महत्वाची गोष्ट अगदीं अकल्पीतपणें घडून आली. डॉक्तर मॉरिट्झ् बुश या नांवाचे बिस्मार्क यांचे एक चिटणिस होते. प्रधानपदाच्या आपल्या जाग्यावरून आपणास दूर करावे, म्हणून जो अर्ज बिस्मार्क यांनीं बादशहांना सादर केला होता, त्याची एक प्रत इ. स. १८९१ च्या मे महिन्यांत फ्रेड्रिकश्रू येथें या चिटणिसानें तयार केली होती. तो अर्ज बिस्मार्क यांच्या मृत्यूमागोमाग ताबडतोब प्रसिद्ध झाला. अर्थातच ही गोष्ट या वेळीं

लोकांच्या ध्यानींमनींहि नसल्यामुळें या अर्जानें सर्वत्र मोठी खळबळ उडाली यांत नवल नाहीं. आपल्या मृत्यूनंतर केव्हां तरी या अर्जांतील मजकूर लोकांच्या नजरेस यावा, अशी बिस्मार्क यांची इच्छा होती, हें खरें; पण अशा अवेळीं तो प्रसिद्ध व्हावा, हें मात्र त्यांच्या इच्छेच्या विरुद्ध झालें. बर्लिन येथील ज्या लोकलअंझीगर पत्रांत हा अर्ज प्रसिद्ध झाला, त्यावर बहुतेक सार्‍या पत्रांनीं त्याच्या तारतम्यशून्यतेबद्दल खूप तोंडसुख घेतलें होतें; पण अशा प्रकारचा महत्वाचा खलिता हातीं आल्यावर ती प्रसिद्ध न करण्या इतका धीर कोणत्या पत्रास असणार ? या वेळीं ही गोष्ट झाली, हें योग्य कीं अयोग्य झालें, हा प्रश्न आतां फारसा महत्वाचा नाहीं. हा खलिता बहुतांशीं सार्वजनिक हितसंबंधाचा असल्यामुळें तो जशाच्या तसाच खालीं दिला आहे.

**बर्लिन,** मार्च ता. १८ सन. १८९०

" या महिन्याच्या पंधराच्या तारखेस माझा कामाचा रिपोर्ट खुदावंताच्या सेवेस मीं सादर केला. त्यावेळीं प्रधानमंडळाचा अध्यक्ष व इतर प्रधान यांजमधील परस्पर संबंध इ. स. १८५२ च्या सपटंबर महिन्यांत कसे नियमित केले होते, याचा लेखी खुलासा करण्याबद्दल मला हुजूरची आज्ञा झाली होती. या बाबतींत हुजूरच्या माहितीसाठीं पुढील स्पष्टीकरण खुदावंताच्या सेवेस मी सादर करीत आहें.

" ज्यावेळीं राज्यकारभाराची सर्व सत्ता गादीच्या हातीं एकवटली होती, त्यावेळीं प्रधानमंडळ अथवा प्रधानमंडळाचा अध्यक्ष, अशा प्रकारची अनुशासनाची रचना अस्तित्वांत असण्याचें कारणच नव्हतें. यानंतर इ. स. १८४७ सालीं संयुक्त पार्लमेंटाची बैठक झाली, त्यावेळीं लिबरलपक्षाच्या प्रतिनिधींनीं अशाप्रकारची नवी रचना असणें युक्त आहे, ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणली. निरनिराळे प्रधान आपा-

पर्लीं कार्यें करीत असतां त्यांत एकसूत्रता असावी, याकरतां त्या सर्वांवर मुख्य असा एक प्रिमीयर ( पेशवा ) नेमावा अशी सूचना या प्रतिनिधींनीं पुढें आणली होती. इ. स. १८४८ सालीं राज्यशासनाच्या पद्धतीस सनदशीरपणाचें रूप दिलें गेलें, त्यावेळीं कौंट आर्निम, क्यांप हॉसन, कौंट ब्रांडनबर्ग, बॉरन फां म्यांटुफेल, प्रिन्स फां होहेन झोलर्न इत्यादि गृहस्थांची नेमणूक या पेशवेपदावर झाली होती. राज्यशासनाची कोणती तरी एकच विशिष्ट शाखा या गृहस्थांच्या हातांत होती, असें नसून सर्व प्रधानमंडळाच्या एकंदर व्यवहाराबद्दल ते जबाबदार होते. यामुळें पेशवा अथवा मुख्य प्रधान म्हणजे सर्व शाखांवर एकसूत्री हुकमत चालविणारा अधिकारी असा अर्थ आपोआपच उत्पन्न झाला. वरील गृहस्थांपैकीं बहुधा कोणाच्याहि हातांत राज्यकारभाराची कोणतीहि स्वतंत्र शाखा नव्हती आणि अध्यक्ष या नात्यानें सर्व प्रधानमंडळाचें कार्य पहावयाचें, इतकेंच काम त्याला असे. माझ्यापूर्वीं प्रिन्स होहेन झोलर्न, फां ऑर्सवाल्ड आणि प्रिन्स होहेनलो, या तिन्हीहि प्रधानमंडळाच्या अध्यक्षाकडे कोणतीहि स्वतंत्र शाखा नव्हती; तथापि सर्व प्रधानमंडळांत एकसूत्रीपणा व राज्यकारभारांत तालबद्धता राखणें व तसेंच गादी आणि प्रधानमंडळ यांचे पूर्वापर संबंध कायम ठेवणें, हीं कामें त्यांस करावयाचीं असत. प्रधानमंडळांतील कोणाहि विशिष्ट व्यक्तीनें कोणतेंहि धोरण स्वीकारलें असलें, तरी त्याची जबाबदारी अध्यक्षाच्या शिरावर असे. असें न झालें, तर सनदशीर पद्धतीनें राज्यकारभार चालविणें शक्य नाहीं, हें उघड आहे. प्रधानमंडळांतील निरनिराळ्या व्यक्ति व त्यांचा अध्यक्ष यांतील परस्पर संबंध नव्या सनदेप्रमाणें निश्चित करण्याची जरूर भासूं लागली, तेव्हां प्रधानमंडळाच्या सल्लामसलतीनें तारीख ८ सपटंबर सन १८५२ रोजीं हे

संबंध निश्चित करणारा खलिता प्रसिद्ध झाला. महाराजांचा हा हुकूम त्या तारखेपासून आज तागाइत अमलांत आहे. या खलित्याप्रमाणें प्रधानमंडळाच्या समवायी धोरणाबद्दल सारी जबाबदारी अध्यक्षाला दिली गेली आहे व ही जबाबदारी या हुकुमाप्रमाणेंच त्यानें आपल्या हातीं घेतली असून या बाबींत लोकमताचा पाठिंबाहि त्याला आहे. प्रधानमंडळांतील कोणाहि व्यक्तीला अध्यक्षाचें मत न घेतां केवळ आपल्याच जबाबदारीवर अखेरचे पक्के हुकूम करण्याची सत्ता मिळाली, तर राज्यधोरणांत एकसूत्रीपणा राहणें अशक्य आहे आणि असा एकसूत्रीपणा राहिला नाहीं, तर राज्यकारभाराची जबाबदारी एकाच व्यक्तीच्या शिरावर टाकतां येणें शक्य नाहीं. अशा स्थितींत कोणताहि प्रधान आणि विशेषेंकरून प्रधानमंडळाचा अध्यक्ष, ही एकसूत्रीपणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊं शकणार नाहीं. पूर्वी सर्व सत्ता जेव्हां एकट्या गादीच्याच हातीं असे, त्यावेळीं राज्यकारभाराची जबाबदारीहि गादीकडेच असून प्रधान मंडळीवर कोणतीच जबाबदारी नसे. अशा स्थितींत वर सांगितलेल्या हुकुमाचेंहि कांहीं कारण नव्हतें, हें उघड आहे. आणि आतांहि राज्यकारभाराची जबाबदारी प्रधान मंडळावर ठेवावयाची नसेल, तर हा हुकूम रद्द करण्यास हरकत नाहीं; पण सनदशीर पद्धति ज्या अर्थी चालू दिवसापर्यंत अस्तित्वांत आहे, त्याअर्थीं प्रधानमंडळाचीं सर्व सूत्रें इ. स. १८५२ च्या हुकुमाप्रमाणें अध्यक्षाच्या हातीं एकवटलेलीं असावीं, हें न्याय्य आणि युक्त आहे, एवढेंच नव्हे तर अवश्यहि आहे. प्रधानमंडळाची कालरोजीं बैठक झाली, तेव्हां या बाबींत सर्वांनीं याप्रमाणेंच आपलें मत दिलें आहे. माझ्या पाठीमागून येणाऱ्या कोणाहि अध्यक्षांच्या हातांत इ. स. १८५२ च्या हुकुमानें दिलेली सत्ता नसेल

तर राज्यकारभाराची जबाबदारीहि घेणें त्याला शक्य नाहीं, या मुद्या-वरहि काल आम्हा सर्वांची एकवाक्यता झाली आहे. हा हुकूम अमलांत राहण्याची आवश्यकता मला स्वतःला जितकी भासली, त्याहून माझ्या पाठीमागून येणारास ती कदाचित अधिकच भासण्याचा संभव आहे. कारण बादशहा पहिले वुइल्यिम व बादशहा फ्रेड्रिक यांनीं जो पूर्ण विश्वास मजवर टाकला होता, तो विश्वास भावी प्रधानावर गादी कडून टाकण्यांत येईलच असा भरंवसा नाहीं.

"प्रधानमंडळांतील गृहस्थांबरोबर काम करीत असतां इ.स.१८५२ च्या या हुकुमाचा उपयोग करण्याची आवश्यकता आजपर्यंत मला केव्हांहि भासली नाहीं. अशा प्रकारचा हुकूम अस्तित्वांत आहे, ही जाणीव व त्याप्रमाणें बादशहा वुइल्यिम व बादशहा फ्रेड्रिक यांचा पूर्ण विश्वास मजवर आहे, हें सर्वांस ठाऊक असल्यामुळें माझ्या अधिकाराचा अतिक्रम करण्याचा यत्न प्रधानमंडळापैकीं कोणीहि केला नाहीं. येथ पर्यंत जीं कारणें मीं सांगितलीं, त्यावरून खुदावंतांचा नवा हुकूम अमलांत आणणें मला कसें अशक्य आहे, हें हुजूरच्या ध्यानीं येईल. हा नवा हुकूम मीं जारी केला, तर इ. स. १८५२ चा वुइल्यिम बादशहांचा हुकूम मींच रद्द केल्यासारखें होईल. नव्या हुकुमा-वर सही करून व जुना हुकूम रद्द करून प्रधानमंडळाची जबाब-दारी शिरावर कायम ठेवणें अशक्य आहे. जनरल फॉ हॅंके व प्रधान ल्युक्यानस यांच्याशीं माझें जें भाषण झालें, त्यावरून इ. स. १८५२ चा हुकूम रद्द करून मुख्य प्रधानपदावर राहणें मला कसें अशक्य आहे, ही गोष्ट खाविंदांच्याहि ध्यानीं आली असावी, असा माझा समज झाला आहे. अशा स्थितींतहि नवा हुकूम कायम ठेवण्याची इच्छा खाविंदांनीं दर्शविली आहे. खाविंदांच्या या कृतीमुळें राजीनामा देणें

मला भाग पडलें, तर तोहि स्वीकारण्याची आपली तयारी असल्याचें खाविंदानीं दर्शविलें आहे. गादीच्या सेवेंत यापुढें मीं रहावें कीं काय, याबद्दल खुद्द हुजुरापाशीं एके वेळीं चर्चा झाली, तेव्हां प्रशियन सरकाराची सेवा वजा करून साम्राज्यसेवेंत मीं रहावें, असा बादशहांचा मनोदय असावा, अशी माझी समजूत झाली. या प्रश्नासंबंधीं अधिक खोल दृष्टीनें विचार करतां मला असें दिसून आलें कीं, माझ्या अधिकाराची विभागणी अशारीतीनें झाली असतां पार्लमेंटांतील माझ्या योग्य अधिकारास उणेंपणा येईल आणि ही गोष्ट मी हुजूरच्या चरणीं निवेदन केली होती. प्रशियाचा प्रधान व साम्राज्याचा मुख्य चान्सेलर या संयुक्त अधिकारांत विभाग झाला, तर त्यापासून जे बरेचसे वाईट परिणाम होणार आहेत, त्याबद्दल येथें अधिक लिहिण्याचें कारण मला नाहीं. कारण यासंबंधीं माझें मत हुजूरच्या भेटीच्या वेळीं मीं प्रत्यक्ष प्रदर्शित केलें आहे. इ. स. १८५२ चा हुकूम रद्द करण्याचा हुजूरचा इरादा ज्या अर्थीं अद्यापीहि पक्का कायम आहे, त्या अर्थीं प्रधानपदाच्या अध्यक्षपदावर राहणें, मला कसें शक्य नाहीं, हें येथवर मीं दर्शविलेंच आहे. या महिन्याच्या पंधराव्या तारखेस मीं आपल्या कामाचा रिपोर्ट हुजूरच्या चरणीं सादर केला, तेव्हां राज्यकारभारांतल्या माझ्या हक्कांस आळा घालण्याची इच्छा हुजूरनीं दर्शविली. माझ्या अधिकारास अशारीतीनें मर्यादा उत्पन्न झाली, तर राज्याचा कारभार सुरळीत चालविण्याच्या मार्गांत मोठाच अडथळा उत्पन्न होऊन त्यावर योग्य देखरेख ठेवणें मला अशक्य होईल. याशिवाय मुख्य चान्सेलर आणि पार्लमेंट यांमधील जे संबंध आजपर्यंत निश्चित झाले आहेत, त्यांतहि व्यत्यय येईल. साम्राज्याच्या चान्सेलराच्या शिरावर सनदशीर पद्धतीमुळें जी जबाबदारी उत्पन्न झाली आहे, ती

योग्य रीतीनें पार पडण्याकरितां मी वर नमूद केलेले सर्व हक्क त्याला असणें इष्ट आहे.

"आतां साम्राज्यांतील अंतर्गत धोरण व साम्राज्याचे परराष्ट्रांशीं येणारे संबंध हीं दोन धोरणें विभक्त करून खाविंदांच्या नव्या हुकुमाप्रमाणें मुख्य प्रधानानें काम करावयाचें म्हटलें, तरी ती गोष्टहि अशक्य आहे. प्रशियाचें धोरण वेगळें आणि साम्राज्याचें धोरण वेगळें. प्रशियाच्या धोरणांत बव्हेरियाच्या किंवा साक्सनीच्या प्रधानाला जसा हात घालवत नाहीं, त्याच प्रमाणें साम्राज्य प्रधानालाहि प्रशियाच्या धोरणांत हात घालतां येऊं नये, असें खाविंदांचें मत आहे. प्रशियाच्या लोकनियुक्त सभा व साम्राज्याचें पार्लमेंट यांच्या मतांच्या धोरणानें मुख्य प्रधानाला सर्व कार्य करून एकसूत्रीपणा राखला पाहिजे. अशा स्थितींत खाविंदांच्या मतांचा अनुवाद करून ही गोष्ट करणें शक्य नाहीं. खाविंदांपूर्वीं होऊन गेलेल्या दोन बादशहांच्या कारकीर्दींत परराष्ट्रांशीं व विशेषतः रशियाशीं जे संबंध मला निश्चित करता आले, ते अशा या नव्या पद्धतीनें भंग पावण्याची भीति मला वाटत आहे. या संबंधांत पूर्वीं जें यश मीं मिळविलें, तें किती महत्वाचें आहे, व साम्राज्याच्या हिताशीं त्याचा किती संबंध आहे, हें तिऱ्हाइतांच्याहि लक्षांत आलें आहे. गादीची नौकरी ज्या भक्तीनें आज पर्यंत मीं वजावली व ज्या परिस्थितींत ही नौकरी वजावण्याची संवय मला झाली, तींत एकदम बदल व्हावा, ही गोष्ट मला अत्यंत कष्टदायक वाटते. अशा स्थितींत खाविंदाचा उद्देश लक्षांत घेतां मी सेवेंत कायम राहिलों, तर पूर्वींचें सर्व धोरण वदलणें मला भाग पडेल, असें मला दिसतें. अशा स्थितींत साम्राज्याचा च्यान्सेलर, प्रधानमंडळाचा अध्यक्ष व प्रशियाचा परराष्ट्रीय प्रधान या तीन जागांच्या कामाचा बोजा माझ्या

शिरावरून दूर करण्याची कृपा खाविंदांनीं करावी व मला कायदेशीर रीतीनें मिळणारा तनखा मिळण्याचा हुकूम व्हावा, अशी हुजुरापाशीं माझी सविनय विनंति आहे. गेल्या थोड्याशा दिवसांत जी कांहीं माहिती मला मिळाली व काल रोजीं हुजूरच्या तैनातींतील कारभाऱ्याशीं माझें जें भाषण झालें, त्यावरून मीं राजीनामा दिला असता, ती गोष्ट खाविंदांच्या मर्जीविरुद्ध होईल, असें मला वाटत नाहीं व हा माझा राजिनामा खाविंद तात्काळ कबूल करतील अशी माझी खात्री आहे. आपल्या परमपूज्य वडिलांच्या इमानी नौकराच्या बुद्धीचा व अनुभवाचा उपयोग करून घ्यावा, अशी खाविंदांची मर्जी असल्याचा माझा समज होता. असा माझा समज झाला नसता, तर मला नोकरींतून वजा करण्याची विनंति यापूर्वींच मीं केली असती. आतां माझ्या नौकरीची गरज आपणांस उरली नाहीं, अशी माझी खात्री झाल्यामुळें साऱ्या राजकीय भानगडी मीं अंगाबाहेर टाकल्या, तर माझें हें कृत्य अवेळीं झालें, असें लोक म्हणणार नाहींत, अशी माझी खात्री आहे."

फां बिस्मार्क.

हा लेख प्रसिद्ध झाल्याबरोबर सर्व जगभर मोठी खळबळ उडून गेली. बिस्मार्क यांच्या राजिनाम्याच्या वेळीं किती भानगडी उपस्थित झाल्या होत्या, हें वाचकांच्या लक्षांत असेलच. आतां हा लेख वाचल्यानंतर बिस्मार्क यांच्या राजिनाम्याचीं कारणें पूर्णपणें लक्षांत आल्यांवाचून राहणार नाहींत.

बिस्मार्क यांच्या मृत्यूनें केवळ जर्मन राष्ट्रासच नव्हे, अथवा इतर राष्ट्रांतील जर्मन प्रजाजनांसच नव्हे, तर सर्व जगासच फार दुःख झालें. बिस्मार्क यांच्या आयुष्यक्रमांत त्यांस शत्रूहि पुष्कळ झाले. ते जिवंत असतां त्यांजवर निंदेचा वर्षावहि पुष्कळ झाला; पण त्यांच्या मृत्यू-

नंतर निंदेचा एक शब्दहि कोठें बाहेर पडला नाहीं. यावेळीं बिस्मार्क यांची निंदा केल्यास जगांत तोंड काढण्यास आपणास जागा उरणार नाहीं, असें त्यांच्या शत्रूंस वाटलें कीं काय कोण जाणे. बिस्मार्क जिवंत असतां त्यांच्या शत्रूनीं त्यांच्याशीं कितीहि वादविवाद केले असले अथवा त्यांच्या आणि बिस्मार्क यांच्या मतांत जमीन अस्मानाचें अंतर असलें, तरी आतां तें सर्व नाहींसें होऊन त्या शत्रूनींहि बिस्मार्क यांची स्तुतीच केली.

बिस्मार्क यांनीं जर्मन लोकांचीं अंतःकरणें आपणाकडे किती ओढून घेतलीं होतीं, याची साक्ष त्यांच्या मृत्यूनें सर्व जगास चांगलीच पटविली. जर्मनीशीं मित्रभाव संपादणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला केवढें मोठें पाठबळ मिळण्याचा संभव आहे, व त्याच्याशीं शत्रुत्व संपादणाऱ्या राष्ट्राला जर्मनीपासून केवढी भीती आहे; याची जाणीव बिस्मार्क यांनीं सर्व जगाला उत्पन्न करून दिली. बिस्मार्क यांच्या साऱ्या आयुष्यक्रमांतील इतिकर्तव्यतेचें रहस्य हेंच होय. बिस्मार्क यांचें कार्य चिरंजीव राहाणारें आहे, या गोष्टीचीहि खात्री ह्यावरूनच होते.

ज्या पुण्य पुरुषानें परस्परांशीं भांडून दुर्बळ झालेल्या बारीक सारीक संस्थानांतून प्रबळ साम्राज्य उत्पन्न केलें व साम्राज्यास त्यानें अमित सामर्थ्य उत्पन्न करून दिलें, त्या महाभागाला अखेरचा नमस्कार असो. स्वदेशसेवेला वाहून घेणारीं नररत्नें ज्याज्या देशांत उत्पन्न होतील, त्या त्या देशांना बिस्मार्क यांचें जिवंत उदाहरण सर्वकाळ प्रोत्साहन देत राहील. आपली सर्व बुद्धिमत्ता, आपलें सारें शौर्य, आपली चिकाटी, आपलें कर्तृत्व आणि आपली नेकी; हे सारे गुण ईश्वराच्या चरणीं अर्पण करून त्यांचा उपयोग त्यांनीं स्वदेशसेवेकडेच केला. स्वदेशाच्या उद्धारार्थ जेथें जेथें म्हणून प्रयत्न होत असतील,तेथें तेथें बिस्मार्क

यांची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं. भावी इतिहासकार बिस्मार्क यांचें चरित्र आनंदानें गाइल्यावांचून राहणार नाहींत.

---

प्रकरण बेचाळीसावें.

## सिंहावलोकन.

जर्मनीला मोठ्या राष्ट्रांच्या मालिकेंत महत्वाचें स्थान मिळवून देण्यासाठीं बिस्मार्क यांनीं काय काय गोष्टी केल्या, याची जंत्री तयार करण्याचें काम मोठेंसें कठिण आहे असें नाहीं. इतिहासाचा मननपूर्वक अभ्यास करणाऱ्या कोणाहि वाचकास थोड्या दिवसांच्या अवधींत हें काम सहज करतां येण्यासारखें आहे; पण बिस्मार्क यांच्या खऱ्या कार्याचें अथवा त्यांच्या व्यक्तिविशेषाचें महत्व इतक्या सहज रीतीनें ध्यानांत येण्यासारखें नाहीं. जर्मन राष्ट्रपुरुषाच्या ठिकाणीं राष्ट्रीय भावना उत्पन्न करण्याच्या कार्यांत बिस्मार्क यांचें कर्तृत्व किती खर्ची पडलें, हें मोजमापानें ठरवितां येणें शक्य नाहीं. या भावनांची बिस्मार्क यांनीं करून दिलेली जागृति अद्यापि जर्मन राष्ट्रांत आपलें कार्य करीत आहे. अनेक ठिकाणीं विभागलेल्या जर्मन प्रजाजनांच्या ठिकाणीं देशाभिमानाची खरी जोत पेटावी म्हणून बिस्मार्क यांनीं आजन्म परिश्रम केले आणि राष्ट्रालाहि बिस्मार्क यांच्या या कर्तबगारीचें रहस्य पटलें असल्यामुळें साऱ्या राष्ट्राचें ते प्रेमविषय होऊन बसले. सुप्रसिद्ध पहिल्या नेपोलियननें सगळ्या युरोपच्या पायांत दास्यशृंखला अडकविण्याचा यत्न केला होता. तो त्याचा यत्न हाणून पाडण्याच्या कार्यांत प्रशियानें अत्यंत चिकटीनें पुढाकार घेतला होता. पुढें नेपोलियनच्या अवतारसमाप्तीनंतर जर्मनराष्ट्रांत यादवी सुरू होती. बाहेरचा दाब होता, तोंपर्यंत हे अंतर्गत कलह राखेखालीं असलेल्या निखाऱ्याप्रमाणें

कांहीं काळ गुप्त राहिले होते; पण हा दाब निघून जातांच त्यांच्या ज्वाळा चोहोंकडे उठूं लागल्या. आजूबाजूला शत्रूचें कडें आणि घरांत कलह अशा स्थितींत जर्मनीला राष्ट्र म्हणून जगावयाचें असेल, तर ती गोष्ट स्वप्रयत्नानेंच त्यानें सिद्धीस नेली पाहिजे, हें बिस्मार्क यांच्या लक्षांत आरंभीं येऊन चुकलें होतें. सर्व जर्मन संस्थानांत राष्ट्रैक्याची भावना आणि राष्ट्राभिमान यांची प्रखर ज्योत न पेटली, तर जर्मनीची पुढें धडगत नाहीं, हें त्यांस कळून चुकलें होतें. आकुंचित संस्थानाभिमान मावळून त्याच्या ज्यागीं विस्तृत राष्ट्राभिमान उत्पन्न करण्याचें कार्य त्यांस करावयाचें होतें. नेपोलियनचीं युद्धें संपल्यानंतर जर्मनींत माजलेल्या या आकुंचित अभिमानामुळें बिस्मार्क यांचें कार्य किती दुष्कर झालें होतें, हें पूर्वींच्या हकीकतीवरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

बिस्मार्क यांच्या मतांत कांही धरबंध नसून त्यांचीं मतें वारंवार पालटत असतात, असा आरोप त्यांच्या शत्रूंनीं त्यांजवर अनेक वार केला आहे. आपली अलोट महत्वाकांक्षा तृप्त करण्याकरतां बिस्मार्क वारा फिरेल तशी पाठ फिरवितात, असें त्यांच्या शत्रूंनीं अनेक वार म्हटलें आहे. बिस्मार्क हे विद्यार्थीदशेंत असतां त्यांचा कल लोकसत्ताक पद्धतीकडे झुकला होता, हें खरें आणि त्यावेळीं त्यांचे जिवश्चकंठश्च स्नेही कांहीं अमेरिकन लोक होते, हेंहि खरें; तथापि त्यांचा देशाभिमान अथवा आपल्या देशाचें कल्याण करण्याची त्यांची इच्छा यांत कोणत्याहि प्रकारची उणीव असलेली दिसत नाहीं. राष्ट्राचें कल्याण हा त्यांचा प्रमुख हेतु होता. लोकसत्ताक पद्धतीनें तें साधेल, असें त्यांस प्रथम वाटत होतें; पण तक्तावरील घराण्याशीं प्रशिया देशाचे संबंध अत्यंत पक्कया रीतीनें बांधले गेले आहेत व प्रशियाच्या तक्तनशीन

पुरुषांच्या मदतीवांचून प्रशियाचें कल्याण साधणें शक्य नाहीं, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली, तेव्हां लोकसत्तेच्या ऐवजीं राजभक्ति त्यांच्या चित्तांत बाणली यांत नवल नाहीं. राजघराण्याचा पाठिंबा असल्याशिवाय जर्मनीचें ऐक्य साधणार नाहीं, हें त्यांचें मत किती खरें होतें, हें प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींनीं पुढें सिद्ध केलेंच. आपल्या आंगीं असेल नसेल तें सामर्थ्य देशसेवेला लागलें पाहिजे, इतकीच महत्वाकांक्षा बिस्मार्क यांस होती आणि त्यांच्या या देशाभिमानाची जाणीव जर्मन जनतेस पूर्ण झालेली असल्यामुळेंच ते तिला इतके पूज्य होऊन बसले होते. त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें म्हणून जर्मन लोकांस ते पूज्य वाटतात, असें नाहीं, तर त्यांची सारी बुद्धिमत्ता देशकार्यार्थ खर्ची पडली म्हणून ते पूज्य झाले. केवळ स्वतःचें स्तोम माजवावें, एवढीच बिस्मार्क यांची इच्छा असती, तर अभूतपूर्व विजयांच्या वेळींहि त्यांनीं जो नेमस्तपणा दाखविला, तो कधींहि दृष्टीस पडला नसता. आस्ट्रिया बरोबर झालेल्या युद्धांत आस्ट्रियन सैन्य नामशेष झालें असतांहि राजधानीकडे त्यांनीं चाल केली नाहीं अथवा आस्ट्रियाकडून जबर अटींहि कबूल करविल्या नाहींत. आस्ट्रियाशीं कायमची मैत्री राहण्यांतच जर्मनीचें कल्याण आहे, ही गोष्ट ध्यानांत धरून अशा आणीबाणीच्या प्रसंगींहि आस्ट्रियाशीं त्यांनीं उदारपणाची वागणूक ठेवली. केवळ स्वतःचेंच स्तोम त्यांस माजवावयाचें असतें, तर व्हिएन्ना राजधानींत आपल्या विजयी झेंड्याबरोबर मिरविणें त्यांस अशक्य नव्हतें.

" बिस्मार्क हे पूर्ण राजभक्त होते. त्याचप्रमाणें परमेश्वराच्या ठिकाणींहि त्यांची पूर्ण आस्तिक्य बुद्धि होती. ना विष्णु पृथिवीपतिः या न्यायानें राजघराण्यावर पूज्य बुद्धीनें ते भक्ति करीत. आपल्या एका भाषणांत ते म्हणतात,–

"मी ह्राडांचा अस्सल ख्रिस्ती नसतों, तर राजाच्या नौकरींत एक घटकाभरहि राहिलों नसतों. परमेश्वरावर विश्वास ठेवून त्याची आज्ञा मीं मान्य केली असती, तर इह लोकच्या राजाबद्दल माझ्या मनांत फारशी पूज्य बुद्धि राहिली नसती. पोटापुरतें साधन मजपाशीं अगोदरच आहे आणि थोडीबहुत मानमान्यताहि मला आहे. अशा स्थितींत एकसारखे काबाडकष्ट करून जिवाला शीण देण्याचें कारण मला काय आहे? राजकारणांत पडून लोकांशीं वादविवाद करावेत, स्वतःला नसत्या अडचणी उपस्थित करून घ्याव्या आणि प्रसंगीं कांहीं कट्टे शत्रूहि निर्माण करावेत; असें करण्याचें मला कांहीं कारण नाहीं; पण परमेश्वराप्रीत्यर्थ त्यानें लावून दिलेलें कर्तव्य पार पाडणें मला भाग आहे. अशी सतत जाणीव माझ्या ठिकाणीं असल्यामुळें या गोष्टी करण्यास मी प्रवृत्त होतों. सर्व जगाचें नियमन जो करितो, त्यानेंच जर्मन राष्ट्राच्या भाळीं मोठेपणा लिहिला आहे; असें मला अंतःकरणपूर्वक वाटलें नसतें, तर राजकारणाचा धंदा मीं ताबडतोब सोडून दिला असता. फार काय पण या धंद्यांत पडलोंच नसतों. या जगांत मला कांहीं कर्तव्य म्हणून आहे, ही जाणिव माझ्या ठिकाणीं कोठून उत्पन्न झाली? तिचा उगम परमेश्वरापासूनच असला पाहिजे. पदव्या आणि चांद असल्या खेळण्यांची मौज मला कधींच वाटली नाहीं; पण मृत्यूनंतरहि मनुष्याचें कार्य मागें रहातें, असा माझा विश्वास असल्यामुळें प्राप्त कर्तव्याला, मीं मागें टाकलें नाहीं. यामुळें राजभक्तीचा उदयहि माझ्या ठिकाणीं झाला. मी राजभक्त नसतों, तर लोकसत्तेचा पुढारी मी बनलों असतों. माझ्या मार्गांत अनेक अडचणी आल्या; पण अशा प्रकारची श्रद्धा माझ्या ठिकाणीं जागृत असल्यामुळें त्या सर्वांस मीं धिमेपणानें तोंड दिलें. ही आत्मश्रद्धा माझ्यांतून नष्ट झाली, तर माझा

सर्वस्वीच नाश झाला, असें मी समजतों. अशा स्थितींत माझ्या ठिकाणीं देशाभिमानहि उरणार नाहीं. खेडेगांवांत राहून स्वस्थपणानें आयुष्य घालवावें व रानावनांतून फिरून सृष्टिमातेबरोबर आनंदांत रहावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. कांहीं देशकार्य परमेश्वरानें मजवर सोंपविलें आहे, अशी जाणीव माझ्या ठिकाणीं नसती, तर बाड बिछाईत खाकोटीस मारून व्हार्जिनचा रस्ता मी उद्यां सुधारला असता."

जर्मन संस्थानांची केव्हां तरी एकी होणार व या कार्यांतील यशाचा बराच भाग परमेश्वर आपल्या वांटयास घालणार, अशी श्रद्धा बिस्मार्क यांच्या चित्तांत आरंभापासूनच होती. सर्व जर्मन संस्थानांची प्रातिनिधिक सभा फ्रँकफर्ट येथें भरत असे. त्यावेळीं प्रशियाचे प्रतिनिधि या नात्यानें ती जागा बिस्मार्क यांनीं स्वीकारली, तेव्हां त्यांनीं लहान तोंडीं मोठा घांस घेतला, असें म्हणून पुष्कळांनीं त्यांची चेष्टा केली होती; पण स्वतःच्या कर्तबगारी संबंधीं पूर्ण विश्वास बिस्मार्क यांस असल्यामुळें कोणाच्या थट्टेची पर्वा त्यांनीं केली नाहीं. कॉफिन यांजपाशीं गार्टिनजेन येथें जर्मन संहती बद्दल त्यांनीं मारलेली पैज, इ. स. १८५१ सालीं जर्मन डायटबद्दल राजाशीं झालेलें त्यांचें भाषण वगैरे गोष्टींवरून जर्मन संहतीबद्दल त्यांची किती खात्री होती, हें दिसून येण्याजोगें आहे. इ. स. १८६२ सालीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या एका पत्रांत ते लिहितात. 'परमेश्वराचा कोणताहि हुकूम मान्य करण्यास मी तयार आहें. अमुक एक गोष्ट करावी, हा त्याचा हुकूम नाहीं, अशी माझी खात्री होईल, तर ती गोष्ट मी कधींहि करणार नाहीं.' अशा प्रकारच्या बारीक सारीक गोष्टीवरून त्यांच्य मनाचा कल कसा वहात होता व त्यांचें अखेरचें साध्य काय होतें,

समजण्यासारखें आहे. आपला राजा जर्मनीचा बादशहा नियत केला गेला आहे व या कार्यांत आपण त्यास मदतगार आहों, असा दृढ विश्वास व विवेकबुद्धीचा पाठिंबा बिस्मार्क यांस नसता, तर एवढें मोठें प्रचंड कार्य त्यांच्या हातून नीटपणें कधींहि सिद्धीस गेलें नसतें.

आपल्या कार्याची प्रेरणा आपणास परमेश्वराकडून मिळते, असा भरंवसा असणें, हा त्यांच्या मनोधर्माचा एक विशेष होता. जर्मन जनतेंत राष्ट्रीय भावना उत्पन्न व्हाव्यात व राष्ट्रकार्याला विघातक अशा कोणत्याहि विचारांची वाढ जर्मनींत होऊं नये यासाठीं जो एवढा अट्टाहास त्यांनीं केला, त्यांतील मर्म हेंच होय. हें ईश्वराचें कार्य आहे. अशी भावना त्यांच्या ठिकाणीं नसती, तर इतक्या लोकांशीं वैर संपादन होईल, अशी गोष्ट करण्याचें धैर्य त्यांस झालें नसतें. फ्रेड्रिकश्रू येथें त्यांनीं जीं अनेक भाषणें केलीं, तीं आपल्या शत्रूवर उट्टें काढण्याकरतां केलीं आहेत, असा आरोप पुष्कळांनीं त्यांजवर केला आहे; पण जर्मनीच्या एकीकरणासाठीं ज्यानें शरीरस्वास्थ्याकडेहि पाहिलें नाहीं, त्यांजवर अशा प्रकारचा आरोप करणें, हें त्यांच्या शत्रूसहि लांच्छनास्पद आहे. नव्या बादशहांनीं स्वीकारलेलें धोरण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें चुकीचें आहे, असें त्यांस मनःपूर्वक वाटलें नसतें व तशी स्पष्ट इशारत बादशहांस देणें आपलें कर्तव्य आहे, असा त्यांचा समज झाला नसता, तर वारा आला तशी पाठ फिरवून ते अधिकारारूढ राहिले असते व आपल्या मानमरातबांत कोणत्याहि प्रकारची उणीव त्यांनीं येऊं दिली नसती. त्यावेळीं ते गप बसले असते, तर त्यांत त्यांचें ऐहिक हित अधिक साधलें असतें, अशी ती वेळ होती; पण बिस्मार्क यांची मनोघटना याहून अधिक उच्च दर्जाची होती. स्वहितापेक्षां राष्ट्रहित त्यांस अधिक किंमतीचें वाटत होतें. ‘ घरांघरांतून सैतानांनीं मजवर हल्ला केला,

तरी माझ्या नियत स्थळीं पोहोंचेपर्यंत मी मागें पाऊल घेणार नाहीं' असें ल्यूथर म्हणाला होता. ल्यूथरचें हें ब्रीदवाक्य बिस्मार्क यांसहि पूर्णपणें लागू पडतें. या त्यांच्या गुणाची जाणीव त्यांच्या राष्ट्रबंधूंस पूर्णपणें असल्यामुळेंच आपल्या राष्ट्राचे ते इतके आवडते होऊन बसले.

इंग्लंडच्या इतिहासांत सुप्रसिद्ध असलेला ऑलिव्हर क्रामवेल याच्याशीं बिस्मार्क यांचें साम्य पुष्कळ वेळां दाखविण्यांत येत असतें. बिस्मार्क व क्रामवेल यांच्या चरित्राची तुलना सूक्ष्म दृष्टीनें केली असतां बऱ्याच बाबींत त्या दोघांत साम्य होतें, असें दिसून येईल. इंग्लंडांतील जुलमी सत्ता कळसास पोहोंचली, त्या वेळीं धर्मरक्षणार्थ क्रामवेलचा अवतार झाला. गांवांतल्या हलक्या सलक्या पण नेकीच्या लोकांस हाताशीं धरून क्रामवेल यानें इंग्लंडास स्वातंत्र्य आणि न्याय- यांची जोड मिळवून दिली. त्याचप्रमाणें जर्मनीच्या या सुपुत्रानें परस्परांतील भांडगामुळें अधोगतीस जाऊं पाहणाऱ्या जर्मन राष्ट्राची एकी करून त्याच्या ठिकाणीं राष्ट्रीय भावनेची प्रेरणा केली. क्रामवेल आणि बिस्मार्क या दोघांचेंहि कार्य सारखेंच अवघड होतें. दोघांच्याहि मार्गांत सारख्याच अडचणी होत्या. राजाचें बाहुलें होऊन बसलेल्या इंग्लंडांतील पार्लमेंटानें राष्ट्राच्या सुधारणेच्या मार्गांत शक्य तितके अडथळे घातले. असल्या पार्लमेंटाशीं भांडून क्रामवेल यास आपला मार्ग मोकळा करावयाचा होता. त्याचप्रमाणें प्रथम प्रशियन पार्लमेंट व नंतर जर्मन पार्लमेंट यांच्याशीं बिस्मार्क यांसहि तंटे करावे लागले. हीं पार्लमेंटें वस्तुतः देशकल्याणाच्या मार्गांत अडथळा आणीत होतीं, त्या अर्थीं त्यांची सत्ता लंगडी करणें देशकल्याणाच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य होतें; पण हें कार्य केल्याबद्दल यां दोघांवरहि 'जुलमी' असा शिक्का कांहीं अदूरदृष्टि टीकाकारांनीं मारला आहे. पार्लमेंट म्हणजे लोकांनीं निवडलेल्या

प्रतिनिधींची सभा आणि पार्लमेंटचें मत म्हणजे सर्व राष्ट्राचें मत, हें शाब्दिक उपपत्तीच्या दृष्टीनें खरें आहे; पण या उपपत्तीचा प्रत्यक्ष व्यवहार कसा होतो, हेंहि पाहणें आवश्यक आहे. नुसतें नामधारी पार्लमेंट लोकमताचें निदर्शन वास्तविकपणें करीत असेल असें नाहीं. आणि जें पार्लमेंट राष्ट्राच्या मनोभावना विसरतें, तें त्या राष्ट्राचें खरें पार्लमेंटच नव्हे, असें म्हणण्यास काय हरकत आहे? अशा स्थितींत असल्या पार्लमेंटाची सत्ता धाब्यावर बसवून राष्ट्रकार्यकर्त्या पुरुषानें राजकारणाच्या सर्व दोऱ्या आपल्या हातांत घेतल्या, तर त्यांत त्यानें मोठा गुन्हा केला, असें होतें काय? राष्ट्रहिताची दूर दृष्टि बाजूस ठेवून व केवळ पक्षाभिमानास पेटून कोणतेंहि पार्लमेंट मुख्य कार्यकर्त्याच्या आड येऊं लागलें, तर येनकेन प्रकारेण त्याचा अधिकार लंगडा करणें अवश्य होय.

कोणत्याहि राष्ट्राचा इतिहास पाहिला, तरी त्यांतील धुरीणाला अशाच प्रकारचे अडथळे नेहमीं येत असल्याचें आढळून येतें. त्याला पुष्कळ शत्रू उत्पन्न होतात व पुष्कळांच्या मनांत त्याजबद्दल शंका उत्पन्न होते. अमेरिकेचा सुप्रसिद्ध प्रेसिडेंट ॲब्रेहाम लिंकन याजवरहि पुष्कळांनीं नाना प्रकारचे आरोप केले होते.

बिस्मार्क यांच्या वागणुकीसंबंधीं युरोपांतील देशांत अनेक प्रकारचा गैर समज पसरला होता. ते रानटी, अडदांड आणि उद्धट आहेत, असें पुष्कळांस वाटे. बिस्मार्क यांच्या शत्रूंनीं त्यांस जीं टोपण नांवें दिलीं होतीं, त्यावरून या समजास अंशतः पुष्टी मिळण्यासारखी होती. तथापि बिस्मार्क यांच्या शत्रूंनीं रंगविलेल्या त्यांच्या या चित्राला अतिरेक आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अत्यंत आवश्यक अशा गोष्टी करण्यांतहि प्रतिपक्षी आड येऊं लागले, तर हातीं असलेल्या सर्व शस्त्रा-

त्रांनीं त्यांचें निवारण करणें बिस्मार्क सारख्या जबाबदार मुत्सद्यास भाग पडतें. केवळ पक्षाभिमानास वश होऊन साम्राज्याचें हित जे विसरतात, त्यांच्याशीं कठोरपणाची वागणूक करणें न्याय्य नाहीं, असें कोण म्हणेल ? बिस्मार्क यांस हाणून पाडण्याकरतां त्यांच्या शत्रूंनीं कमी खटपटी केल्या होत्या असें नाहीं. त्यांच्या खटपटी बिस्मार्क यांनीं हाणून पाडल्या हाच काय तो बिस्मार्क यांचा अपराध. बिस्मार्क यांच्या जुलमी स्वभावाचें उदाहरण म्हणून कौंट आर्निम यांचा खटला त्यांचे शत्रू नेहमीं पुढें करतात. पण कौंट आर्निम यांचा अपराध केवढा घोर होता, हें पाहिलें म्हणजे बिस्मार्क यांची वागणूक कठोरपणाची होती, असें कोणीहि म्हणणार नाहीं. बिस्मार्क स्वजनद्रोह्यांचे पक्के द्वेष्टे होते, ही गोष्ट त्यांनीं स्वतः कधींहि लपवून ठेवली नाहीं. स्वतःचें तट्टू पुढें ढकलण्याकरतां अथवा केवळ पक्षाभिमान म्हणून जे लोक साम्राज्याचें हित विसरत त्यांजपाशीं बिस्मार्क यांची वर्तणूक नेहमींच कठोरपणाची असे. अशा सर्पांचीं डोकीं सांपडतील तेथें तावडतोब ठेंचून टाकलीं पाहिजेत, असें ते स्पष्ट बोलून दाखवीत. धडपडी शिवाय जगांत अस्तित्व सुद्धां शक्य नाहीं, हें तत्व बिस्मार्क यांनीं फ्रेड्रिकश्रू येथील आपल्या कित्येक भाषणांत अनेक प्रकारानें विशद केलें आहे. बिस्मार्क यांच्या साऱ्या आयुष्यक्रमाचा विचार केला, तर त्यांत या तत्वाचा आचार पदोपदीं आढळून येतो. विस्कळित संस्थानांचें साम्राज्य बनेपर्यंत अंतर्गत व बहिर्गत असे दोन्ही प्रकारचे कलह बिस्मार्क यांस किती करावे लागले, याचा विचार केला म्हणजे, त्यांच्या मनोभूमिकेंवर प्रत्येक दिवशीं किती लढाया चालल्या असतील, याचें सहज अनुमान करण्याजोगें आहे. प्राशियांत राज्यक्रांति करण्यासाठीं उत्पन्न झालेल्या एका पक्षाबरोबर इ. स. १८४८ त पहिलें भांडण

संपतें, तोंच आस्ट्रियाशीं युद्ध उभें राहिलें. आस्ट्रियाच्या मगरमिठींतून जर्मन संस्थानें मोकळीं सुटत आहेत, असें पाहून त्यांतील मिळेल तेवढा घांस गिळण्याचा यत्न फ्रान्स करूं लागल्यामुळें त्यांना फ्रान्सशीं दोन हात करावे लागले. अशारीतीनें बाह्य शत्रूंचा उपसर्ग नाहींसा होतो न होतो, तोंच पोल, क्याथोलिक, सोशल डेमोक्राट वगैरे अंतःस्थ शत्रू त्यांस त्रास देऊं लागले. या सर्वांचा समाचार पाळीपाळीनें त्यांनीं घेतला. साम्राज्याच्या हिताच्या मार्गांत खाडा पडण्याचें चिन्ह जेथें जेथें उपस्थित झालें, तेथें तेथें साम्राज्याचा झेंडा हातीं घेऊन बिस्मार्क यांनीं उडी घातली. शत्रूंच्या कोणत्याहि खटपटींनीं आमरण ते कधींहि हताश झाले नाहींत. उलट शत्रूंच्या वाढीबरोबर त्यांचा उत्साह वाढतच गेला.

तोंडांतून निघालेल्या प्रत्येक अक्षरांत सत्य पूर्णपणें भरलेलें असावयाचें, हा बिस्मार्क यांच्या वागणुकीचा एक ठळक विशेष आहे. बिस्मार्क यांनीं कांहीं गोष्ट सांगितली; तर तिच्या सत्यत्वाबद्दल अथवा त्यांच्या कृतींत लपंडाव असल्याबद्दल त्यांच्या कट्टया शत्रूंनीं सुद्धां कधींहि आक्षेप घेतला नाहीं. राजनीतींत अनेक प्रकारचे लपंडाव असतात, ही गोष्ट बिस्मार्क यांस माहित नव्हती असें नाहीं. ही कला ते स्वतः पूर्णपणें जाणून होते. अनेक प्रकारच्या वस्ताद राजनीतिनिपुणांशीं दोन हात करण्याचे प्रसंग त्यांस अनेकवार आले; पण अशा स्थितींतहि 'माझ्या साऱ्या आयुष्यांतील कोणत्याहि प्रसंगीं आणि मुत्सद्देगिरींतहि कधींच खोटें बोललों नाहीं ' तशी अभिमानाची उक्ति सर्व लोकांसमक्ष स्पष्टपणें बोलण्याइतकी त्यांनीं आपली वर्तणूक चोख ठेवली होती. आपले धनी पहिले वुइल्यिम बादशहा यांच्या संमतीनें बिस्मार्क यानीं जर्मनराष्ट्राला जो सरळ व निष्कपट मार्ग आंखून दिला, त्यामुळें त्याला

सांप्रतचें वैभव प्राप्त झालें आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. बिस्मार्क यांच्या हातीं जर्मनीची राज्यधुरा होती, तोंपर्यंत सर्व युरोपभर शांतता राखण्याचें त्यांनीं दिलेलें आभिवचन ते पूर्णपणें पाळ-तील असा भरंवसा सर्व राष्ट्रांत पूर्ण वसत होता. नव्या बादशाहांनीं ही राज्यधुरा बिस्माक यांच्या खांद्यावरून अचानकपणें काढली, तेव्हां साऱ्या युरोपभर किती खळबळ उडाली, हें पाहिलें म्हणजे बिस्मार्क यांच्या सरळ व खुल्या स्वभावाचा भरंवसा इतर राष्ट्रांस किती होता, हें आपोआप कळून येतें.

नीर्लोभीपणा हा बिस्मार्क यांचा दुसरा एक मोठा गुण होय. केवढाहि मोठा विजय मिळाला, तरी आपल्या शत्रूंवर कोणत्याहि जुलमी अटी त्यांनीं लादल्या नाहींत. त्यांच्या या नेमस्त वागणुकीमुळें कित्येक वेळां स्वतःच्या सहकाऱ्याशींहि भांडण्याचे प्रसंग त्यांस येत व कित्येक वेळां सारें जर्मनराष्ट्रहि त्यामुळें नाखुष होई. इ. स. १८६६ सालीं कॉनिंगग्राडझ् अथवा सॅडोवा येथें प्रशियन सैन्यानें आस्ट्रियन सैन्यावर अभूतपूर्व विजय मिळविला होता. त्यावेळीं आस्ट्रिया पादाक्रांत करणेंहि जर्मन सेनापतींस अशक्य नव्हतें. व्हियेन्नावर चाल करून जावें, या साठीं सारें सैन्य व सेनापति उत्सुक असतां बिस्मार्क यांनीं त्यांचें बोलणें मनास आणलें नाहीं. आस्ट्रियाशीं कायमचें वितुष्ट पडणें ही गोष्ट केव्हां तरी जर्मनीच्या घातास कारणीभूत झाल्यावांचून राहणार नाहीं, हें बिस्मार्क सारख्या दूरदृष्टीच्या मुत्सद्याला सहज कळण्यासारखें होतें. सामान्य जनाप्रमाणें मोठ्या जयानें ते हुरळून गेले नाहींत. इ. स. १८६६ नंतर होहेनझोलर्न व हॅप्सबर्ग हीं मध्य युरोपांतील दोन प्रमुख घराणीं कायमच्या स्नेहरज्जूंनीं कशीं बांधलीं गेलीं आहेत, हें इतिहासज्ञांस आतां विदित आहेच.

बिस्मार्क यांनीं त्या वेळीं नेमस्तपणा राखला नसता, तर पुढें घडून आलेला जर्मनी, आस्ट्रिया व इटाली यांचा त्रिकूटसंधि घडून आला नसता. हा संधि अस्तित्वांत नसता, तर युरोपांत शांतता कधींहि राहिली नसती. युरोपांत बरींच वर्षें नांदलेल्या शांततेचें श्रेय बिस्मार्क यांच्या नेमस्तपणासच दिलें पाहिजे. फ्रँको जर्मन युद्धानंतरहि फ्रान्सशीं मैत्री जोडण्याचा उपक्रम बिस्मार्क यांनीं केला होता. युद्धापूर्वी जशा प्रकारचे तह या दोन राष्ट्रांत अस्तित्वांत होते, तशाच प्रकारचे तह पुन्हा अस्तित्वांत आणावे, अशी त्यांची इच्छा होती. फ्रान्सवर युद्धांत विजय मिळविला, एवढ्याच साठीं वाटेल त्या अटी त्याजवर लादणे म्हणजे त्यांच्या अपयशाचा अन्याय्य फायदा घेणें होय, असें ते म्हणत.

बिस्मार्क हें स्वतः खुल्या दिलाचे असल्यामुळें उघडणें आपणाशी शत्रुत्व करणाऱ्या माणसांबद्दलहि त्यांस आदर वाटे; पण अंतस्थ रीतीनें कावा करणाऱ्या लोकांचा मुलाहिजा त्यांनीं कधीं राखल नाहीं. त्याचप्रमाणें पार्लमेंटांत केवळ आपल्या पक्षाचा अभिमान धरणाऱ्या लोकांबद्दलहि त्यांस कधीं आदर वाटला नाहीं. हे लोक स्वतःचींच भाषणें ऐकण्यास खुष असतात व साम्राज्याचें कांहींहि नुकसान झालें तरी त्याकडे लक्ष न देतां स्वतःच्या भाषणांतील अलंकाराचें प्रदर्शन करण्यापलीकडे त्यांचें लक्ष नसतें, असें बिस्मार्क म्हणत. अशा गृहस्थांना बिस्मार्कहि तडकाफडकी उत्तरें देऊन त्यांची बोळवण ते करीत. यामुळें पुष्कळ वेळां हें लोक त्यांचे कट्टे शत्रू बनत व साधेल त्या प्रसंगी बिस्मार्क यांजवर सूड उगविण्याचा यत्न ते करीत. आपणास बरोबर वाटेल, तें स्पष्ट शब्दानीं बोलण्यास बिस्मार्क कधींहि कचरत नसत. आपल्या हाताखालच्या लोकांशीं पार्लमेंटांतील प्रतिनिधीशीं अथवा प्रत्यक्ष बादशहाशींहि कांहीं बोलण्याचा प्रसंग आला

तरी आपलें मत ते स्पष्ट बोलून दाखवीत. आपल्या भाषणानें कोणाचें मन दुखेल कीं काय याचा विचार तरुणपणापासूनच त्यांनीं कधीं केला नाहीं. यामुळें बिस्मार्क हे रानदांडगे आहेत, अशी त्यांची ख्याती सर्वत्र पसरली होती. सरकारी ऑफिसांत काम करीत असतां 'ऑफिसच्या बाहेर तुमची व माझी योग्यता सारखीच आहे.' असें आपल्या वरिष्ठांस त्यांनीं एकवार बजावलें होतें, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. सॅडोवाच्या लढाईंत वुइलिम राजे बरेच पुढें जात असतां राजांनीं अधिक पुढें जाणें इष्ट नाहीं, असें म्हणून बिस्मार्क यांनीं त्यांचा घोडा आपणच मागें फिरविला. फ्रेड्रिकश्रू येथें त्यांस भेटावयास गेलेल्या पुष्कळ लोकांना बिस्मार्क यांच्या स्पष्टवक्तेपणाचा अनुभव येई. यामुळें कित्येक लब्धप्रतिष्ठ नाखुषहि होऊन जात. जर्मन संस्थानांची संहति घडवून आणण्याच्या महत्कार्यांत अनेकांचे श्रम खर्ची पडले असून त्याचें श्रेय अंशत: मात्र आपणाकडे आहे, असें बिस्मार्क स्पष्ट बोलून दाखवीत. नाटकी शालीनतेमुळें असें ते बोलत असें नव्हें तर त्यांना मनःपूर्वकच तसें वाटे. असें असतांहि बिस्मार्क यांच्या भाषणांत नाटकी शालीनता भरली आहे, असें म्हणण्यास त्यांच्या टीकाकारांनीं कमी केलें नाहीं. ते साऱ्या जर्मन राष्ट्राच्या गळ्यांतले ताईत होऊन बसले आहेत, हीच गोष्ट पुष्कळशा टीकाकारांस खपत नाहीं. एकाद्या राजालाहि मिळणार नाहीं, अशा प्रकारचा सन्मान सर्व जर्मन राष्ट्रानें त्यांस दिला, त्यांच्या वाढ दिवशीं सर्व लहानथोरांनीं एकचित्तानें आणि अश्रुतपूर्व उत्साहानें त्यांचें अभिनंदन केलें, हें त्यांच्या शत्रूंस रुचलें नाहीं. बिस्मार्क जे जर्मन राष्ट्रास इतके पूज्य होऊन बसले आहेत, ते त्यांच्या महत्कार्यसंपादनामुळें नव्हेत, तर त्यांच्या आदर्शवत दानतीमुळें होत.

त्यांच्या आयुष्याचा इतिहास म्हणजे जर्मन राष्ट्राच्या वाढीचा इतिहास-होय. जर्मन राष्ट्राच्या इतिहासाशीं त्यांचें नांव पक्कें बांधलें गेलें असल्या मुळेंच राष्ट्रास ते इतके प्रिय झाले. बिस्मार्क यांचा सन्मान करणें म्हणजे राष्ट्राभिमान दाखविणें होय, असें सामान्य जर्मनांस वाटतें. बिस्मार्क यांजवर कोणीं हल्ला केला, तर साऱ्या राष्ट्रावर तो हल्ला होय असें जर्मन जनतेस वाटल्या वांचूनरहात नाहीं.

बिस्मार्क यांच्या वर्तणुकीच्या सार्वजनिक रूपाचें येथवर वर्णन झालें. त्यांच्या सार्वजनिक रूपाप्रमाणेंच त्यांचें वैयक्तिक अथवा खाज-गीरूपहि तितकेंच मनोहर व आदरणीय आहे. बिस्मार्क यांची आई स्वतः अत्यंत धर्मशील असल्यामुळें तिनें त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न केलेल्या धार्मिक बुद्धीमुळें सत्याची चाड त्यांच्या ठिकाणीं लहानपणा-पासूनच उत्पन्न झाली होती. त्याप्रमाणें त्यांची पत्नीहि स्वभावानें साधी आणि धर्मशील होती. नवरा आणि मुलेंबाळें यांची तनूनें आणि मनानें सेवा करावयाची हें जर्मन धर्मपत्नीचें कर्तव्य आहे, असा जर्मन लोकांचा समाज आहे. संसार सुखाचा व्हावयाचा असेल, तर गृहदेव-तेनें स्वतःकडे न पाहतां यजमान आणि मुलेंबाळें यांच्या शुश्रूषे-साठीं आपलें सर्वस्व अर्पण केलें पाहिजे, हें जर्मन तत्व खुद्द बिस्मार्क यांनींच एके प्रसंगीं बोलून दाखविलें होतें. बिस्मार्क यांच्या पत्नीची वागणूक या तत्वाला सर्वथैव साजेशी होती. तिच्या ठिकाणीं यत्किं-चित सुद्धां ताठा नव्हता. कौंटेस, डचेस, प्रिन्सेस या पदव्यांपेक्षां फ्राऊ ( सौभाग्यवती ) हीच पदवी आपणास अधिक प्रिय आहे, असें ती म्हणे. बिस्मार्क यांनीं आपल्या पत्नीला लिहिलेलीं पत्रें पाहिलीं म्हणजे या जोडप्याचें परस्पर प्रेम कसें होतें, हें दिसून येण्याजोगें आहे. राजकार्यार्थ ते कोठेंहि बाहेर गेले, अथवा कितीहि लांब मुदतीच्या

प्रवासांत ते असले, तरी त्यांचें अर्धें मन घरीं असे. त्यांजवर त्यांच्या मुलांचें व नातवंडांचें अत्यंत प्रेम होतें.

वृद्धापकाळीं गृहस्थ या नात्यानें जी परिस्थिति सुखद म्हणून गणली जाते, ती बिस्मार्क यांस प्राप्त झाली होती. त्यांस वृद्धापकाळीं मिळालेले स्नेही सोबतीहि खुल्या दिलाचे व सच्च्या अंत:करणांचे गृहस्थ होते. बिस्मार्क यांच्या स्वभावांत घमेंड नसल्यामुळें गतगोष्टीची चर्चाहि या स्नेही मंडळींत चाले. त्यांची वृत्ति अशा प्रसंगीं इतकी निरभिमान असे कीं जर्मन साम्राज्याचे जनक बिस्मार्क ते हेच, अशी जाणीव मुद्दाम करून दिल्याशिवाय बिस्मार्क यांच्या भाषणावरून अथवा अंग विक्षेपावरून ती श्रोत्याच्या लक्षांत येत नसे.

इंग्लंडचा सुप्रसिद्ध योद्धा सर चार्लस नेपिअर याचें टामसकार्लाइल यानें केलेलें वर्णन बिस्मार्क यांसहि तंतोतंत लागू पडतें. कार्लाइल म्हणतो,

नेपिअर हे मोठ्या तडफीचे गृहस्थ आहेत. औदार्य हा जो क्षात्र वृत्तीचा विशेष गुण प्राचीन योद्धयांत दिसे; तो यांच्या ठिकाणींहि आहे. त्यांची खरी परीक्षा त्यांच्या भाषणावरून होत नसून त्यांच्या कृतीवरून होते. मनुष्याचें खरेंपण शब्दांतच नव्हे तर बारीकसारीक कृतींतहि प्रतिबिंबित झालेलें असतें. त्यांच्या ठिकाणीं मोठेपणाची किंमत सर्वत्र दिसत असतां व प्रपंचाच्या कंटकमय अरण्यांतून हिंडत असतां अनेक प्रकारचे कांटे त्यांना बोंचून तापदायक होत असतात. मूर्खपणा, लोभ, मत्सर इत्यादि जगांतील विकार त्यांचा मार्ग पदोपदीं शोधीत असतांहि केवळ स्वसामर्थ्यानें आपला स्वर्गाचा रस्ता ते निष्कंटक करतात. वाटेंत कितीहि अडचणी आल्या, तरी मरेपर्यंत आपला सन्मार्ग ते सोडीत नाहींत आणि स्वत:च्या पश्चात ज्या पावलांच्या खुणा ते मागें

ठेवतात, त्या इतरांस मार्गदर्शक होतात. रात्रींच्या वेळीं सर्वत्र अंधार पसरलेला असतां एकादा दिवा लावला म्हणजे उजेड थोडा आणि काळोख पुष्कळ, हें जसें प्रत्ययास येतें त्याप्रमाणें अशा मानवी दीपांच्या दर्शनानें जगांत गोंधळ आणि मूर्खपणा पुष्कळ आणि उज्वल शहाणपणा थोडा असा प्रत्यय येतो. बिस्मार्क यांच्याशीं समकालीन असलेल्या कांहीं टीकाकारांनीं त्यांचा मोठेपणा कबूल केला नाहीं अथवा राष्ट्राची त्यांनीं केवढी कामगिरी बजाविली, या अथवा खाज- केली नाहीं, तरी त्या कार्याची खरी परीक्षा करून मान्यांन यांची आई देण्यास व दीवाभीताप्रमाणें सूर्याविरुद्ध ओरड करणाऱ्या घुबड उत्पन्न बक्षिस देण्यास काळ समर्थ आहे.

संपूर्ण.

## परिशिष्ट.

## बिस्मार्क यांच्या आठवणी व टिपणें.

प्रिन्स बिस्मार्क यांचे सरकारी चिटणीस डॉ. मॉरिट्झ् बुश यांनीं प्रसिद्ध केलेल्या रोजनिशींतून पुढील उतारे घेतले आहेत. डॉक्टर मजकुरांनीं बिस्मार्क यांची नौकरी सुमारें एकवीस वर्षें केली. या अवधींत ज्या कांहीं गोष्टी त्यांच्या नजरेसमोर प्रत्यक्ष घडल्या अथवा ज्या त्यांनीं खुद्द बिस्मार्क यांच्या तोंडून ऐकल्या, त्यांचीं टिपणें ते रोजच्या रोज करीत असत. पुढील बहुतेक उताऱ्यांत खुद्द बिस्मार्क यांच्या तोंडचेच शब्द डॉक्टर मजकुरांनीं नमूद केले आहेत. यावरून अस्सल पुरावा या दृष्टीनें या उताऱ्यांचें महत्व किती आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

( १ )

इ. स. १८७० सालाच्या युद्धांत फ्रेंचांवर जय मिळाल्यास कोणत्या अटीवर तह करावा, याविषयीं बोलणें निघालें असतां प्रिन्स म्हणाले, " फ्रेंचांकडून खंडणी म्हणून केवढीहि मोठी रक्कम आम्ही घेतली, तरी जीवित व वित्त यांची जी आमची हानी झाली आहे, तिची भरपाई होणार नाहीं. दक्षिण जर्मनीचें भावी हल्ल्यापासून संरक्षण करणें हें आमचें आद्य कर्तव्य आहे. गेलीं दोन शतकें या परिस्थितीचा फायदा घेऊन फ्रान्सनें जर्मन संस्थानांत दुहीचें बीजारोपण केलें. जर्मन संस्थानांत इतकी अंतस्थ फाटाफूट आणि गोंधळ हीं असण्याचें कारण हेंच आहे. बेडन, वर्टेंबर्ग आणि त्याचप्रमाणें बव्हेरिया यांना स्ट्रास्बर्गचा उपसर्ग यापुढें लागूं देतां उपयोगी नाहीं. गेल्या दीडशें वर्षांत या भागांत फ्रान्सनें बारा वेळ हल्ले केले. असे हल्ले होऊं नयेत म्हणून इ. स. १८१४–१५ सालीं परस्परांच्या संगनमतानें कांहीं यत्न झाला होता. त्यावेळीं मोठ्या

मनानें आम्ही हार खाल्ली; पण तिचा उपयोग झाला नाहीं. सामानें हीं गोष्ट पुढेंहि साधणार नाहीं. मद आणि सत्तेची हांव हे फ्रेंच राष्ट्राचे जन्मजात गुण आहेत. आणि 'स्वभावो दुरतिक्रमः' या न्यायानें फ्रेंच राष्ट्र संधि साधेल तेव्हां आपल्या दुबळ्या शेजाऱ्यावर तुटून पडल्याशिवाय रहात नाहीं. यांत बोनापार्ट घराण्याचाच वाक आहे, असें नाहीं. फ्रेंच राष्ट्रावर राज्य कोणत्याहि घराण्यानें केलें, तरी त्याच्या राजनीतीच्या मार्गांत फरक पडणार नाहीं. फ्रेंच लोकांची सदोदित मनधरणी करीत राहून आमचें संरक्षण होणार नाहीं. स्वसंरक्षणाचा खरा उपाय म्हटला म्हणजे मजबूत सरहद्द निर्माण करणें हाच होय. चवदाव्या लुईच्या कारकीर्दीच्या वेळीं व त्यानंतर झालेल्या लोकसत्ताकाच्या वेळींहि दक्षिण जर्मनींत फ्रेंचांनीं धुडगुस घातला आहे. फ्रान्सचा हल्ला केव्हां येईल, या काळजींतून दक्षिण जर्मनी कधींच मुक्त झाला नाहीं. फ्रेंचांचे एक दोन प्रांत आम्हीं खालसा केले, तर त्यांच्या मनांत आम्हाबद्दल सदोदित वैषम्य राहील हें खरें; पण त्याची पर्वा आम्ही करीत नाहीं. मनांत वैषम्य राहणें आणि प्रांत खालसा करणें, या दोन गोष्टींचा परस्परांशीं कांहींच संबंध नाहीं. इ. स. १८६६ सालीं आस्ट्रियाकडून एक वारभरदेखील जमीन आम्हीं घेतली नाहीं; पण त्याबद्दल आस्ट्रियानें आम्हाशीं असें कोणतें मोठें सख्य दाखविलें आहे? सॅडोवाच्या जयानें फ्रेंच लोक आम्हाविरुद्ध आधींच बिथरून गेले आहेत; मग वोर्थ आणि मेट्झ् येथें घडलेल्या प्रकारांनीं आम्हाविरुद्ध त्यांचें मस्तक किती भडकून जाईल, याचा नेमच नाहीं. आम्हीं कोणताहि भाग खालसा न केला, तरी आमच्या या जयांचा सूड उगविण्याची कल्पना त्यांच्या चित्तांत सदोदित राहील. उपकार करून कोणाचा स्नेह संपादन होत असेल–शत्रूचा मित्र होत असेल–तर तसें अवश्य

करावें; पण तसें होत नसेल, तर आपल्या शत्रूला कायमचा लुला करून टाकणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे. स्ट्रास्बर्ग आणि मेट्झ् हे दोन गड कायमचे जमिनदोस्त केले, तरीहि आमचें कार्य होणार नाहीं. लष्करें वाढवीत सुटण्याचें युरोपला लागलेलें खूळ नाहींसें करण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं प्रथम फ्रान्सचें सामर्थ्य नाहींसें करून टाकलें पाहिजे. कारण युरोपची शांतताभंग करणारें राष्ट्र फ्रान्स हेंच एक आहे; आणि पुढेंहि तें तसेंच राहील."

"आपल्या शौर्याची घमेंड हा फ्रेंच लोकांचा राष्ट्रीय दुर्गुण आहे. फ्रान्सचे राज्यकर्ते बोनापार्ट असोत अगर तेथें लोकसत्ताक असो, फ्रेंचांच्या या मानसिक अवस्थेंत जोंपर्यंत फरक पडला नाहीं, तोंपर्यंत त्यांच्या दुबळ्या शेजाऱ्यांना त्यांजपासून भीति राहणारच. युरोपांतील युद्धाच्या तयारीचें खूळ कमी करण्याची ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं कोरड्या नीतितत्वांवर भिस्त ठेवतां उपयोगी नाहीं. परदास्यांतून जर्मनीला मुक्त करण्याचें कार्य इ. स. १८१३–१४ सालापासून सुरू झालें. हें कार्य या वेळीं कायमचें पूर्ण करून टाकलें पाहिजे. याकरतां ज्या दरवाजांतून फ्रान्सचा प्रवेश दक्षिण जर्मनींत होऊं शकतो, तें द्वार आमच्या हातीं घेण्यावांचून आम्हांस गत्यंतर नाहीं. फ्रेंचांशीं तुम्ही कितीहि सवलतीनें वागलां, तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. याशिवाय जे प्रांत आम्ही आज मागत आहों, ते पूर्वींचे जर्मनप्रांतच आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. याकरतां स्ट्रास्बर्ग आणि मेट्झ् हे दोन्हीहि गड आमच्या हातीं असणें अवश्य आहे. युरोपांत शांतता रहावी अशी ज्यांची मनःपूर्वक इच्छा असेल, त्यांनीं तरी याच्या आड येऊं नये. फ्रान्सच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं आत्मसंरक्षणाची इच्छा करणें त्रावगें आहे काय?"

( २ )

एके वेळीं राजेरजवाड्यांसंबंधीं बोलणें निघालें असतां प्रिन्स म्हणाले, " * * चे राजेसाहेब विलक्षण घमेंडखोर आहेत. त्यांच्याइतकें पोकळ डोकें मीं कोठेंहि पाहिलें नाहीं; पण यांत त्यांचा तरी काय दोष ? त्यांच्या शिक्षणपद्धतीनेंच ते असे बनले आहेत. त्यांचे गुरू त्यांना ठराविक भाषणें करण्यास मात्र शिकवीत असतात. एके वेळीं एका राणी साहेबांस भेटण्याकरतां एका गांवचे एक मोठे पाटील आले असतां राणीसाहेब म्हणाल्या, ( या ठिकाणीं बिस्मार्क यांनीं वांकडी मान करून व बारीक आवाज काढून राणीचें अनुकरण करून दाखविलें. ) ' पाटील बोवा, तुम्हांस पाहून आम्हांस फार संतोष झाला. तुमच्या गांवची कीर्ति अशी ऐकली आहे कीं, तुमच्या गांवांत तंबाखू फार चांगली मिळते. ' इतकें भाषण झाल्यावर पाटिल बोवाहि संतुष्ट होऊन निघून गेले. "

( ३ )

युवराजासंबंधानें प्रिन्सचें मत विचारतां ते म्हणाले, " अलीकडे त्यांचें माझें चांगलें जमलें आहे. मी फ्रेंचांच्या तर्फेचा आहे, असा पूर्वी त्यांचा समज होता; पण आतां तो नाहींसा झाल्यामुळें त्यांचें मजवर प्रेम बसलें आहे. राजाचा धंदा करणारे लोक वृद्ध झाले, म्हणजे भलत्याच ठिकाणीं आपलें तट्टू पुढें करून आपल्या मंत्र्याच्या मार्गांत घोंटाळे करण्याची खोड त्यांस लागते. ही खोड आमच्या युवराजांनीं मात्र आपणास पुढें लागूं देऊं नये. त्यांना आढ्यता मुळींच नसून स्वभावानें ते अगदीं सरळ आहेत. त्यांना कामाची फारशी चाड नाहीं. खर्चावयाला पुष्कळसे पैसे आणि चैन हीं असलीं म्हणजे झालें. आणि वर्तमानपत्रांनीं थोडेसें स्तुतिस्तोत्र केलें, म्हणजे तर ते अगदींच खूष होतात. "

अशा प्रकारें प्रिन्स आज मोकळेपणानें बोलत असतांना मींहि अधिक प्रश्न विचारण्याचें धाष्टर्य केलें. युवराज्ञी फार हुशार आहेत कीं काय, असें विचारतांच प्रिन्स म्हणाले, "होय. त्या हुशार आहेत, म्हणजे बायकांच्या जातींत हुशार आहेत, इतकेंच. यजमानावर त्यांचें फारसें वजन असेल, असें मला वाटत नाहीं. आपले मनोविकार चेहऱ्यावर दिसूं देण्याची कला त्यांना अवगत नाहीं. हनोवर मीं खालसा केलें, तेव्हां त्या मजवर फार रागावल्या. माझी दृष्टादृष्ट होतांच त्यांचा राग उसळून वर येत असे. एकदां मजजवळ त्यांनीं पिण्यासाठीं पाणी मागितलें. एक पेला भरून तो मीं त्यांच्या हातीं दिला, तेव्हां जवळच बसलेल्या आपल्या मैत्रिणीला त्या म्हणाल्या, 'या पेलाभर पाणी या गृहस्थानें माझ्या डोळ्यांतून काढलें आहे.'

( ४ )

आज आमच्या येथें मोठा मेजवानीचा समारंभ होता. मेकलेनबर्गचे ग्रँड ड्यूक, जर्मनींतील पोस्टाचा मुख्य अधिकारी व अमेरिकन सेनापति शेरिड्यान वगैरे बडीबडी मंडळी मेजवानीला होती. अनेक विषयांवर गप्पा चालतां चालतां शेतकऱ्यांनीं लढाईत शिपायाचें काम करावें कीं काय, याबद्दल प्रश्न निघाला. बेझिली गांवच्या संरक्षणाकरतां फ्रेंच शिपायी लढत असतां आपल्या मदतीसाठीं त्यांनीं कांहीं शेतकरी गोळा केले होते. शेतकऱ्यांना अशा तऱ्हेनें लढतां येत नाहीं, असें प्रिन्सचें म्हणणें होतें. शेतकऱ्यांच्या अंगावर शिपायीपेशाचा विशिष्ट पोशाक नसल्यामुळें वाटेल तेव्हां त्यांनीं हत्यारें टाकलीं अथवा घेतलीं, तर ती गोष्ट समजून येण्यासारखी नाहीं. युद्धांत दोन्हीं पक्षांना सारखी संधी मिळणें अवश्य आहे; पण अशा प्रकारामुळें एक पक्ष फुकटचा अधिक जोरावतो. या विषयासंबंधीं मत देतांना अमेरिकन सेनापति शेरिडयान

म्हणाले, "शत्रूच्या सैन्याला शक्य तितके प्रचंड तडाके देणें, हें प्रत्येक सेनापतीचें पहिलें कर्तव्य आहे. याशिवाय बिन लढाऊ रहिवाशांसहि त्यानें सळो कां पळो करून सोडिलें पाहिजे. असें झालें तरच ते आपल्या सरकाराला तह करण्यास लावतील. युद्धांत त्यांचें इतकें नुकसान केलें पाहिजे कीं, रडण्याला डोळ्याशिवाय त्यांजजवळ दुसरें कांहीं उरूं नये."

( ५ )

"मेट्झ् आणि स्ट्रास्बर्गचे गड व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश आम्हांला घेणें अगदीं अवश्य आहे. एवढ्या भागाचें एकादें तटस्थ संस्थानहि निर्माण करून आमचें भागावयाचें नाहीं. कारण युद्धाच्या प्रसंगीं हें संस्थान आमच्या शत्रूला अवश्य मिळणार. आतां हा मुलूख निरनिराळ्या जर्मन संस्थानांस वांटून द्यावा कीं काय, या गोष्टीचा विचार करतां तसें करणेंहि इष्ट नाहीं. त्याचप्रमाणें हा भाग प्रशियालाहि जोडतां उपयोगी नाहीं. ज्याअर्थीं हें युद्ध सर्वांनीं मिळून इतक्या रंगरूपाला आणलें, त्याअर्थीं सर्वांना त्याचा फायदा सारखा मिळावा हें योग्य आहे. प्रशियाच्या वागणुकीसंबंधीं इतर संस्थानांच्या मनांत थोडीशी शंकाहि येऊं देतां उपयोगी नाहीं. कारण तशी शंका त्याच्या मनांत उत्पन्न झाली, तर सर्व संस्थानांचें एकीकरण करणें, हें जें आपलें अखेरचें साध्य त्यालाच धक्का बसेल."

( ६ )

पारीस आणि इतर फ्रेंच मुलूख याविषयीं बोलणें निघालें असतां, त्यांत आलसेस–लॉरेनचीहि गोष्ट निघाली;तेव्हां प्रिन्स म्हणाले, "आलसे–लॉरेन प्रांतांतून फ्रेंच सैन्यांत चांगली भरती होते हें खरें; पण तेथील लोकांबद्दल फ्रेंचांच्या मनांत फारसा आदर आहे, असें मात्र

मुळींच नाहीं. राज्यांतील मोठमोठ्या हुद्याच्या जागा या प्रांतांतील लोकांस क्वचितच मिळतात. ऐरिश लोकांच्या बद्दल लंडनवाल्यांच्या मनांत जसा तुच्छभाव असतो, तसाच पारीसवाल्यांच्या मनांत या प्रांतस्थांबद्दल असतो. फ्रेंच लोकांत सामान्यत: दोन वर्ग निर्माण झाले आहेत. एक प्यारीसवाल्यांचा व दुसरा इतरेजनांचा. पारीस येथील रहिवाशी आपणाला श्रेष्ठ दर्जाचे समजतात व इतरांस तुच्छ लेखतात. यामुळें प्यारीस हें एक राष्ट्र व इतर फ्रान्स हें एकराष्ट्र अशीं दोन राष्ट्रें एका फ्रान्सांत निर्माण झालीं आहेत. प्यारीसवाल्यांचा हा जुलूम नाहींसा करण्यासाठीं नेपोलियनची बादशाही त्याजवर शिक्षा म्हणून लादावी, असें केव्हां केव्हां माझ्या मनांत येतें. फ्रान्स हें एक भलें मोठें शून्याचें राष्ट्र आहे. त्यांना स्वत:-ची अशी कांहींच किंमत नाहीं. फ्रेंच लोक श्रीमंत आणि रीतीभा-तीला चांगले आहेत; पण त्यांना व्यक्तिविशिष्टत्व असें कांहींच नाहीं. प्यारीस मधून जसा वारा फिरेल, तशी पाठ सारे फिरवितात. तीन कोणी काफिर लोकांचें जसें राष्ट्र असावें, तसें हें राष्ट्र आहे. यामुळें यांतलेच कांहीं लोक हाताशीं धरून बाकीच्या राष्ट्रावर वाटेल तसा जुलूम करण्यास पारीसवाल्यांस फावत."

( ७ )

"फ्रेंच बादशहा तिसरा नेपोलियन याला वुइलियमशो येथें आम्हां फार चांगल्या तऱ्हेनें वागविलें, याबद्दल कित्येक जर्मन वर्तमानपत्रकारांचीं माथीं खलवळलीं आहेत. असल्या प्रकारच्या भयंकर अपराध्याला दया दाखविणे हें मोठें पाप होय, असें न्याशनल झिटंग पत्र म्हणतें. माझ्या दृष्टीनें हें मत अगदीं मूर्खपणाचें आहे. खाजगी व्यक्तिविषयक नीतितत्वांच्या ताजव्यानें राजकारण तोलावयाचें नसतें. युद्धांत एकादा

पक्ष विजयी झाला, म्हणून न्यायाधिशाचें काम त्याजकडे येतें, असें नाहीं. अशा रीतीनें न्याय आपल्या हातांत घेणें, हाच मोठा अन्याय होय. अशा रीतीनें बोलणाऱ्या लोकांस राजकारण म्हणजे काय, याचेंच ज्ञान नसतें. निष्कारण युद्ध उपस्थित करणाऱ्या लोकांस काय शिक्षा द्यावी हें परमेश्वर ठरवील. असें करण्यास मुत्सद्याला अधिकारच नाहीं. आपल्या देशाचा शक्य तितका फायदा कसा करतां येईल, हें पाहणें इतकेंच त्याचें कर्तव्य होय. दया, उदारपणा वगैरे कोमल मानसिक गुणांचा राजकारणाशीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं. त्याचप्रमाणें द्वेष, मत्सरादि दुर्गुणांचाहि नाहीं. शत्रूच्या पूर्वींच्या अपकृत्यांबद्दल सूड उगविणें हें मुत्सद्याचें कर्तव्य नसून त्याच्या हातून पुन्हां तसें घडूं नये असा बंदोबस्त करणें इतकेंच त्याचें काम आहे."

( ८ )

'फ्रान्सांत लोकसत्ताक पद्धति जिवंत आहे तोंपर्यंत शांतताभंग होणार नाहीं' असें फावर पुन्हां पुन्हा निक्षून सांगतो; पण फ्रान्सचा मागचा इतिहास पाहतां या म्हणण्यावर कोणाचाहि भरंवसा बसणार नाहीं. तोंडानें शांतिसूक्तें म्हणावीं आणि संधि सांपडतांच शेजाऱ्याशीं मारामारी करावी, असा क्रम निदान चाळीस वर्षें तरी एकसारखा सुरू आहे. इ. स. १८२९ मध्यें तोंडानें शांतिरस्तु म्हणत असतां जर्मनीवर हल्ला करण्याकरतां फ्रान्सनें रशियाशीं तह केला. इ. स. १८३०त फ्रान्सांत राज्यक्रांति झाली नसती, तर रशिया व फ्रान्स यांचा दुहेरी हल्ला जर्मनीवर खास झाला असता. इ. स. १८४० मध्यें ऱ्हाईनप्रांत घशांत घालण्याची त्याची इच्छा होती, हें सर्वांस माहित आहेच. या हकीकती लक्षांत घेतल्या म्हणजे फावरच्या बोलण्याला किती किंमत द्यावी हें कोणासहि कळण्यासारखें आहे. 'लोकसत्ताक

आहे, तोंपर्यंत शांती राहील ' या फावरच्या म्हणण्यावर आमचें एकच उत्तर असें आहे कीं, फ्रान्स आहे, तोंवर युद्ध राहणारच. याकरतां मेटझ् आणि स्ट्रास्बर्ग जर्मनीला जोडण्यावांचून आम्हांस गत्यंतर नाहीं.

फ्रेंचांशीं पत्रव्यवहार करतांना आम्ही अद्यापि बादशाही मायने लिहितों, यावरून बादशहाला पुन्हां गादीवर आणण्याचा आमचा विचार आहे, असा तर्क कोणी काढतात; पण आमच्या मनांत तसा विचार मुळींच नाहीं. फ्रान्सांत अनेक पक्ष अस्तित्वांत आहेत, ते आपसांत कितीहि भांडत असले, तरी ते आमच्याशीं सारख्याच शत्रुत्वानें वागतात. त्यांचे परस्परांतील तंटे जिवंत राखणें हाच आमचा उद्देश आहे. सुरक्षितपणा असा कोणालाहि वाटूं देतां उपयोगी नाहीं. याच हेतूच्या सिद्धीकरतां बादशाही मायन्यांचा उपयोग आम्ही करीत असतों. नाहीं तर नेपोलियन काय अथवा लोकसत्ताक काय, आम्हाला दोन्ही सारखींच. फ्रान्सांत माजलेला गोंधळ आमच्या पथ्यावर कसा पडेल इतकेंच आमचें पाहणें आहे. फ्रान्सला यापुढें राज्यपद्धति कोणती असावी, हें पाहण्याचें आमचें काम नाहीं. तें फ्रेंचांनींच ठरवावें. आत्महित पाहणें एवढेंच मुत्सद्याचें काम आहे."

( ९ )

वुइलियम राजांना कांहीं वर्तमानपत्रें पहावीशीं वाटलीं; तेव्हां महत्वाच्या भागावर खुणा करून तीं आपणांस पाठवावीं, असा हुकूम त्यांनीं केला. हा हुकूम येतांच प्रिन्स मजकडे वळून हंसून म्हणाले, "तेथले चार पांच कागद घेऊन कोठें तरी लाल रेवा मारून पाठवून द्या. कोणत्या भागावर खुणा केल्या आहेत, याचा विशेष विचार करण्याचें कारण नाहीं."

( १० )

फावर आज पुन्हां प्रिन्सच्या भेटीला येऊन गेला. त्याचा चेहरा अगदीं उतरल्यासारखा दिसत होता. तो गेल्यावर प्रिन्स म्हणाले,

"त्याला फार दु:ख झालें असावे, असें मलाहि प्रथम वाटलें आणि त्याचें सांतवन करण्याचा यत्नहि मीं केला; पण त्याच्याकडे अधिक निरखून पाहतां त्याचें दु:ख केवळ नाटकी होतें, अशी माझी खात्री झाली. अशा रीतीनें नाटक करून तो मला फसवूं पहात होता. पारीस मधले वकीलहि पुष्कळ वेळां ज्यूरीसमोर रडूं लागतात. आपल्या चेहऱ्यावर दु:खाची भावना स्पष्ट दिसावी म्हणून त्यानें आपला चेहरा रंगविला असावा अशी माझी खात्री आहे. डोळ्याच्या खालच्या पापणीच्याखालीं काळसर हिरवट रंग दिला होता. कदाचित् त्याला खरोखर दु:खहि झालें असेल; पण दया आणि राजकारण यांचा अर्थाअर्थीहि संबंध नाहीं; ही गोष्ट त्याला कळत नाहीं; त्याअर्थीं तो मुत्सद्दीच नाहीं. स्ट्रास्बर्ग आणि मेट्झ् बद्दलचा ध्वनी मीं आपल्या भाषणांत काढला, तेव्हां जणूं काय मी थट्टाच करीत आहें, असें त्यानें मला दर्शविलें. त्यावेळीं बर्लिनच्या एका व्यापाऱ्यानें जें उत्तर मला एकदां दिलें होतें, तेंच मी त्याला देणार होतों. एकदां एक लोकरीचा कोट घेण्याकरतां त्या व्यापाऱ्याच्या दुकानीं मी गेलों होतों. एक कोट पसंत करून त्याची किंमत मीं त्याला विचारली, तेव्हां एक बराच मोठा आंकडा त्यानें मला सांगितला. किंमतीचा आंकडा ऐकून मला फार आश्चर्य वाटलें आणि मीं त्याला म्हटलें, 'तुम्ही थट्टा तर करीत नाहीं ना ?' तेव्हां मजकडे गंभीरपणें पाहून तो म्हणाला, " धंद्यांत मी कधींहि थट्टा करीत नाहीं!" हें उत्तर मी फावरला देणार होतों."

( ११ )

जेवणाच्या वेळीं एकदां भाषण चालतां चालतां देशभक्तीचा विषय निघाला. तेव्हां टेबलावर पडलेल्या तेलाच्या एका थेंबाकडे बोट करून प्रिन्स म्हणाले, " ज्याप्रमाणें हा तेलाचा डाग हळूहळू पसरत जातो,

त्याचप्रमाणें स्वदेशासाठीं सर्वार्पण करणें ही भावनाहि समाजाच्या तळापर्यंत पसरत जाते. पुढें पुढें कीर्तीची अपेक्षाहि नाहींशी होऊन केवळ देशासाठींच सर्वस्वाचा त्याग करणें, हेंच स्वर्गसुख आहे, असें वाटूं लागतें. या भावनेला रक्ताचें खत मिळालें म्हणजे हा वृक्ष अधिकच जोरानें फोफावतो. लेफ्टेनन्टच्या किंवा कर्नलच्या हुद्याच्या मनुष्यांतच ही भावना असते असें नाहीं, तर सामान्य शिपायांतहि ती तितकीच जोरदार असते. राष्ट्राच्या सर्व दर्जाच्या लोकांत ही भावना असते. फ्रेंच लोकांना व्यक्तिविशिष्टत्व नसल्यामुळें ते सर्व एका भावनेनें प्रेरित होतात, तेव्हांच एकादें महत्कार्य करूं शकतात. आम्हा जर्मन लोकांत प्रत्येकाला विशिष्टत्व असतें. यामुळें त्यांच्यांत फाटाफूटहि अधिक असते; पण एकाच भावनेचा पगडा पुष्कळ लोकांवर बसला, म्हणजे तेहि महत्कार्यें करतील. एकाद्या अंधाऱ्या जाग्यांत आपणास कोणी पहात नाहीं, अशा ठिकाणीं गोळी खाऊन मरण्याची छाती फ्रेंच लोकांस नाहीं. अशा रीतीनें अगदीं एकाकी असतां मरण्यास लागणारी छाती कर्तव्य तत्परतेनें उत्पन्न होत असते. अशी कर्तव्यतत्परता फ्रेंच लोकांत नाहीं. ही उत्पन्न होण्यास परमेश्वरावर भरंवसा असावा लागतो. माझें कार्य सेनापति पहात नसला, तरी परमेश्वर पहात आहे, ही भावना ज्या शिपायाच्या चित्तांत असेल, तो कोणत्याहि प्रसंगीं डगमगणार नाहीं. ”

इतक्यांत मध्येंच कोणीं प्रश्न केला, ‘ सामान्य शिपायी इतका बारीक विचार करतात, असें आपणास वाटतें काय ? ’

उत्तरः—“ विचार ? छे छे ! ते विचार करीत नाहींत. ही एक मूल भावना आहे. ही एक मनःस्थिति आहे. वाटेल तर तिला उपजत बुद्धि असें नांव द्या. मनांत विचार सुरू झाला कीं भावना मावळतात.

अमुक गोष्ट मीं कां करावीं अथवा कशी करावी, अशी वाटाघाट मनुष्याच्या चित्तांत सुरू झाली म्हणजे अखेरीस ती करण्याचें कारणच नाहीं, असा निकाल तो आपल्या मनांत देतो. परमेश्वराच्या ठिकाणीं विश्वास नसेल, तर मनुष्यांना समाजरूपानें राहतां येणार नाहीं. सर्वांचा न्यायाधीश कोणी तरी आहे, ही भावना मनुष्य जातींतून नष्ट झाली, तर मनुष्य समाजरूपानें राहणार नाहीं, आपलें कर्तव्य करणार नाहीं आणि इतरांसहि तें करूं देणार नाहीं."

( १२ )

एके वेळीं रशिया संबंधीं बोलणें निघालें असतां प्रिन्स म्हणाले, 'रशियांतील जमिनदार लोक शेतकऱ्यांना हवे तसे पिळून आपल्या तुंबड्या भरीत असतात. युसुपॉफ नांवाच्या एक जमिनदाराची मिळकत तीन वेळ जप्त झाली तरी आमच्या पुष्कळशा जर्मन संस्थानिकांहूनहि त्याजपाशीं अधिक दौलत होती. युसुपॉफच्या दौलतीचा कारभार जो गृहस्थ पहात होता, त्यानें सुमारें तीसचाळीस लाखांची कमाई केली, तरी ती गोष्ट युसुपॉफच्या समजुतींतहि आली नाहीं. यावरून त्याची दौलत केवढी असेल, याची कल्पना करा. बर्लिनच्या राजवाड्यांतहि नाहीं, एवढें मोठें माजघर त्याच्या घराला होतें; त्या ठिकाणीं रोज तीन चारशें मंडळी जेवावयास असत. एक वृद्ध लष्करी कामदार कित्येक वर्षें तेथें रोज जेवून जात असे; पण तो कोणाचा कोण याची वास्तपुस्त कोणींहि केली नाहीं. हा सगळा शेतकऱ्यांच्या रक्ताचा पैसा."

( १३ )

एके दिवशीं संध्याकाळीं मोल्टके विषयीं बोलत असतां प्रिन्स म्हणाले, "आतांशा त्याची तब्येत फारच उत्तम दिसते. इतकी टवटवी मोल्टकेच्या तोंडावर मीं यापूर्वी कधींहि पाहिली नाहीं. हा सारा युद्धाचा

परिणाम. तो त्याचा धंदाच पडला. स्पेनच्या गादीचा तंटा विकोपास जाऊं लागला, तेव्हां मोल्टकेचा चेहरा अगदीं तरुणासारखा दिसूं लागला. पुढें हा तंटा थंडावत असल्याचें मीं त्याला सांगितलें, तेव्हां पुन्हा त्याला म्हातारकळा प्राप्त होऊन तो अगदीं जर्जर दिसूं लागला; पण फ्रेंचांनीं पुन्हां उचल खातांच तो पुन्हां ताजातवाना आणि तरुण झाला. या गोष्टीचा विचार करण्याकरतां मोल्टके, रून आणि मी एकत्र जमलों आणि त्या खलबताचा अखेरचा परिणाम म्हणजे ( या ठिकाणीं प्रिन्स थोडेसे हंसले ) एम्सची तार."

( १४ )

तेरा हा आकडा आणि शुक्रवार हा दिवस या दोन गोष्टी अशुभ आहेत, असा बिस्मार्क यांचा समज होता. कोणत्याहि महत्वाच्या कार्यास ते शुक्रवारीं प्रारंभ करीत नसत. तसेंच जेवतांना पंक्तीला तेरा इसम आहेत कीं काय, हेंहि पहात. एके दिवशीं कर्मधर्मसंयोगानें आम्ही तेरा जण जेवावयास बसलों. कामाच्या धांदलींत या गोष्टीकडे प्रिन्सचें लक्ष गेलें नाहीं. ही गोष्ट माझ्या लक्षांत येऊन माझा स्नेही बुचर याला मीं ती सांगितली. तेव्हां तो हळूच मला म्हणाला, "इतक्या मोठ्यानें बोलूं नका. प्रिन्सचे कान फार तिखट आहेत. त्यांनीं हें ऐकलें, तर ताबडतोब जेवणावरून उठतील."

( १५ )

वर्तमानपत्रांत प्रिन्सच्या सांगण्यावरून जे लेख मी लिहीत असें त्याविषयीं ते एकदां म्हणाले, "डॉक्टर, इतक्या कडक रीतीनें तुम्ही कां लिहितां ? जणूं काय प्रतिपक्ष्याचें डोकेंच फोडण्याची तुमची इच्छा आहे असें दिसतें. सरकारी इतिहास लेखकाची जागा तुम्हांस हवी असेल, तर ही पद्धत तुम्हीं सोडून दिली पाहिजे. सभ्यपणाचा अति-

क्रम केव्हांहि होऊं देऊं नये. लिहिणें मुत्सद्देगिरीचें असावें. युद्ध पुकारतांना सुद्धां सभ्य भाषा वापरली जाते, हें लक्षांत असूं द्या. आपला मुद्दा सोडूं नये; पण दुसऱ्याला निष्कारण वाईट वाटेल अशी भाषाहि वापरूं नये."

( १६ )

या युद्धांत आलसे–लोरेन प्रांत जर्मनीनें आपल्या राज्यास जोडूं नयेत असें म्हणणारा एक पक्ष खुद्द प्रशियांतच निर्माण झाला होता. जेकबी या नांवाचा या पक्षाचा एक पुढारी होता. आलसे–लोरेन प्रांतांच्या बाबतींत त्यानें कांहीं गैरशिस्त बेकायदेशीर लेख लिहिल्यावरून प्रशियन सरकारनें त्याला तुरुंगांत ठेवलें. ही बातमी बोहलेन यांनीं प्रिन्स यांस सांगून म्हटलें, " या बडबडया पाजी मनुष्याला तुरुंगांत टाकलें हें बरें झालें." यावर प्रिन्स म्हणाले, " हें ऐकून मला बरें वाटत नाहीं. आपल्याविरुद्ध पक्षाचा एकादा गृहस्थ तुरूंगांत गेला, तर स्वपक्षाभिमान्याला तें कदाचित् बरें वाटेल. कारण त्याच्या वर सूड उगविला असें तो म्हणेल, पण मुत्सद्याच्या मनांत अशी कल्पना कधींच येत नाहीं. मुत्सद्यानें विकारवश केव्हांहि होऊं नये. परपक्षाला चीत करतांना सुद्धां देशाला या गोष्टीचा फायदा कितपत होईल, इतकाच विचार त्यानें केला पाहिजे."

( १७ )

जर्मनी व फ्रान्स यांजमध्यें तह घडवून आणण्याच्या खटपटींत आस्ट्रिया आहे, अशी बातमी मिळाल्यावरून बिस्मार्क यांनीं पुढील लेख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करविला. " समरांगणीं आलेल्या दोन राष्ट्रांपैकीं एक कमकुवत आणि दुसरें जोरदार असल्याचें स्पष्ट दिसत असतां तिसऱ्या राष्ट्रानें मध्यें पडण्याची खटपट केल्यास त्याचें वर्तन संशया-

स्पद आहे, असें म्हटलें पाहिजे. दोन राष्ट्रांचा सलोखा व्हावा, या सदिच्छेपेक्षां दुर्बळ राष्ट्राचें अधिक नुकसान होऊं नये या दृष्टीनें त्याचीच बाजू उचलण्याची खटपट हें तिन्हाइत राष्ट्र करीत आहे, अशी शंका घेतल्यास ती अस्थानीं होणार नाहीं. अशा रीतीनें कमकुवत पक्षास मिळून वरचढ पक्षाचें नुकसान करणें हा तटस्थ वृत्तीचा भंग होय. त्यांतून अशा प्रकारच्या तटस्थ राष्ट्रानें इतर राष्ट्रांसहि मध्यस्थी करण्याची विनंति करणें म्हणजे त्या विजयी राष्ट्राविरुद्ध गुप्त खलबतें करणें होय. आस्ट्रियाचे मुख्य प्रधान कौंट ब्यूस्ट हे अशा प्रकारच्या खटपटींत आहेत, ही बातमी खरी असेल, तर ते आपल्या कर्तव्यास चुकत आहेत, असें म्हटलें पाहिजे. ब्रीटन, इटली व रशिया या तिघांनींहि आपली तटस्थ वृत्ति आतांपर्यंत चांगली सांभाळली आहे. युध्यमान राष्ट्रांपैकीं कोणत्याहि पक्षाकडे त्यांनीं आपला स्पष्ट कल दाखविलेला नाहीं. अशा स्थितींत परोपकाराचें सोंग आणून विजयी पक्षाला नामोहरम करण्याचा प्रयत्न करणें निंद्य होय. अशा प्रकारें कोणतेंहि तटस्थ राष्ट्र असला लांडा कारभार करूं लागलें, तर त्याचें म्हणणें आम्ही कानावरसुद्धां पडूं देणार नाहीं. मेट्झ्चा गड आतां आमच्या स्वाधीन झाल्यानंतर जर्मनीची पश्चिम सरहद्द अभेद्य केल्यावांचून आम्ही राहणार नाहीं. आस्ट्रियाशीं चांगल्या प्रकारचा स्नेह संबंध असावा, असा यत्न आम्ही करीत असतां ब्यूस्ट यांच्या वर्तनानें तो आमचा यत्न निष्फळ होईल. सांप्रतच्या स्थितींत ब्यूस्ट यांच्या बळजबरीनें आम्हास फायदेशीर असा तह करून घेतां आला नाहीं, तर याचा वचपा आम्ही दुसरीकडे काढूं, हें ब्यूस्ट यांनीं ध्यानांत ठेवावयाला नको काय? फ्रेंचांची लष्करी तयारी पुन्हा पुरी व्हावयाच्या आंत या द्वेषाचें उसनें फेडल्यावांचून आम्ही राहणार नाहीं."

( १८ )

पुढील चर्चेसाठीं वेळ मिळावा म्हणून कोणत्या अटीवर युद्ध तह-कूब करतां येईल, याची वाटाघाट करण्याकरतां थियर्स आज आला होता. तो निघून गेल्यानंतर या वाटाघाटीसंबंधीं बोलत असतां प्रिन्स म्हणाले, " प्यारीसमध्यें अन्न सामग्री पुष्कळ आहे, असें भासविण्याचा यत्न थियर्स करीत होता. ही सामग्री किती आहे, याचे कांहीं आकडे तो सांगूं लागला असतां मीं मध्येंच म्हटलें, ' थांबा थांबा, याबद्दल तुमच्यापेक्षां आम्हालाच अधिक माहिती आहे. फार फार झालें तर जानेवारी अखेर पुरण्याइतकी सामग्री तुम्हापाशीं आहे. ' माझे हे शब्द ऐकतांच तो इतका कांहीं चपापला कीं कांहीं विचारूं नका. वास्तविक प्यारीस बद्दल आम्हाला माहिती कांहींच नाहीं; पण समुद्राची खोली पाहण्याकरतां मी एक बुडिद टाकला होता. "

( १९ )

आपल्या खाण्यापिण्याच्या संवयीसंबंधीं एके दिवशीं बोलत असतां प्रिन्स म्हणाले, " पुष्कळ वर्षांपासून एकदां जेवण्याची संवय मला लागली आहे. सकाळीं उठल्यावर एक पेलाभर चहा दुधाशिवाय मी घेतों. त्यावर संध्याकाळपर्यंत मी कांहीं खात नाहीं. आणि संध्याकाळीं पानावर बसलों म्हणजे मात्र अजगरासारखें खातों. त्यामुळें मग रात्रीं झोंप चांगली येत नाहीं. एकादे दिवशीं घटका अर्धी घटका डोळा लागतो न लागतो तोंच मी जागा होतों. मग नाना प्रकारचे विचार डोक्यांत घोळूं लागतात. मग मी किती तरी पत्रें लिहितों आणि सर-कारी खलितेहि लिहितों; पण मी पांढऱ्यावर काळें करीत नाहीं. लेखनाचा हा सारा कारभार डोक्यांतल्या डोक्यांत चालतो. प्रधान या [illegible]यानें माझी नुकतीच नेमणुक झाली होती. त्यावेळीं मी खरोखरच

उठून कांहींतरी खरडीत सुटे. सकाळीं उठून पहावें, तों त्यांत पुस्तकी उपदेशांपेक्षां कांहींहि नसे. व्हासिस झीटंग पत्राला अथवा आमचे सरकार वीमरचे ग्रँडड्युक यांनाच शोभण्यासारखे ते लेख होते. आतां कोणताहि विचार मनांत येऊं नये अशी खटपट मी करतों; पण माझें डोकें कांहीं थांबत नाहीं. अशा प्रकारें अनेक वेतबात चालू असतां उजाडण्याच्या सुमारास मला झोंप लागते. मग मात्र दहा अकरा वाजेपर्यंत मी जागा होत नाहीं. "

( २० )

थियर्स संबंधीं बोलतांना प्रिन्स म्हणाले, "तो हुशार आहे, स्वभावाचा गोड आहे आणि आनंदीहि आहे; पण मुत्सद्देगिरी म्हणजे काय, हें त्याला समजत नाहीं. भावनामय आणि कोंवळीं मनुष्यें मुत्सद्दी होऊं शकत नाहींत. फावरपेक्षां त्याचें अंतःकरण अधिक सुसंस्कृत आहे यांत शंका नाहीं; पण सवदा ठरविण्याच्या कामीं तें अगदीं निरुपयोगी आहे. एकाद्या घोड्याची खरेदी किंवा विक्री त्याला नीटशी करतां येणार नाहीं. तसेंच पोटाचा तो अगदींच हलका आहे. थोडासा चिमटा घेतल्याबरोबर तो सारें ओकून टाकतो. मनांत काय चाललें आहे याची छटा देखील मुत्सद्याच्या चेहऱ्यावर दिसतां कामा नये. पारीसमध्यें तीन चार आठवड्यांपुरतीच सामग्री आहे, हें मला त्याच्याकडूनच समजलें. याशिवाय आणखीहि कित्येक गोष्टी तो मजपाशीं खुशाल बडबडला. "

( २१ )

या युद्धाच्या वेळीं जर्मनींतील बरेचसे संस्थानिक स्वारीबरोबर हजर होते. ही मंडळी बहुधा आमच्या महाराजांच्या स्वारीबरोबर असे. त्यांजविषयीं बोलतांना प्रिन्स एकदां म्हणाले "आज महाराजांशीं चार

शब्द सुद्धां मला बोलतां आले नाहींत. किती तरी सरकार स्वाऱ्या कावळ्या सारख्या माझ्या भोंवतीं जमल्या होत्या. दिवसाच्या वेळीं एकादें घुबड चुकून बाहेर पडलें, म्हणजे कावळे जसे त्याला वेढून घेतात, तसें त्यांनीं मला वेढून घेतलें. लढाई ही सुद्धां एक मौजेचीच गोष्ट आहे, असें त्यांना वाटतें. केवळ तमाशा पाहण्यासाठीं ते येथें आले आहेत. आतां या घोळक्यांतून आपली सुटका कशी होणार, याची मला मोठी काळजी पडली होती. इतक्यांत कोणी बातमी आणली कीं, एका प्राचीन अभिषेकाच्या सिंहासनाची पाठ कीं तंगडी कोठेंशीं सांपडली आहे. हें ऐकल्याबरोबर आमच्या सरकार स्वाऱ्या तें कौतुक पाहण्यासाठीं धांवतच गेल्या आणि ही संधी साधून मीहि तेथून अदृश्य झालों."

तिसऱ्या नेपोलियनबद्दल त्यांनीं पुढील उद्गार काढले होते. "लोकांना वाटतें तितका तो चाणाक्ष नाहीं: इ. स. १८६६–६७ सालीं आस्ट्रियावर त्याला खचित मात करतां आली असती; पण या संधीची त्याला कल्पना सुद्धां आली नाहीं, एकंदरींत त्याच्या डोक्यांत सारा ब्रह्मघोंटाळा आहे."

( २२ )

प्रिन्स यांच्या पत्नीकडून त्यांस आलेल्या पत्रांतील एक पुढील उतारा बिस्मार्क यांनीं वाचून दाखविला. "फ्रान्सांत बायबलाची एकादी प्रत तरी तुम्हांस मिळेल कीं नाहीं याची मला शंकाच आहे. फ्रेंच लोक परमेश्वराचें अस्तित्व देखील विसरले आहेत. बायबलांतील पुढील अर्थाचें स्तोत्र त्यांना वाचून दाखवावें. 'मी तुला सांगतों, कीं जे परमेश्वराला विसरले आहेत, त्यांचा नाश होईल.' फ्रेंचांबद्दल हें भविष्य बायबलांतच आहे."

( २३ )

एकदां आपल्या तरुणपणच्या कांहीं हकिकती सांगत असतां प्रिन्स म्हणाले, "आपला मेंदू आणि विचारशक्ति, यांचा संबंध किती निकट आहे, हें बऱ्याच वर्षांपूर्वी एकदां माझ्या अनुभवास आलें. एकदां घोड्यावरून मी घरीं येत असतां माझा घोडा बुजून पुढच्या दोन तंगडयांवर उभा राहिला. त्याबरोबर मी धाडकन् खालीं पडलों. पडतां क्षणींच मी बेशुद्ध झालों. थोड्या वेळानें मी शुद्धीवर आलों, तेव्हां कांहीं बाबतींत माझी विचारशक्ति अगदीं शाबुत असून कांहीं बाबतींत मात्र तिनें मला अगदीं सोडलें असल्याचें आढळून आलें. घोड्याला कोठें लागलें आहे कीं काय, हें मी अगदीं स्वस्थ चित्तानें तपासलें; तेव्हां त्याला कोठें लागलें नसून खोगीर मात्र फाटून गेल्याचें दिसलें. तेव्हां मोतद्दाराला हाक मारून मी त्याच्या घोडयावर बसलों आणि घरीं आलों. दरवाजाजवळ येतांच घरांतलीं कुत्रीं रोजच्या चाली प्रमाणें आनंदानें भोंकत व उड्या मारीत पुढें आलीं. तेव्हां दुसऱ्या कोणाचीं कुत्रीं मला चावण्यासाठीं येत आहेत, असें वाटून मी चाबूक घेऊन त्यांस पिटाळून लावलें. घरांत येऊन 'मोतद्दार घोड्यावरून पडला आहे' असें म्हणून त्याला आणण्यासाठीं डोली घेऊन जा, असें नौकरांस मी सांगूं लागलों; पण खरी हकीकत त्यांना कळली असल्यामुळें ते जागचे हलेनात. हें पाहून मला विलक्षण संताप आला. 'तो भर रस्त्यांत पडला आहे,' असें मीं त्यांना परोपरीनें सांगितलें. मी स्वतः घोड्यावरून पडल्याचें स्मरणच जणूं काय मला राहिलें नाहीं. कांहीं वेळानें मी व मोतद्दार असे दोघेहि घोड्यावरून पडलों, असें मला वाटलें. अखेरीस कांहीं थोडें खाऊन मी झोंपीं गेलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझी प्रकृति नेहमीं सारखी झाली. ही हकीकत मोठी चम-

त्कारिक आहे. आपल्या मेंदूंत जणूं काय निरनिराळे खण असून त्यांत निरनिराळे विचार रहात असावेत. मी शुद्धीवर आल्यानंतर खोगीर फाटलें आहे, वगैरे गोष्टी मला बरोबर समजल्या आणि दुसऱ्या कांहीं गोष्टींचा उमज मुळींच पडेना. डोक्याला लागलेल्या धक्क्यामुळें डोक्यांतला एकादा खण जणूं काय एकदम घट्ट बसला आणि तो उघडावयास इतरांपेक्षां अधिक वेळ लागला."

( २४ )

जर्मनीच्या कैदेंत पडलेला नेपोलियन पुन्हां फ्रान्सच्या गादीवर येण्याचा संभव आहे, अशा आशयाचा एक लेख इंन्डिपेन्डन्स् बेल्ज पत्रांत कोणीं लिहिला होता. त्यावर चर्चा चालली असतां प्रिन्स बिस्मार्क म्हणाले, "नेपोलियनला अजून अशी आशा आहे, हें खरें आणि ही गोष्ट अगदीं अशक्य आहे, असेंहि नाहीं. आमच्याशीं त्यानें आतां तह केला, तर आमच्या कैदेंत असलेल्या सैन्यासह आमच्या संगनमतानें पारिसमध्यें तो पुन्हा कदाचित प्रवेश करूं शकेल. फ्रान्सांत शांतता ठेवण्यासाठीं दोन लक्ष माणसें बस होतील. लोकसत्ताकाचे पुढारी दंगाधोपा करूं लागले, तर तोफ चालू करून त्यांचीं तोंडें बंद पाडण्यास फारसा अवकाश लागणार नाहीं."

( २५ )

क्रिमियन युद्धाच्या अखेरीस जो तह झाला होता, त्यांतील कांहीं कलमांबद्दल या वेळीं आक्षेप घेऊन रशियानें बरीच गडबड उडविली होती. रशियाची ही कृति अन्याय्य आहे, असा आक्षेप इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉर्ड ग्रेनव्हील यांनीं घेतला. अशा रीतीनें तहाचीं कलमें वाटेल तेव्हां मोडतां येऊं लागलीं, तर भावी शांतीबद्दल कसलाच भरंवसा राहणार नाहीं, असें ग्रेनव्हील म्हणाले. ही हकीकत बिस्मार्क यांस समजली,

तेव्हां ते म्हणाले, " ग्रेनव्हीलचा रोंख भावी गोष्टीबद्दल आहे, इतकेंच ना ? मग आतांच-ते कांहीं भानगड उपस्थित करतील असें दिसत नाहीं. एकाद्या मुत्सद्याला कांहीं करावयाचें नसलें, म्हणजे पार्लमेंटाच्या समजुतीसाठीं तो अशींच भविष्य काळचीं भविष्यें करीत असतो. अर्थात् या बाबतींत इंग्लंडकडून सध्यांच कांहीं घोंटाळा होईल, अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. या बाबतींत गारशकॉफचें धोरण अगदीं चुकलें असें मला वाटतें. परकीय राष्ट्रांना धमक्या देत बसणें आणि त्याप्रमाणें कांहींच न करणें हें आपणांस मोठ्या मुत्सद्दी म्हणविणाऱ्या गारशकॉफला शोभत नाहीं. कसलीहि बडबड न करतां काळ्या समुद्रांतलें आरमार त्यानें वाढविलें असतें, तर या बाबतींत त्याला कोणीं प्रश्नहि विचारला नसता. बऱ्याच काळानें असा प्रश्न कांहीं राष्ट्रांनीं उपस्थित केलाच असता, तर या प्रकरणाची चौकशी चालू आहे, अशा सबबीवर कांहीं वर्षें त्याला सहज काढतां आलीं असतीं. कांहीं काळानें असल्या गोष्टी लोकांच्या ध्यानांतून आपोआप जातात आणि मग तुमचा चालू वहिवाटीचा हक्क स्थापित होतो. "

( २६ )

एके वेळीं नाणेबाजारांत चालणाऱ्या सट्टयाविषयीं बोलणें निघालें असतां प्रिन्स म्हणाले, " राजकीय भानगडीची जेवढी माहिती एकाद्या मुत्सद्यास असते, तेवढीचा उपयोग करून तो सट्टे करूं लागला, तर त्याचा कांहीं फायदा होईल असें मला वाटत नाहीं. एक असें कीं, या बाबींतलें त्याचें ज्ञान फार अपुरें असतें. दुसरें असें कीं जे प्रकार पुढें घडतील, असें त्याला माहीत असतें, ते केव्हां घडणार याची नक्की तारीख त्याला सांगतां येणें शक्य नसतें. राजकीय उलाढाली आज होऊन गेल्या म्हणजे पुढें कांहीं काळानें सराफ कट्टयावर त्याचे

परिणाम होतात. आतां सराफ कट्ट्यावर कांहीं वटघट घडवून आणण्याकरतांच एकाद्या मुत्सद्यानें खटपट केली, तर मात्र त्याला बराच द्रव्यलाभ होण्याचा संभव आहे, हें खरें; पण असलें कृत्य त्याच्या उच्चस्थानाला काळिमा लावणारें आहे. फ्रेंच प्रधान ग्रॅमांट यानें असेंच कांहीं केलें असल्याचें ओडोसेलनें मला सांगितलें. अशा रीतीनें एका दिवसांत त्यानें आपली तिजोरी दुप्पट केली. कदाचित् याच उद्देशानें त्यानें हें युद्ध घडवून आणलें असावें, असेंहि मी म्हणेन. अशाच रीतीनें दुसऱ्या एका मुत्सद्यानें आपल्या एका प्रिय पात्राच्या नांवानें सराफ कट्ट्यावर असेच उपद्व्याप केले; पण पुढें ही गोष्ट उघडकीस आल्यामुळें विष खाऊन त्यानें आत्महत्या केली. आतां अशा प्रकारचा प्रत्यक्ष अप्रामाणिकपणा न करतांहि दुसऱ्या मार्गानें सराफ-कट्ट्याचा फायदा घेतां येईल. पण कांहीं झालें तरी मुत्सद्याच्या पद-वीला ही गोष्ट शोभण्यासारखी नाहीं. आपल्या वडिलांनीं असल्या चोरट्या मार्गानें घर भरलें, असें म्हणण्याचा प्रसंग आपल्या मुलांबाळां-वर येणें इष्ट नाहीं. यापेक्षां लग्नांत श्रीमंत नवरी मुलगी बघून पुष्कळसा हुंडा घेतलेला काय वाईट?"

( २७ )

पारीस शहरावर तोफा लावण्याचें काम विलक्षण दिरंगाईवर पडलें होतें. यामुळें प्रिन्स फार संतापून गेले. या प्रश्नाची वारंवार चर्चा होत असे. अशाच एका चर्चेच्या प्रसंगीं ते म्हणाले, "अशा रीतीनें हें काम दिरंगाईवर पडणें अत्यंत अनिष्ट आहे; पण आमचे महाराज आणि युवराज यांचे कान त्यांच्या बायकांच्या हातांत सांपडल्यामुळें माझा नाइलाज झाला. अशा रीतीनें आठवड्याच्या आठवडे पारीस बाहेर माशा मारीत बसण्यानें लष्कराचा निष्कारण खराबा होतो, ही

गोष्ट या राण्यांच्या लक्षांत कशी येत नाहीं, याचेंच मला मोठें नवल वाटतें. माझे शत्रू माझ्या समोर असते, तर केव्हांच मी त्यांचा फडशा पाडला असता; पण या गुप्त शत्रूसमोर माझा कांहीं इलाज चालत नाहीं. या लोकांना जर्मन साम्राज्य आणि जर्मनांनीं गाजविलेला अतुल पराक्रम यापेक्षां इंग्रजी वर्तमानपत्रांतल्या कोरड्या स्तुतिस्तोत्राची किंमत अधिक वाटते."

( २८ )

क्रिमियन युद्धाच्या वेळीं झालेल्या तहांतील कांहीं अटींवर हरताळ फासण्याची खटपट रशियन प्रधान गारशकॉफ यांनीं केली होती. या बाबींत आपल्या बाजूचें म्हणणें झार यांस स्पष्ट कळवावें अशा अर्थाचा निरोप बिस्मार्क यांस वुइलियम राजाकडून आला, तेव्हां प्रिन्स म्हणाले, "आतां अधिक डवचण्यांत कांहीं हांशील आहे, असें मला वाटत नाहीं. या बाबींत किती तरी तारा आणि पत्रव्यवहार झाला आहे. आतां पिटर्सबर्गला कांहीं लिहावयाचेंच असलें, तर तें गोड आणि मृदु शब्दांनींच लिहिलें पाहिजे. तत्रापि या बाबींत आज मूग गिळून बसणेंच इष्ट आहे. आतां लवकरच रशियाच्या स्नेहभावाची गरज आपणांस लागणार आहे. आपला हात दगडाखालीं आहे, तोंवर रशियाला डवचून उपयोग नाहीं. हेंच इंग्लंड असतें, तर इतका विचार करण्याचें प्रयोजन नव्हतें. आपण मोकळें झाल्यानंतर मग थोडाबहुत उद्धटपणा दाखविल्यास चालेल; पण तोंपर्यंत तरी रशियाला गोंजारून ठेवणेंच इष्ट आहे."

( २९ )

फ्रेंचांना मदत करावी, असें म्हणणारा एक पक्ष आस्ट्रिया-हंगारींत यावेळीं निर्माण झाला होता. हा पक्ष संख्येनें मोठा नव्हता; तथापि तो वजनदार होता. प्रशियानें इ. स. १८६६ च्या युद्धांत आपला

मोड केला, त्याचें उसनें या वेळीं फेडावें आणि फ्रान्सवर आलेल्या प्रसंगांत त्याला साहाय्य केल्याबद्दल मानहि मिळवावा असा या पक्षाचा हेतु होता. याबद्दल एकदां बोलणें निघालें असतां प्रिन्स म्हणाले, "हें ऐकून मला एस्टरहेझी नांवाच्या एका कुटुंबाची आठवण होते. या कुटुंबाचा जमीनजुमला मोठा आणि त्याजवळ सोनेंनाणेंहि पुष्कळ होतें. वास्तविक पहातां साधारण चांगल्या लौकिकानें राहण्यास त्याला हरकत नव्हती; पण खोट्या मानपानाचा समंध या कुटुंबाच्या मानेवर बसला. मोठमोठ्या सरदारांना आणि राजकुमारांना मेजवान्या द्याव्यात, मोठाल्या घोडशाळा बांधाव्यात आणि हिऱ्यामोत्यांचा झगझगाट दाखवून लोकांना दिपवून टाकावें, असा क्रम त्यानें चालविला. या खुळामुळें तें कुटुंब अखेरीस धुळीचे दिवे खात गेलें. आस्ट्रिया-हंगारींतला हा पक्ष खोट्या मानाच्या भरीं पडून आपल्या साम्राज्याला असेंच धुळीस न मिळवो म्हणजे झालें. आस्ट्रिया देश स्वभावतःच चांगला सुपीक आहे. खनिज पदार्थांची संपत्ति तेथें विपुल आहे; पण त्याचे मालक एस्टरहेझीप्रमाणें वागत आहेत. आपल्या ठिकाणीं असलेल्या खऱ्या योग्यतेहून अधिक योग्यतेचा आभास लोकांस दाखविण्याची वेडी हांव त्यांच्यांत शिरली आहे. प्रत्येक राष्ट्रानें आपली खरी योग्यता वाढवावी. केवळ मोठ्या योग्यतेचा आभास उत्पन्न करण्याच्या भरीस पडूं नये. नाहीं तर आवांक्याबाहेर उडी मारावयाला लागून दांत पडण्याचा प्रसंग येतो. इतर लोकांना लुबाडून हॅप्सबर्ग घराणें श्रीमंत झालेलें आहे. एकादा गुप्त पोलीस संशयित लोकांना लुबाडून जसा गबर होतो, तसेंच हें हॅपस्बर्ग घराणें आहे."

( ३० )

बर्लिनमध्यें एकदां बंड झालें होतें. तेव्हां पॉटस्ड्यामच्या राजवाड्यांत जनरल मोलेनडॉर्फ, राजा, बिस्मार्क व इतर कांहीं मुत्सद्दी इतकी

मंडळी जमली होती. राजाच्या भित्रेपणामुळें व अनिश्चित स्वभावामुळें बंड मोडण्याचा निश्चित मार्ग कोणताच ठरेना. या प्रसंगाची हकीकत सांगत असतां प्रिन्स म्हणाले, "मोलेनडॉर्फ यानें बंडखोरांच्या हातचा इतका मार त्या दिवशीं खाल्ला होता कीं, त्याला जागचें हालवतहि नव्हतें. ज्याला जी युक्ति सुचेल, ती तो सुचवीत होता. पण निश्चय असा कांहींच ठरेना. मी पियानोजवळ बसलों होतों, तेव्हां सहजगत्या कांहीं पड्यावरून हात फिरवून पायदळ पलटणीच्या हल्ल्याचे सूर मीं वाजविले. ते सूर ऐकल्याबरोबर वृद्ध मोलेनडॉर्फ मजजवळ येऊन म्हणाला, 'समजलों. बर्लिन शहरावर हल्ला चढविला पाहिजे.' ही युक्ति बहुधा सर्व मंडळीला मानवली; पण राजेसाहेब तितके धीट नसल्यामुळें ती अमलांत आली नाहीं."

( ३१ )

बिस्मार्क वकिलाच्या नात्यानें रशियांत कांहीं दिवस होते. तेथला अनुभव सांगत असतां एक पुढील मजेदार हकीकत त्यांनीं सांगितली. "रशियांत जळाऊ लाकडांची देखील विलक्षण महागाई. एकेवेळीं बंदरांतल्या एका बोटीवर जळाऊ लांकडांचीं ओझीं मीं पाहिलीं. किंमत विचारतां बोटवाल्यानें मला बेताचा आंकडा सांगितला. त्या किंमतीला तीं घेण्यास मी तयार झालों, तेव्हां तीं 'कोणा सरकारी अम्मलदारासाठीं पाहिजेत कीं काय?' असा प्रश्न त्यानें मला विचारला. तेव्हां जर्मन वकिलातीसाठीं तीं हवींत असें सांगून कांहीं वाहन शोधण्यासाठीं मी परत गेलों. थोड्या वेळानें बंदरावर येऊन पाहतों, तों बोट केव्हांच अदृश्य झाली होती. आजुबाजूंच्या लोकांस विचारतां ते म्हणाले, 'तुम्ही कोणी सरकारी कामगार असाल, असें समजून बोटवाले पळून गेले. प्रथम किंमत ठरवावी आणि मग लाकूडवाल्यांवर चोरीचा अथवा

दुसरा कसला आरोप ठेवून त्याला पैशाशिवाय तसाच परत लावावा, असला येथल्या अधिकाऱ्यांचा धंदाच आहे.' ही हकीकत ऐकून रशियन सरकारी अधिकाऱ्यांबद्दल मला काय वाटलें असेल याचा तुम्हीच विचार करा."

( ३२ )

निरनिराळ्या देशांच्या सरकारी वकिलांचे पगार काय असतात, या संबंधानें कोणीं पृच्छा केली असतां, प्रिन्स यांनीं पुढील माहिती सांगितली. " सगळ्या राष्ट्रांत आमचें प्रशियन सरकार अगदीं भिकार. आपला खर्च भागवितां भागवितां आमच्या वकिलांच्या नाकीं नव येतात. आमच्या येथल्या इंग्रज वकिलाला त्रेसष्ट हजार थेलर पगार आहे. रशियन वकिलाला चवेचाळीस हजार आहे. याशिवाय त्यांनीं कांहीं मेजवान्या दिल्या किंवा बॉल केले, तर त्याचा खर्च अलाहिदा मिळतो; पण आमच्या वकिलाला पगार सारा दहा हजार असून त्यांतच सर्व खर्च त्यानें केला पाहिजे."

( ३३ )

पारीस शहराला तोफ लावण्या संबंधीं मधून मधून चर्चा होतच होती; एके दिवशीं महाराजांची मुलाखत घेऊन परत आल्यावर प्रिन्स म्हणाले " आज महाराजांनीं एक थाप मारली. पारीसवर तोफ लागणार कीं नाहीं ? असा प्रश्न मीं त्यांस केला. तेव्हां ' तसा हुकूम आधींच दिला आहे, ' असें उत्तर त्यांनीं दिलें; पण हें खरें नसल्याचें मीं त्यांच्या चेहऱ्यावरून तेव्हांच ताडलें. त्यांचा स्वभाव मला पुरा माहित आहे. त्यांना बेमालुम खोटें बोलतां येत नाहीं. एकादे वेळीं कांहीं प्रसंगीं त्यांनीं कांहीं खोटें सांगितलेंच, तर त्यांचा चेहरा तावडतोब गोरामोरा होतो. या प्रसंगींहि तसेंच झालें. "

( ३४ )

फ्रँकफूर्ट येथील आपल्या आठवणी एकदां सांगत असतां प्रिन्स म्हणाले, “ आस्ट्रियाचा प्रतिनिधि थून हा चांगला गृहस्थ होता. त्याजबरोबर कामकाज करणें मला फारसें जड गेलें नाहीं. रेचबर्गहि फारसा वाईट मनुष्य नव्हता; पण तो अत्यंत रागीट आणि कोणाचेंहि न ऐकणारा असा होता. खायचे दांत एक व दाखवायचे वेगळे हा प्रकार आस्ट्रियन मुत्सद्देगिरींत त्या काळीं पक्का होऊन बसला होता, त्यामुळें रेचबर्गलाहि असेंच दुटप्पी वर्तन करणें भाग पडे. राजधान्यांतून कित्येक वेळां त्याला एकाच गोष्टीबद्दल परस्पर विरोधी पत्रें येत. एकेवेळीं बर्लिनशीं आपला स्नेहसंबंध कायम राखावा अशा अर्थाचें एक पत्र व्हियेन्नाहून त्याला आलें होतें. आणि त्याच टपालानें दुसरें पत्र अगदीं विरुद्ध मजकुराचें आलें होतें. त्या दिवशीं मी सहजगत्या त्याजकडे गेलों असतां बोलण्याच्या भरांत भान न राहून त्यानें तें दुसरें पत्र मला वाचावयास दिलें. तें वाचून पाहातांच सारी हकीकत माझ्या लक्षांत आली. नंतर तें पत्र मी त्याच्या हातीं परत देऊन म्हटलें, ‘ माफ करा. आपण भलतेंच पत्र मला वाचावयाला दिलें.’ ही चूक लक्षांत येतांच तो बिचारा अगदीं गांगरून गेला. तेव्हां मी त्याला म्हटलें ‘ भिण्याचें कांहीं कारण नाहीं. चुकीमुळें माझ्या हातीं आलेल्या या माहितीचा मी दुरुपयोग करणार नाहीं. ’ तिसरा आस्ट्रियन प्रतिनिधि प्रोकेश हा तर धडधडीत लुच्चा होता. खोटें बोलण्याची त्याला बिलकुल दिक्कत वाटत नसे. एके वेळीं आस्ट्रियन दरबारानें केलेल्या एका गोष्टी संबंधीं मंडळींत चर्चा चालू होती. त्या बाबींत आस्ट्रियानें खऱ्या वस्तुस्थितीकडे लक्ष पुरविलेलें नव्हतें. आस्ट्रियन दरबारानें या कामीं चूक केली आहे, असें कोणीसें म्हणतांच सर्व मंडळीला ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें प्रोकेश

म्हणाला. 'मी म्हणतों हें खरें नसेल, तर आस्ट्रियन दरबारानें खोटें बोलण्याचें पातक मला जाणून बुजून करावयाला लावलें असें होईल. फार काय, पण खुद्द आमचे बादशहाच खोटें बोलतात असें होईल.' त्याचें भाषण संपतांच मीं म्हटलें, "होय साहेब, या वेळीं आपण अगदीं बरोबर बोललांत." माझें उत्तर ऐकतांच त्याचा चेहरा अगदीं उतरून तो सर्वांकडे डोळे फिरवून पाहूं लागला. माझ्या उलट कोणी तरी बोलेल अशी त्याला आशा होती; पण तसें कांहींच न झाल्यामुळें माझें उत्तर सर्वांच्या पसंतीस पडलें, असें दिसलें. तेव्हां दारूनें भरलेला एक ग्लास हातांत घेऊन मजकडे येऊन तो म्हणाला, 'आतां आपण तह करूं या.' मीं उत्तर दिलें, 'अर्थात भांडण्याचें कारणच नाहीं. मात्र आस्ट्रियन खलित्यांतलीं तेवढीं वाक्यें काढून टाका म्हणजे झालें.' ही गोष्ट कबूल करून त्यानें तीं वाक्यें काढून टाकलीं. यावरून मूळ खलित्यांतलें तें विधान धडधडीत खोटें होतें, असें त्याच्याच तोंडानें सिद्ध झालें."

( ३५ )

एके दिवशीं बोलतां बोलतां कशावरूनसा सोकाजींचा विषय निघाला. तेव्हां प्रिन्स म्हणाले, "खेड्यापेक्षां शहरांतच असल्या अक्कडबाजांची वस्ती अधिक असते. अशा प्रकारचे लोक नेहमीं बहुधा शहरांत राहतात. विटा आणि दगड यावांचून दुसरा कोणताहि पदार्थ त्यांच्या डोळ्यांना दिसलेला नसतो. आपल्या शहराबाहेरचें जग ही कशी वस्तु असते, हें त्यांना ठाऊक नसतें. असले लोक लंडन, पॅरीस, बर्लिन येथें किती तरी आहेत. लंडनमध्यें तर असे लक्षावधी लोक आहेत. हे लोक कूपमंडूकाप्रमाणें असल्यामुळें स्वतःच्या मोठे-पणाच्या विलक्षण कल्पना यांच्या डोक्यांत भरलेल्या असतात. हे लोक

नुसतेच मूर्ख असते, तरी पुरवतें. पण ते मूर्ख, डौली, आणि गर्वानें ताठलेले असतात. खेडवळ लोकांना व्यवहारांत जें चातुर्य येतें तें यांच्या गांवींहि नसतें. खेडवळांना पुस्तकी विद्या कमी असली, तरी संसार-दक्षता आणि व्यवहारचातुर्य अधिक असतें. सृष्टिदेवतेच्या सान्नि-ध्यामुळें त्यांची दृष्टि उदार आणि विस्तृत झालेली असते. यामुळें त्यांच्या आंगीं जी माणुसकी असते, ती शहरवासीयांच्या आंगीं दिसत नाहीं."

( ३६ )

" सध्यांचे बादशहा ( पहिले वुइल्यिम ) जुन्या पिढींतले असल्या-मुळें त्यांच्या कल्पना चालू काळाला पटण्यासारख्या नाहींत; तथापि त्यांच्या ठिकाणीं स्वकर्तव्याची जाणीव इतकी तीव्र आहे कीं, राज्य-रक्षणासाठीं स्वतःच्या देहाचे तुकडे झाले, तरी ती गोष्टसुद्धां ते आनं-दानें करतील. आमचे भावी महाराज अशा प्रकारचे नाहींत. खर्चा-वयाला पुष्कळ पैसा आणि व्यत्यय न येतां चैन चालली म्हणजे ते खुश असतात. त्यांतून वर्तमानपत्रांनीं स्तुति केली, म्हणजे तर त्यांना आतोनात आनंद होतो."

( ३७ )

सुप्रसिद्ध इंग्रज ग्रंथकार टामस कार्लाइल यानें तारीख १८ नोवेंबर-च्या टाइम्सच्या अंकांत प्रसिद्ध केलेलें पुढील पत्र फार मननीय आहे.

" आपला शत्रू चीत झाला आहे, त्याअर्थीं आतां औदार्यानें त्याला क्षमा करावी कीं काय, हा सध्यांचा प्रश्न नसून तो दूरदर्शित्वाचा आणि व्यवहाराचा प्रश्न आहे. जमिनदोस्त दिसत असलेला सध्याचा शत्रू पुन्हां पायावर उभा राहिला, तर काय करील, याचा विचार जर्मनीनें अवश्य करावयाला पाहिजे. गेल्या चारशें वर्षांचा जो अनुभव

जर्मनींच्या चित्तावर पक्का कोरला गेला आहे. तो अनुभव जर्मनी विसरून गेला असेल, असें म्हणतां येत नाहीं. हा अनुभव इंग्रज राष्ट्राला नाहीं. त्याची गोष्ट इंग्रज राष्ट्रानें कधीं काळीं कर्णोपकर्णीं ऐकली असेल, तर त्या गोष्टीचें त्यांना आतां विस्मरण पडलें असेल. फ्रान्स इतका वाईट शेजारी जर्मनी शिवाय दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राला मिळाला नसेल. हा शेजारी एखाद्या दुसऱ्या गोष्टींतच वाईट आहे, असें नाहीं, तर सर्व गोष्टींनीं तो वाईट आहे. तो पहिल्या प्रतीचा उद्दाम असून भूमितृष्णा त्याच्या हृदयांत एकसारखी जळत आहे. आपल्या शेजाऱ्यावर तुटून पडण्याचा उद्योग चारशें वर्षें तो करीत आहे. असल्या शत्रूपासून स्वतःचें संरक्षण यापुढें करण्याचा उद्योग जर्मनी न करील, तर तें राष्ट्र खरोखर मूर्ख आहे, असें मी निःसंशय समजेन. या संधीचा उपयोग जर्मनीनें न केला, तर त्याची गणना खरोखरच मूर्खांत केली पाहिजे. फ्रान्सनें लुटून नेलेला आपला माल परत मिळविण्याची संधि एकाद्याला प्राप्त झाली असतां, फ्रान्सनें तो देऊं नये, अशा अर्थाचा एकादा सृष्टीचा, परमेश्वराचा अथवा एकाद्या पार्लमेंटाचा कायदा अस्तित्वांत असलेला, मला माहीत नाहीं. ऑलसे लोरेन प्रांत गेले, तर आमचा मानभंग होतो, अशी ओरड फ्रान्सचें चालविली आहे आणि आजूबाजूचे प्रेक्षक 'फ्रान्सचा अपमान करूं नका' असें गयावया करून सांगत आहेत; पण शेजाऱ्याच्या घरावर दगड फेंकून जीं तावदानें फ्रान्सनें फोडलीं त्यांची किंमत भरून न देण्यानें फ्रान्सचा मान उज्वल राहील काय ? अशा प्रकारें शेजाऱ्याच्या घरावर दगड फेंकणें हाच फ्रान्सच्या मानाला मोठा कालिमा आहे. जर्मनीनें कोणतीहि कुरापत काढली नसतां त्याजवर निष्कारण तुटून पडणें, ही गोष्ट कोणत्याहि राष्ट्राला लांछनास्पदच झाली असती. मग फ्रेंचांनाच असली गोष्ट लाजि-

खाणी कां होऊं नये ? आतां पश्चात्तापानें शुद्ध होऊन असली निष्कारण आगळिक पुढें कधींहि न करण्याचा निश्चय फ्रान्सनें केला, तरच त्याचा पूर्वीचा मान कायम राहण्याचा संभव आहे. तापानें फणफणलेला मनुष्य वायूच्या लहरींत जशी बडबड करतो, तशी सध्यांची फ्रान्सची बडबड आहे. त्याची बडबड ऐकून कोणाहि त्रयस्थांस त्याची दया येईल; पण ही दया करण्यासारखीहि गोष्ट नाहीं. त्याबद्दल सध्यां कोणी तिरस्कार दर्शविला, तरीहि तें वावगें होणार नाहीं. धडधडीत समोर असलेली वस्तुस्थिति दृष्टि आड करण्याचा यत्न फ्रान्स करीत आहे. जी शिक्षा त्यानें आपल्या हातानें आपणावर ओढून घेतली आहे, तीपासून तो देश पळूं पहात आहे. त्या देशाला सध्यां कोणीच त्राता उरलेला दिसत नाहीं. चोहोंकडे अंदाधुंदी माजली असून धनी कोण आणि चाकर कोण, हेंच कोणाला समजेनासें झालें आहे. आपणास प्रधान म्हणविणारीं माणसें फुग्याच्या विमानांत बसून काल्पनिक जयांच्या खोट्या नाट्या बातम्या लोकांना सांगण्यावांचून दुसरें कांहींच करीत नाहींत. असल्या असत्याच्या जोरावर सध्यांचें फ्रेंच सरकार आपला जीव जगवूं पहात आहे. सध्यां होणारा वृथा रक्तपात बंद न करतां चालू ठेवावा, अशीच त्याची इच्छा दिसते. आपल्या हातच्या राज्याच्या दोऱ्या सोडण्यापेक्षां रक्तस्राव झालेलाहि त्यांना चालतो. असल्या प्रकारच्या फसवणुकीचें जें वर्तन फ्रान्सच्या सध्यांच्या सरकारनें चालविलें आहे, तें पाहून आश्चर्यानें मन थक्क होतें आणि भावी काळाबद्दल भीतीहि वाटते; पण हें दुटप्पीपणाचें व असत्याचें साम्राज्य फ्रान्समध्यें आजच माजलें आहे, असें नसून तें बरेंच दीर्घ कालीन आहे, ही गोष्ट खुद्द फ्रेंच लोकांच्याहि लक्षांत आलेली नाहीं, हें पाहून मला अत्यंत खेद होतो. पूर्वीं कांहीं होऊन गेलेले व

सध्यां जिवंत असलेले विशाल बुद्धिक म्हणून नाणावलेले पुरुष जीं कांहीं कृत्यें आज करीत आहेत व जीं त्यांनीं पूर्वी केलीं, तीं पाहून मला सखेद आश्चर्य वाटतें. हें चिन्ह फ्रान्स देशाला बऱ्याचें नाहीं, स्वतः असें मनांत येऊन कोणालाहि वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. शिवाय बाकीचीं सारीं राष्ट्रें अंधारांत बुडालीं असून फ्रान्स देशांत नवा ज्ञानसूर्य उदय पावत आहे, असा भ्रम फ्रान्सला झाला आहे. गेलीं पन्नास वर्षें मनुष्य जातीला अत्यंत कल्याणकारक म्हणून जीं तत्वें फ्रेंच साहित्य जगापुढें मांडीत आहे, त्यांत वातविकृतीच्या बडबडीशिवाय दुसरें कांहींहि नाहीं. या तत्वांनीं मनुष्य जातीचें कल्याण न होतां अकल्याण मात्र हटकून होईल. मनुष्य जातीनें या तत्वांचें ग्रहण केल्यास ती रसातळास मात्र खचित जाईल. ऑलसेस लॉरेन प्रांत बिस्मार्क यांस मिळालें, तर त्यांत जर्मनीचेंच बरें आहे, असें नाहीं, तर तें आम्हांला, साऱ्या जगाला व कालेंकरून खुद्द फ्रान्सलाहि कल्याणकारक होईल. ज्या गोष्टीनें जर्मन राष्ट्राचेंच नव्हे, तर सर्व मानवजातीचें कल्याण होणार आहे, ती गोष्ट बिस्मार्क हळू-हळू सिद्ध करीत आहेत, असें मला वाटतें. युरोपखंडांत फ्रान्ससारख्या उडावू, दुरभिमानी, नाटकी, भांडखोर, अतृप्त आणि मनस्वी राष्ट्राचें वर्चस्व असण्यापेक्षां उदारधि, शांत, गंभीर आणि खोल बुद्धीच्या एकीकृत जर्मन राष्ट्रांचें वर्चस्व माझ्या दृष्टीसमोर स्थापन होत आहे, हें भावी काळाचें मोठें आशादायी चिन्ह आहे, असें मला वाटतें."

( ३८ )

फ्रँको जर्मन युद्ध सुरू होण्यापूर्वी एम्स येथें काय भानगडी झाल्या, याची हकीकत सांगत असतां प्रिन्स म्हणाले, "त्या वेळचें राजेसाहेबांचें धरसोडीचें वागणें मला पसंत पडलें नाहीं. व्हार्जिन येथें मला

पहिली तार पोहोंचली, तेव्हां मी फिरावयास गेलों होतों. त्या तारेचें उत्तर देऊन मी ताबडतोब बर्लिनला यावयाला निघालों. बर्लिनला पोहोंचण्यापूर्वींच माझ्या तारेचें उत्तर आलें असेल, असें मला वाटत होतें; पण मी येईपर्यंत उत्तर आलें नव्हतें. मध्यंतरीं मोल्टके व रून यांस मीं आपल्या घरीं जेवावयास बोलाविलें. त्यांवेळीं राजकीय परिस्थिति अधिकाधिक बिकट होत चालल्यामुळें त्या बाबींत त्या दोघांचें मत घेणें मला अवश्य वाटलें. आमचें जेवण सुरू असतांच एम्स येथून एक लांबलचक तार येऊन धडकली. ती सुमारें दोनशें शब्दांची तार मी वाचून दाखवितांच ते दोघेहि फार खिन्न व भयभीत झाल्याचें दिसलें. मोल्टकेचा चेहरा तर ओळखूं येईनासा झाला. तो एकाएकीं वृद्ध दिसूं लागला. आमचे महाराज अखेरीस अवसानघात करतात कीं काय अशी भीति आम्हांस पडली. युद्धाचा प्रसंग आलाच, तर जयापजयाचा संभव कसा काय आहे, असा प्रश्न मीं मोल्टके यांस केला, तेव्हां ‘आपलाच जय होईल’ असें उत्तर त्यानें मला दिलें. त्या दोघांनाहि क्षणभर थांबावयास सांगून मी बाजूच्या एका लहान टेबलाजवळ गेलों आणि त्या दोनशें शब्दांचें सार सुमारें वीस शब्दांत तयार करून आणून त्या दोघांना दाखविलें. त्यांत अर्थाची फिरवाफिरव न करतां अथवा त्यांत पदरची भर न घालतां मीं तो मजकूर तयार केला होता. ॲबेकेन यानें एम्स येथून पाठविलेली तार तीच; पण तीच तार या नव्या स्वरूपांत अधिक लहान, अधिक निश्चयाची आणि कमी धरसोडीची झाली. ‘हा मजकूर कसा काय आहे?’ असा प्रश्न मी त्या दोघांस विचारतां ते दोघेहि खुष होऊन म्हणाले, ‘ठीक आहे. हें आतां चालेल.’ मी लिहिलेला मजकूर वाचतांच मोल्टके पुन्हां ताजातवाना आणि तरुण दिसूं लागला. आपला धंदा

पुन्हां तेजीला येणार एवढ्या विचारानें तो अगदीं खुष होऊन गेला. आमच्या अदमासाप्रमाणें अखेरीस घडून आलें. वर्तमानपत्रांत मी प्रसिद्ध करविलेला मजकूर पाहून फ्रेंच लोक रागानें अगदीं खवळून गेले आणि अठ्ठेचाळीस तासांच्या आंतच आम्हांवर युद्ध पुकारल्याचा खलिता फ्रेंच वकिलानें माझ्या हातीं दिला."

( ३९ )

ग्यास्टीनच्या तहाबद्दल बिस्मार्क यांनीं एकेवेळीं पुढील मजेदार हकीकत सांगितली. "ब्लोम याजबरोबर तहाच्या अटीसंबंधीं मी वाटाघाट करीत होतों. त्यावेळीं पत्त्यांचा क्विझ नांवाचा खेळ मी त्याजबरोबर खेळत होतों. यावेळीं मोठमोठ्या रकमा मी भराभर हारत गेलों. मनुष्याच्या बुद्धिमत्तेची व दानतीची परीक्षा या खेळांत होते, असा ब्लोम याचा समज असल्याचें मला ठाऊक होतें. मनुष्य जोखण्याचा हा ताजवा कितपत खरा आहे, हें ब्लोम मजवर अजमावीत होता. तेव्हां त्याच्या या मूर्खपणाच्या समजाचा फायदा घेऊन त्यालाहि एक चांगला धडा शिकविण्याचा निश्चय मीं केला. माझ्या खिशांतून गेलेले पांचचारशें रुपये मला सरकारी तिजोरींतून भरून घेण्यास हरकत नव्हती. कारण ही रक्कम वास्तविक सरकारच्या कामासाठीं खर्च झाली होती. मी भराभर रक्कम हारत आहें, हें पाहून हा मनुष्य अविचारी आणि धाडशी असावा, असें समजून ब्लोम यानें तहाच्या अटीसंबंधीं फारसा विचार न करतां मीं सांगितलेल्या अटींवर त्यानें मुकाट्यानें सही केली."

( ४० )

रुमानियाचा राजा चार्ल हा अडचणींत असतां पुढें काय करावें, याबद्दल बिस्मार्क यांची सल्ला त्यानें विचारली होती. याबद्दल बोलत

असतां प्रिन्स म्हणाले, " रुमानियावर कोणींहि राज्य केलें, तरी त्याबद्दल इंग्लंड आणि आस्ट्रिया बेपर्वा आहेत. फ्रान्स तर सध्यां हिशोबांतच नाहीं. झार आलेक्झांडर प्रत्यक्ष मदत करीत नसला, तरी चार्लेच्या बाजूचा आहे. जर्मनीचे हितसंबंध तेथें कसल्याच प्रकारचे नाहींत. अशा स्थितींत सुद्धां चार्लला आपलें घोडें पुढें दामटण्याचें धैर्य नसलें, तर त्यानें गादीचा राजीनामा देऊन स्वस्थ बसावें हेंच उचित आहे. राजकारणांत प्राप्त झालेली संधि ज्याला आपल्या उपयोगीं लावतां येत नाहीं, त्यानें त्या भानगडींत पडूंच नये."

सीन नदींतून एक लहानशी बोट पाठवून पारिस मधल्या इंग्रज कुटुंबास घेऊन जाण्याची परवानगी आम्हास द्यावी, अशी मागणी इंग्लंडनें फ्रँको-जर्मन युद्ध सुरू असतां केली होती. ही मागणी बिस्मार्क यांनीं अर्थातच नाकारली. या विषयासंबंधीं खाजगी रीतीनें बोलत असतां प्रिन्स म्हणाले, " या मागणीच्या आंतील डाव मला समजतो. सीन नदींत आम्ही कोठें सुरुंग टाकले आहेत कीं काय, एवढेंच त्यांना पहावयाचें आहे. म्हणजे मग फ्रेंच गलबतांना आंत शिरण्यास आयताच मार्ग मोकळा झाला. आम्ही मोठाल्या लढाया जिंकल्या, याबद्दल इंग्रजांस अत्यंत विषाद वाटत आहे. आमचा विजय त्यांना सहन होत नाहीं. प्राशियासारख्या क्षुद्र संस्थानानें असे विजय मिळविणें त्यांना बरें वाटत नाहीं. प्रशियन लोकांनीं इंग्लंडचे पैसे खाऊन त्याच्याच हितासाठीं युद्धें जिंकावींत, असें त्यांना वाटतें. यामुळें शक्य त्या रीतीनें आम्हाला इंग्लंड उपसर्ग लावीत असतें. आमच्याबद्दल इंग्लंडच्या मनांतील मत्सर आणि क्षुद्रभाव हीं आमच्या युवराज्ञीच्या ठिकाणींहि मूर्तिमंत अवतरलीं आहेत. आमच्या युवराजाबरोबर लग्न करण्यांत प्राशियन लोकांवर आपण मोठा उपकार केला, असें ती भासवीत

असते. एकेवेळीं तर ती मला असेंहि म्हणाली कीं, लिव्हरपूलच्या एकदोन व्यापाऱ्यांजवळच इतकी चांदी आहे कीं, प्रशियांतील साऱ्या सरदार घराण्यांतील चांदी गोळा केली, तरी ती तिच्या पासंगासहि पुरणार नाहीं. मीं उत्तर दिलें, 'राणी सरकार, आपलें म्हणणें कदाचित् खरें असेल; पण सोन्या चांदीपेक्षां ज्या दुसऱ्या कांहीं वस्तु आम्हा प्रशियनांजवळ आहेत, त्यांची किंमत आम्ही अधिक समजतों."

( ४१ )

एके वेळीं कांहीं शिळोप्याच्या गप्पा चालल्या असतां फावरची गोष्ट निघाली. तेव्हां प्रिन्स म्हणाले, "पारीस मधील हवा खाण्याच्या ठिकाणीं सुंदर पोषाकांच्या स्त्रियांची गर्दी अजूनहि असते, असें फावरनें मला सांगितलें. मीं त्याला म्हटलें, 'ही खरोखर मोठ्या नवलाची गोष्ट आहे. तुह्मी त्यांना अजून खावून कसें टाकलें नाहीं,'' इतक्यांत स्ट्राऊसबर्ग नांवाच्या एका लक्षाधिश व्यापाऱ्याचें नांव निघालें. याचें दिवाळें लवकरच निघणार, अशी बातमी कोणींशी सांगितली. तेव्हां प्रिन्स म्हणाले, 'मला माझ्या मालकीच्या घरीं मरण येणार नाहीं.' असें त्यानें स्वतःच मला एकदां सांगितलें होतें. तथापि नाना कुलंगडीं रचून आणि पुन्हःपुन्हां हुंड्या, काढून त्यानें आपलें गाडें कसेंबसें चालू ठेवलें होतें, आणि आतां युद्ध सुरू झाल्यामुळें त्याज जवळच्या कित्येक रोख्यांचे भाव इतके उतरले कीं, ते कसे मण विकतात, असें दलाल विचारूं लागले." पुढें गॉंबेटाची गोष्ट निघाली. तेव्हां प्रिन्स म्हणाले, 'युद्धाच्या गडबडींत त्यानें पन्नास लक्षापर्यंतची माया केली असल्याची बोलवा आहे. आणि नेपोलियननें आपल्या एकोणीस वर्षांच्या कारकीर्दींत पांच कोटींची रक्कम जवळ केली आहे. कोणी म्हणतात, आठ कोटी; पण मला तें खरें वाटत नाहीं. लुईफि-

लिप नांवाच्या त्याच्या हस्तकानें सारी घाण केली. त्यानें कांहीं बाजारी लोक गांठून त्यांच्या कडून बंडाची हूल उठविली आणि आमस्टरड्याम-च्या सराफकट्ट्यावर रोखे खरेदी करण्यास सुरूवात केली; पण व्यापाऱ्यांना हा डाव कळल्यामुळें सारेंच घोंगडें लुईफिलिपच्या गळ्यांत आलें. इतक्यांत नेपोलियनबद्दल कोणी अशीहि माहिती सांगितली कीं, सराफकट्ट्यावर आपल्याला अनकूल वधघट होण्याकरतां केव्हां केव्हां तो अजारीपणाचेंहि सोंग करी."

( ४२ )

यावर मोर्नी नांवाच्या पिटर्स्बर्ग येथील फ्रेंच वकिलासंबंधीं प्रिन्स यांनीं पुढील मजेदार हकीकत सांगितली. "नेपोलियनच्या कारकीर्दींत नाना प्रकारच्या युक्त्या करून पैसे मिळविण्याच्या कामांत मोर्नी फारच तरबेज होता. पिटर्स्बर्गला त्याची नेमणूक झाली, तेव्हां आपल्या खाजगीच्या म्हणून त्रेचाळीस गाड्या त्यानें बरोबर आणल्या होत्या. या गाड्यांत स्त्रियांचे उंची उंची पोषाक, रेशमी साड्या व दुसऱ्या चैनबाजीच्या वस्तु किती तरी भरल्या होत्या. तो फ्रेंच सरकारचा वकील असल्यामुळें या वस्तूवर त्याला अर्थातच कर पडला नाहीं. पिटर्स्बर्गला आल्यावर थोड्या दिवसांनीं हा सारा माल त्यानें आठ लक्ष रूबलांस विकला. मोर्नी हा अट्टल चोर होता; पण फार गोडबोल्या होता. पिटर्स्बर्गचे कांहीं अधिकारीहि पैसा घेण्यास नाखुष नसत. मात्र कोणापासूनहि ते प्रत्यक्ष पैसा घेत नसत; तथापि एकाद्याला त्यांच्या मदतीची जरूर लागली म्हणजे, ठरलेल्या फ्रेंच दुकानांत जाऊन हजारों रुपयांची खरेदी तेथें तो करी. असलीं कांहीं दुकानें अधिकाऱ्यांमार्फत चालत असत, ही गोष्ट तेथें महशूर होती."

( ४३ )

राज्यशासनपद्धतीबद्दल भाषण निघालें असतां प्रिन्स म्हणाले, " जर्मन लोक चांगल्या नेतृत्वाखालीं असले, आणि एका हुकुमतीखालीं ते बद्ध झालेले असले, म्हणजे ते अगदीं आजिंक्य होतात. त्यांच्या धडाडीपुढें कोणाचीहि मात्रा चालावयाची नाहीं. पण जर त्यांना त्या एकसूत्रांतून काढलें, तर ते ताबडतोब विस्कळीत होऊन मग जो तो आपणच राजा बनतो. युरोपांतील साऱ्या देशांच्या इतिहासांत याचा दाखला सांपडतो. ज्या ज्या देशांत जर्मन देशांतील लोकांनीं वस्ती केली, तेथें एकसूत्रानें ते वागत होते, तोंपर्यंत स्वत:बरोबर त्या देशांचीहि भरभराट त्यांनीं केली. रशिया, इटली, फ्रान्स, वगैरे देश या गोष्टीची साक्ष देत आहेत. फुलांत ज्याप्रमाणें स्त्रीकेसर आणि पुंकेसर असतात, त्याप्रमाणें युरोपखंडांत जर्मनवंश पुंकेसरासारखा असून सेल्टीक, स्लाव, वगैरे वंश स्त्रीकेसरासारखे आहेत. एकंदरीनें पाहतां एकमुखी राजसत्ता अधिक कल्याणकारक आहे, असें माझें मत आहे. आतां ती सत्ता प्रगल्भबुद्धीच्या मनुष्याच्या हातांत असली पाहिजे, ही गोष्ट मात्र खरी. एकमुखी सत्तेचें तत्व अंशत: तरी स्वीकारल्यावांचून कोणत्याहि राष्ट्राचा निभाव लागणार नाहीं. राजशासन सत्ता पुष्कळ हातीं विभागली गेली, म्हणजे राज्याची घडी विस्कळित झाल्यावांचून रहात नाहीं. ही सत्ता बारभाईच्या हातीं गेली, म्हणजे प्रत्येकजण राज्याचा गाडा आपापल्या परी पाहतो. यामुळें धोरणांतील एकसूत्रीपणा जावून घड्याळाच्या लंबकाप्रमाणें तें हेलकावे खाऊं लागतें. क्षुद्र कामेंहि निरर्थक लांबणीवर पडतात. आतां पूर्वींची सुलतानी सत्ता जगांत कोठेंच अस्तित्वांत नाहीं. राजसत्तेचा हा प्रकार निजधामास जाऊन फार काळ लोटून गेला आहे. जगाचा ओढा दिवसेंदिवस लोकसत्ताक

पद्धतीकडे अधिकाधिक होत आहे. भविष्यत्काळीं जगावर लोकसत्ताक पद्धतीचाच पगडा बसण्याचीं चिन्हें दिसत आहेत; पण अलीकडचे लोकसत्तावादी म्हणून पुढें पुढें येऊं पाहणारे लोक मात्र मला अगदीं नापसंत आहेत. राजेहि आतां पूर्वीसारखे एकलकोंडे आणि वृथाभिमानी राहिले नाहींत."

( ४४ )

कांहीं दिवस युद्ध तहकूब ठेवण्यासंबंधीं बोलणें करण्याकरतां फावर आला होता. तो येऊन गेल्यानंतर तहकुबीच्या अटींसंबंधीं बोलत असतां प्रिन्स म्हणाले, "ग्यारिबॉल्डी संबंधीं कांहीं अटी मीं नाकबूल केल्या, याबद्दल फावरला थोडेंसें वाईट वाटलें. यापुढें होणाऱ्या लढायांत फ्रेंच लोक पकडले गेले, तर त्यांनां आम्ही कसें वागवावें, याच्या कांहीं अटी या तहकुबींत होत्या. याच अटी ग्यारिबाल्डीला व त्याच्या सैन्याला लागू कराव्यात असें फावरचें मत होतें; पण ही गोष्ट मी साफ नाकारली. वाटेल त्या फ्रेंच मनुष्यानें आम्हाविरुद्ध शस्त्र उचललें, तर तसें करण्याचा अधिकार त्याला आहे, असें मी समजतों; पण ग्यारिबॉल्डीसारख्या उपटसुंभ्याला हा हक्क कां द्यावा, हें मला समजत नाहीं. जगांतल्या साऱ्या भागांतले भुरटे लोक जमा करून उगीच घोंटाळा माजवूं पाहणाऱ्या या बंडखोरांना मी ते हक्क देऊं इच्छित नाहीं. 'ग्यारिबाल्डी दैववशात तुमच्या हातीं सांपडला, तर तुम्ही त्याचें काय कराल?' असा प्रश्न फावरनें मला केला. तेव्हां मी त्याला जबाब दिला कीं 'कृतघ्न' अशी चिट्ठी त्याच्या गळ्यांत बांधून आम्ही तिकिट लावून त्याचें प्रदर्शन करूं."

( ४५ )

फ्रेंचांचा तह लांबणीवर पडत चालला होता. नवी निवडणूक होऊन कायदेशीर लोकसत्ताक स्थापन व्हावें याकरतां उभय पक्षांच्या

संमतीनें कांहीं अटींवर युद्ध तहकूब झालें होतें; तथापि निवडणुक लवकर सुरू होण्याचें चिन्ह दिसेना. या बाबीसंबंधीं बोलतांना प्रिन्स म्हणाले, "फ्रेंच लोकांना व्यवहार कसा तो समजत नाहीं. साऱ्या गोष्टींत त्यांना मदत करण्याचें व सल्ला देण्याचें काम आम्हास करावें लागतें. पारीसच्या रहिवाशांना अन्नसामग्री मिळण्याची सवलत तहकुबीच्या अटींत आम्ही दिली; पण तिचासुद्धां उपयोग त्यांच्या रेलवे कंपन्या करीत नाहींत. या रेलवे कंपन्यांवर आज कोणाचाच ताबा चालत नाहीं. कारण कायदेशीर सरकार फ्रान्स देशांत आज नाहीं. फ्रान्सांत आतां कसलें तरी सरकार कायदेशीर रीतीनें लवकर स्थापन न होईल, तर त्यांच्या डोक्यावर मी राजा आणून बसवीन. मी सारी तयारी कडेकोट करून ठेवली आहे. स्पेनचा राजा नुसतें प्रवासी पाकीट हातांत घेऊन माद्रिदच्या स्टेशनावर उतरला; पण आमचा राजा सारा लवाजमा, प्रधानमंडळ, आचारी, पाणके शागिर्द, हुजरे आणि सैन्य यांसुद्धां प्यारीसमध्यें शिरेल."

( ४६ )

एके दिवशीं रपेट करण्याकरतां कांहीं मंडळीसह प्रिन्स पारीस जवळील सेंट क्लाऊड नांवाच्या राजवाड्याकडे गेले होते. सहल करून आल्यावर पारीसच्या स्थितीचें वर्णन करतांना ते म्हणाले, "आमच्या मंडळींत लष्करी पोशाकाचे लोक पाहिल्याबरोबर पुरुषांनीं क्रूर मुद्रा धारण केल्या. फ्रेंच स्त्रिया आम्हाकडे सस्नेह बुद्धीनेंच पहात होत्या; पण पुरुष मात्र छात्या वर काढून आणि उग्र मुद्रा करून आम्हाकडे पहात होते. यावरून नेपोलियनच्या वेळच्या एका शिस्तीच्या हुकुमाची मला आठवण झाली. निकराचा हल्ला चढवितांना 'मुद्रा क्रूर' असा एक हुकुमाचा शब्द होता. भपकेदार पोशाक, उठावदार चेहरा आणि

ढबदार भाषण एवढें असलें म्हणजे फ्रेंच लोक खुष होतात. खऱ्या नाण्यापेक्षां दिखाऊ ढब्बू त्यांना अधिक पसंत पडतो. एकाद्या मुत्सद्याच्या भाषणांत कांहीं महत्वाचा मुद्दा नसला, तरी त्यानें गांभिर्याचा आव घालून पुष्कळसे नाटकी हावभाव केले, म्हणजे फ्रेंच लोक त्याला मोठा मुत्सद्दी समजतात. कसलाहि महत्वाचा मुद्दा नसतां नुसतें शब्दावडंबर माजविण्याची कला अवगत असणें ही गोष्ट राष्ट्राला फार विघातक आहे. यामुळें पार्लमेंटांत भाषणें करण्याचें खूळ वाढत जातें. प्रत्येक जण कांहीं तरी चऱ्हाट वळून वेळाचा अपव्यय करीत असतो. पार्लमेंटांतील बहुतेक भाषणें वक्तयाच्या मुखांतून बाहेर निघालीं, कीं तीं थोडावेळ हवेंत तरंगून बाजूच्या खिडक्यांतून सरळ बाहेर निघून जातात. शेंपन्नास भाषणांत एकादेंच भाषण श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोहोंचतें. खरोखर लंबींचवडीं भाषणें करणें हा गुन्हा समजून त्याबद्दल शिक्षा व्हावी, असा कायदा झाला, तर त्यानें राष्ट्राचा फायदा अधिक होईल. ”

( ४७ )

आस्ट्रियन तहासंबंधीं एके वेळीं हकीकत सांगत असतां प्रिन्स म्हणाले, “ आस्ट्रियाकडून आम्हाला लढाईच्या खर्चाबद्दल तीन कोटीची रक्कम मिळाली. याहून बरीच मोठी रक्कम घ्यावी व शिवाय आस्ट्रियन सायलेशिया व बोहेमिया हे प्रांतहि घ्यावेत असा पुष्कळांचा मनोदय होता; पण पैशासंबंधीं पाहतां आस्ट्रियासारख्या भिकारी राष्ट्रा कडून अधिक पैसे मिळणें शक्य नव्हतें. बोहिमिया मिळाला असता तर मात्र आपणास एका सधन प्रांताचा लाभ झाला असता. आस्ट्रियाकडून हा प्रांत घ्यावा, असें त्या वेळीं पुष्कळ लोक म्हणतहि होते; पण हा प्रांत आह्मी घेतला असता, तर पुढें इतक्या अडचणी

उद्भवल्या असत्या, कीं त्यांत फायद्यापेक्षां तोटाच अधिक झाला असता. सायलेशिया प्रांत फारसा महत्वाचा नाहीं. आस्ट्रियाच्या मनांत आपल्या बद्दल कायमची तेढ ठेवणें इष्ट नाहीं. अशा स्थितींत तह करतांना आपणास शत्रूकडून किती मिळवितां येईल हें न पाहतां आपणास कसली जरूर आहे, इतकेंच पाहणें, हें मुत्सद्याचें कर्तव्य आहे. "

( ४८ )

प्रिन्स यांनीं एके वेळीं पुढील एक हास्यकारक गम्मत सांगितली. "मी एके वेळीं निकोसबर्ग येथें हिंडत असतां दोन पोलिस शिपायी एका माणसाच्या मागें लागलेले पाहिले. त्यानें काय गुन्हा केला, असें विचारतां एकजण म्हणाला, "कौंट बिस्मार्क यांची बेअदबी करण्यासारखे शब्द तो बोलला." यावर मीं उत्तर दिलें, बिस्मार्क यांची बेअदबी आणखीहि पुष्कळ लोक करीत असतील. हें उत्तर ऐकतांच ते दोन पोलिस मलाहि ठाण्यावर घेऊन जाऊं लागले; पण इतक्यांत त्यांची नजर चुकवून मी कसाबसा तेथून पोबारा केला. "

( ४९ )

या प्रसंगावरून मला आणखीहि एका गमतीची आठवण झाली. इ. स. १८६६ सालीं एके वेळीं आमच्या विजयी सैन्याची मिरवणुक बर्लिन मधून निघाली होती. मला त्या दिवशीं बरें वाटत नव्हतें म्हणून बाहेर कोठें जाऊं नका, असें बायको मला सांगत होती; पण तिचा डोळा चुकवून आणि एक साधा लांब कोट पांघरून मी बाहेर पडलों. वाटेंत एका नाक्यावर कांहीं माणसें जमून 'बिस्मार्क यांचा जय' असा घोष करीत होतीं. मी त्यांच्यांत न मिसळतां बाजूनें जात आहें, असें पाहून त्यांच्यांतील दोन चार इसम मजभोंवतीं जमा होऊन मलाहि जयघोष करण्यास सांगूं लागले. त्या मस्त झालेल्या

लोकांच्या म्हणण्याला मान न दिल्यास कदाचित् हातघाईचा प्रसंग येईल, असें पाहून मीहि ' बिस्मार्कचा जय ' म्हणून ओरडूं लागलों. "

( ५० )

फ्रेंचांकडून आम्ही पांडेचरी घेणार, अशी गप्प इ. स. १८७० च्या युद्धांत पसरली होती. याबद्दल बोलत असतां प्रिन्स म्हणाले, " वसाहतीचा उपयोग सध्यां आम्हाला कांहीं नाहीं. वसाहती म्हणजे सरकारच्या कांहीं जांवयांना पोसण्याच्या जागा होत. इंग्लंड आणि स्पेन हे देश तरी वसाहतींचा उपयोग इतकाच करीत आहेत. आम्ही सध्यां वसाहतींच्या मागें लागणें म्हणजे अंगांत घालायला सद्रा किंवा कोट नसतां मोठा रेशमी झगा करणाऱ्या एकाद्या जुन्या पोल सरदाराचें अनुकरण करणें होय. "

( ५१ )

आलसे लेरेन संबंधीं बोलतांना प्रिन्स एकदां म्हणाले, " फ्रेंचांनीं आम्हाला दहा पांच कोटींची रक्कम आणखी दिली, तर मेट्झ् सोडून द्यायला सुद्धां आम्ही कदाचित् तयार होऊं. त्याच्या पिछाडीला कांहीं मैलांवर सारब्रुकन किंवा फॉकनबर्गच्या जवळपास तटबंदीला योग्य अशी जागा सांपडेल. आपल्या घरांत इतक्या जवळ फ्रेंच लोकांना घेणें, मला इष्ट वाटत नाहीं. बेलफर्ट प्रांतहि सर्व फ्रेंचांनींच भरला आहे; पण मेट्झ् सोडण्याची गोष्ट मोल्टके बोलूंसुद्धां देत नाहीं. अर्थात् लष्करी बाबींत त्याचें म्हणणें खरेंहि असूं शकेल. "

( ५२ )

एके वेळीं तहाच्या अटींसंबंधीं बोलणें करण्याकरतां थियर्स येऊन गेल्यानंतर प्रिन्स म्हणाले, " आम्ही तहाच्या अटी सैलावल्या नाहींत, तर युरोपांतलीं राष्ट्रें मध्यें पडतील असा धाक थियर्सनें मला घातला.

तेव्हां मी त्याला जबाब दिला कीं, युरोपचें नांव तुम्ही काढाल, तर नेपोलियनचें नांव मी तुमच्यापुढें करीन. नेपोलियनच्यानें आतां काय होणार, असें ते म्हणाले. तेव्हां मी त्यांना सांगितलें, फ्रान्सचा शेतकरी वर्ग अद्यापि नेपोलियनच्या बाजूचा आहे. याशिवाय आमच्या हातीं असलेले सेनापति आणि लष्कर यांचें पाठबळहि नेपोलियनला खास मिळेल. या सैन्याला लागणारा दारूगोळा आम्हीं पुरवूं. अशाप्रकारें सज्ज होऊन फ्रान्सची सरहद्द नेपोलियननें एकवार ओलांडली कीं, फ्रान्स त्याचा झालाच. आमच्या भावी संरक्षणाला आवश्यक अशा अटी तुम्हीं कबूल न केल्या, तर नेपोलियनला पुन्हा आम्ही खास गादीवर बसवूं, असें मी त्यांना बजावलें. सध्यां थियर्सची स्थिति मोठी चमत्कारिक झाली आहे. त्यांना दोन्ही बाजूंनीं थपडा खाण्याचा प्रसंग येतो; पण आम्ही तरी काय करणार ? खंडणीच्या रकमेसंबंधीं थियर्स म्हणाले, ' आम्हाला या युद्धांत अतोनात खर्च झाला आहे. यामुळें आम्हापाशीं फारशी शिल्लक नाहीं. बाहेर देशांनीं आम्हाला पुरविलेला माल इतका सडलेला होता कीं, त्याचा फारसा उपयोग आम्हांस झाला नाहीं. एकाद्या शिपायाचा नुसता पाय घसरला, तर त्याच्या विजारीचे तुकडे होत. अमेरिकेंतून आलेल्या बुटाच्या तळव्यांत नुसते कागदाचे तुकडे भरलेले होते. त्यांनीं पुरविलेल्या बंदुकांची सुद्धां हीच तऱ्हा. ' थियर्सचें हें बोलणें ऐकून मी त्याला म्हटलें, ' एकादा मनुष्य तुम्हाला मारण्यासाठीं पुढें आला आणि त्याच्याशीं झालेल्या मारामारींत तुम्ही विजयी झालां, तर त्याजपासून भरपायी घेतांना त्याच्या काठीला किंमत किती पडली होती, याचा विचार तुम्ही करालं काय ?"

( ५३ )

परराष्ट्रांत ठेवलेल्या आमच्या वकिलांकडून येणाऱ्या खलित्यासंबंधीं बोलतांना प्रिन्स म्हणाले, " हे खलिते म्हणजे निव्वळ पांढऱ्यावर केलेले

काळे होय. याशिवाय अर्थशून्य आणि लांबलचक चऱ्हाटें वळून तीं ते आम्हाला वाचावयाला लावतात, तें वेगळेंच. कांहीं वकील जुन्यापान्या वर्तमानपत्रांतले उतारेसुद्धां खलित्यांत घालीत असतात. दर तीस वर्षांनीं सरकारी दप्तर लोकांस पहावयास सांपडतें. वास्तविक पाहतां इतका अवधी देखील ठेवण्याचें कारण नाहीं. एकादा नाजुक अथवा महत्वाचा मुद्दा असला, तर त्याचा उल्लेख खलित्यांत नसतां खाजगी पत्रांत असतो अथवा कित्येक वेळां हें काम तोंडी निरोपानें होत असतें. उदाहरणार्थ:—रशियाची बादशाहीण आमच्याशीं शत्रुत्व दाखविते, या गोष्टीचा मागमूसहि खलित्यांत लागावयाचा नाहीं."


( ५४ )

युरोपांतील सर्व देशांत सोशियालिस्ट प्रबळ होऊं पहात होते. त्यांना आळा घालण्याचा कांहींतरी उपाय शोधून काढावा अशा अर्थाचा पत्रव्यवहार आस्ट्रिया, रशिया, फ्रान्स, इंग्लंड व बेल्जम या देशांशीं बिस्मार्क यांनीं चालविला होता. ज्या देशांत राजसत्ता आहे, त्या देशांला तरी या लोकांकडून फार मोठें भय आहे, असें बिस्मार्क यांनीं आपल्या खलित्यांत म्हटलें होतें. सोशियालिस्ट पक्षाची विशेष मोठी संख्या फ्रान्समध्यें असून इंग्लडमध्येंहि हा पक्ष प्रबळ होऊं पहात होता. सर्व युरोपांतील सोशियालिस्टांनीं एकत्र होऊन एक प्रबळ युरोपिय सोशियालिस्ट संघ निर्माण करावा, या हेतूनें या पक्षाचे पुढारी लंडनमध्यें जमत असत. लंडन हें त्यांनीं आपलें मुख्य ठाणें केलें होतें. वास्तविक पाहतां जर्मनीमध्यें हा पक्ष तादृश्य प्रबळ नव्हता, यामुळें त्याबद्दल फिकिर वाळगण्याचें कारण बिस्मार्क यांस नव्हतें; पण हा प्रश्न इतक्या तांतडीनें सर्व राष्ट्रांपुढें आणण्यांत बिस्मार्क यांचे दोन हेतू होते. एक हेतु हा कीं निदान एका प्रश्नाच्या विचाराकरतां तरी युरो-

पचीं सर्व राष्ट्रें एका बैठकीला आणून त्यांचें परस्पर दळणवळण व स्नेहबुद्धि हीं वाढवावीं. दुसरा आणि मुख्य हेतु हा कीं, फ्रान्स आणि रशिया यांमधील तेढ कायम राखून आस्ट्रियाला आपल्या पक्षाला घ्यावें. सोशियालिस्टांची मोठी संख्या फ्रान्समध्यें असल्यामुळें त्या पक्षाच्या भयानें राजसत्ताधिष्ठित रशिया फ्रान्सकडे अर्थातच साशंक बुद्धीनें पाहील. आणि जर्मनी व आस्ट्रिया हे दोघेहि राजसत्ताक असल्यामुळें दोघांनाहि सामान्य असणाऱ्या भयाचें निवारण करण्याकरतां ते दोघेहि एक होतील. "

( ५५ )

"इ. स. १८७१ च्या तहांत फ्रान्सवर जर्मनीनें लादलेली खंडणीची रक्कम फ्रान्सला झेपण्यासारखी आहे कीं नाहीं, या प्रश्नाचा वादविवाद वर्तमानपत्रांतून कांहीं दिवस सुरू होता. ही खंडणी फ्रान्सच्या आवांक्याबाहेर आहे, असें कांहीं पत्रें म्हणत होतीं. तें कसेंहि असलें, तरी ती खंडणी दिल्यावांचून फ्रान्सला गत्यंतर उरलेलें नाहीं. अर्थात् फ्रान्सला आपल्या उत्पन्नाची उधळपट्टी पूर्वींसारखी करतां येत नाहीं. शक्य त्या रीतीनें उत्पन्न वाढवून खर्चाची प्रत्येक बाब अत्यंत काळजीपूर्वक त्यानें तपासली पाहिजे. असें असतांहि लष्कर अथवा आरमार यांत यत्किंचित सुद्धां काटकसर करण्याचें थियर्स यांच्या मनांतहि येत नाहीं. उलट या दोहोंची सारखी वाढ करण्याचा त्यांचा हेतु स्पष्ट दिसत आहे. बैठ्या सैन्यांत नऊ लक्ष माणसांची आणखी वाढ करावी अशी त्यांची सूचना आहे. यावरून युरोपचें नाक आपल्याच हातांत ठेवण्याची फ्रान्सची प्रबळ महत्वाकांक्षा यत्किंचितहि कमी झालेली नाहीं, असें स्पष्ट सिद्ध होतें. लष्कराबद्दलचा प्रश्न फ्रेंच प्रतिनिधींपुढें आला असतां त्यांनींहि हल्लींच्यासारख्या संकटाच्या वेळींहि लष्कर



फ्रेड्रिकश्रू—बिस्मार्क यांचा वानप्रस्थाश्रम.

वाढविण्यास अनुकूलता दाखविली; यावरून आम्ही त्यांजवर लादलेली खंडणीची रक्कम अधिक नसून कमी आहे, असेंच सिद्ध होतें. फ्रान्सला कोणत्याहि देशाकडून आज उपसर्ग लागण्यासारखा नाहीं. असें असतांहि आपलें लष्कर तो वाढवीत आहे, यावरून अनुकूल संधि सांपडतांच कोणातरी शेजाऱ्यावर तुटून पडण्याची त्याची इच्छा जागृत आहे, हेंच सिद्ध होतें."

( ५६ )

निरनिराळ्या जर्मन संस्थानांची संहति झाली, त्यावेळीं परस्परांत झालेल्या करारांत कांहीं संस्थानांना परदेशीं आपआपले वकील नेमण्याची सवड मिळाली होती; पण या सवलतीचा प्रत्यक्ष अम्मल व्हावा कीं नाहीं, याविषयीं बोलतांना प्रिन्स म्हणाले, " प्यारीसमध्यें जर्मन साम्राज्यातर्फे तीन चार वकील असणें फायद्याचें नाहीं. त्याच प्रमाणें फ्रेंच दरबारातर्फे जर्मन साम्राजांत बर्लिनवांचून अन्यत्र आणखी वकील असणे इष्ट नाहीं. कारण यामुळें आंतून लावालावी करून साम्राज्यांतील पोटांतील संस्थानांत फाटाफूट करण्याची संधि फ्रान्सला आयतीच मिळेल. इ. स. १८७० च्या युद्धापूर्वी आमच्यांत विलक्षण फाटाफूट झालेली आहे, अशा अर्थाचे रिपोर्ट फ्रेंच वकीलाकडून पारीस दरबाराला मिळाले नसते, तर कदाचित् तें युद्ध टळलेंहि असतें. बारक्या सारक्या दरबारच्या वकीलांना फारसें काम नसलें, तरी कांहींबांहीं रिपोर्ट करावे लागतातच. मग भल्याबुऱ्या वाटेल त्या गोष्टी ते लिहीत सुटतात. त्यांनीं तसें न केलें, तर यांचा उपयोग काय ? असा प्रश्न लोक करूं लागतील. आपली जरूर सरकारला आहे, असें भासविण्याकरतां पोलिस अधिकारी ज्याप्रमाणें कित्येक वेळां जसे निरर्थक खटले उपस्थित करीत असतात, तसाच उद्योग हे वकीलहि कित्येक वेळां करतात."

( ५७ )

रशिया व आस्ट्रिया यांशीं जर्मनीचें संबंध कसें असावेत, या विषयीं बोलत असतां प्रिन्स म्हणाले, “आमच्या बादशहांना रशियाचा अनावर मोह पडला आहे. रशियाबद्दल माझ्याहि मनांत स्नेहबुद्धि आहे, पण या बाबींत बादशहाइतका मी आंधळा नाहीं. रशिया विरुद्ध त्यांना कोणी कांहीं सांगितलें, तर ते त्यांना ऐकूंच येत नाहीं. रशियाचा एकादा डाव खडे मांडून त्यांना दाखविला, तर त्याकडे ते ढुंकून सुद्धां पहात नाहीं. आलेक्झांड्रोबो येथें आपण जाणे अनिष्ठ आहे, असें मीं त्यांना परोपरीनें सांगितलें, तथापि ते गेलेच. रशियानें चार लक्षांनीं आपलें लष्कर वाढविलें असून वाटेल त्यावेळीं चोवीस डिव्हीजन् सैन्य त्यांना एकदम उभे करता येईल. घोडदळाचे ठाणें आपल्या सरहद्दीच्या इतक्या जवळ ठेवलें आहे कीं, तीन दिवसांच्या आंत त्यांची टोळधाड जर्मनीवर पडूं शकेल. या गोष्टी आमच्या बादशहांच्या मुळींच लक्षांत येत नाहींत. बर्लिन घेऊन मग कॉन्स्टान्टीनोपल घ्यावें अथवा व्हिएन्नाच्या द्वारें तें सर करावें, अशा गोष्टी पिटर्सबर्ग येथें राजरोस चालतात. याकरतां आपणासहि कोणाचें तरी पाठबळ मिळविणें अवश्य आहे. आस्ट्रिया व रशिया या दोघांशीहि स्नेहभाव असावा, हें कोणाहि मनुष्याला इष्ट आहे; पण या दोघांपैकीं एकाशींच स्नेह जोडणें शक्य असेल, तर रशियापेक्षां आस्ट्रियाशीं तो जोडणें, हें अधिक श्रेयस्कर आहे. आस्ट्रियन साम्राज्यांत एक कोटी प्रजाजन जर्मन आहेत. हंगेरीयन लोक आपणांस सर्वथा अनकूल आहेत. स्लेच लोक आपणांवर प्रेम करीत नसले, तरी रशियाच्या विरुद्ध आहेत. इतक्या गोष्ट आस्ट्रियाशीं आपला स्नेह जोडण्यास पुरेशा आहेत. आस्ट्रियांत निव्वळ स्लाव लोकांची वस्ती आहे, असेंहि घटकाभर गृहित धरलें,

तरीहि त्याशींच स्नेह जोडणे आपणास फायद्याचें आहे. कारण रशिया स्वतःच इतका प्रबळ आहे कीं, त्याला आपल्या मदतीची अपेक्षा फारशी भासणार नाहीं. रशियाच्या मानानें आस्ट्रिया दुर्बल असल्यामुळें आपल्या मदतीची इच्छा त्याला सदोदित राहील. यामुळें आपल्या विरुद्ध कांहीं भानगडी करण्याच्या फंदांत तो सहसा पडणार नाहीं. या शिवाय आस्ट्रिया दुर्बल असला, तरी आपला मदतगार म्हणून त्याचा उपयोग आपणांस पुष्कळ होईल. युरोपची शांतता कायम राखण्याच्या कामांत आस्ट्रियाचें आपणास खास पाठबळ मिळेल. आस्ट्रिया व जर्मनी हीं दोन राष्ट्रें एक झालीं, तर या दुफळीवर हल्ला करण्यास सहसा कोणी धजावणार नाहीं. या बाबींत युवराजांचें मत माझ्या मताशीं अगदीं तंतोतंत जुळतें; पण ही गोष्ट आमच्या बादशहांच्या मनांत अद्यापि येत नाहीं. ”

( ५८ )

दुसऱ्या एका प्रसंगीं ते म्हणाले, “ रशिया आणि आस्ट्रिया यांज-मध्यें संधीचा योग येतो कीं काय अशी फार भीति मला वाटत होती. आस्ट्रियाशीं स्नेहभाव असावा ही कल्पना इ.स. १८५२ सालापासून माझ्या चित्तांत घोळत होती. जर्मन संहतींत आस्ट्रियानें प्रशियाच्या आड येऊं नये व त्याचें योग्य स्थान त्याला मिळूं द्यावें, म्हणजे अडचणीच्या प्रसंगीं त्याला आम्ही मदत करूं, असें बोलणें मीं तेव्हा लावलें होतें; पण आस्ट्रिया त्यावेळीं घोड्यावर असल्यामुळें या बोलण्याचा उपयोग झाला नाहीं. प्रशियासारख्या क्षुद्र संस्थानाची मदत आपणांस कितपत [illegible]गार ? अशी घमेंड त्यावेळीं त्याला होती. श्वाझेनबर्ग आम्हांस त्या वेळीं अगदीं तुच्छतेनें लेखीत असे. जर्मन संस्थानांच्या पुढारीपणाचा सारा मान एकट्या आस्ट्रियाकडेच राहिला पाहिजे, असा त्याचा कटाक्ष

( ६० )

इटलीसंबंधीं बिस्मार्क यांनीं एके वेळेस पुढील मत प्रगट केलें होतें. " नेहमीं दुर्बळ आणि सदां लोभी. लिसाच्या लढाईंत, त्यांच्या शूर आरमारानें कसा बेदम मार खाल्ला हें सर्वांस ठाऊक आहेच. आपलें अवशिष्ट आरमार घेऊन ॲडमिरल साहेब पळून गेले. इटालियन राष्ट्र आधींच गरीब आणि त्यांत तें कर्जांत बुडून गेलेलें असून कराच्या ओंझ्याखालीं लोक दडपून गेले आहेत. आस्ट्रियाच्या ताब्यांतील आपला मुलुख सोडविण्याचा नादीं लागण्यापेक्षां आपलें राहतें घर ते आधीं दुरुस्त करतील तर तें बरें. पूर्वी पोपच्या ताब्यांत असलेला मुलुख आणि नेपल्सचें राज्य हीं पुन्हां स्वतंत्र होतील असा माझा समज आहे. रशिया आणि इटलीया दोघांनाहि शांतता नको. रशियाला चार लक्ष चौरस मैलांचें राज्य अपुरें वाटत असून आणखी मुलुख जिंकण्याची हांव त्यास आहे. इटलीहि यापैकींच. "

( ६१ )

सरकार आणि मजूरवर्ग यांजमधील संबंध कसे असावेत, या विषयीं बोलतांना प्रिन्स म्हणाले, " मजूरवर्गाचें हित पाहणें हें सरकारचें काम आहे. मजुरांच्या वृद्धापकाळाची तरतूद सरकारनें अवश्य केली पाहिजे. आपणांस उदार मताचा म्हणविणारा पार्लमेंटांतला पक्ष याविषयीं अगदीं उदासीन आहे. सरकारनें या बाबतींत हात घालूं नये, असें त्याचें मत दिसतें. तथापि या संबंधाचा मसुदा पार्लमेंटपुढें मांडण्याचा माझा निश्चय आहे. यांत अडचणी येतील; तथापि त्या गोष्टीचा प्रारंभ करणें अवश्य आहे. मजूरवर्ग आणि सरकार यांमध्यें स्नेहभाव उत्पन्न होणें अवश्य आहे. ज्याच्या वृद्धापकाळाची तरतूद झालेली आहे, असा मजूर स्वाभाविकपणेंच अधिक संतुष्ट वृत्तीचा

असल्यामुळें तो बेफामपणें वागत नाहीं. ज्याला घर ना दार असा मनुष्य अगदीं बेपर्वा असल्यामुळें तो सरकारच्या विरुद्ध गेला, तर तो सरकाराला अधिक जाचक होत असतो. खाजगी नोकर आणि सरकारी नोकर यांच्यांतील फरक लक्षांत आणा. सरकारी नौकराला पेनशनाची आशा असल्यामुळें तो आपोआप जपून वागत असतो. अशा रीतीनें सरकार सोसियालिस्ट पक्षाला पाठबळ देत आहे, असा आक्षेप मजवर कांहीं घेतात; पण त्याची पर्वा करण्याचे फारसें कारण नाहीं. याला पुष्कळ खर्च होईल ही गोष्ट खरी; पण त्याला उपाय नाहीं. सरकारी तिजोरीनें आपल्या गरीब प्रजाजनांच्या हितासाठीं एवढें औदार्य दाखविलेंच पाहिजे. मजूरवर्गाची सहानुभूति मिळविण्याला कितीहि किंमत पडली, तरी ती थोडीच. सरकार म्हणजे नुसता पैसा वसूल करणारी संस्था नसून प्रसंगीं तिजकडून आपणास मदतहि मिळते, अशी भावना मजुरवर्गाच्या मनांत उत्पन्न झाली पाहिजे. सरकार म्हणजे पुष्कळ नफा मिळवून आपली तिजोरी भरूं पाहणारी व्यापारी संस्था नव्हे.

" सरकार आपलें हित कांहींच पहात नाहीं, या समजामुळेंच मजूरवर्ग सरकारविरुद्ध बिथरत असतो. याकरतां त्यासाठीं कांहीं पैसा खर्च करणें म्हणजे राज्याचा विमा उतरणें होय. मजुरवर्ग फिसकटून त्यानें बंडावा केला, तर थोडाशा महिन्यांत सरकारचे अतोनात नुकसान तो करूं शकेल. त्यापैक्षां त्यांना संतुष्ट राखण्यांत कमी खर्च येईल. "

समाप्त.

# अगत्यपूर्वक विनंति.

ग्रंथमालेनें श्री छत्रपति शिवाजीमहाराज वगैरे सारखीं जीं कांहीं महत्वाचीं कामें हातीं घेतलीं आहेत, त्यासाठीं कागदाची खरेदी मोठ्या प्रमाणांत करतां यावी म्हणून पैशाची फार गरज आहे. हा पैसा योग्य व्याजानें कर्जाऊ घेण्याचें आम्हीं योजिलें आहे. तेव्हां ग्रंथमालेवर ज्यांचा विश्वास असेल त्यांनीं यावेळीं ग्रंथमालेस शक्य तें द्रव्य सहाय्य अवश्य करावें. हें कर्ज खालील शर्तीवर घेण्याचें ठरविलें आहे. ( १ ) व्याज दरसाल दर शेंकडा नऊ टक्याप्रमाणें. हें व्याज प्रत्येकवर्षीं मनीआर्डरीनें पाठविलें जाईल. ( २ ) रकमेची फेड तीन वर्षांच्या आंत केली जाईल. ( ३ ) जे गृहस्थ ग्रंथमालेस कर्जाऊ पंचवीस रुपये देतील, त्यांना पुढें प्रकाशित होणारें प्रत्येक साध्या बांधणीचें पुस्तक ग्रंथमाला मोफत व पदरखर्चानें पाठवील. ( ४ ) जे गृहस्थ पन्नास रुपये कर्जाऊ देतील त्यांना ग्रंथमालेचें पुढें प्रकाशित होणारें प्रत्येक कापडी बांधणीचें पुस्तक मोफत व पदरखर्चानें पाठवील. ( ५ ) सर्व कर्जाऊ रक्कम कागदाच्या खरेदींतच गुंतविली जाईल. ( ६ ) या कर्जासंबंधाची, पोंच व सर्व हिशोब वगैरे वेळोवेळीं प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत दाखल केला जाईल.

**प्रभाकर श्रीपत भसे.**

व्यवस्थापक-**भारत-गौरव-ग्रंथमाला.**

**गिरगांव-मुंबई.**